म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. 92369



म
ग्र
रा
धा
र
म
ण

REFBK-0007252

★

# समग्र "राधारमण"

REFBK-0007252

REFBK-0007252

किंमत सात रुपये

: प्रकाशक :
**चि. कृ. लिमये**
३/११ अग्रवाल नगर,
व्हीन्सेंट रस्ता, मुंबई १९.

: मुद्रक :
**वि. ग. माटे**
"विश्वकर्मा" पॅकर्स अॅण्ड प्रिंटर्स
११६६/२ टिळक रोड, पुणें २.

## —: अर्पण पत्रिका :—

ज्यांच्या पुण्याईनें मला हे दिवस दिसले, ज्यांचा चिर सहवास मला न
लाभतांही ज्यांची पुण्याई त्यांच्या मित्रद्वारें माझ्या अभिवृद्धीस
कारणीभूत झाली, ज्यांच्या निःस्वार्थी, बाणेदार व उदार अंतः-
करणाची जाणीव मला सतत राहील अशा घटना घडल्या,
जे तत्कालीन कविमंडळांत ‘ प्रति मोरोपंत ’ म्हणून
म्हटले जात, परंतु ज्यांचें काव्य मात्र समग्रपणें
जगाचें निदर्शनास आमच्या आणि महा-
राष्ट्राच्या कमनशिबानें आतांपर्यंत
लुप्तप्राय झालें होतें,

त्या माझ्या पूज्य पितार्जींच्या चरणीं ही त्यांची वाङ्मयश्राधांजली पितृऋणाचें ब्रह्मार्पण म्हणून अर्पण करीत आहें.

विनीत,

**चिंतामणी कृष्णाजी लिमये**



कै. कृष्णाजी पांडुरंग लिमये

तथा

कवि "राधारमण"

| जन्म | मृत्यू |
| --- | --- |
| श्रावण व ॥ १३ शके १७९९ | कार्तिक शु ॥ १३ शके १८४४ |

# : निवेदन :

उशिरां कां होईना--पण " समग्र राधारमण " हा ग्रंथ मराठी वाचक-वर्गापुढें ठेवण्याचें काम माझ्या हातून घडलें याबद्दल मला आनंद तर वाटतो आहेच; पण त्याहीपेक्षां मी एक कर्तव्य केलें; याची जाणीव मला जास्त समाधान देत आहे. आपल्या हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें व्यक्तिमात्राला अंतकाल-पावेतों पंचऋणांतून मुक्त व्हावयाचें असतें. मातृऋणानंतर पितृऋण. तें तितकेंच महत्वाचें असतें. माता मी बाल्यावस्थेंत असतानाच निवर्तल्यामुळें, माता-पिता दोन्ही जबाबदाऱ्या आमचे पिताजींना स्वीकाराव्या लागल्या; आणि त्या त्यांनीं अखेरपर्यंत व्यवस्थित पार पाडल्या. या ऋणांतून अंशतः पार पडण्याची संवेदना व चालना पिताजी कै. 'राधारमण' यांच्या पुण्याईनेंच मिळाली व त्यामुळें थोडें हायसें वाटलें.

कै. 'राधारमण' तारीख १ नोव्हेंबर सन १९२२, या दिवशीं इहलोक सोडून गेले, आणि आमच्या पदरीं पोरकेंपण आलें. त्याच क्षणाला त्यांचीं काव्यापत्येंही पोरकीं झालीं हें सांगावयाला नकोच. या पोरकेपणामुळें लहानपणीं मला त्यांच्या काव्यांची कांहीं कल्पनाच नव्हती. त्याचप्रमाणें त्यांचा कवी म्हणून थोरपणा आणि वाङमयक्षेत्रांतील त्यांचें स्थान याचीही कांहीं कल्पना नव्हती. तथापि त्यांच्या मित्र-शिष्य वर्गांतील ज्यांचा माझेपाशीं संबंध येई, त्या सर्वांची 'मी राधारमणांचा मुलगा' म्हणून माझेकडे पाहाण्याची एक विशिष्ट दृष्टि असे; आणि यांतच या 'समग्र राधारमण' या ग्रंथ प्रकाशनाचा उगम आहे.

अगदीं लहानपणींच पोरकेपण प्राप्त झाल्यामुळें पिताजींच्या चरित्राच्या रूपरेषेचीही जुळवाजुळव करणें हें काम अत्यंत जड आणि कठीण होतें. तथापि त्यांच्यावर सादर प्रेम करणारा त्यांचा मित्रवर्ग आणि शिष्यवर्ग बराच मोठा असल्याकारणानें, उदिष्ट कार्य--चरित्राची माहिती मिळविणें, ती पडताळून निश्चित रूपरेषा आंखणें, त्यांचें इतस्ततः विखुरलेलें प्रकाशित व अप्रकाशित काव्य फार मेहनतीनें मिळविणें, आठवणी जमा करणें, इत्यादि कामें साधून यथा शक्य पूर्ण करण्यास, त्या सर्वांच्या प्रोत्साहनाचा व सह-

कार्याचा फार उपयोग झाला. त्यामुळें त्या सर्वांचा मी ऋणि असून, त्याबद्दल मी येथें त्या सर्वांचे उघडपणें आभार मानितों. या कार्यासाठीं लागणाऱ्या आर्थिक मदतीची जरी मीं कोणापासून अपेक्षा करीत नाहीं, तथापि तो बोजा मला जडच आहे; परंतु पिताजींच्या पुण्याईनें तोही बोजा त्यांचे चहाते, मित्र व शिष्यवर्ग ह्यांमार्फत हलका होईल अशी उमेद ठेऊन मी हें त्यांचें वाङमयश्राद्ध करण्याचें पक्कें ठरवून त्या उद्योगाला लागलों.

मी स्वत: लेखक तर नाहीच, पण निबंध लिहिण्याइतकाही लायक आहें असें वाटत नाहीं. म्हणून जमविलेल्या माहितीच्या आधारें त्यांचें त्रोटक चरित्र लेखनाचें काम, त्यांच्याविषयीं विशेष आदर असणारे त्यांचे एक शिष्य—दापोली येथील ए. जी. हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. सी. ल. तांबे, बी. ए., बी. टी. यांना विनंती करतांच त्यांनीं तें पत्करलें. ह्याबद्दल मी तर त्यांचा ऋणी आहेंच; परंतु त्यांच्या गुरुजींच्या वाङमयश्राद्धासाठीं तिलांजली देण्याचें भाग्य त्यांना लाभलें हाही एक महत्वाचाच योगायोग म्हणावयाचा.

राधारमण हे स्वत: काव्यमय होते. अर्थात् प्रस्तुत ग्रंथांतील मुख्य भाग काव्य हाच आहे. ती त्यांची काव्यसंपत्ति बरीच मोठी असूनही ती आतांपावेतों अंधारांतच होती, त्यांच्या काव्यांचा कांहीं भाग तत्कालीन नियतकालिकांतून आणि केसरीआदि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला होता. परंतु त्यांचा काव्यौघ मोठा असल्यानें तो त्यावेळींच जनतेपुढें यावा अशी त्यांची स्वत:ची इच्छा व प्रयत्न होता, असें त्यांनी डिसेंबर सन १९१४ सालीं ' विहार ' मासिकांत प्रसिद्ध केलेल्या पुढील विनंती विज्ञप्ति पत्रकावरून दिसून येतें.

## —" काव्य–जीवन "—

या सर्व साधारण नांवाखालीं आपला कविता संग्रह छापून प्रसिद्ध करण्याचा हेतु आहे. प्रत्येक खंडाची किंमत आठ आण्यांहून अधिक असणार नाहीं. एक खंड प्रसिद्ध झाल्यापासून वर्षाचे आंत दुसरें खंड प्रसिद्ध केलें जाणार नाहीं. तरी ग्राहकांनीं खालील पत्त्यावर नांवें नोंदवावीं.

आपला आश्रयाभिलाषी,

**कृ. पां. लिमये.**

( राधारमण )

मु. दापोली, जि. रत्नागिरी.

परंतु हें कार्य त्यांचें हातून सिद्धीस गेलें नाहीं.

आमच्या घरगुती संग्रहांत त्यांचा प्रसिद्ध व अप्रसिद्ध काव्यभाग थोडा-फार होता. आणि त्यांतील कांहीं भाग अनपेक्षित रीत्या श्री. रा. वा. दातार ॲसिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांचे पाहण्यांत सन १९२३ मध्यें आला. आणि जेथें तो त्यांना आढळला त्यांचे परवानगीनें तो त्यांनीं आस्थेनें जमवून, इतकीं वर्षें जतन करून माझा हा बेत ठरल्याचें कळतांच तो सर्व संग्रह माझेकडे पाठवून, मला उपकृत केलें हें नमूद करणें माझें कर्तव्य आहे. त्यांचेकडून जर मला तो मिळाला नसता तर त्यांचें अप्रसिद्ध काव्य मला प्रसिद्धच करितां आलें नसतें. मुळांत माझेजवळ अजिबात कांहीं नव्हतें, परंतु कवी 'राधारमण' यांच्या चहाते, मित्र, शिष्य वर्गानें प्रसिद्ध वा अप्रसिद्ध ज्याच्याकडे जें होतें तें पाठवून मी हातीं घेतलेल्या या कार्याला हातभार लावला, त्या सर्वांचें आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

त्यांच्या काव्याचें परीक्षण करणें वा परामर्श घेणें हें काम महाराष्ट्र-कवि-वर्गाचे आणि विद्वज्जनांचें आहे. पण महाराष्ट्रीय काव्यगंगेचा एक फाटा-भाग, आज महाराष्ट्रापुढें ठेवण्याचें काम माझ्या हातून घडलें ह्याबद्दल मला आनंद वाटतो. पण पूज्य पिताजींच्या पुण्याईचाच हा परिणाम असें मी समजतों.

व्यक्ति आणि त्याच्या आठवणी हाही एक चरित्राचा भाग असतो. त्यांचे शिष्य, मित्र, चहाते, सहाध्यायी व समकालीन लोक अजूनही बरेच असल्यानें त्या सर्वांचें माहितीसाठीं म्हणून वृत्तपत्रांतून जाहीर विनंती देऊन 'राधारामण' यांच्याविषयींच्या 'आठवणी' मागविल्या. कवी 'राधारमण' कैलासवासी झाल्याला दोन तपाहून जास्त काल लोटला असूनही अनेकां-कडून कवी 'राधारमण' यांच्याबद्दल त्यांचें मनांत वसलेलें गाढ प्रेम-आदर व्यक्त करणारीं पत्रें आलीं, आणि बत्तीस जणांनीं तर प्रत्यक्ष आठवणी पाठवून आपलें हृद्गत व्यक्त केलें. प्रस्तुत ग्रंथ अपेक्षेपेक्षां जास्त मोठा झाल्यानें आलेल्या सर्वच आठवणी जशाच्या तशा न छापतां सोबत जोडलेल्या कवी 'राधारमण' यांचे चरित्रांत अंतर्भाव झालेला नाहीं, आणि ज्यावरून व्यक्तीचा स्वभाव विशेष वा इतर कांहीं गोष्टी सहज समजतात, अशाच आठवणींचा भाग या ग्रंथाला जोडला आहे. तथापि आठवणी पाठविणारांचा मी अत्यंत ऋणी आहे.

राधारमणांच्या चरित्राचा व काव्याचा परिचय महाराष्ट्रीय वाचकांना कोणा सहृदय व अधिकारी व्यक्तिकडून व्हावा अशी इच्छा होती; व ती आपला अमूल्य वेळ मोडून, पूर्ण केल्याबद्दल आचार्य भागवत यांचे आभार मानणें जरूर आहे. याशिवाय या ग्रंथाचे नवोदित मुद्रक 'विश्वकर्मा' यांचेही आभार मानणें जरूर आहे. कारण त्यांनीं हें काम फार आपुलकीनें केलें आहे. या प्रकाशनाप्रीत्यर्थ मला अनेकांनीं अनेक प्रकारें अगदीं आपुलकीनें मदत केली आहे; श्री. वि. मो. केळकर, रा. वा. दातार, सी. ल. तांबे, गो. द. गोखले, व्रा. गो. मायदेव, गो. प्र. भावे व साने गुरुजी यांचे मदतीशिवाय माझे हातून हें कार्य तडीसच गेलें नसतें. ह्या आणि इतर ज्यांनीं हा पितृवाङ्मयश्राद्ध संकल्प तडीस नेण्यास मदत केली त्या सर्वांचा मीं फार ऋणी आहें.

कार्तिक शु. १३ शके १८७१<br>
तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १९४९

प्रकाशक,<br>
**चिंतामणी कृष्णाजी लिमये**

# : अ नु क्र म णि का :

## भाग १ ला

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | निवेदन | |
| २. | कवि चरित्र | १ |
| ३. | आठवणी | ४३ |
| ४. | काव्य-स्वरूप | ५९ |

## भाग २ रा काव्य

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | कालचक्र | ३ |
| ३. | फडणीस काव्य | ४३ |
| ४. | मोरोपंतांचा प्रभुद्रोह | १५७ |
| ५. | आर्यमाता विलाप | १८३ |
| ६. | महाराष्ट्र वीरादर्शकाव्य | २०७ |
| ७. | गजासुरवध (अपूर्ण) (सर्ग १ आणि २ फक्त). | २३५ |
| ८. | किरातार्जुनीयाचें रूपांतर (अपूर्ण) (सर्ग १ ते ६ फक्त) | २६५ |
| ९. | जहाल आणि मवाळ | ३१३ |
| १०. | दैवाचा खेळ | ३३३ |
| ११. | स्फुट कविता | ३४९ |
| १२. | शुद्धी पत्र | ४४७ |
| १३. | टिपा | ४५८ |

# भाग एक

★

कवि चरित्र, वगैरह

# कवि 'राधारमण' यांचें चरित्र

★

लेखक :—

सी. ल. तांबे,
बी. ए., बी. टी.
हेडमास्तर-ए. जी. हाय स्कूल,
दापोली.

द्वा. क्र. ६२५२

# कै. कृष्णाजी पांडुरंग लिमये

उर्फ

# राधारमण कवि

( जन्म-१८७७ मृत्यु १९२२ )

## अल्प चरित्र

सत्यपूतां वदेद् वाचम्।

कृतं न नश्यति।

**पहिल्याच भेटींत**

सन १९११ सालचीं गोष्ट. चिपळूण येथील युनायटेड इंग्लिश स्कूलमध्यें पांचवी इयत्ता पास होऊन तेथें त्या वेळीं सहावी इयत्ता नसल्यामुळें पुढील अभ्यासक्रमासाठीं मी दापोली मिशन हाय स्कूलमध्यें आलों. शाळेंत कोणीहि शिक्षक किंवा विद्यार्थी माझ्या ओळखीचे नव्हते. शाळेंत आल्यानंतर प्रि. रेव्हरंड गॅडनेसाहेब यांजकडे नांव नोंदवून मी सहावीच्या वर्गांत जाऊन बसलों. इंग्रजी, गणित, इतिहास, वगैरे विषयांचे शिक्षक आले. वर्गांत माझा नवीन चेहरा पाहून त्यांनी माझी जुजबी चौकशी केली आणि आपापले तास संपवून ते वर्गाबाहेर निघून गेले. मधल्या सुटीनंतर पहिल्याच तासाला संस्कृतचे अध्यापक आले. त्यांचा तो वाटोळा रक्तवर्ण चेहरा, तेजस्वी चमकदार डोळे आणि थांबत थांबत पण परिणामकारक अशी बोलण्याची ढब पाहून कांहीं अभूतपूर्व अशी अंतःसंवेदना मला झाली. मला पाहतांच त्यांनीं इंग्रजींत सवाल केला:

"What school do you come from?"

"I come from the United English School, Chiplun, Sir." मी उत्तर दिलें. "What was your score in Sanskrit in the last Annual?" त्यांनीं दुसरा प्रश्न टाकला. "Sixty-eight per cent, Sir." असें माझें उत्तर ऐकून ते म्हणाले, "That's a good number of marks" हीच माझी व राधारमणांची पहिली भेट. या प्रथम भेटीच्या वेळींच माझ्या हृत्पटलावर कधींहि पुसटला जाणार नाहीं असा ठसा उमटला व गुरु राधारमणांबद्दल आदरबुद्धि उत्पन्न झाली आणि आपल्या जीवनास इष्ट वळण लागणार अशी निश्चिति वाटूं लागली.

पुढें १९१३ सालीं मी मॅट्रिक होऊन मिशन स्कूलमधून बाहेर पडलों तों १९१८ सालीं बी. ए. झाल्यावर एकदोन वर्षें इकडेतिकडे नोकरी केल्यानंतर १९२० सालीं शिक्षक म्हणून दापोली मिशन स्कूलमध्यें आलों. तेव्हां कवि 'राधारमण' हेच शाळेचे मुख्य अध्यापक होते. त्यांचें सान्निध्य मला केवळ दोन वर्षें लाभलें. सन १९२२ च्या दिवाळीच्या सुटीच्या अखेरीस निर्घृण काळानें त्यांच्यावर अवचित झडप घातली व राधारमणांच्या आयुष्याच्या ग्रंथाचा अकालीं शेवट झाला! तथापि या दोन वर्षांच्या अवधींत शिक्षकाच्या धंद्यास उपयुक्त व आवश्यक अशा कितीतरी गोष्टी मला त्यांच्यापासून शिकतां आल्या. आज त्यांचा मला फार उपयोग होत असून प्रसंगानुसार त्या मला राधारमणांची स्मृति दिल्यावांचून रहात नाहींत.

राधारमण आकस्मिक निधन पावले. त्या वेळीं त्यांचे चिरंजीव अल्पवयी होते. त्यांस आपंगणारा असा जवळचा नातेवाईकहि कोणी नव्हता असें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें त्यांचीच ज्या ठिकाणीं आबाळ झाली त्या ठिकाणीं राधारमणांच्या काव्यसंग्रहाची उपेक्षा झाली यांत कांहीं नवल नाहीं. त्यांची कांहीं हस्तलिखित कविता नष्ट झाली असण्याचाहि बराच संभव आहे. तथापि आज जी कविता उपलब्ध आहे ती सर्व हरप्रयत्नानें मिळवून तिचा संग्रह करावा व केवळ प्रतिवार्षिक पिंडप्रदान करून किंवा तिलांजलि देऊनच आपल्या

प्रेमळ व पूज्य पिताजींचा श्राद्धदिन साजरा करून मी सहतां काव्यप्रसिद्धीच्या रूपानें त्यांचें वाङ्मयश्राद्ध करावें व तें केल्यानें आपल्या वडिलांची स्मृति चिरंतन होऊन त्यांच्या अनेक आप्तसुहृदांसहि त्यांचें पुनरपि दिव्य दर्शन घडेल अशा विचारानें राधारमणांचे चिरंजीव रा. चिंतामणराव यांनीं काव्यप्रकाशनाची योजना आंखली व राधारमणांचें चरित्र मीं लिहून द्यावें अशी विनंति मला केली.

वास्तविक हें काम राधारमणांच्या जवळच्या नातेवाइकांपैकीं कोणा अधिकारी माणसाकडून किंवा त्यांच्याशीं समकालीन असणाऱ्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या एखाद्या सुहृदाकडून झालें असतें तर तें अधिक यथार्थ झालें असतें. परंतु आज तशी व्यक्ति राहिलेली नाहीं. किंबहुना राधारमणांची माहिती पूर्णपणें देऊं शकेल असेंहि कोणी नाहीं म्हटलें तरी चालेल. त्यामुळें हें चरित्रलेखनाचें काम केवळ अपरिहार्य कर्तव्य म्हणून करण्यास मीं प्रवृत्त झालों आहें. मात्र या योगानें सन १९११ ते १९२२ पर्यंतचा कालखंड पुन्हां माझ्या मनश्चक्षूंसमोर चलच्चित्रपटाप्रमाणें निघून जात आहे व राधारमणाच्या प्रेमळ दिव्य संगतीचा पुन्हां लाभ घडत आहे असा मनाला गोड भास होतो.

चरित्रलेखनाचें काम पत्करलें खरें; परंतु वाचकांना प्रथमच निवेदन केलें पाहिजे कीं, चरित्रलेखनाचें सर्वोत्कृष्ट साधन उपलब्ध असतांना वेळींच त्याचा फायदा न घेतल्यामुळें तें हातचें निघून गेलें. राधारमणांशीं बोलत असतांना ते स्वतःबद्दल असे कांहीं चुटके सांगत कीं त्यावरून अशी इच्छा उत्पन्न होई कीं राधारमणांच्या जीवनांतील घडामोडींचें संगतवार एकादें टांचण करून ठेवावें व कधीं काळीं त्यांचें चरित्र प्रसिद्ध होण्याचा सुयोग आला तर त्या वेळीं सदर टांचणाचा उपयोग करावा. ही कल्पना त्यांस पटलीहि होती. परंतु पुढें स्वतः त्यांनीं किंवा मीं कोणीहि त्या गोष्टीचा विशेष नेट न धरल्यामुळें तें तसेंच राहून गेलें आणि काळानें त्यांच्यावर अवचित आणि अकालीं घाला घातल्यामुळें तें साधन आतां कायमचेंच नष्ट झालें. आतां हळहळून काय उपयोग ? " गतं न शोच्यम् । स्थितस्य गतिश्चिन्तनीया " या न्यायानें मिळाले

ते धागेदोरे जमवून जुळवून हा चरित्रपट विणला आहे. यांत पुष्कळ उणीवा आहेत याची जाणीव मला आहे; परंतु त्यास नाइलाज आहे. माहिती पुरविण्याच्या कामीं ज्यांनीं मला बिनमोल साहाय्य दिलें त्यांत जालगांवचे सन्मान्य रहिवासी श्री. गंपूबाबा बर्वे व श्री. बापूसाहेब गोरे, गव्हें येथील श्री. सदानंदकाका करंदीकर आणि हल्लीं या जिल्ह्यांत ॲसिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून काम करीत असलेले श्री. रा. वा. दातार यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें जरूर आहे. चरित्रलेखन चालू असतांना माझे स्नेही रा. दातार यांनीं कांहीं फार उपयुक्त अशा सूचना केल्या व त्यांचा मला फार उपयोग झाला हें नमूद करून ठेवणें मी आपलें कर्तव्य समजतों.

दापोली तालुक्यांत जन्मास येऊन आपल्या अंगच्या कर्तबगारीनें दापोलीच्या नांवलौकिकांत भर घालणाऱ्या ज्या कांहीं लहानथोर व्यक्ति होऊन गेल्या व आजहि कांहीं हयात आहेत अशा व्यक्तींत राधारमणांची गणना होते.

## सुप्रसवा दापोली

वक्तशीरपणा व नियमितपणा या गुणांमुळें सुपरिचित असलेले व ब्रिटिश राजवटीच्या प्रारंभकाळांतील नांवाजलेले वकील कै. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक, प्रसिद्ध ज्योतिःशास्त्र-विशारद कै. शंकर बाळकृष्ण दिक्षित, स्वराज्यमंत्रद्रष्टे व महान् कर्मयोगी गीतारहस्यकार कै. लोकमान्य टिळक, प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर देऊन, समाजनिंदेची पर्वा न करितां स्त्री-शिक्षणाची प्रतिष्ठा वाढविणारे व त्या कार्यास स्वतःला वाहून घेणारे महर्षि अण्णासाहेब कर्वे, मुंबई विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु, संस्कृत विषयाचे महापंडित व विशेषतः धर्मशास्त्रांत अत्यंत पारंगत असलेले, आंग्लविद्याविभूषित महामहोपाध्याय श्री. पांडुरंग वामन काणे, पहिले सीनियर रँग्लर सर डॉ. र. पु. परांजपे, इत्यादि थोर व्यक्तींचा जन्म या दापोली तालुक्यांतच झालेला आहे. या थोर पुरुषांनीं राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि निरनिराळ्या क्षेत्रांत श्रेष्ठ दर्जाची कामगिरी करून भारताची कीर्ति दिगंत केली असल्यामुळें दापोली तालुक्यास मोठेपणा

मिळत आहे. या जगन्मान्य प्रथमश्रेणींतील व्यक्ति वगळून विचार केला तरी दापोलीला मोठेपणा प्राप्त करून देणाऱ्या द्वितीय श्रेणींत घालतां येतील अशा कांहीं व्यक्ति आहेत. त्यांत दापोली येथील छात्रालयाचे व विद्यालयाचे माजी चालक कै. नारायणराव गोगटे, त्याच विद्यालयाचे मुख्याध्यापक कै. मावळंकर, मिशन हाय स्कूलचे आद्यसंस्थापक खिस्तवासी रे. गॅडनेसाहेब व त्यांच्याच हाय स्कूलमधील उत्तम अध्यापक म्हणून आजहि ज्यांची आदरपूर्वक आठवण काढली जाते असे श्री. साने आणि श्री. वर्दे, त्या काळचे प्रसिद्ध कवि श्री. ना. मुजुमदार, इत्यादि व्यक्तींचा समावेश होतो. अशा व्यक्तींपैकींच राधारमण कवि हेहि एक होत.

कवि राधारमण यांचा मूळ गांव पाडलें. हा दापोली तालुक्याच्या उत्तर भागांत समुद्रकांठीं वसलेला आहे. या गांवांत ब्राह्मणांचीं सुमारें दहाबारा घरें असून त्यांत लिमयांचें घराणें प्रमुख व वजनदार असें प्रथमपासूनच गणलें जात आहे. गांवाची रचना सामान्यत: पश्चिमेकडून पूर्वेकडे जातांना प्रथम अरबी समुद्र, पुढें नारळीच्या बागा, नंतर थोडी वस्ती, पुन्हां नारळी-सुपारीच्या बागा व वस्ती, त्यापुढें शेतें व नंतर डोंगर अशी असून समुद्र ते डोंगर यांमधील अंतर सुमारें तीन फर्लांग आहे. गांवाची दक्षिणोत्तर लांबी ३।४ फर्लांग आहे. या गांवाला लागूनच उत्तरेच्या बाजूस आडें गांव अशाच प्रकारें पसरलेला असल्यामुळें दोन्ही गांवांमिळून एकच गांव आहे किंवा काय, असा नवीन येणारास भास होतो. राधारमणांचे वडील श्रीयुत पांडुरंगपंत लिमये हे घर-संसारी सुखवस्तु गृहस्थ असून ते घरीं राहून शेतीभाती, बागायत व इतर सर्व व्यवहार पहात असत. पांडुरंगपंतांस वासुदेव, कृष्णाजी, रघुनाथ व रामचंद्र असे चार मुलगे व चार मुली होत्या. सर्वांत वडील वासुदेवराव हे प्राथमिक शाळेंत शिक्षक होते. वडिलांच्या पश्चात् घरचा सर्व कारभार तेच पहात असत. द्वितीय चिरंजीव कृष्णाजीपंत म्हणजेच प्रस्तुत चरित्राचे नायक राधारमण कवि हे होत. तृतीय चिरंजीव रघुनाथराव हे राघोबा ऊर्फ अप्पा लिमये म्हणून विशेष प्रसिद्ध होते. ते प्रथम मुंबईस

तारखात्यांत नोकरीस होते. पुढें कांहीं घरगुती अडचणीमुळें ते नौकरी सोडून आले व अखेरपर्यंत आसूद येथील त्यांचे श्वशुर श्री. सीतारामबापू बिवलकर यांच्या घरीं स्थायीक होऊन राहिले. त्यांना ज्योतिषाचा विशेष नाद होता. चौथा मुलगा रामचंद्र हा लहानपणींच निवर्तला. चारी मुली सुस्थळीं पडलेल्या होत्या व पांडुरंगपंतांस गृहसौख्य एकंदरीनें बरें लाभलें होतें असें दिसतें.

कृष्णाजीपंताचा जन्म श्रावण वद्य १३ शके १७९९ म्हणजे ता. ५ सप्टेंबर १८७७ मध्यें पाडलें गांवीं झाला. त्यांचा बाळपणचा बराचसा काळ हूडपणांतच गेला. मराठी चार इयत्तांपर्यंतचें शिक्षण गांवांतील मराठी शाळेंत झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणासाठीं ते दापोली येथील मिशन हाय स्कूलमध्यें दाखल झाले.

## बालपण व विद्यार्थीदशा

दापोलीस रा. नारायणराव गोगटे यांनीं चालविलेल्या विद्यार्थीवसतिगृहांत ते रहात असत. या वेळीं राधारमणांची शरीरयष्टि बारीक असून दिसायला तें अगदीं किडकिडीत दिसत. परंतु वसति-गृहातील गणपति मराठे या नांवाच्या एका तालीमबाज ब्राह्मण सहाध्यायाच्या प्रोत्साहनामुळें राधारमणांसहि तालीम करण्याचा नाद लागून त्यांची प्रकृति चांगली सुधारली. लाठी, बोथाटी, कुस्ती व मलखांब या व्यायामप्रकारांची त्यांस विशेष आवड होती. पोहण्याचीहि त्यांस फार आवड असे. दापोलीनजीकच्या जालगांव या गांवांत एक चौरसाकृति भव्य तळें आहे. या तळ्यावर शेंकडों विद्यार्थी पोहण्यासाठीं जमत असत. शनिवार रविवार उजाडतात केव्हां व आपण पोहण्यासाठीं तळें गांठतों केव्हां, असें प्रत्येक विद्यार्थ्यास वाटत असे. या पोहणाऱ्या मंडळींत राधारमण नेहमीं सर्वांच्या पुढें असावयाचे. त्यांची पोहण्याची हौस अखेरपर्यंत टिकली होती. कारण १९२० ते १९२२ या अवधींत दापोली येथील मिशन हाय स्कूलमध्यें मी शिक्षकाची नोकरी पत्करून आल्यानंतर आरंभीं कांहीं दिवस माझें बिऱ्हाड राधारमणांकडेच होतें. पावसाळ्यांत तळ्यावर स्नानास जाण्याचा आमचा नित्यक्रम होता. तळ्यांत उतरल्या-

बरोबर एक सरळी मारून समोरची तड गांठायची व तसेंच परत मूळ ठिकाणीं यायचें, अंग चोळून साफसूफ करायचें, एकादुसरी बुडी मारायची व पुन्हां दुसरी सरळी मारून पूर्वस्थळीं परत आल्यानंतर लगेच तळ्यांतून बाहेर पडायचें असा आमचा नित्याचा परिपाठ होता. या वेळीं राधारमणांची चाळिशी उलटलेली होती. विद्यार्थीदशेंत राधारमणांनीं इतका संयम व प्रमाणशीरपणा राखला असेल असें वाटत नाहीं. तरुण मुलें पोहण्याच्या बाबतींत जेवढे जेवढे म्हणून विक्रम करतात तेवढे सर्व राधारमणांनीं केले असावे असें त्यांच्या तोंडून ऐकलेल्या गोष्टींवरून दिसतें. लीलेनें अर्धवर्तुळाकार पद्धतीनें हातामागून हात टाकीत सर्वांच्या पुढें जाऊन पैलतीर गांठणें हें त्यांच्या पोहण्यातील वैशिष्ट्य होतें. ते पाण्यांत फार वेळ तरंगू शकत नसत. परंतु पोहतांना दिसणारे सौंदर्ययुक्त अंगविक्षेप व पाण्यांतील द्रुतगतीचें सौकर्य हे त्यांचे पोहण्याच्या कलेंतले विशेष होते.

विद्यार्थीवसतिगृहांत असतांना राधारमणांची दिनचर्या काय असे, कोणत्या गोष्टींचा त्यांना विशेष नाद होता, काव्य लिहिण्याची स्फूर्ति केव्हां उद्भूत झाली, वगैरे गोष्टी कळण्यास मार्ग नाहीं. पांचव्या इयत्तेंत असतांना त्यांनीं "भस्मासुर" नांवाची कविता लिहिली असा उल्लेख मिळतो.

**काव्याची आवडहि लहानपणींच**

परंतु सदर कविता उपलब्ध नाहीं. इंग्रजी, मराठी व संस्कृत विषयाची अत्यंत गोडी राधारमणांस त्याच वेळीं लागली असावी असें दिसतें. श्री. साने मास्तर इंग्रजी काव्य शिकवीत, इंग्रजी गद्य व संस्कृत श्री. वर्दे मास्तर घेत असत व श्री. नारायणराव गोगटे मराठी शिकवीत असत. तिन्ही शिक्षक आपापल्या विषयांत तज्ज्ञ व शिकविण्यांत तरबेज असल्यामुळें आपणांस त्यांच्यापासून बराच फायदा मिळाला असें राधारमण म्हणत असत. विशेषतः तिन्ही विषयांतील काव्य त्यांनीं बरेंच आत्मसात् केलेलें होतें. मॅट्रिक परीक्षेस बसण्यापूर्वी संस्कृत पंचमहाकाव्यांचें त्यांनीं चांगलेंच अध्ययन केलेलें होतें, असें त्यांनीं अनेक वेळां सांगितल्याचें आठवतें. वसतिगृहांत रहाणाऱ्या विद्यार्थ्यांस

श्री. साने मास्तर वक्तृत्वहि शिकवीत असत. त्यासाठीं त्यांनीं इंग्रजी, संस्कृत व मराठी वाङ्मयांतील उत्कृष्ट उतारे विद्यार्थ्यांकडून पाठ करून घेतले होते. त्या वेळीं दसरा-संमेलन भरविण्याचाहि उपक्रम केलेला असून त्या प्रसंगीं पालक व नागरीक यांच्यासमोर जे कार्यक्रम केले जात त्यांत नाटय, संवाद, नकला यांचाहि समावेश केलेला असे. असल्या कार्यक्रमांत भाग घेण्यांत राधारमण हे नेहमीं पुढें असत. वेणीसंहारांतील अश्वत्थाम्याची भूमिका ते फारच उत्कृष्ट करीत असत, असें त्यांच्या वेळचे विद्यार्थी सांगतात. या काळांतील राधारमणांचे जिवलग मित्र म्हणजे कोळथरे येथील रहिवासी केशवराव मनोहर, श्रीवर्धनचे पुरुषोत्तम जोशी, जालगावचे रामजी दांडेकर व राजाभाऊ बर्वे व गव्ह्यांचे सदानंदकाका करंदीकर व बापूसाहेब गोरे हे होत. यापैकीं पहिले चार कालवश झालेले आहेत. या सवंगडयांसह क्वचित् प्रसंगीं लांबच्या सहली ते करीत असत. अशीच एक सहल रायगड किल्ला पहाण्या-करितां त्यांनीं काढिली होती. तिची अद्भुत व रोमांचकारी हकीकत ते सांगत असत. हंसतमुखपणा व विनोद हे जे राधारमणांचे स्वभावविशेष पुढील आयुष्यांतहि अखेरपर्यंत टिकून राहिले होते ते त्यांच्या वसतिगृहांतील जीवनक्रमांतहि पदोपदीं आढळून येत, असें आज हयात असलेले त्यांचे सम-कालीन सहाध्यायी सांगतात.

सन १८९४ सालीं राधारमण हे मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. याच सुमारास म्हणजे सन १८९५ सालीं दापोली येथें

**पोटभरू, शिक्षणांत कमनशिबी**

श्री. नारायणराव गोगटे यांनीं रे. गॅडनेसाहेबांच्या मिशन स्कूलला प्रतिस्पर्धी अशी दुसरी इंग्रजी शाळा काढली होती. त्या शाळेंत राधारमणांनीं पुढील शिक्षणास पुणें येथें जाण्यापूर्वी कांहीं दिवस शिक्षकाचें काम केलें. मिशन स्कूलमधून मॅट्रिक परीक्षेला बसून उत्तीर्ण झालेले रा. त्र्यंबक सीताराम कारखानीस ( यांनींच पुढें महाराष्ट्र नाटक मंडळी काढली ) व राधारमणांचे जिवलग स्नेही श्री. केशवराव मनोहर यांसहि त्या शाळेंत शिक्षक म्हणून

घेतलें होतें. येथें सुमारें दोन वर्षे काम केल्यावर पुढील शिक्षणक्रमासाठीं राधारमण हे सन १८९७ सालीं पुणें येथें फर्ग्युसन कॉलेजमध्यें दाखल झाले. कॉलेजमधील जीवनक्रम हा आयुष्यांतील एक अत्यंत सुखाचा काळ असतो. राधारमणांचा कॉलेजमधील जीवनक्रम कसा व्यतीत झाला तें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु ते बी. ए. झाले नाहींत. बी. ए. न होण्यास काय कारणें झालीं ती माहिती उपलब्ध नाहीं. तथापि आर्थिक परिस्थिति अनुकूल नसावी हेंच प्रमुख कारण असावें असें वाटतें. कारण तीन वर्षें कॉलेजचें शिक्षण झाल्यानतर त्यांस कॉलेज सोडावें लागून नोकरी धरावी लागली.

सन १८९५ सालीं राधारमणांचा विवाह मुरूड येथील रहिवासी श्री. गणपतराव ऊर्फ भाऊ बाळ यांच्या मुलीशीं झाला. पत्नीचें नांव राधा असें ठेवण्यांत आलें आणि आपल्या पत्नीच्या नांवास अनुलक्षूनच त्यांनीं 'राधारमण' असें काव्यमय नांव कवि या नात्यानें धारण केलें. या नांवावरून गडकऱ्यांच्या मीमांसेप्रमाणें कवीच्या काव्यरचनेचा प्रारंभकाळ तारुण्य हाच ठरतो. राधारमणांची पत्नी सौ. राधाबाई ही जुन्या वळणाची, बालबोध घराण्यातील सनातनी पद्धतीची आर्य महिला होती. व्रतवैकल्यें व उपासतापास करणें, पतीला देव मानणें, गोब्राह्मण, अतिथिअभ्यागतांस पूज्य मानणें व त्यांचा यथाशक्ति परामर्श घेणें, इत्यादि गोष्टींत आणि नित्याचीं प्रापंचिक कर्तव्यें पार पाडण्यांत त्या साध्वीचा बहुतेक वेळ जात असे. सौ राधाबाई साक्षर होत्या कीं नाहीं हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. त्या काळीं निदान कोंकण प्रांतांत तरी स्त्रीशिक्षणाबद्दल अनास्थाच होती. चूल आणि मूल एवढयाच गोष्टींशीं स्त्रियांचा संबंध, असा सर्व साधारण समज होता. तेव्हां या बाबतींत राधारमण अपवाद असतील असें वाटत नाहीं. एवढी मात्र गोष्ट खरी कीं जरी सौ. राधाबाईंना शालेय शिक्षण मिळालेलें नसलें, तरी शिक्षणाचें अंतिम ध्येय जें मनाचें औदार्य व कर्तव्याची जाणीव तें त्यांनीं गांठलें होतें. आपल्या पतीच्या मनोभावना समजून घेऊन व त्यांच्याशीं समरस होऊन संसारशकट सुरळीतपणें चालविण्याचें कौशल्य त्यांनीं संपादन केलें होतें.

त्यामुळें पतिपत्नीमध्यें अकृत्रिम प्रेमभाव उत्पन्न झालेला होता. इतका कीं सन १९१७ सालीं पत्नी निवर्तल्यानंतर त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें राधारमणांस द्वितीय-कुटुंब-संबंध करणें सहज शक्य असतांना, व तशी संधीहि प्राप्त झाली असतांना त्यांनीं तिचा फायदा घेण्याचें साफ नाकारलें. द्वितीय संबंध नाकारण्याचें एकमेव कारण म्हणजे प्रथम पत्नीविषयीं मनांत वसत असणारा आदर व प्रेमभाव हेंच होय असें प्रसंगानुसार तत्संबंधीं विषय निघाला असता ते जें प्रतिपादन करीत असत त्यावरून अनेकवार दिसून आलेलें आहे.

सन १९०१ सालीं कॉलेज सोडल्यानंतर राधारमणांनीं पुणें येथील सुप्रसिद्ध न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी पत्करिली. संस्कृत—त्यांतहि

**पोटासाठीं पुण्यास**

विशेषत: काव्य-हा त्यांचा अध्यापनाचा अत्यंत आवडीचा विषय होता. असें सांगतात कीं संस्कृत व्याकरण रा. एम्. पी. ओक यांनीं व संस्कृत वाङ्मय रा. के. पी. लिमये ( राधारमण ) यांनींच शिकवावें असें त्या वेळीं म्हटलें जात असे. दोघेहि आपापल्या शाखेंत पूर्ण पारंगत. ते शिकवूं लागले कीं विद्यार्थी अगदीं तल्लीन होऊन जात. राधारमण क्वचित् खाजगी शिकवणीहि करीत. कै. लोकमान्य टिळक यांचा वडील मुलगा जो विश्वनाथ त्याचे खासगी अध्यापक राधारमणच होते. स्वत: लोकमान्यांनींहि राधारमणांचें शिकवणें एकदोन वेळां पाहून आपली पूर्ण पसंती व्यक्त केली असल्याचें राधारमणांच्या तोंडून त्यांच्या निकट सहवासांतील मंडळींनीं ऐकलेलें आहे. दापोलीस येण्यापूर्वी पुणें येथेंहि त्यांनीं प्रायव्हेट संस्कृत क्लास चालविला होता व तो त्या वेळीं अत्यंत लोकप्रियहि झालेला होता.

राधारमणांस पुण्याची हवा फार दिवस मानवली नाहीं. सन १९०५ च्या सुमारास त्यांनीं आपलें सुप्रसिद्ध "फडणीसकाव्य" लिहिलें व त्यानंतर

**फ. काव्य व महर्षींचा आशीर्वाद**

त्यांस एक मेंदूचा विचित्र रोग जडला. बोलतां बोलतां एकाएकीं फिट यावयाची. डॉक्टरना बोलावून आणल्यावर त्यांनीं

प्रकृति तपासून पहावी तर ते चांगले शुद्धीवर असून सर्व कांहीं ठाकठीक चाललेलें आहे असें आढळून यावयाचें. डॉक्टर त्याला "मोमेन्टरी डेथ" असें म्हणत. पुष्कळ डॉक्टरी उपाय झाले; परंतु गुण आला नाहीं. कांहीं देशी वैद्यांचींहि औषधें घेऊन झालीं; परंतु तींही निरुपयोगी ठरलीं. तेव्हां स्वतः राधारमणहि निराश झाले. या रोगाला आपण बळी पडतों कीं काय, असें त्यांस वाटूं लागलें. सरतेशेवटीं दैवयोगानें त्यांस महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या भेटीचा योग आला. त्यांनीं औषध दिल्यानंतर थोडाबहुत गुण दिसूं लागला व त्यांनीं, "या रोगानें तुला मृत्यु कसचा येतो ? अजून तुझ्या हातून पुष्कळ कार्य व्हावयाचें आहे" वगैरे जे प्रोत्साहनपर उद्गार काढले त्यांच्यावर राधारमणांचा विश्वास बसला. तथापि राधारमणांनीं पुणें सोडून कोंकणांत जावें असा महर्षींनीं त्यांस सल्ला दिला. त्याला अनुसरून ते कोंकणांत यावयास निघाले. त्या वेळीं महर्षींनीं "पुन्हां कधीं असा प्रसंग आला तर हेंच औषध घे" असें त्यांस बजावून सांगितलें होतें. महर्षींचें हें भाकीत खरें ठरलें. सन १९१९ सालीं राधारमणांनीं "महाराष्ट्र वीरादर्श" हें काव्य लिहिलें. त्यानंतर पुन्हां त्यांना त्याच रोगानें पछाडलें. महर्षि अण्णासाहेबांच्या शब्दावर त्यांचा पूर्ण विश्वास असल्यामुळें त्या वेळींहि राधारमणांनीं पूर्वीं त्यांनीं सांगितलेले औषधोपचार केले व त्यांतून ते पूर्ण बरे झाले. तथापि त्यांची प्रकृति मात्र जी ढांसळली ती पुन्हां पूर्ववत् झाली नाहीं.

**कट्टर देशप्रेमामुळें पुन्हां कोंकणांत**

पुणें सोडण्यास राधारमणांस दुसरेंहि एक बलवत्तर कारण झालें. सन १९०८ सालीं कै. लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाच्या आरोपावरून खटला होऊन त्यांस हद्दपारीची शिक्षा सुनावण्यांत आली. राधारमण हे लोकमान्यांचे कट्टे भक्त असल्यामुळें लोकमान्यांस सरकारनें दिलेल्या त्या कठोर व दीर्घकालीन शिक्षेमुळें राधारमणांचा सात्त्विक संताप अनावर होऊन त्यांनीं "आर्यमाताविलाप" या नांवाचें अत्यंत खळबळ करून

सोडणारें काव्य लिहिलें. त्याची माहिती पुढें यथावकाश येईलच. त्या काव्यामुळें डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या तत्कालीन चालकांशीं मतभिन्नता निर्माण होऊन तिची तीव्रता इतकी वाढली कीं सदर संस्थेंत रहाणें राश्रा-रमणांस प्रशस्त न वाटून त्यांनीं संस्थेंतील आपल्या नोकरीचा राजिनामा दिला व महर्षीच्या सल्ल्यानुसार कोंकणांत जाण्याचा बेत त्यांनीं कायम केला व सन १९०६ सालीं ते इकडे कायमचे निघून आले.

सन १९०८ ते १९१४ पर्यंतचा तो काळ म्हणजे भारतांतील अत्यंत खळबळीचा काळ होता. त्या वेळीं स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, इत्यादि चळवळींबद्दल घोषणा देशाच्या वातावरणांत सर्वत्र दुमदुमत होत्या व त्यांचे पडसाद देशाच्या कोनाकोंपऱ्यांतून उठत होते. त्यांतील कांहीं पडसाद दापोली-सारख्या खेडेवजा गांवांतहि उठल्यावाचून राहिले नाहींत. रे. गॅडनेसाहेबांच्या मिशन हाय स्कूलमध्यें सरकारी छापाचें मिळमिळीत शिक्षण मिळत राहणार, मुलांच्या मनांतील राष्ट्रीय भावना उद्दीपित करून देशहितार्थ धडाडीनें कार्य करणारी तरुण पिढी निर्माण करणारें जळजळीत राष्ट्रीय शिक्षण मिळणें तेथें शक्य नाहीं, अशी तत्कालीन पुढारी मंडळीची ठाम समजूत होती. त्यामुळें तशा प्रकारचें शिक्षण देणारी संस्था काढण्याच्या बुद्धीनें प्रेरित होऊन कांहीं मंडळींनीं दापोली येथें राष्ट्रीय शाळा काढण्याचें ठरविलें. परंतु नुसते मनोरथ रचून कार्यें तडीस जात नाहींत.शाळा काढायची म्हटलें कीं त्यासाठीं इमारत पाहिजे, शिक्षक पाहिजेत, विद्यार्थ्यांचा भरणा पाहिजे. आणि पैशाच्या पिश-वीचें तोंड सदा उघडें पाहिजे. दापोलींतील राष्ट्रीय वृत्तीच्या मंडळीनें एकत्र जमून सर्व गोष्टींचा विचार करून, सर्व गोष्टींची सिद्धता केली व १९०६ सालीं मिशन स्कूलच्या टेकडीच्या पश्चिमेस रस्त्यापलिकडील रा. भय्यासाहेब बर्वे याचा बंगला घेऊन तेथें इंग्रजी १ ते ३ इयत्तांचें शिक्षण देणारी शाळा 'प्रिपरेटरी क्लासेस्' म्हणून सुरू केली.

लौकरच ४. थी इयत्ता सुरू करण्यांत आली. त्या वेळीं कोळथरचे रहिवासी रा. दामुअण्णा वडे यांस मंडळींनें हेड मास्तर म्हणून नेमलें. चालकांनीं

**कोंकणांतील नवीन शाळेंत**

पांचवीचा वर्ग चालू करण्याचें ठरविलें. याच सुमारास आपल्या फडणीसकाव्यामुळें ख्यातनाम झालेले राधारमण हे पुणें सोडून कोंकणांतील पाडलें या आपल्या गावीं येऊन राहिले होते. नवीन शाळेच्या चालकांनीं त्यांस गांठलें व आपल्या शाळेचे मुख्य अध्यापक होऊन राष्ट्रीय शिक्षणाची सुवर्णसंधि साधण्याची त्यांस विनंती केली. भावनावश होऊन राधारमणांनीं त्यांच्या विनंतीस तत्काळ रुकार दिला व ते दापोलीस येऊन नवीन जागेवर रुजू झाले. त्या वेळीं शिक्षक मंडळामध्यें रा. बापूसाहेब गोरे, दामुअण्णा वडे, सदानंदकाका करंदीकर, विश्वनाथपंत सोमण, वगैरे मंडळी असून राधारमण मुख्य अध्यापक होते. शाळा तीनचार वर्षें टीक चालली. साहेबाच्या शाळेतून कांहीं मुलें नांवें काढून या नवीन शाळेंत येऊन दाखल झालीं. परंतु लौकरच म्हणजे सन १९०८ सालीं देशामध्यें रिस्ले सर्क्युलर निघून राष्ट्रीय शिक्षणाची गळचेपी करण्यांत आली. राष्ट्रीय शिक्षण घातक स्वरूपाचें ( pernicious character ) आहे असें ठरविण्यांत आलें आणि त्याचा परिणाम दापोलीच्या उपरिनिर्दिष्ट शाळेवर होऊन १९०९–१० च्या सुमारास ती शाळा बंद करावी लागली.

या नवीन शाळेची आर्थिक परिस्थिति बेताचीच होती. फंड वगैरे जमविण्याचे विशेष प्रयत्न झाले नाहींत. फीचें उत्पन्न फारसें नव्हतें. म्हणून शिक्षकांस महिन्याचे महिन्यास पगार मिळणेंहि जड जात असे. हृदयांत देशभक्तीच्या कितीहि तीव्र भावना असोत; मध्याह्नसमयीं अन्नाचे चार घांस पोटांत गेले नाहींत तर काम कठीण. उदात्त हेतूनें प्रेरित होऊन आरंभिलेल्या कार्याविषयींचीहि माणसाची निष्ठा हळुहळु ओसरूं लागते. हमखास ठराविक वेळीं निश्चित उत्पन्न देणारें निर्वाहाचें साधन मनुष्य हुडकूं लागतो. अशीच स्थिति त्या वेळीं राधारमणांचीहि झाली होती. याच वेळीं रे. गॅडनेसाहेब हे आपली

शाळा मिशनच्याच्या धिम्मेपणानें टेकडीवर चालवीत होते. राधारमणांची विष-यांतील पारंगतता व त्यांची अध्यापनकौशल्याची कीर्ति त्यांच्या कानावर गेलेली असून वेळ येतांच हा मोहरा आत्मसात् करावयाचा असा आपल्या मनाचा धडा त्यांनीं केव्हांच करून ठेविला होता. आणि तशी अपेक्षित वेळ आलीहि. निर्वाहाचें साधन इतरत्र मिळण्याचा कोठेंच संभव दिसेना. तेव्हां राधारमणांनीं नोकरीचा अर्ज रे. साहेबांकडे पाठवितांच त्यांना संस्कृत विष-याचे अध्यापक म्हणून मिशन स्कूलमध्यें तावडतोब ठेवून घेतलें. तथापि नेम-णूक करण्यापूर्वी राधारमणांनीं पुणें कां सोडलें या गोष्टीचा पूर्ण तपास त्यांनीं केला होता व त्यांत ' रा. लिमये आपल्या संस्थेंत पुन्हां येतील तर पूर्वीच्या त्यांच्या नोकरीचा विचार करून त्यांस घेण्यास डेक्कन एज्युकेशन सोसायटी तयार आहे ' असें रे. गॅडनेसाहेबांस कळल्यामुळें राधारमणांस शिक्षक म्हणून घेण्यांत धोका नाहीं अशी आपल्या मनाची खात्री त्यांनीं प्रथम करून घेतली. त्या वेळीं गिमवण्याचे रहिवासी रा. शंकरराव जोशी हे मुख्य अध्यापक होते. राधारमण हे अजून बी. ए. झालेले नव्हते. अर्थात् त्यांची नेमणूक उपशिक्षक म्हणून करण्यांत आली. मात्र नोकरीच्या शाश्वतीचा विश्वास उत्पन्न व्हावा यासाठीं वर्ष भरतांच साहेबांनीं राधारमणांस पांच रुपयाची पगारवाढ दिली.

सन १९१० सालीं राधारमणांचा दापोली येथील मिशन हाय स्कूलमध्यें प्रवेश झाला. तेव्हांपासून शेवटच्या घटकेपर्यंत ते याच हाय स्कूलमध्यें होते.

## मिशन हायस्कूलांत

या शाळेंत आल्यानंतरहि राधारमणांस कांहीं काळपर्यंत सुखाचें जीवन मिळालें नाहीं. राधारमण शाळेंत येण्यापूर्वी रा. धोंडो गोविंद चाळ हे हाय स्कूलमध्यें संस्कृत व रा. केशवराव प्रधान हे मराठी विषय शिकवीत असत. राधारम-णांची नेमणूक झाल्यानंतर हाय स्कूलमधील वरच्या वर्गाचें संस्कृत व मराठी हे विषय शिकविण्याचें काम साहजिकच त्यांच्याकडे देण्यांत आलें. त्याचें वैषम्य वाटून शिक्षकांत चुरस लागली. त्यांचे निरनिराळे गट पडले व मधून मधून कलह उत्पन्न होऊं लागले. कधीं कधीं हे कलह प्रिंसिपॉल गॅडनेसाहेब

यांच्या कानावरहि जात असत. सर्वांचें म्हणणें ऐकून घेऊन मिशनऱ्याच्या शांत स्वभावानुसार प्रत्येकाची ते समजूत करीत व कलह विकोपास जाऊं देत नसत. तथापि त्यांचा पूर्ण उपशम तें कधींच करूं शकले नाहींत. त्यामुळें राधारमणांस पुष्कळ त्रास सोसावा लागला. शिक्षकांतील वैमनस्याचा अनिष्ट परिणाम छात्रगणावरहि होत असे. हल्लीं जिकडे तिकडे शाळा चालविण्यासाठीं सोसायटया स्थापन झाल्या आहेत. त्यांच्या कारभारामध्यें हा गुण निश्चित दिसून येतो कीं त्यांत काम करणाऱ्या शिक्षकांमध्यें कदाचित् कांहीं किरकोळ मतभेद उत्पन्न होतात; परंतु त्याचें पर्यवसान तीव्र कलहामध्यें सहसा होत नाहीं. हा सोसायटयांचा मोठाच उपयोग आहे असें म्हटलें पाहिजे.

त्या काळीं पदवीधर शिक्षक फार दुर्मिळ होते. दापोली मिशन स्कूलमध्यें कित्येक वर्षें रा. शंकरराव जोशी हे एकटेच पदवीधर होते. राधारमणांनीं बी. ए. च्या तीन टर्म्स भरलेल्या होत्या. रा. धोंडोपंत बाळ यांचें शिक्षण इंटर आर्टस्चें झालेलें होतें व इतर शिक्षक मॅट्रिक किंवा स्कूल फायनल परीक्षा पास झालेले होते. शिक्षक बी. टी. किंवा एस्. टी. सी. असलाच पाहिजे असा हल्लीं निर्बंध आहे, तसा त्या वेळीं नव्हता. निरनिराळे विषय त्या त्या विषयांचा विशेष अभ्यास ज्या शिक्षकांनीं केलेला आहे अशाच शिक्षकांनीं ते शिकविले पाहिजेत असा कटाक्षहि त्या वेळीं नव्हता. कोणीहि शिक्षक प्रसंगीं कोणताहि विषय शिकविण्यास धजावत असत. ‘ माझा तो विषय नव्हे ’ असें सांगणें त्या काळीं कमीपणाचें मानलें जाई. त्यामुळें प्रसंग पडल्यास आपल्या वांटयास येईल त्या विषयाचा प्रत्येक शिक्षक अभ्यास करीत असे. नुसता मॅट्रिक असलेला शिक्षकहि जरूर पडल्यास वरचे वर्ग घेत असे राधारमण यांचा संस्कृत हा जरी आवडता विषय होता तरी ते इंग्रजी व मराठीहि उत्कृष्ट प्रकारें शिकवीत असत. क्वचित् प्रसंगीं इतिहास, भूगोल व खगोलशास्त्रहि त्यांनीं शिकविल्याचें स्मरतें. बरेच शिक्षक पदवीधर नव्हते; तरी त्यांची

शिस्त करडी असून छात्रगणांवर त्यांचा वचकहि चांगला होता. विद्यार्थ्यांतहि एकंदरीनें शिक्षकांविषयीं पूज्यबुद्धि व आदरभाव होता.

आपण बी. ए. नाहीं हें शल्य राधारमणांना मनांतून फार टोंचत होतें. तसेंच नोकरीचें पहिलें वर्ष भरल्याबरोबर पांच रुपयांची बढती देण्यांत

**अखेर बी. ए. झालेच**

रे. गॅडनेसाहेबांनीं जी तत्परता दाखविली होती तीहि पुढें दिसली नाहीं आणि प्रापंचिक परिस्थिति तर नेहमींच भेडसावीत होती. त्यामुळें संधी सांपडेल तेव्हां पदवीची परीक्षा द्यावयाचीच असा त्यांनीं आपल्या मनाचा ठाम निश्चय केला होता. अखेरीस तशी वेळ आली व सन १९१६ सालीं बी. ए. ची शेवटची टर्म भरण्यासाठीं मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्यें दाखल झाले. विद्यार्थीदशा संपून १८।१९ वर्षें नोकरींत घालविल्यांनंतर परीक्षेची तयारी करणें किती कठीण असतें त्याची यथार्थ कल्पना ती परिस्थिति ज्यांनीं प्रत्यक्ष अनुभविलेली आहे अशानाच येईल. ग्रहणशक्ति वाढलेली असल्यामुळें विषयाची समजूत लौकर पटते; तथापि स्मरणशक्ति विद्यार्थीदशेंतील शक्तीइतकी तरतरीत व कार्यक्षम रहात नाहीं. त्यामुळें उच्चक्रमांक पटकाविणें हें अशा उशिरां दिलेल्या परीक्षेचें ध्येय जरी नसलें तरी पदवी मिळण्यासाठीं जरूर असलेली किमान गुणमर्यादा गांठणेंहि कठीण होऊन बसतें. पदवी नसते म्हणून समाजामध्यें जो कमीपणा वाटत असतो तो पदवी मिळाल्यामुळें वाटेनासा होतो, इतकेंच त्या पदवीचें महत्त्व असतें. राधारमणांनीं प्रयत्न करून १९१७ सालीं बी. ए. ची पदवी मिळविली व भावी उन्नतीच्या मार्गांत येणारा मोठा थोरला अडथळा दूर करून टाकला.

सन १९१७ मध्यें बी. ए. पदवी संपादन करून राधारमण शाळेंत शिकवूं लागले या गोष्टीचा त्यांना स्वतःला जितका अभिमान व आनंद वाटला असेल

**छात्रगणांकडून गौरव**

तितकाच — किंबहुना कांकणभर सरसच — अभिमान त्यांच्या कांहीं जुन्या विद्यार्थ्यांना वाटला. मुंबईस कॉलेजांत शिकत असलेले किंवा नोकरीधंद्यांत शिरलेले असे कांहीं विद्यार्थी एकत्र जमले व त्यांनीं राधारमणांना मानपत्र

व ग्रंथ समर्पण करून त्यांचा गौरव करण्याचें ठरविलें. मानपत्र संस्कृत भाषेमध्यें देण्याचें ठरलें व कुंभकोणमच्ची महाभारताची प्रत, रामायण, भागवत, इत्यादि ग्रंथ त्यांस अर्पण करण्याचें ठरलें. संस्कृत मानपत्राचा बहुतेक भाग प्रस्तुत लेखकानें लिहिला. त्याला थोडासा हातभार कॉलेजमधील सहाध्यायी रा. वल्लभदास रणछोडदास भाटे यांनीं लावला. मुंबईला बोरभाट गल्लीमध्यें मंडलीक–बंधूंच्या बिऱ्हाडीं रात्रीं सभा होऊन राधारमणांच्या गौरवपर त्यांच्या कांहीं छात्रांचीं भाषणें झालीं व ग्रंथसंभार कोंकणांत प्रिन्सिपॉल रे. गॅडनेसाहेब याजकडे पाठविण्यांत आला आणि सभेची हकिगत, राधारमणांच्या अभिनंदनाचा ठराव, इत्यादि गोष्टी साहेबांना कळवून त्यास विनंती करण्यात आली कीं, सदर ग्रंथ, समारंभ करून राधारमणांस अर्पण करण्यांत यावेत. रे. गॅडनेसाहेबांनीं विद्यार्थी व शिक्षक यांची सभा भरवून राधारमणांच्या गुणगौरवपर भाषण करून मानपत्र व ग्रंथ त्यांस अर्पण केले.

या ठिकाणीं राधारमणांच्या छात्रप्रियतेची चर्चा केल्यास ती अस्थानीं किंवा अप्रस्तुत ठरणार नाहीं अशी आशा आहे. ते आपल्या विषयाची परिश्रमपूर्वक

**शिक्षकी वृत्तीची ईषत् चिकित्सा**

पूर्व तयारी करीत, ग्रंथ वाचीत, संदर्भ धुंडाळीत, इंग्रजी ग्रंथांतील समान विचारांची स्थळें हुडकून काढून प्रतिपाद्य विषयाची चित्ताकर्षक मांडणी करीत. शिकवितांना त्यांचा स्वर हळुहळु चढत जात असे. रसाला आणि भावनेला पोषक असा त्यांचा चेहरा, अंगविक्षेप आणि स्वर हे असत. वीर, शृंगार आणि करुण हे रस हाताळण्यांत त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या रसाळ वाणीचा एकदां ओघ सुरू झाला म्हणजे त्या प्रवाहाबरोबर त्यांचा छात्रगण पुढें पुढें वहात गेला नाहीं असें सहसा झालें नाहीं. त्यांच्या जिभेला अद्वितीय माधुरी होती. एखादी आपणांस माहीत असलेलीच गोष्ट राधारमणांच्या तोंडून ऐकली कीं, तिला स्वारस्य यायचेंच. सगळ्या देहाच्या वृत्ति कानांत केंद्रित व्हाव्यात असें प्रत्येकाला वाटावयास लागे. राधारमणांच्या अध्यापनांतील गोडी चाखल्यानंतर प्रत्येक श्रोत्याला असें वाटे कीं,

" झाले बहु होतिल बहु, आहेतचि बहु, परंतु यासम हा "

हल्लींच्या अध्यापनपद्धति त्या काळीं प्रचलित नव्हत्या. शिक्षक बहुतेक काळ खुर्चीवर बसूनच शिकवीत असत. निर्दोष प्रश्न कसे विचारावे हें सर्वांना ठाऊक होतेंच असें नाहीं. विद्यार्थ्यांना प्रश्न रांगेनें विचारले जात आणि दुसऱ्या शेंकडों तपशिलांमध्यें आधुनिक अध्यापनतंत्र सांभाळलें जातें तसें त्या काळीं जात नसे. राधारमणही यास अपवाद नव्हते. एका विषयाचें विवेचन चालू असतांना प्रस्तुत प्रकरणापासून राधारमणांचे दूरसंचारही ( Digressions ) कित्येकदां होत असत. पण या मध्येंच केलेल्या सहली फार बहारदार असत. राधारमणांच्या मनांतून एस. टी. सी. चा अभ्यास करावयाचा होता व त्याकरतां त्यांनीं Landon चें अध्यापनाशास्त्रचें पुस्तकही वाचावयास घेतलें होतें. त्याची भाषा व प्रतिपादनाची शैली त्यांस फार आवडली होती. परंतु तो अभ्यास अपुराच राहिला.

राधारमणांचें शिकवणें चालू असतांना तास कधीं संपूंच नये असें विद्यार्थ्यांस वाटत असे. पुढच्या तासाचे शिक्षक कधीं कधीं पांचपांच दहादहा मिनिटें वर्गाबाहेर फेऱ्या घालीत आहेत असा देखावा दिसावयाचा व राधारमण वर्गाबाहेर पडतां पडतां पुटपुटावयाचे, " I am afraid I am late. Very sorry. "

मात्र राधारमणांच्या जिभेमध्यें परस्परविरोधी असे दोन गुणधर्म होते. ती एकापक्षीं जशी गोड होती तशीच दुसऱ्यापक्षीं तिखट होती. एखाद्या विद्यार्थ्यानें कांहीं आगळीक किंवा अपराध केला तर त्याचा लगेच समाचार घेण्यास ते चुकत नसत. हृदयांत सात्त्विक संतापाचा रस कढूं लागल्यावर एखाद्या ज्वालामुखीसारखे या संतप्त रसाचे फवारे त्या विद्यार्थ्याच्या अंगावर पडूं लागले कीं त्याला दे माय धरणी ठाय होऊन जाई. तीक्ष्ण शब्दाच्या मारापेक्षां हातावर छडीचे प्रहार पुरवले असें त्या विद्यार्थ्यास होत असे. नेत्रांतून गंगायमुनासरस्वतीचे प्रवाह चालू होऊन तो विद्यार्थी हात जोडून शरण

येऊन, 'क्रोधं गुरो संहर संहरेति' असें म्हणावयास सिद्ध होत असे. खऱ्या भावानें क्षमा मागितल्यानंतर याचना सफल होण्यासही विलंब लागत नसे. क्षमा करतांना राधारमण म्हणत कीं, 'बेटा, तुझ्या नम्रपणांतच तुझ्या भावी उत्कर्षाचीं बीजें आहेत. तुझी चूक झाली त्यांत कांहीं वावगें नाहीं. नुसता देवासारखा बसून कांहीं एक चळवळ न करणाऱ्या मुलापेक्षां तूं मला बरा वाटतोस. वाट चुकत आहे तेवढी सुधार म्हणजे झालें.' त्या विद्यार्थ्यासही नंतर हायसें होत असे. कांहींतरी आपल्यावरचें ओझें कमी झालें, आपण आता शुद्ध झालों असें त्यास वाटत असे.

राधारमणांच्या छात्रप्रियतेला औदार्याची अनुपम जाड मिळालेली असल्यामुळें त्यांची सहानुभूति केवळ शाब्दिक न राहतां तिचें पर्यवसान अनेक वेळां सक्रियतेंत होत असे.

**राधारमणांचें छात्रप्रेम —**

घरची सांपत्तिक स्थिति फारशी स्पृहणीय नसतांना सुद्धां त्यांच्याकडे कांहीं विद्यार्थी वारावर असत. कांहीं विद्यार्थ्यांना फीची किंवा पुस्तकांची मदत ते करीत. अभ्यासाच्या बाबतींत तर कोणीही केव्हाही शाळेंत वर्गाबाहेर अथवा घरीं त्यांस शंका विचाराव्या. त्यांचा उलगडा तत्परतेनें आणि आनंदानें ते करीत असत. त्यांच्या तत्परतेनें शिकविण्याचा लाभ नवशीचा जनू करंदीकर, दह्याळचे विनायक नारायण काळे, प्रस्तुत लेखक, देवरूखचे रा. ना. श्री. आगाशे, हर्णै येथील रा. म. बा. उर्फ दादासाहेब गोळे आणि मुरूडचे रा. रामचंद्र वामन दातार यांनीं आपल्या विद्यार्थीदशेंत घेतला. पैकीं जनू करंदीकर, विनायकराव काळे आणि दादासाहेब गोळे हे कालवश झालेले आहेत. जनू करंदीकर सर्व विषयांत हुषार होता. त्यास खाजगी तऱ्हेनें संस्कृत व्याकरण आणि वाङ्मय राधारमणांनीं शिकविलें. १९१२ सालीं मॅट्रिक परीक्षेच्या वेळीं जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति एकदोन मार्क कमी पडल्यामुळें करंदीकर यास मिळाली नाहीं. त्याचीच पुनरावृत्ति पुढें १९१९ सालीं रा. ना. श्री. आगाशे यांच्या बाबतींत घडून आली. त्या वेळीं आगाशे यांना जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति न मिळाल्यामुळें राधारमणांस विशेष

वाईट वाटलें. रा. आगाशे यांनीं हें अपयश पुढें इंटरमध्यें धुऊन काढावें म्हणून त्यांनीं कॉलेजमध्यें प्रवेश केल्यानंतरही राधारमण त्यांस पत्रद्वारें मार्गदर्शन करीत असत. परंतु पुढें असहकाराचें युग सुरू होऊन त्यांत रा. आगाशे यांनीं कॉलेज सोडल्यामुळें राधारमणांची ती इच्छा अखेरपर्यंत अतृप्तच राहिली. रा. आगाशे हे लीड्स् युनिव्हर्सिटीची टी. डिप्. ही पदवी घेऊन आलेले असून सांप्रत ते अकोला हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हणून काम करीत आहेत व रा. दातार हे ग्रॅजुएट झाले असून याच जिल्ह्यांत ॲसिस्टंट डेप्युटी एजुकेशनल इन्स्पेक्टरच्या हुद्यावर आहेत.

राधारमणांच्या शाळेंतील अध्यापनापेक्षांसुद्धां ते जो खाजगी वर्ग चालवीत त्यांतील अध्यापन बहारीचें असे. त्यांचा वर्ग प्रातःकाळीं सूर्योदयापूर्वी सुरू

**खाजगी शिकवण्या**

व्हावयाचा आणि सूर्योदयानंतर फार तर अर्धा तास चालावयाचा. सूर्योदयापूर्वी वर्गांत दिवा लावावा लागत असे. त्यांच्या खाजगी वर्गांत १९११–१२ सालांत आम्ही सहावीसातवींतले मिळून सुमारें बावीसबावीस विद्यार्थी होतों. फी माफक असे. म्हणजे टर्मचे प्रत्येकीं पांच रुपये पडत. टर्म तीन ते चार महिन्यांची असे. गरीब विद्यार्थ्यांस शिक्षण मोफत असे. शिक्षण इंग्रजी आणि संस्कृत दोन्ही विषयांचें असे. प्रत्येक विषय एक दिवसा आड घेतला जाई. आमच्या वर उल्लेखिलेल्या दोन वर्षांच्या क्लासांत शाकुंतलाचा ४ था आणि ७ वा अंक, कुमारसंभवाचे २ रा, ४ था आणि ५ वा सर्ग, रघुवंशाचा ११ वा सर्ग, Lady of the Lake मधील उतारे, Paradise Lost मधील उतारे, 'Young Lochinvar, Psalm of Life, Prospice, Words from Poets मधील कित्येक उतारे, आणि Julius Caesar आणि Hamlet हीं नाटकें राधारमणांनीं आम्हांस शिकविलीं होतीं. त्यांचा स्वाद आज घट-केलाही चांगला स्मरतो, इतक्या परिणामकारकपणें त्यांनीं शिकविलें. खाजगी वर्गाचा समारोप करतांना बेझंट बाईंची गीता, मनाचे श्लोक किंवा Words

from Poets सारखीं छोटी पुस्तकें ते विद्यार्थ्यांस वांटीत असत आणि चिवडा, कॉफी यासारखा खाद्यपेयांचा कांहीं प्रकार बहुधा ठेवीत असत.

अध्यापनाच्या स्वतःच्या सामर्थ्याबद्दल आणि कौशल्याबद्दल राधारमणांस पूर्ण आत्मविश्वास होता. कोणी तुलनाच करूं लागला तर स्वतःच्या बाबतींत ते म्हणत असत--

I may or may not be superior to others but I am quite certain that I am inferior to none.

सन १९१७ मध्यें पदवीधर होऊन राधारमणांच्या जीवनास स्थैर्य प्राप्त होतें न होतें तोंच त्यांच्यावर मोठीच कौटुंबिक आपत्ति ओढवली! त्यांची प्रियपत्नी राधाबाई ही एकाएकीं किरकोळ आजारानें इहलोक सोडून गेली. त्यांचा उल्लेख त्या वर्षींच्या श्रीगणेशाष्टकांत--

यस्याद्भुतं शाश्वतिकं स्वराज्यं
स्वानंदलोकं विततं हि भोक्तुम् ।
जगाम राधारमणस्य राधा
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ।।

असा पहावयास मिळतो. पत्नी सौभाग्य घेऊन गेली खरी; परंतु पति व लहान मुलें यांच्या जीवनावर दुःखाची छाया पसरली. राधारमणांचें शाळेकडील जीवन सुखाचें होत गेलें; परंतु कौटुंबिक जीवन उताराला लागलें.

**मुख्याध्यापक झाल्यांनंतर—**

सन १९१९ मध्यें रा. शंकरराव जोशी हे हेडमास्तरच्या जागेपासून सेवानिवृत्त होऊन परमार्थाचा शोध करावयाला दापोली सोडून वाईला गेले आणि राधारमणांची मुख्य अध्यापक म्हणून त्यांच्या जागीं नेमणूक झाली. शाळेची सुधारणा करण्याचा त्यांनीं चंग बांधला. रा. केशवराव प्रधान आणि धोंडोपंत बाळ यांच्याशीं शाळा सुधारण्याच्या कामांत सहकार्याची याचनाही केली. परंतु त्या वर्षींच्या उन्हाळ्यांत रा. केशवराव प्रधान भिवंडीस आपल्या मुली-

कडे जे गेले ते तिकडेच एका शाळेंत मुख्याध्यापक झाले. याच सुमारास रा. विनायकराव काळे हे एक ग्रॅज्युएट शाळेला मिळाले होते. नंतर रा. सदाशिवराव भर्वे हे आणखी एक ग्रॅज्युएट शाळेंत शिक्षक म्हणून आले. कांहीं दिवसानीं रा. काळे शाळा सोडून असहकाराच्या दिवसांत पुन्हां राष्ट्रीय शाळा दापोलीस निघाली तिकडे गेले आणि त्यांच्या जागीं प्रस्तुत लेखकाची नेमणूक झाली. राधारमण शाळासुधारणेच्या योजना आंखून कार्यप्रवृत्तहि झाले. परंतु त्यांच्या प्रकृतीवर खासगी कौटुंबिक परिस्थितीचा, आर्थिक विषमतेचा आणि वाढत्या वयाचा परिणाम होत होता. मनांतले बेत मनांतच रहात होते.

### गाणपत्य राधारमणांचा अंत

रहाण्याकरतां स्वतःचें घर असावें या सदिच्छेनें जालगांवास रा. दांडेकर यांजपासून सात गुंठे जागा विकत घेऊन त्यांनीं १९२१ सालीं पाया बांधण्यास सुरुवात केली. इमारतीकरतां लाकूडसामान जमविणें, चिरे, मापें यांचा साठा करणें, इत्यदि कामाकरतां त्यांना पुष्कळ खेट घालावे लागले. पुष्कळ दगदग सोसावी लागली. चिरकामी, सुतार, गवंडी, मजूर, इत्यादि लोकांशीं संबंध आले. त्यांत त्यांना पुष्कळ कटु अनुभव आले. कामगारांनीं पैसे आधीं मागून न्यावे, काम वेळेवर करूच नये, सुतार आहेत तर गवंडी नाहींत, गवंडी आले तर मजूर नाहींत. असे प्रकार झाले. जीव अगदीं रडकुंडीस आला. सन १९२२ च्या पावसाळ्यापूर्वी घरावर जेमतेम कौलें चढलीं. परंतु घरभरणी झाली नाहीं. अजून कांहीं काम अपुरेंच राहिलें होतें. तें पुरें करून घरभरणी करून नंतर नवीन घरांत रहावयास यावयाचें असा त्यांचा बेत होता. परंतु दुर्दैवानें तो तडीस गेला नाहीं. १९२२ च्या ऑक्टोबर महिन्यांत हर्णै येथें रत्नागिरी जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षकांचें संमेलन भरलें होतें. त्याचें अध्यक्षपद राधारमण यांस देण्यांत आलें होतें. असें ऐकिवांत आहे कीं त्या वेळचें राधारमणांचें भाषण अप्रतिम झालें होतें. संमेलनाहून राधारमण जालगांवीं आपल्या बिऱ्हाडीं आले तोंच त्यांना विषम-

ज्वर आला. यांतून आपण निभावणें शक्य नाहीं असें त्यांस वाटूं लागलें असावें असें दिसतें. मृत्युसमय समीप येऊन ठेपला तेव्हां नातेवाईक मंडळी जमून प्रकृतीबद्दल विचारपूस करूं लागली. तेव्हां त्यांनीं आधीं त्यांना सांगितलें कीं, श्रीगणपतीची तसबीर मला दिसेल अशी ठेवा. त्यांनीं कितीतरी वेळ गणपतीकडे टक लाविली होती. तोंडानें अस्पष्ट असा गणपतिस्तव चालला होता. मध्येंच डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या होत्या. ज्वरावर वैद्यकीय उपाय चालूच होते. परंतु कोणाचा कसलाही इलाज न चालून दोनतीन दिवसांच्या अल्पावधींतच राधारमणांचें देहावसान झालें. नवीन घर बांधलें म्हणजे कोणाला तरी धोका असतो अशी जी एक सामान्य समजूत आहे तिचा प्रत्यय प्रत्यक्ष यजमानाच्याच बाबतींत आला. संध्याकाळीं दिवे लागले. राधारमणांच्या मुलांनीं देव, तुळस, दिवा, वडील माणसांना नमस्कार केले. राधारमणांच्या तोंडून शब्द येईना. डोळ्यांत अश्रुधारा आल्या. त्यांनीं आपल्या लाडक्यांना हातानेंच अशीर्वाद दिला. शेवटचाच 'ठरला तो आशीर्वाद ! राधारमणाचा अमर आत्मा जडदेह सोडून स्वानंद लोकांतील शाश्वत सुख उपभोगण्यास निघून गेला. हां हां म्हणतां ही बातमी जालगाव आणि शेजारचे गांव म्हणजे दापोली, गिमवणें, निगडें, गव्हे, इत्यादि ठिकाणीं पसरली आणि त्याचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र, सहकारी शिक्षक आणि विद्यार्थी मिळून दीडदोनशें मंडळी जालगावच्या स्मशानामध्यें त्यांच्या प्रेतयात्रेबरोबर गेली. सामान्यतः खेडेगांवांत प्रेतयात्रेकरतां वीसपंचवीस मंडळीसुद्धां जमण्याची पंचाईत पडते.

शाळा दिवाळीच्या सुटीनंतर उघडली तेव्हां राधारमणांच्या निधनानिमित्त दुखवट्याची सभा होऊन मुलांना सोडून देण्यांत आलें. नंतर तीन वर्षांनीं राधारमणांचें स्मारक करण्यांत आलें. स्मारकाकरितां त्यांच्य जुन्या व नव्या विद्यार्थ्यांकडून कांहीं निधि जमविण्यांत येऊन त्यांतून शाळेच्या लायब्ररींत जीं संस्कृत पुस्तकें नव्हतीं तीं विकत घेण्यांत आलीं व तीं राधारमणाचें स्मारक म्हणून शाळेच्या लायब्ररीला देण्यांत आलीं. त्या वेळीं शाळेमध्यें जी स्मारकसभा भरली

होती त्यांत स्टाफमधील कांहीं शिक्षकांचीं व शाळेंतील कांहीं विद्यार्थ्यांचीं भाषणें झालीं. मला असें पक्कें आठवतें कीं राधारमणांचे जुने विद्यार्थी रा. केशव नारायण काळे हे त्या सभेला आले होते आणि त्यांनीं चांगलें परिणामकारक, हृदय हलवून सोडणारें असें राधारमणांच्या गुणवर्णनपर भाषण केलें होतें.

राधारमणांना एक मुलगा आणि तीन मुली अशीं एकूण अपत्यें चार. पैकीं एक मुलगी गोदावरी ही सुमारें महासात वर्षांची असतांना अपस्माराच्या विकारानें आजारी पडून सन १९१२ मध्यें निवर्तली. ती आईवडिलांची फार लाडकी होती. त्यांना तिच्या निधनानें किती शोक झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. सर्वांत वडील मुलगी गंगू हिचा विवाह निगडयाचे रा. सीताराम गोपाळ करमरकर याच्याशीं १९१५ सालीं झाला. हें एकच मंगलकार्य सपत्नीक राधारमणाच्या हातून झालें. रा. सीतारामपंत करमरकर हे जी. आय. पी. रेल्वेमध्यें नोकरीस आहेत. तिसरी मुलगी द्रौपदी हिचा विवाह रोह्याचे रा. शंकर बाळकृष्ण ओक यांच्याशीं करण्यांत आला. रा. ओक हे मुंबईस लॉइड्स् बँकेमध्यें नोकरीस असतात. मुलगा चिंतामणि याचा व्रतबंध १९२३ मध्यें करण्यांत आला आणि विवाह १९३९ सालीं करण्यांत आला. रा. चिंतामणराव हे मुंबई म्युनिसिपालिटीमध्यें मर्हेअर म्हणून काम करतात.

राधारमण अगदीं साधा पोशाक करीत. आंत गंजिफ्रॉक त्याच्यावर फुलशर्ट आणि वर कोट, खालीं धोतर आणि डोक्यास रुमाल. उन्हाळ्यांत पायांत तांबडालाल पुणेरी जोडा व पावसाळ्यांत कोंकणच्या वहाणा. शिरोवेष्टनाच्या बाबतींत प्रथम रंगीत जरीकांठी रुमाल नंतर साधा सफेद रुमाल व शेवटीं शेवटीं काळी किंवा तपकिरी रंगाची टोपी यांचा उपयोग ते करीत असत. घरांतून बाहेर जातांना हातामध्यें जाडा सोटा घेण्यास राधारमण कधीं चुकले नाहींत.

**राधारमणांचीं जीवनदृश्यें**
**साधी रहाणी**

अं. क्रमांक १२३८

**कांहीं स्वभाव-विशेष**

राधारमण नित्य पहांटे उठत असत. ज्ञानवृद्धीकरितां किंवा करमणुकीकरितां जें संस्कृत, मराठी किंवा इंग्रजी ग्रंथांचें वाचन करावयाचें तें ते पहांटे करीत असत. इतर लोक झोंपलेले आहेत, आणि मात्र उठून उद्योग करीत आहोंत म्हणजे तेवढें आयुष्य आपण वाढविलें, तितकें काम आपण पदरांत पाडून घेतलें असें ते म्हणत असत. प्रिन्स बिस्मार्कला हें तत्त्व पटलेलें होतें आणि त्याच्या यशस्वितेची गुरुकिल्ली या त्यांच्या संवयींत होती असें सांगतात. वाचन झाल्याबरोबर ते बहुधा कोणी बरोबर येणारा मिळाल्यास, त्याच्यासह नाहींतर एकटेसुद्धां तीनचार मैल तरी फिरावयास जात असत. प्रायव्हेट क्लास घेत असत तेव्हां क्लास संपल्यावर फिरावयास जात. ऊन अजून कोवळें आहे तोंच घरीं परत येऊन रोजच्या दिनचर्येला लागत असत.

**आवडतें वाङ्मय**

राधारमणांना शेक्सपीअरचीं नाटकें व काव्य, मिल्टनचें काव्य, सर वॉल्टर स्कॉट्, लॉंगफेलो, टेनिसन्, शेले, इत्यादि कवींचीं काव्यें विशेष आवडत. संस्कृतमध्यें कालिदास, भवभूति, जयदेव, जगन्नाथपंडित, भर्तृहरी, बाण, शंकराचार्य, इत्यादि लेखकांचे ग्रंथ त्यांना प्रिय होते. इतर कामाचा कंटाळा आला व मनाला करमणूक हवी असें वाटलें तर 'गीतगोविंदम्' हें काव्य वाचण्याचा त्यांना विशेष नाद होता. मराठीमध्यें चिपळूणकर, टिळक, केळकर, खाडिलकर, कोल्हटकर, हरी नारायण आपटे, वामनराव जोशी, इत्यादि गद्यलेखक, जुन्या कवींमध्यें वामन, मुक्तेश्वर, रघुनाथ पंडित आणि नव्या कवींमध्यें बालकवि, दत्तकवि, चंद्रशेखर, इत्यादि त्यांस आवडत असत.

राधारमणांना गाण्याबजावण्याची आवड असे. मात्र स्वतः ते कोणतेंही वाद्य वाजवीत नसत. लाडघरचे श्री. हरीभाऊ बाळ आले म्हणजे त्यांचें गाणें होत असे आणि त्यासाठीं पहांटे दोनतीन वाजेपर्यंत जागरणही ते आनंदानें करीत. त्यांचे स्नेहीसोबती जमले म्हणजे खूप गप्पा चालत आणि राधारमण

पुष्कळ कोट्या आणि विनोद करून आपण हंसत आणि इतरांस हसवीत. Laugh and grow fat असें एका लेखकाचें वाक्य ते नेहमीं सांगत असत. ते एकदां हंसावयाला लागले म्हणजे देहभान विसरत असत आणि यांचें हसणें आवरतें कसें, असें इतरांस होई.

ते विडी क्वचित् ओढीत आणि पानसुपारीही क्वचित् खात. मात्र पान-सुपारीचा समारंभ पंचमावाचून ( तंबाखूवाचून ) पुरा होत नाहीं असें ते मानीत. एखादवेळेस नुसताच तंबाखू आणि चुना हातावर एकत्र मिळून त्याची गोळी करून ते ती तोंडांत सोडीत. शाळेंत तासावर जातांना मात्र चूळ भरून तोंड स्वच्छ करून नंतर वर्गांत पाऊल टाकीत असत. गाईचें विशेषतः कपिला गाईचें निर्मळ ताजें दूध हें उत्कृष्ट पेय होय असें ते समजत आणि तशी गायही त्यांनीं मिळविली होती. ते चहापान करीत नसत. क्वचि-त्काळीं कॉफी घेत असत. दूध बहुधा दिवसांतून एकदां तरी घेत असत. ते उषःपान करीत असत. उषःपानानें अंगातले किरकोळ दोष नाहींसे होऊन प्रकृति साफ राहते असें ते प्रतिपादीत असत.

त्यांना ज्योतिषाचा नाद असे. त्यांच्या " फडणीस " काव्यांत ज्योतिष, शकुन, अपशकुन, इत्यादि विषयाचे उल्लेख आढळतात. ते मलेरियावर व आमांशावर औषधेंही देत असत. होमिओपाथीचाही त्यांनीं अभ्यास केला होता. औषधाकरिता कुणबी, कुंभार, वगैरे लोकाची त्यांच्या घरीं गर्दी असे. ते औषधें मोफत देत असत. जन्मास आल्यासारखें आपण परोपकाराचें किंवा लोकसेवेचें कांहीं ना कांहीं अल्पस्वल्प तरी केलें पाहिजे असें ते म्हणत असत. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच कुणबी आणि कुंभार लोकांचाही समाज हळहळला व आपला एक आधार गेला असें त्यांस वाटलें. पुढें पुढें त्यांच्या घरावरून जात असतांना " भाऊंची " ( राधारमणांस गांवातील बहुतेक सर्व ' कुशाभाऊ ' किंवा नुसते ' भाऊ ' असें संबोधित असत ) आठवण होऊन पुष्कळ जण कृतज्ञतेनें मान नमवून व दुवा देऊन पुढें जात.

भोजनानंतर पुष्कळांना पानसुपारी, सुपारी, लवंग, वेलेदांडे किंवा बडि शेप खाण्याची संवय असते. त्या ऐवजीं राधारमण हे बहुदा भाजलेले शेंगदाणे, काजूगर, सुकें खोबरें, सुकवलेला आंबरस, आंब्याचें साठ किंवा फणसपोळी यांपैकीं जी वस्तु सुलभ असेल ती घेऊन मुखशुद्धि करीत असत.

गांवामध्यें कोणी शास्त्री, पंडित, प्रवचनकार, लेखक, कवि किंवा हरिदास आला तर राधारमणांची व त्याची भेट झाल्याविना बहुधा रहात नसे.

**राधारमणाची गुणग्राहकता**

कोणी पोवाडे म्हणणारा आला तरी त्याला मुद्दाम थांबवून ते त्याच्याकडून चांगले तीनचार पोवाडे म्हणवून घेत असत. हंसक्षीरन्यायानें आपल्याकडे आलेल्या माणसाचे गुण घ्यावयाचे अशी त्यांची पद्धत असे.

राधारमण हे मंगलमूर्ती श्रीगणपतीचे भक्त होते. याचें कारण बहुधा असें असावें. त्यांचा मूळ गांव जो पाडलें, येथें श्रीगणपतीचें देवालय आहे.

**खरे कवि हे गाणपत्य असतातच**

त्याचा उत्सव दरसाल माघ शुद्ध चतुर्थीला होतो. उत्सवाची सर्व व्यवस्था लिमये घराण्याकडून होत असते. म्हणजे बाळपणींच गांवच्या देवळातील देवतेबद्दल मनावर संस्कार घडले. याचा परिणाम राधारमणाच्या सर्व आयुष्यावर झाला. घरामध्यें श्रीगणपतीची मोठी तसबीर त्यांनीं ठेविली होती. चित्रांतील गणपतीस रोज गंधफूल ते वहात असत. घरांतून बाहेर पडतांना आणि बाहेरून घरांत पाऊल ठेवतांना श्रीगणपतीस वंदन करण्यास ते कधीं चुकले नाहींत. गांवांतलि देवळांत जाऊन सकाळीं किंवा संध्याकाळीं सवड मिळेल तेव्हां श्रीगणपतीचें दर्शन ते नियमानें घेत असत. आपल्या मनासारखी एकादी गोष्ट घडून आली तर श्रीसत्यनारायण करण्याची पुष्कळांची चाल आहे. त्याप्रमाणें अधूनमधून सत्यनारायणाची पूजा ते करीत असत. परंतु कधीं कधीं श्रीसत्यविनायकाचें व्रत ते करीत असत. त्यांच्या कित्येक कवितांच्या आरंभीं त्यांनीं श्रीगणपतीचें स्तवन केलेलें आढळेल. या गोष्टी टाम श्रद्धेविना घडणें शक्य नाहीं.

याप्रमाणें राधारमणांच्या जीवनांतील ज्या घटनांची माहिती मिळाली त्या घटना व जे प्रसंग किंवा स्वभावविशेष माझ्या प्रत्यक्ष अनुभवास आले त्यांचे स्मरणांतून जे पडसाद उमटले त्यांचें येथवर यथामति चित्रण केलें आहे. आतां काव्यसंसाराचें धावतें दर्शन घेऊन हें चरित्रलेखनाचें कार्य आटोपतें घेतों. राधारमणांना आम्ही कवि या नात्यापेक्षां गुरु किंवा शिक्षक या नात्यानेंच ते वागत असतांना अधिक पाहिलें. मात्र त्यांचें अध्यापन, सार्वजनिक व्याख्यान किंवा खासगी संभाषण चालू असतांना गुरूमध्यें पदोपदीं कवीनें संचार केलेला वारंवार आढळला. आणि म्हणूनच त्यांची ती कृति परमावधीची चित्तवेधक झाली. राधारमणांच्या काव्यसंसाराचें धावतें दर्शन घेण्यांत दोन हेतु आहेत. एक त्यांच्या काव्याचें परीक्षण करण्याचें काम ~~त्यांच्या~~ एका सुप्रसिद्ध ~~शिष्यानें~~ पत्करिलें आहे आणि दुसरा हेतु हा कीं रसिक वाचकांची प्रत्यक्ष राधारमणांच्या काव्यामृताशीं लवकर गांठ पडून त्याचा त्यांनीं मनमुराद आस्वाद घ्यावा.

### काव्यपरिचय

साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांनीं १९१५ सालीं अभिनव काव्यमाला भाग ३ रा संपादित केला. त्यांत राधारमणांच्या काव्यांतून सहा उतारे त्यांनीं प्रसिद्ध केले. त्याच्या प्रस्तावनेंत केळकर म्हणतात " राधारमणांची पहिली कविता ' भस्मासुर ' ही असून ती त्यांनीं इ. स. १८९२ त इंग्रजी पांचव्या इयत्तेंत असतांना केली. " ' भस्मासुर ' ही कविता आज उपलब्ध नाहीं.

दुसरी ' कालचक्र ' ही बहुधा १८९९ सालीं रचली गेली असावी. आणि ती सन १९०९ च्या सप्तंबर महिन्यांत मुंबईच्या हिंद एजन्सी छापखान्यात छापली गेली. " प्रकाशकाचे दोन शब्द " या मथळ्याखालीं पुढील माहिती वाचावयास मिळते:

" इ. स. १८९८ सालीं रा. रा. पुरुषोत्तम अनंत जोशी व रा. रा. केशव वासुदेव मनोहर व रा. रा. रामचंद्र गणेश दांडेकर हे तरुण व

**कालचक्र**

धाडसी गृहस्थ आफ्रिकेंत उद्योगधंदा करण्यासाठीं दापोलीहून निघाले. वरील तरुण गृहस्थ व राधारमण यांची बाळपणापासून जिवश्चकंठश्च मैत्री. आफ्रिकेंत पोंचून सर्व जम बसण्याला ८।९ महिने लागले. नंतर वरील गृहस्थांनीं आपली जन्मभूमि जें " परशुराम क्षेत्र " तेथील ऋतुमानवृत्त पद्यांत लिहून पाठविण्याविषयीं राधारमणांस विनंति केली. त्या वेळीं कोंकणांत शरदृतु चालू होता. म्हणून कवीनें कवितेचा प्रारंभ शरत्कालापासून केला आहे.

ज्याप्रमाणें कालिदासानें ' ऋतुसंहार ' संस्कृतमध्यें, थॉमसननें Seasons, इंग्रजीमध्यें, त्याप्रमाणें राधारमणानीं कालचक्र मराठीमध्यें लिहून सर्व ऋतूंच्या वर्णनांची आपली हौस फेडून घेतली.

यानंतर ज्या काव्यामुळें राधारमणांचें नांव सर्वतोमुखीं झालें व ज्यामुळें उच्च दर्जाच्या कविमालिकेमध्यें त्यांस अढळ पद प्राप्त झालें तें ' फडणीस-

**फडणीस-काव्य**

काव्य ' नांवाचें मराठींतील महाकाव्य राधारमणांनीं १९०५ अखेर लिहिलें व तें २८–६–१९०६ ला फडणीस-स्मारक कमिटीमार्फत प्रसिद्ध करण्यांत आलें. या बाबतींत नाना फडणीस उत्सवाचे एक उत्पादक रा. रा. केशव बाळकृष्ण जोशी ( हल्लींचे के. बी. जोशी ) आपल्या प्रस्तावनेंत लिहितात —

" वेळास येथें १९०० सालापासून फडणीस-उत्सव सुरू करण्यात आला. उत्सवाबरोबरच ज्या विभूतीचा उत्सव करावयाचा त्याच्या संबंधानें निरनिराळ्या प्रकारचीं पुस्तकेंहि प्रकाशित करण्याची कल्पना सन १९०३ सालीं निघाली. तेव्हांपासून उत्सवानिमित्त प्रतिवर्षी एक पुस्तक बक्षिसार्थ नेमून तें संस्थेमार्फत छापून प्रसिद्ध करण्याचा उपक्रम सुरू झाला. १९०३ सालीं ' ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव कां करावेत ? ' हा विषय बक्षिसाकरितां नेमला होता. "

नाशीकचे रा. विनायक दामोदर सावरकर, बी. ए., ( हल्लीचे बॅ. तात्याराव सावरकर ) यांचा निबंध सर्वांत उत्तम ठरून त्यास संस्थेमार्फत बक्षिस मिळालें. सन १९०४ सालाकरितां 'मराठ्यांच्या इतिहासांत नानाचें महत्त्व' हा विषय नेमला होता. आलेल्या निबंधांत पुण्याचे रा. रा. कृष्णाजी महादेव संत यांचा निबंध पसंत ठरून त्यांस संस्थेकडून ठराविक पारितोषक मिळालें.

१९०५ सालीं 'नाना फडणविसांचें कवितावद्ध चरित्र' हा विषय बक्षिसाकरितां नेमला गेला. त्याप्रमाणें बावीस कवींकडून बावीस चरित्रें परीक्षणाकरितां आलीं होतीं. आलेल्या सर्व चरित्रांचें चांगलें परीक्षण होऊन, परीक्षक कमिटीनें पुणें न्यू इंग्लिश स्कूलातील संस्कृत शिक्षक रा. रा. कृष्णाजी पांडुरंग लिमये—जे राधारमण या नांवानें कविमंडळांत प्रसिद्ध आहेत—यांचेंच काव्य सर्वानुमतें पसंत केलें व त्याप्रमाणें संस्थेकडून त्यांस बक्षिसही मिळालें. आलेल्या बावीस काव्यांमध्यें यांचेंच काव्य पसंत कां झालें, त्यांत इतरांपेक्षां विशेष असें काय आहे, वगैरे सहाजिकच उद्भूत होणाऱ्या प्रश्नांचें उत्तर या ठिकाणीं देत बसण्यापेक्षां वाचकांसच तें एकवार अवश्य वाचण्याची नम्र विनंति करणेंच प्रस्तुत श्रेयस्कर व इष्ट आहे. किंबहुना 'राधारमण' हें नांवच वरीलसारख्या पोकळ शंकांचें निरसन करण्यास पुरें आहे. काव्याची भाषा प्रौढ व अलंकारिक असून काव्याचें ऐतिहासिक दृष्ट्या किंवा मांडणी फारच नांवाजण्यासारखी आहे, यांत तिलप्राय शंका नाहीं. तसेंच उपमा देण्याची हातोटी मजेदार असून अनुकरणीय आहे. सारांश एकवार तरी सदरहू काव्य प्रत्येक महाराष्ट्रीयानें अवश्य वाचावें अशी माझी त्यांस आग्रहपूर्वक विनंति आहे."

सदरहू काव्य रा. गणेश नारायण जोशी यांनीं विजय छापखान्यांत छापिलें.

'फडणीस' काव्यांतील एका कवितेबद्दल राधारमणांचा आणि एका गृहस्थांचा वाद झाल्याचें राधारमणाच्या तोंडून ऐकलें होतें. त्या गृहस्थांचें

नांव मात्र आतां लक्षांत नाहीं. ‘फडणीस’ काव्याच्या पहिल्या सर्गांत कोंकणच्या वर्णनांत :—

विद्या कला आणिक देशसेवा
या सद्‌गुणांचा बहुमोल ठेवा ।
जेथें जनांच्या वसतो सुखानें
हृत्संपुटीं मुद्रित मत्सरानें ॥

अशी कविता आली आहे. त्या गृहस्थांचें म्हणणें असें कीं, ह्या कवितेचें स्वारस्य ‘मुद्रित मत्सरानें’ या शेवटच्या दोन शब्दांनीं हिरावून घेतलें आहे.

**जीवनाचें प्रतिबिंब काव्यांत**

तेव्हां एवढे शब्द गाळा. राधारमणांचें यावर म्हणणें असें आहे कीं, हें तर माझ्या जीवनांतील अनुभवांचें सार आहे. तुम्हाला माझे प्राण मागतां येतील पण हा अनुभवांचा गड्डा कापून टाकतां येणार नाहीं.

मज्जीवनाचें हें असें कीं निधान
त्यातें कैसा होऊं मी बेइमान ॥

आणि खरें पाहिलें तर हा दोष कोंकणच्या जनांचाच नसून अखिल हिंदु जनतेचा आहे. त्यानेंच ऐतिहासिक काळांत घात केला आहे. आणि आजही हा दोष हिंदूंच्या बोकांडी बसला असल्यामुळें त्यांचें नष्टचर्य अद्यापि संपलेलें नाहीं.

यानंतरचें राधारमणांचें काव्य ‘मोरोपंतांचा प्रभुद्रोह’ हें होय. हें १९०७ मध्यें पुण्याच्या चित्रशाळा छापखान्यांत छापलें. याला तत्कालीन

**मोरोपंताचा प्रभुद्रोह**

राजकीय घटनेचा आधार आहे. लोकमान्य टिळकांवर राजद्रोह केल्याचा आरोप ठेऊन सरकारनें खटला भरला होता. खटला चालला त्यांत ते निर्दोषी म्हणून सुटले. आपल्या कल्पनाशक्तीनें या परिस्थितीसारखी मोरोपंतांच्या केकावलीमधील परिस्थिति निवडून त्याच्यावर राधारमणांनीं अन्योक्ति बसविली. चाणाक्ष

वाचकाला या झिरझिरीत वस्त्राच्या आड खरी मूर्ति कोणाची आहे हें तेव्हांच लक्षांत येतें आणि मोठी गंमत वाटते. याच सुमारास बंगालमध्यें कर्झनशाही गाजली होती बंगालची फाळणी करण्याचा सरकारचा बेत होता. कडक कायदे आणि दडपशाही यांस ऊत आला होता. महाराष्ट्राचे प्रसिद्ध नाटककार रा. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनीं महाभारतांतला एक समान प्रसंग निवडून त्यावर कीचकवध नांवाचें नाटक लिहिलें प्रतिभावान् लेखकांना असले प्रसंग सुचतात आणि त्यांच्या हातून तेजस्वी लेखन निर्मिति होते.

लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला होऊन सरकारनें त्यांस शिक्षा ठोठावली. व १९०८ सालीं त्यास मंडालेच्या तुरुंगांत पाठविलें.

**आर्यमाता विलाप**

लोकमान्यांनीं केस चांगलीच लढविली आणि उत्कृष्ट आत्मसमर्थन केलें. शिक्षेनंतरचें यांचें भाषणही त्यांच्या निर्भय आणि तेजस्वी शीलाला साजेसें झालें. त्यांची शिक्षा ऐकून सारा देश हळहळला, सरकारला दूषणें देणारे कोणी सणसणीत लेख लिहिले, कोणी सभा भरवून दणदणीत भाषणें केलीं राधारमणांनीं आपल्या शारदेला पाचारण करून तिला पुढील आदेश दिला:—

"घळ घळ घळे अश्रु, शारदे, तूं न गाळीं
तुजसि उचित नाहीं मोह हा कार्य-काळीं ।
कठिण मन करीं गे, आवरी अश्रुपात
निपट पदरि येतो ना तरी कार्यघात ॥
तुज तिलक-वियोगें दुःख वाटे अपार
करुन रुदन-योगें तें करीं मंद सार ॥

त्यांनीं त्या भरांत 'आर्यमाता विलाप' नांवाचें खंडकाव्य लिहिलें व तें राष्ट्रप्रेम पुष्पमालेचें पहिलें पुष्प म्हणून मुंबईच्या विजय छापखान्यांत १९०९ सालीं छापलें मदरह् काव्यामुळेंच राधारमणांस न्यू इंग्लिश स्कूल सोडावें

लागलें, त्याचा उल्लेख मागें आलाच आहे

सन १९१८ मध्यें शिवगंगामठाचे स्वामी शंकराचार्य यांनीं दापोलीस भेट दिली होती. त्यावेळीं राधारमणांनीं संस्कृतमध्यें ‘ आचार्य चंपू ’ रचून तो स्वामीस दाखविला. तो वाचून स्वामी संतुष्ट झाले आणि त्यांनीं राधारमणांस ‘ कवि शिरोमणि ’ ही पदवी दिली.

राधारमणांचें शेवटचें मोठें काव्य ‘ महाराष्ट्र वीरादर्शकाव्य ’ १९१९ सालीं यशवंत प्रेस पुणें, या छापखान्यांत छापून रा. रा. न. गोडबोले यांनीं प्रकाशित केलें. प्रकाशकांनीं आपल्या दोन शब्दांत पुढील निवेदन केलें आहे:—

**शेवटचें काव्य महाराष्ट्र वीरादर्श काव्य**

“ कवीच्या इतर कवितांप्रमाणेंच प्रस्तुत ‘ महाराष्ट्र-वीरादर्श ’ काव्यही सुबोध व सरळ असून त्यांत मराठे गड्यांच्या शौर्याचा विषय असल्यामुळें तें फारच बहारीचें झालें आहे. स्वराज्यप्राप्तीला उत्कंठित झालेल्या आजच्या महाराष्ट्राला तर हें काव्य आपल्या पूर्वजांच्या शूरवृत्तीचें स्मरण देऊन अतिशय आनंददायी होईल असें आम्हांस वाटतें.

प्रस्तुत काव्यांत २१ श्लोकांचा एक असे एकंदर पांच स्तबक आहेत. त्या पांचही स्तबकांतून वीररसाचा प्रवाह एक सारखाच वहात असून तो वाचकांच्या अंत:करणास हलवून सोडतो ! असें सुंदर काव्य आज महाराष्ट्र वीरशिरोमणि श्री शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक स्मारकोत्सवास महाराष्ट्र वाचकांच्या हातीं देण्याचा योग येत आहे यामुळें तर आम्हांस विशेष आनंद होत आहे. ”

वर उल्लेख आला आहे त्याशिवाय कांहीं काव्य राधारमणांनीं लिहिलें आहे. ‘ गजासुर वध ’ नांवाचें दुसरें महाकाव्य त्यांनीं करावयास घेतलें होतें. परंतु त्याचे दोन सर्ग तेवढे लिहून झाले. भारवीच्या किरातार्जुनीय काव्याचें मराठींत भाषांतर करावयास

**अपुरीं काव्यें**

घेतलें, पण तेंही अपुरेच राहिलें. कांहीं स्फुट कविता आणि प्रासंगीक कवनेंही त्यांनीं केलीं. उदाहरणार्थ—वटवृक्षास, दाता आणि देव, प्रियेचे अश्रुबिंदु, जहाल आणि मवाळ, रावबहाद्दुर रानडे, दे. भ. गोपाळराव गोखले, अण्णासाहेब पटवर्धन यांच्या निधनानंतर शोकगीतें. यापैकीं पटवर्धनांवरील गीत संस्कृतमध्यें आहे. शिवाय गणेशचतुर्थीस संस्कृतमध्यें गणेशाष्टकें कित्येक वर्षें केसरीमध्यें प्रसिद्ध झालीं आहेत. तीं राधारमणांनींच रचलेलीं आहेत. दोन तीनदां गणपतीवर रचलेली चर्पटपंजरी मुंबईच्या संदेशमध्यें छापलेली आहे. केसरी व संदेशामध्ये गणपती या एकाच विषयावर जरी कविता अनेक वेळां रचून छापिली आहे तरी त्यांतील कोणतीही वाचावयास घेतली तरी ती ताज्या, टवटवीत आणि सुगंधित अशा पुष्प मंजरीप्रमाणेंच वाटते याचा वाचकांनीं जरूर तर प्रत्यय पहावा. सन १९२० मध्यें लोकमान्य टिळक दिवंगत झाले. त्यांच्या मृत्यूची दुःखद वार्ता ऐकल्याबरोबर राधारमणांस अत्यंत दुःख झालें. त्यांची प्रतिभा त्यांस स्वस्थ बसूं देईना. अनेक मित्रांनीं 'या प्रसंगीं तुमची लखणी मुग्ध कां' अशी पृच्छा करणारी पत्रें धाडलीं. तथापि राधारमण नुकतेच आजारांतून उठले होते. मधुमेहाचा विकार जडतो कीं काय अशी शंका येऊं लागली होती. व त्यामुळें त्यांच्या वैद्यकीय सल्लागारांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणें अगदीं कांटेकोर अशी त्यांनीं या वेळीं दिनचर्या ठेविली होती. प्रकृति स्वास्थ हा प्रधान हेतु असल्यामुळें राधारमणांस आपलें मनास आळा घालावा लागला. मात्र जनतेचीं अंतःकरणें हालवून सोडणाऱ्या काव्य प्रसंगास आपणांस मुकावें लागत आहे याची त्यांचे अंतःकरणास अखंड तळमळ लागून राहिली होती.

राधारमणांच्या मनांतून 'प्रेम' 'मृत्यु' आणि 'कर्तव्य' या विषयांवर प्रत्येकीं शंभर कविता लिहून, भर्तृहरीनें ज्याप्रमाणें शृंगार, नीति आणि वैराग्य या विषयांवर शतकें लिहून अजरामर कीर्ति मिळविली, त्याप्रमाणें आपलें नांव अजरामर करून ठेवावयाचें होतें. परंतु हे संकल्प तडीस गेले नाहींत.

याप्रमाणें राधारमणांच्या लेखनाचा ओझरता परामर्श घेतला. जातां जातां दोनतीन मुद्यांची चर्चा करून हें चरित्र लेखनाचें काम संपवितों. कांहीं

**काव्य विशेष**

लोकांचें म्हणणें असें आहे कीं राधारमणांचें काव्य संस्कृतप्रचुर आणि म्हणून क्लिष्ट झालेलें आहे. याला उत्तर असें कीं त्यांच्या लेखनावर संस्कृत भाषेची छाप आहे. मोरोपंतांच्या कवितेवर अशीच संस्कृतची छाप आहे आणि पुष्कळ ठिकाणीं ती सरळ सुबोध आणि प्रासादिकही आहे. राधारमणांनी आपल्यापुढें कालिदास आणि मोरोपंत यांचा आदर्श ठेविला होता. राधारमणांचें काव्य मोरोपंतांपेक्षां कमी क्लिष्ट आहे या विधानाला पोषक असे 'कालचक्र' आणि 'फडणीस काव्य' यांतून हवे तितके उतारे काढून दाखवितां येतील. याचें प्रत्यंतर रसिक आणि मर्मज्ञ वाचकांनींच पहावें.

राधारमण पूर्ण राष्ट्रीय वृत्तीचे होते. राजकारणांत त्यांना वीरवृत्तीचा टिळक. पक्ष मान्य होता. तथापि रा. ब. रानडे किंवा गोपाळराव गोखले या पुढाऱ्यांबद्दलही त्यांच्या मनांत आदर होता. त्यांच्या काव्यांत तत्कालीन राजकीय परीस्थिति पुष्कळच उमटलेली आहे. 'मोरोपंतांचा प्रभुद्रोह' 'आर्यमाता विलाप' व 'जहाल आणि मवाळ' हीं काव्यें या गोष्टीची साक्ष देतील. 'फडणीस काव्य' आणि 'आम्ही मराठे गडी' (महाराष्ट्रवीरादर्श) हीं काव्यें कवीला इंग्रजाचा आणि जुलमी यवनी सत्तेचा तिटकारा आणि आपल्या पूर्वजांबद्दल आणि ऐतिहासीक प्रतिष्ठेबद्दल जाज्वल्य अभिमान होता हें पटवून देतील. जसे कवि विनायक, सावरकर किंवा कवि गोविंद हे स्वराष्ट्रप्रेमी आणि स्वातंत्र्याचे कैवारी म्हणावयाचे तसेच राधारमणही होते.

मग पुढचा प्रश्न साहजिकच उद्भवतो तो असा कीं राधारमणांच्या कवितेचा महाराष्ट्रामध्यें म्हणण्यासारखा बोलबाला कां झाला नाहीं ? माझ्या मतें याला कारण प्रसिद्धिकरणाचा अभाव. प्रसिद्धीकरणाचें सुद्धां तंत्र आहे. जाहिराती दिल्या पाहिजेत, प्रचार केला पाहिजे, गांठीभेटी घेतल्या पाहिजेत.

कवीनें यांतलें कांहींच केलें नसावें. काव्य जसें जसें तयार झालें तसें तसें कुठल्यातरी छापखान्यांत छापून टाकलें. त्याच्या प्रसाराची खटपट झाली नाहीं. काव्यें फूटकळ प्रसिद्ध झाली. त्यांचा संग्रह असा कधीं छापलाच नाहीं. काव्य-दोहन, अभिनवकाव्यमाला किंवा काव्यकौमुदी अशासारख्या पुस्तकांतून त्रोटक उतारे घेतले गेले. त्यावरून येणारी कल्पना ही त्रोटकच असणार. आतां त्यांचें समग्र काव्य छापून निघत आहे यावरून कवि गुणांची संपूर्ण कल्पना येऊं शकेल.

राधारमण हे जुने मराठी कवि आणि नवे मराठी कवि यांच्या मधला दूवा किंवा सांधा होते. जुन्यांतील चांगलें त्यांनीं टिकविलें आणि नव्यांतील चांगल्याचाही स्वीकार केला. पण म्हणून ते संगमावर राहिले. प्रदीर्घ रचना सर्ग, महाकाव्य वृत्तें आणि ऐतिहासिक परंपरा या जुन्या गोष्टीला कल्पना आणि विषय तेवढे नवे अशी सांधेजोड त्यांनीं केली. नवी चलनीं वृत्तें किंवा पद्यावरच्या चाली फारशा घेतल्या नाहींत. काव्यामध्यें आत्मपर Subjective निवेदन फारसें कोठें नाहीं. बहुतेक काव्य परलक्षीच Objective निर्मिलें. राजकीय मतांचे बाबतींत जितके पुढें पाऊल तितकेंच सामाजिक बाबतींत औदासिन्य. तुतारी, रणशिंग, बिगूल यांसारखें शारदेकडून वाद्यवादन करविलें नाहीं आणि मुख्य गोष्ट म्हणजे स्वतःच्या कवितेचा प्रयत्न पूर्वक प्रचार आणि प्रसार नाहीं. या कारणपरंपरेमुळें राधारमणांची कविता मागें पडली असें या लेखकाचें नम्र मत आहे. आतां तरी समग्र ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा हा योग त्यांच्या निधनानंतर सव्वीस वर्षांनीं येत आहे. या काळांत लोकांची काव्य विषयक अभिरुचि पालटली आहे. तरी सुद्धां कांहीं समान-धर्मी आढळतील. ते या ग्रंथाचें प्रेमानें स्वागत करतील अशी आशा आहे.

प्रस्तुत लेखकानें 'आनंदीकांत' या नावानें कांहीं कविता केली आहे. त्याला प्रारंभींचें मार्गदर्शन आणि उत्तेजन गुरू राधारमणांचेंच. राधारमणांच्या निधनानंतर प्रस्तुत लेखकानें एक कविता रचली होती. ती सन १९२२

ज्या काव्यरत्नावलींत छापून आली होती. ती या चरित्राचे शेवटीं दिली असतां अप्रस्तुत होणार नाहीं, अशी आशा बाळगून चरित्राचा गद्यमय भाग येथें पुरा करितों.

---

## कवि राधारमण निमाले

कवि राधारमण निमाले। कवितेच्या स्वर्गा गेले।
डौलदार गाउनि गाणीं। काव्यांची अस्सल नाणीं।
कीर्तीचा मंगल ठेवा। उत्पन्न करिल जो हेवा।
ठेऊन खूण जगतास।
स्वानंद भूमिचा वास।
स्वीकारुनि निज वाटयांस।
मारुनी लाथ जगताला। मृत्यूचा प्याले प्याला। ॥ १ ॥

फडणीस काव्य घडवीलें। चैतन्य शारदे दिधलें।
फुंकिली जिवाची ज्योत। प्रतिभेचा वाहे स्रोत।
ओतिला घडा सुरसाचा। चढविला साज लेण्यांचा।
'शब्दांची' अर्पुनि 'शाल'।
भारक्त लाउनि चाल।
होतात मनांत खुशाल।
गांठिलें शिखर कीर्तीचें। चिर सौख्य हृदय-पूर्तीचें ॥ २ ॥

पेशवे मराठे यांचा। अभिमान वाहिला साचा।
सामर्थ्यवान इतिहास। काव्यांत नटविला खास।

शौर्यास फोडिली वाचा । प्रेमानें वाचा वाचा ।
कविदोष अल्प विसरा हो ।
गुणसंघ स्मरणीं राहो ।
काव्याचा घ्यावा लाहो ।
इतिहास काव्य उभयांचा । होतसे लाभ तर वाचा ॥ ३ ॥

ते टिळक शंकराचार्य । त्रिभूवनीं धन्य कृतकार्य ।
करुनियां स्पर्श तच्चरिता । मांगल्या पावली कविता ।
पंतांचा प्रभुशीं द्रोह । केकांचा पाडी मोह ।
ऋतुचक्र सृष्टीचें काव्य ।
गंभीर कल्पना भव्य ।
रिझविती हृदय नवनव्य ।
मांडिला मेजवानीचा । कीं थाट खाद्यपेयांचा ॥ ४ ॥

वृक्षांची वेल फुलांची । रचिलिसे बाग नवलाची ।
जाहाल मवाळां थारा । सांपडला काव्यद्वारा ।
कवि–शिरोमणी ही पदवी । योग्यता कवीची पटवी ।
प्रेम–मृत्यू–कर्तव्यांचें ।
शतकत्रय विरचायाचें ।
संकल्प असे चित्ताचे ।
जाणुनी यमानें त्यांस । ओढिलें टाकुनी पाश ॥ ५ ॥

कालिदास आणिक पंत । कविमणिंचा धरिला पंथ ।
वाचुनी आंग्ल कवितेस । रंगाविलें निज वाग्वधुस ।
वेंचुनि सकलही शक्ति । साधिली गजानन भक्ति ।
होतात प्राण जंव गोळा ।
लाविला विनायकिं डोळा ।

करि अंतक चोळा मोळा ।
स्वानंद भूमिला गेले । कवि राधारमण निमाले ॥ ६ ॥

काव्याचें मंदिर अपुरें । भावि-वास-मंदिर अपुरें ।
ठेउनी आपुल्या मागें । गेलांत निघूनि का रागें ।
पुष्पाहुनि मोठी कलिका । वाटली तुम्हांला खरि का !
जी छात्रगणांवरि छाप ।
अध्यापन बसावि अमूप ।
करिल कोण त्याचें माप ।
आनंदिकांत शेवटिल । भवदीप धरी पदकमल ॥ ७ ॥

कै. कृष्णाजी पांडुरंग लिमये

तथा

कवि ‘ राधारमण ’

यांच्याविषयींच्या

# आठवणी

# आठवणी

## खरें गाणपत्य

कै. राधारमण यांचा इंग्रजी व संस्कृत शिकविण्याचा खाजगी वर्ग दापोली येथें होता. इंग्रजी सहावी व सातवी या वर्गांतील विद्यार्थी या वर्गांत येत. माझ्या गरिबीमुळें मला त्यांनीं मोफत त्या वर्गांत घेतलें होतें. हा वर्ग पहांटेस चाले. वर्गाची जागा त्यांच्या व माझ्या बिऱ्हाडापासून सुमारें अर्धा-पाऊण मैलावर होती. पहांटेच्या वेळीं त्यांना हांक मारून त्यांच्या-बरोबर मी आणि माझे एक वर्गबंधु असे आम्ही सर्व बरोबर जात असूं. पहांटेस त्यांच्या घरीं जाऊन उठविण्यासाठीं म्हणून हांक मारावी तों ते एका आसनावर हातांत पोवळ्यांची माळ घेऊन गणपतीच्या तसबिरी-जवळ त्याचा नामजप करीत बसलेले दिसत. हें पाहून मला आश्चर्य वाटे. मला वाटतें ते भरांत येऊन भाषण करूं लागले असतां त्यांच्या मुखांतून जो सरस रसवंतीचा मनोहर प्रवाह चाले त्याचें कारण वर उल्लेखिलेल्या गणपतीच्या उपासनेमुळें प्रसन्न झालेल्या गणपतिप्रियेचा म्हणजे सरस्वतीचा वरदहस्त हेंच असावें. वर्गास जाण्यास वेळ असल्यास ते जें त्या वेळीं 'विहारी' मासिकांत संस्कृत किरातार्जुनीय काव्याचें भाषांतर प्रसिद्ध करीत होते त्याच्या कच्च्या प्रतीची एक प्रत माझ्याकडून लिहवून घेत.

—**श्री. के. बी. बापट**, चिपळूण.

## १. सूक्ष्म व्यासंग व तीक्ष्ण स्मरणशक्ति

राधारमणांचा संस्कृत वाङ्मयाचा व्यासंग दांडगा होता. त्यांचा संस्कृत ग्रंथांचा संग्रहही फार मोठा असून त्यांतील प्रत्येक ग्रंथाचें त्यांनीं परिश्रमपूर्ण व सूक्ष्म वाचन केलें होतें असें कोणताही ग्रंथ उघडतांच सहज दिसून येई. एकदां असें झालें, नित्यनियमाप्रमाणें चार मंडळी जमून गप्पागोष्टी बोलतां बोलतां गाण्याचा विषय निघाला. त्या विषयावरील तज्ज्ञ असा त्या मंडळींत कोणीच नव्हता. मालकंस रागांत पंचम लागतो

कीं नाहीं य.वर बरीच भवति न भवति होऊन अखेर निर्णय लागेना. तेव्हां राधारमण म्हणाले, "मला गाण्याचा गंधही नाहीं. परंतु पंचमहाकाव्यांवर टीका लिहिणारा मल्लिनाथ हा त्या विषयांत चांगलाच तज्ञ असला पाहिजे असें त्यानें आपल्या टीकेंत प्रसंगानुसार एतद्विषयक जे अभिप्राय ठिकठिकाणीं व्यक्त केले आहेत त्यांवरून दिसून येतें. माघ काव्यावर टीका लिहितांना एके ठिकाणीं त्यानें मालकंस राग गातांना जर पंचम सूर येईल तर आप्तसुहृदाच्या मृत्यूमुळें जसें त्याच्या नातेवाइकांस दुःख होतें तसें दुःख श्रोतृवर्गास होतें, असा अभिप्राय दिलेला आहे" असें सांगून पंचम सूर मालकंसांत लागत नाहीं असा निर्णय देऊन माघाचा तो सर्ग, त्यांतील तो श्लोक, त्यावरील टीकेचें तें पृष्ठ व त्यावरील साधारणतः कोणत्या ओळी तें, इतका बारीक तपशील देऊन आपलें म्हणणें बरोबर आहे कीं नाहीं तें पडताळून पाहण्यास सांगितलें. व पुस्तक काढून पाहतां त्यांचा तपशीलही तंतोतंत बरोबर ठरला. ही एकच गोष्ट त्यांचा संस्कृत विषयाचा अभ्यास किती सूक्ष्म होता तें दाखविण्यास पुरेशी आहे.

## २. बाणे कवींचें बाणेदार उत्तर

सन १९१४ ते १८ युरोपांतील पहिलें महायुद्ध झालें. त्या काळात सैन्यभरती करण्यासाठीं रत्नागिरी जिल्ह्यांत दोन बड्या ऑफिसरांची नेमणूक झाली होती. राधारमण हे एक उच्च दर्जाचे कवि असून त्यांची कविता स्फूर्तिदायक असते असा त्यांचा लौकिक या ऑफिसरद्वयाचे कानीं पडल्यावरून त्यांनीं मुद्दाम घरीं जाऊन राधारमणांची भेट घेतली व भेटीचा उद्देश त्यांना कळविला व या प्रसंगाला उचित असें एखादें छोटेंसें काव्य तुम्हीं लिहिलेंत तर सरकारकडूनही त्याचा चांगला पुरस्कार केला जाईल अशी खटपट करण्याचें राधारमणांस आश्वासन दिलें. राधारमणांनीं या संधीचा फायदा घेण्याचें ठरवून 'महाराष्ट्रवीरादर्श' नांवाचें काव्य लिहिलें. या काव्यांत पांच सर्ग असून प्रत्येक सर्गांत २१ श्लोक आहेत. सदर काव्य ऑफिसरद्वयास फार पसंत पडलें व त्याचा पुरस्कार केला जावा म्हणून सरकारकडे जोराची प्रशंसा करण्याचेंही त्यांनीं मनाशीं ठरविलें. परंतु पहिल्या सर्गांतील प्रत्येक श्लोकाचे चौथ्या

३९१३५७

चरणांत 'ऐसे कोण जवान मर्द जगतीं आम्ही मराठे गडी' ही समस्या घातलेली त्या ऑफिसरद्वयास रुचली नाहीं. 'आम्ही मराठे गडी' याऐवजीं 'ते हे मराठे गडी' असा पाठ घालावा असें त्यांचें म्हणणें होतें. तो पाठ फिरवावा म्हणून त्यांनीं राधारमणांची गांठ घेऊन त्यास सांगितलें. त्याबाबत पुष्कळ चर्चा झाली. 'मराठे गडी' म्हणजे जातीनें जे मराठे तेवढेच होत असा संकुचित अर्थ माझा नाहीं. तत्कालीन परिस्थितींत महाराष्ट्र ही माझी मायभू असें मानून तिच्या प्रतिष्ठेसाठीं ज्यांनीं ज्यांनीं आपले प्राण पणास लावले, मग ते मराठे असोत, यवन असोत किंवा इतर कोणत्याही जातीचे लोक असोत, त्यांस मी मराठे समजतों. उलट ज्या मराठ्यांनीं कोणत्या ना कोणत्या मिशानें मातृभूशीं द्रोह केला त्यांस मी मराठे समजत नाहीं एवढेंच नव्हे तर त्यांचा 'आम्ही मराठे गडी' यांत अंतर्भाव करीत नाहीं असा राधारमणांनीं खुलासा करून तो पाठ बदलणें म्हणजे माझ्या मुलाच्या गळ्यास मींच नख लावल्यासारखें आहे, म्हणून मी तो बदलणार नाहीं, असें स्पष्ट सांगितलें. राधारमणांची स्पष्टोक्ति ऑफिसरद्वयास आवडली तर नाहींच, उलट इतकी झोंबली कीं, 'तर आम्हाला त्याचा पुरस्कार करतां येणार नाहीं' असें सांगून ते जाण्यास निघाले. राधारमणांनींही तितक्याच हिरिरीनें त्यांस प्रत्युत्तर केलें, 'ठीक आहे, मुलाला जन्म दिलेला आहे. त्याच्यांत सामर्थ्य असेल तर तो जगेल, नसेल तर आपोआपच मरून जाईल. तुमच्या पुरस्काराची मला पर्वा नाहीं.' काव्यांतील शब्दांची योजना करतांना राधारमण किती काळजी घेत असत हें यावरून कळून येण्यासारखें आहे.

## ३. सहृदय पितृत्व व पतिपणा

सन १९१७ सालीं राधारमणांनीं बी. ए. ची पदवी घेतली. नंतर त्यांचा नोकरीचा जीवनक्रम सुरळित चालू होतो न होतो तोंच त्यांची पत्नी निवर्तली. या वेळीं राधारमणांचें वय चाळिशीच्या आंतच होतें. त्यांची सांपत्तिक स्थिति जरी म्हणण्यासारखी स्पृहणीय नव्हती तरी तत्कालीन परिस्थितींत द्वितीय संबंध करण्याचें ते मनांत आणते तर तें

सहज शक्य होतें. किंबहुना त्यांनीं द्वितीय संबंध करावाच असा त्या वेळीं प्रयत्नही केला गेला. तथापि प्रथमपत्नीच्या निधनप्रसंगीं द्वितीय संबंध न करण्याचा त्यांनीं जो निश्चय केला होता तो अखेरपर्यंत टिकला होता. एकदां तर एका मुलीचे पालकांनीं स्वतः राधारमणांस भेटून या बाबतींत आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली. त्यांचें सर्व म्हणणें राधारमणांनीं ऐकून घेतलें व शेवटीं ' या लग्नासाठीं तुम्हीं किती खर्च करणार आहां ? ' असा त्या पालकांस प्रश्न केला. ' पांचशें रुपयांपेक्षां जास्त खर्च करण्याची आमची ऐपत नाहीं, परंतु मुलीचा तुम्हींच स्वीकार करीत असाल तर सहाशें रुपये खर्च करूं ' असें उत्तर मिळालें. हें त्या गृहस्थांचें उत्तर मिळाल्यावर राधारमण उठले व घरांतून तीनशें रुपयांच्या नोटा आणून त्या सदर गृहस्थांपुढें ठेवून म्हणाले, ' आपली मुलगी माझ्यासारख्या म्हाताऱ्यास ( ? ) देऊन तिच्या आयुष्याची माती करूं नका. तुमचे सहाशें रुपये व हे तीनशें रुपये मिळून नऊशें रुपये खर्च करून आपण आपल्या मुलीला छानदार नवरा पाहूं या ! ' यावर आलेले गृहस्थ काय बोलणार ? ते निमूटपणें उठून गेले.

—श्री. **रा. वा. दातार**, बी. ए., डेप्युटी सुपरवायझर, अलिबाग.

## शीघ्र कवित्व

इ. स. १९११ सालीं मी दापोली हायस्कूलमध्यें ५ व्या वर्गांत असतांना गुरुवर्य लिमये आम्हांला संस्कृत शिकवीत असत. १९१२ च्या जानेवारींत मकरसंक्रमणानिमित्त बाहेरगांवीं असलेल्या कांहीं मित्रांस मीं तिळगूळ पाठविण्यासाठीं त्याच्या कांहीं पुड्या केल्या. पण त्यावर ' तिळगूळ घ्या गोड बोला ' याऐवजीं दुसरें कांहीं संस्कृतांत लिहावें असें माझ्या मनांत आलें; म्हणून मी गुरुवर्य लिमये यांच्या घरीं गेलों व माझा येण्याचा हेतु सांगितला. लगेच त्यांनीं पुढील संस्कृत कविता लिहून माझ्या हातांत कागद दिला. ती कविता अशी——

अतःस्नेहेन संयुक्तान् बहिश्च सितयान्वितान् ।
तिलान्गृहाण सन्मित्र सर्वत्र मधुरं वद ॥

–श्री. **सखाराम हरि पंडित**, हेडमास्तर, शाळा रिसोड, जि. अकोला.

## संस्कृत गद्यापेक्षां पद्याचीच आवड

दापोली बालसंवर्धनालय (बोर्डिंग) ही किल्येकांच्या आयुष्याला निरोगी वळण लावणारी एक नमुनेदार संस्था दहा वर्षें (सन १८९० ते १९००) चाललेली होती. कै. कुशाभाऊ (कृ. पां. लिमये) हे माझे सहाध्यायी होते. सन १८९५ मध्यें आम्ही मॅट्रिक झालों.

कै. कुशाभाऊंचें संस्कृत काव्याचें वाचन ते पांचव्या सहाव्या इयत्तेंत असल्यापासूनच होतें. मोरोपंत वगैरे कवींचीं काव्येंही त्यांनीं चांगलीं वाचलीं होतीं. मूळपासून गद्यापेक्षां पद्यानेंच त्यांचें चित्त रंगून जाई व त्यांतच त्यांच्या काव्यस्फूर्तीचें बीज आहे.

महाराष्ट्र नाटक मंडळी मीं स्थापन केली त्या वेळीं प्रसिद्ध अमेरिकन कवि Lowell यांच्या काव्यांतील एक पंक्ति Not failure but low aim is crime ही मंडळीचें ब्रीदवाक्य म्हणून स्वीकारलेली होती. तिचें संस्कृत रूपांतर मीं कै. कुशाभाऊंकडून करून घेतलें. तें मंडळीच्या तिकिटांवर आम्ही छापीत असूं. तें रूपांतर असें:— नोच्चार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः ।

—**त्र्यं. सी. कारखानीस**, संस्थापक, महाराष्ट्र नाटक मंडळी,
२८१ शनिवार पेठ, पुणें.

## १. मोहाचे नारळ

एकदां राधारणांना मोहाचे नारळ दिले होते. पुन्हां भेटलों तेव्हां ते म्हणाले, "तुमच्या मोहाच्या नारळांचा फारच उपयोग झाला. येथें नवीन मुन्सफ आले आहेत. त्यांस घेऊन मामलेदारसाहेब मला हेड मास्तर म्हणून औपचारिक रीत्या भेटण्यास आले होते. त्या वेळीं सदरहू नारळांनीं त्यांचा पाहुणचार केला व मोहाच्या नारळांबद्दल त्यांस माहिती दिली. ती देतांना हिंदुधर्माचे व्याख्येची 'उपास्यानाम् अनियमः एतद्धर्मस्य लक्षणम् ।' ही ओळ म्हणून मोहाचा नारळ विश्वासघातकी व अनियमित कसा आहे याचें वर्णन केलें. तेव्हां त्यांस फारच मौज वाटली."

## २. शाळा

एकदां श्री. कृष्णाभाऊ लिमये आडे गांवाहून दापोलीला पायीं जात होते. वाटेंत त्यांना एक बडे ओळखीचे गृहस्थ बैलगाडींतून जात असताना भेटले. त्यांच्या आग्रहास्तव श्री. लिमये त्या गाडींत बसले बऱ्याच गप्पागोष्टी झाल्यावर ते सद्गृहस्थ श्री. लिमयांना म्हणाले, "आज एका सुंदर नायकिणीचें गाणें आहे. तरी त्यासाठीं आज आपण रहा. तुमची शाळा न बुडण्याची व्यवस्था मी करीन." श्री. लिमयांनीं उत्तर दिलें, "आभारी आहें आपला; पण मी येणें शक्य नाहीं. मी एका शाळेचा मुख्याध्यापक आहें. शेंकडों विद्यार्थ्यांचे डोळे माझ्या हालचालींकडे लागलेले असतात. क्षमा करा. मी येणें शक्य नाहीं." आणि श्री. लिमये यांनीं आपला सीधा रस्ता पत्करला !

—श्री. **भा. ग. निजसुरे**, पेन्शनर, आंजर्लें.

## १. मानवतेचे प्रतीक

गु. लिमये हे शाळेंतील शिक्षक म्हणून आदरणीय तर होतेच होते पण गरिबांबद्दल तर त्यांस विशेष कळवळा असे. त्या काळीं मी, माझी आई व भाऊ वगैरे कांहीं वामपरिस्थितीमुळें 'गरीब' या सदरांतच मोडत असूं. माझ्या घरच्या सर्व मंडळींचा व त्यांचा एक प्रकारचा घरोबाच होता. तेव्हां त्या आमच्या वामपरिस्थितींत त्यांनीं आईला निरपेक्षतेनें योग्य मार्गदर्शन केलें. एक दिवस मी तेथें असतांना पुढील गोष्ट पाहिली. गुरुवर्य लिमये यांनीं अत्यंत निरपेक्षतेनें कोणा एका 'पांडू' नांवाच्या गरीब माणसाच्या वतीनें कागदोपत्रीं व सरकारदरबारीं खटपट करून त्यास तीनशें रुपये मिळवून दिले. त्या काळीं तीनशें रुपये म्हणजे केवढीतरी रक्कम होती; अन् विशेषतः गरिबाला तर त्याची किंमत फारच होती. त्या दिवशीं मी तेथें असतांनाच त्या पांडूची तीनशें रुपयांची मनीऑर्डर घेऊन 'शिंदे' नांवाचा पोस्टमन सही व साक्षीसाठीं पांडूसह तेथें आला. पांडूबरोबर दुसरेही दोन गरीब पुरुष व एक गरीब बाई होती. सहीसाक्षीचा विधि झाल्यानंतर पांडूनें कृतज्ञता म्हणून गुरुजींस विचारलें, "आतां या तीनशेंची काय वाट लावावयाची ?" गुरुजींनीं विचार-

पूर्वक सांगितलें, " आधीं ह्या ' शिंदे ' पोस्टमन यास त्यांच्या मुलाच्या पुस्तकांसाठीं चार रुपये दे; नंतर अमकेयास पंचवीस दे व तमक्यास पन्नास दे व बाकीचे घरीं ने. " पांडूनें पोस्टमनला चार रुपये दिले व चटकन् पंचवीस रुपये मोजून त्यांच्या स्वतःपुढें ठेवले व हात जोडून म्हटलें, " केवळ तुमच्या खटपटीनें मला हे पैसे मिळाले तर त्यांतील मी कृतज्ञतेनें हे पंचवीस रुपये देत आहें ते घ्या; नाहीं म्हणूं नका; मला वाईट वाटेल " असें म्हणून त्यानें गुरुजींच्या पायांवर डोकें ठेवलें. गुरुजींनीं त्याला चटकन् उठवलें व म्हटलें, " पांडू, तुला पैसे मिळाले, ते मलाच मिळाल्यासारखे आहेत. मी एवढ्यावर तृप्त आहें. तुझ्या कृतज्ञतेनें मला तीनशेंहून अधिक पैसे मिळाले आहेत; तेव्हां हे पैसे घेऊन जा. " बिचारा पांडू तर बोलता बंद झाला; पण इतका वेळ किंचित् बाजूला उभी असलेली ती गरीब बाई चटकन् पुढें झाली व त्या पंचविसांत आणखी पंधरा घालून गुरुजींच्या पायांवर डोकें ठेवून त्यांना ते घेण्यास आग्रह करूं लागली. गुरुजी चटकन् सावरून बसले व पांडूस म्हणाले, " मी हे चाळीस रुपये घेतों—घेतले; पण ते तुला परत देत आहें, अन् एवढ्याकरितांच कीं या माझ्या मुलीला याचें लुगडें व बांगड्या मिळाव्यात. उचल हे चाळीस रुपये अन् तिच्यासाठीं खर्च कर. बिचारी बाई ! तिला कृतज्ञता व्यक्त करतां येईना, म्हणूनच केवळ गुरुजींच्या पायांवर डोकें ठेवून रडूं लागली ! आणि या तिच्या अश्रूंनीं जेवढी कृतज्ञता व्यक्त झाली तिचा एकदशांशही पांडूच्या शब्दांनीं झाली नव्हती ! ! गरिबांच्याबद्दल ही निरपेक्षता व हा त्याग किती जणांच्या हातून होत असेल ! म्हणूनच लिमये गुरुजी हे गुरुजी तर होतेच, पण त्याहीपेक्षां अधिक मानवतेचे प्रतीक होते.

## २. क्वचित् कठोर पण प्रेमळ

लिमये गुरुजी अत्यंत प्रेमळ व शांत असत. विद्यार्थ्यांवर ते कधींही फारसे रागावलेले दिसत नसत. आमच्या वर्गांत असणाऱ्या मुलांनीं तर त्यांना कधीं सुद्धां रागावलेले पाहिलें नव्हतें. पण अखेर एक दिवस असाही उजाडला कीं त्या दिवशीं लिमये गुरुजींचा रुद्रावतार आम्हां विद्यार्थ्यांस

दिसला व विद्यार्थ्यांपैकीं एकास ( हल्लींच्या साने गुरुजींस ) विशेष कठोरतेनें अनुभवास आला. मी स्वतः त्या दिवशीं वर्गांत जरा उशिरां आलों होतों. मी आलों तेव्हां वातावरण बरेंच शांत झालेलें होतें. पण उष्णतामान गरम गरम भासत होतें. कांहींतरी विशेष झालें आहे हें खास असें वाटत होतें; पण निश्चिततेनें सांगतां येत नव्हतें. वादळानें झालेलें 'नुकसान' प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर प्रतीत होत होतें व हातावरचे वळ त्याची साक्ष देत होते. लिमये गुरुजींचा तो भयानक अवतार विद्यार्थी-वर्गाच्या मनावर कायमचा राहिला ! अन् एवढें जरी झालें तरी लिमये गुरुजी अत्यंत शांत, प्रेमळ व हळव्या मनाचेच आहेत ही विद्यार्थ्यांची त्यांच्याबद्दलची मनोमय खात्री कधींच व कशानेंही पुसून गेली नाहीं. मला तर सर्व नंतरच कळलें, पण प्रत्येक विद्यार्थ्याच्या तोंडून लिमये गुरुजींचा रुद्रावतार व त्या काळच्या बावळ्या सानेची सहनशीलताही ऐकूं येत होती.

## ३. आदर उत्पन्न करणारा चेहेरा

कै. गुरुवर्य लिमये यांचें नांव मी स्वतः इंग्रजी तिसरींत असतांना इतर विद्यार्थ्यांकडून ऐकलें होतें. त्यांची भव्य व गंभीर अन् विद्यार्थी-वर्गाच्या मनांत एकदम आदर व भीति उत्पन्न करणारी मूर्ति प्रत्यक्ष पाहण्याचा योग लवकरच आला. आज या क्षणाला सुद्धां डोक्याला जरीचा शेंदरी चौकड्यांचा रुमाल बांधलेली व धीमेपणानें ठाम पावलें टाकीत जाणारी त्यांची ती मूर्ति डोळ्यांसमोर उभी रहाते. त्यांच्याबद्दल एकदम भीति तर वाटलीच पण त्या भीतीपेक्षां आदराचीच भावना अधिक तीव्रतेनें उत्पन्न झालेली होती. त्या काळीं तरी दुसऱ्या कुठल्याही शिक्षकाकडे पाहून माझ्या मनांत एवढी आदराची भावना उत्पन्न झाली नव्हती.

—डॉ. रा. कें. जोशी, उंबरगांव.

## १. निर्मत्सरी उदारपणा

कै. राधारमण यांच्या मनाचा विशालपणा पटविणारी एक आठवण मला अद्यापिही मार्गदर्शक वाटते. १९२० मध्यें एकदां एक गृहस्थ

त्यांचेकडे जाऊन त्यांस म्हणाले, “ अहो लिमये मास्तर, तुमच्या शाळत आलेले अमुक अमुक नवे मास्तर तुम्हांलाही मागें टाकणार असें लोक म्हणतात.” यावर ते चटकन् म्हणाले, “ मग मला त्यांत फारच आनंद आहे. माझ्या हाताखालीं जर असे शिक्षक असले तर त्यांत माझा मोठेपणाच आहे.” ह्या त्यांच्या निर्मत्सर मनाचा मोठेपणा माझे मनावर अजून ठसलेला आहे. असे निर्मत्सर हेडमास्तर ज्या शाळांस मिळतील त्यांचें महद्भाग्यच !

## १. ‘ पिक् गुलाभ्यां दाणिच् ’

कै. राधारमण हे विद्वान् होते परंतु वेदाभ्यासजडत्व त्यांचे ठिकाणीं आलेलें नव्हतें. त्यांचें खाजगी संभाषण विनोदप्रचुर असे. त्यांचा उच्च व संस्कृत व्याकरणतज्ज्ञास साजेसा असा एक विनोद मला अजून आठवतो. पाणिनीच्या सूत्रासंबंधीं विषय चालला असतां ते सहज म्हणाले, “ अहो, पाणिनीच्या सूत्रांप्रमाणें मराठी भाषेचीं सूत्रेंही तयार करतां येतील. पहा–‘ पिक्गुलाभ्यां दाणिच्’ (पिक व गुलाब या शब्दांस दाणि हा प्रत्यय लावून पिकदाणी व गुलाबदाणी असे शब्द सिद्ध होतात.) तसेंच ‘ एकात्तरगुडानाञ्च ’ ( त्याचप्रमाणें ‘ एक ’, ‘ अत्तर ’ आणि ‘ गुड ’ यांसही दाणी हा प्रत्यय जोडून एकदाणी, अत्तरदाणी व गुडदाणी हे शब्द सिद्ध होतात. ) वरील सूत्रांत किती सुंदर विनोद आहे हें संस्कृतज्ञांस विशेष सांगावयास नकोच.

—श्री. **स. वि. बर्वे**, एम्.ए., एस्.टी.सी.,
शिक्षक, युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण.

## स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते

सोळा वर्षांहून लहान असल्यामुळें मला व्हर्नाक्युलर फायनलचे परीक्षेला बसतां येईना. त्या वेळीं दापोलीच्या इंग्रजी शाळेंत मुलींना प्रवेश नव्हता. म्हणून पुढें काय करावें हा प्रश्न उभा राहिला. पण दैवयोगानें इंग्रजी शाळेचे त्या वेळचे मुख्याध्यापक श्री. जोशी हे कांहीं कारणासाठीं शाळा सोडून गेले. आणि श्री. लिमये मुख्याध्यापक झाले. आमचा श्री. लिमयां-

कडे बराच घरोबा होता. त्यांची मुलगी द्रौपदी हिचेबरोबर खेळण्यास मी त्यांचेकडे जात असें. त्या वेळीं एकदां "मी इंग्रजी शाळेंत येऊं का?" असें लिमये गुरुजींना विचारलें. कांहीं दिवसांनीं "पहिल्या तारखेपासून तूं शाळेंत ये; तुझें नांव घालूं" असें त्यांनीं सांगितलें; आणि मी व मैत्रीण द्रौपदी अशा दोघी शाळेंत जाऊं लागलों. आणि त्या वेळपासून पुढील काळांत मुलींना त्या शाळेंत प्रवेश मिळूं लागला.

—सौ. **गिरिजाबाई अनंत बर्वे**, मेंबर, डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड, ठाणें.

## आदर्श शिक्षक

सन १९०७-८-९ सालांतील राजकीय घडामोडींत, सुरतेची कॉंग्रेस, लो. टिळक व काळकर्ते परांजपे याचे खटले व त्यांना झालेल्या जबर शिक्षा यांनीं आमचे शाळेंतील विद्यार्थीवर्ग सरसहा गरम झाला होता. तेव्हां न्यू इंग्लिश स्कूलमध्यें गु. प. वा. एम्. पी. ओक व गु. के. पी. लिमये हे संस्कृत शिक्षक म्हणून होते. आम्ही विद्यार्थी उभयतां शिक्षकांकडे पूज्यबुद्धीनें बघत असूं. त्यांच्या शिकवणींत तशीच आपुलकी, गोडावा व कळवळा होता. श्री. ओक मास्तरही कवि होते. ते मोठ्या अजीजीनें शिकवीत; पण राजकारणाचा संपर्क टाळीत. याच्या उलट श्री. लिमये यांच्या काळ्याभोर दाढीच्या आणि पाणीदार डोळ्यांच्या जरबेनें दिसावयास उग्र असले तरी विनोदाचे फवारे उडवीत रमत गमत शिकवीत. ते स्वतः कट्टे टिळकभक्त जलज्जहाल असल्यानें काव्य शिकावितांना त्यांचा तास केंव्हाच संपला असें वाटे. काव्यपाठाशीं समरस होऊन त्यांतील रसाची हृदयस्पर्शी तऱ्हेनें उकल करून दाखविण्याची त्यांची शैली अजबच होती. अजविलाप शिकवितांना त्यांनीं अक्षरशः आम्हांस तासन्तास हसविलें आणि रडविलें आहे.

—अॅडव्होकेट **श्री. ग. भट**, एम्.ए., एल्एल्.बी.

'गणेश-गीत-सहस्री' कर्ते.

## रसिक शिक्षक

राधारमण कवि उर्फ लिमये गुरुजी हे आमच्या शाळेंत संस्कृतज्ञ म्हणून विशेष, व इंग्रजी व मराठी भाषांचेही उत्तम शिक्षक म्हणून, अनेक

त्पें प्रसिद्ध होते. उच्च विचारसरणी व साधी रहाणी, सर्व विद्यार्थ्यांशीं सहृदय वागणूक, मनमोकळा स्वभाव या गुणांमुळें ते विद्यार्थीवर्गामध्यें फार प्रिय झाले होते. विद्यार्थ्यांशीं सतत मिसळून त्यांचा दरारा यत्किंचितही कमी झाला नाहीं. लिमये गुरुजींच्या वाङ्मय शिकविण्याच्या पद्धतीमुळें मला मराठी व इंग्रजी वाङ्मयाची गोडी लागली व शास्त्रीय व्यवसाय असूनही ती अजून टिकून आहे.

जालगांवपासून शाळा सुमारें अर्धा मैल अंतरावर एका टेकडीवर आहे. वाटेंत त्या वेळीं कांहीं नागचांफ्याचीं व बकुळीचीं झाडें होतीं. फुलांच्या मोसमांत, शाळेच्या वेळे अगोदर, पुढें जाऊन हीं फुलें तोडून व बकुळीच्या फुलांचे तुरे करून ते लिमये गुरुजींना अर्पण करण्यासाठीं जालगांवात रहाणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांत स्पर्धा लागलेली असे. या एकाच गोष्टीवरून ते विद्यार्थीवर्गामध्यें किती प्रिय होते हें पटेल.

—श्री. **पां. ना. जोशी**, बी.ए. (ऑनर्स), एम्. एस्सी., टेक., एफ. आर. आय.सी. प्रिन्सिपल, व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूद, माटुंगा, मुंबई यांजकडून.

## १. मातेचें स्थान

एकदां वर्गांत शिकवीत असतांना थोर पुरुषांच्या आयांच्या अंगचे इतर कांहीं गुण जरी जनतेला दिसले नाहींत तरी हरकत नाहीं. हें सांगतांना त्यांनीं प्रसिद्ध कवि मिल्टन ह्याच्या आईबद्दल पुढील वाक्य सांगितलें—

"Other qualifications she need not have. It was enough that she was the mother of Milton."

मिल्टनच्या आईच्या अंगीं इतर कांहीं गुण नसले तरी ती मिल्टनची आई होती एवढीच गोष्ट तिच्या मोठेपणाची साक्ष पटविते.

## २. जहाल मताचे टिळक भक्त

गुरुवर्य लिमये हे जहाल पक्षाचे टिळकभक्त होते. सन १९०७–८ मध्यें शनिवारांतील त्यांचे बिऱ्हाडीं आम्हां विद्यार्थ्यांच्या गुप्त सभा भरत.

तेथें शिवरामपंत परांजप्यांच्या वडील चिरंजिवांचें भाषण आम्हीं एकदां ऐकलें होतें.

—श्री. वि. ह. निजसुरे, धुळें.

## अभिनव भारताची दीक्षा

वयाचे आठव्या वर्षींच जेव्हां मला शिक्षणासाठीं प्रथम दापोली येथील बोर्डिंगांत आणून ठेवण्यांत आलें तेव्हांच लिमये गुरुजींचा आणि माझा प्रथम परिचय झाला. यानंतर माझा व भाऊंचा ( मी त्यांना भाऊ म्हणत असें ) पुनश्च पुण्याला संबंध आला, तो बराच काल टिकला. मी पुण्याला कांहीं दिवस गोखल्यांचे वाड्यांत त्यांच्याचकडे रहात होतों. याच वेळीं कॉलेजचे वसतिगृहांतून काढून टाकल्यामुळें आजचे स्वातंत्र्यवीर बॅ. विनायक दामोदर सावरकर हेही त्याच गोखल्यांचे घरांत रहात होते. कै. कृष्णाजी पांडुरंग लिमये यांनींही याच कालांत अभिनव भारताची दीक्षा घेतली होती. मी लहानपणापासून काव्यप्रवृत्त होतों, त्यामुळें ते माझें कौतुक करीत असत. त्यांच्याच आदेशानुसार मी ‘ चापधर ’ या टोपणनांवाखालीं काव्यें प्रसिद्ध करूं लागलों.

—श्री. **शंकर नारायण मोघे**, मुंबई.

## एक प्रसंग

श्री. लिमये यांना पोहण्याची आवड असे. व ते इतर शिक्षकांसह जालगांवच्या तळ्यांत पोहण्यास जात त्या वेळीं एवढा मोठा देह उत्तम पोहूं शकतो याचें आम्हांस कौतुक वाटे. या त्यांच्या हौशीमुळें एकदां त्यांच्या जिवावर प्रसंग आला होता. ब्रह्मचारी मुख्याध्यापक श्री. शंकरराव जोशी, एम्. ए., हे पोहणें शिकत होते. पोहतां पोहतां ते थकले व आश्रयासाठीं जवळपास आधार पाहूं लागले. तोंच त्यांच्या दृष्टीला श्री. लिमये पडले. त्यांनीं लिमयांना जवळ पाहून त्यांच्या गळ्याला मिठी मारली व तरण्याऐवजीं दोघेही गटंगळ्या खाऊं लागले. गुहागरचे काळे वगैरे अट्टल पोहणाऱ्या विद्यार्थ्यांना तें दृश्य पाहून आश्चर्य व भीति वाटली. परंतु त्यांनीं ताबडतोब मंडळींकडून तळ्यांतील बुडणाऱ्या मंडळींस हात देववून त्यांच्यावरचें प्राणसंकट टाळलें व सर्वांस आनंद झाला.

—श्री. **परशुराम गोपाळ मंडपे**, बी.ए., एलएल.बी., दापोली.

## रसिकता

गुरुवर्य लिमये यांचें संस्कृत व मराठी भाषांवर प्रभुत्व होतेंच परंतु इंग्रजी काव्याच्याही अंतरंगांत ते जात असत. त्यांची रसिकताही वाखाणण्यासारखी होती. ते कॉलेजांत शिकत असतांना कोठलेंतरी चांगलें नाटक ( गडकऱ्याचा 'एकच प्याला' म्हणाले असें वाटतें ) पहाण्याकरितां तांब्या गहाण ठेविल्याचें त्यांनीं आम्हांस सांगितलें.

—श्री. **सीताराम नारायण देशपांडे**, क्लार्क ऑफ् दी कोर्ट, रत्नागिरी.

## मजल्यामजल्यांनीं हंसणारे

कै. कृ. पां. लिमये हे फार विनोदी होते व हंसूं लागले म्हणजे फारच मोठ्यानें हंसत. एकदां असें झालें कीं येथील नातूंचे चाळींत तळमजल्यावर ते व दुसरी मंडळी यांची खोली होती. त्या वेळीं केशवराव मनोहर, साने, रामजी वैद्य ( दांडेकर ) व नारायणराव गोगट्यांचे भाचे पुरुषोत्तम जोशी हे १८९८ मध्यें आफ्रिकेंत जावयास निघाले. त्या रात्रीं आम्ही दापोलीचे शाळेंतील दहाबारा जण जमलों होतों. सबंध रात्र आम्हीं गप्पांत काढली. रात्रीं १२–१ वाजतां लिमये यांनीं कांहींतरी कोटी केली तेव्हां आम्ही सर्व हंसूं लागलों व लिमये तर मजल्यावर मजले हंसूं लागले. तेव्हां वरच्या मजल्यावरची मंडळी काय गडबड, मारामार झाली तें पहाण्यासाठीं जिन्यांतून भराभर खालीं उतरूं लागली. त्यांची चाहूल लागतांच आम्हीं सर्वांनीं एका क्षणांत दिवे मालवून अगदीं शांतता धारण केली. लोक खालीं येऊन इकडे तिकडे पाहून कांहींच पत्ता लागेना म्हणून परत जिना चढूं लागले. शेवटचा मनुष्य जिना चढून जातांच आम्ही सर्व इतक्या जोरानें पुन्हा हंसलों कीं तो आवाज पहिल्यापेक्षांही मोठा झाला. मग लोक आम्हांला फाजील टारगीं पोरें आहेत असें बडबडत वर गेले. व पुन्हां खालीं आले नाहींत.

—महामहोपाध्याय **पांडुरंग वामन काणे**, एम्.ए., एल्एल्. एम्.,
उपकुलगुरु, मुंबई विश्वविद्यालय.

## स्वभावविशेष

विनोदी स्वभाव हा लिमयांचा जन्मसिद्ध सद्गुण असल्याकारणानें ते जालगांव येथील सर्व आबालवृद्धांस फार प्रिय वाटत असत. कोणींही दुःखीकष्टी अगर संकटग्रस्त गृहस्थाची आणि त्यांची मुलाखत होण्याची खोटी त्याबरोबर त्या गृहस्थाचे सर्व विकार नष्ट होऊन जाऊन नव-चैतन्ययुक्त व्हावयाचे अशी त्यांच्या स्वाभावामध्यें जादू भरलेली होती.

—श्री. **द. ह. परांजपे**, जालगाव.

## गुरु-शिष्य एकदम बी.ए.

पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मध्यें मी मॅट्रिकचे वर्गात शिकत होतों. त्या वेळीं लिमये गुरुजी आमचे वर्गाला संस्कृत शिकवीत असत. आम्हाला संस्कृत इंग्रजींतून शिकावें लागत असूनसुद्धां ते काव्य शिकवूं लागले कीं आम्हांला इंग्रजी भाषेच्या अडचणीचा विसर पडत असे. जणूं आम्ही समुद्रकांठच्या ओल्या मऊ वाळूवरूनच मार्ग आक्रमीत असूं. पुढें सन १९१७ सालीं असा योग आला कीं आम्ही गुरु-शिष्य एकदम बी. ए. ला बसलों. फार मोठेपणीं परीक्षेला बसल्यामुळें ते यशाबद्दल साशंक होते; पण मला वाटे ते पास होतीलच. ते पास झाल्याचें समजल्यावर मला फार आनंद झाला.

—श्री. **गो. रा. चोळकर**. इचलकरंजी.

## एक प्रसंग

दापोली बोर्डिंगांत एका प्रसंगीं संस्कृतमधून वेणीसंहार नाटकांतील एक अंक केला होता. त्यांत राधारमणांनीं केलेली भूमिका फारच उत्तम वठली होती. त्या वेळीं त्यांनीं जानवें तोडून, मोठ्या आविर्भावानें "इयं मे जाति त्यक्ता" असें बोललेलें आठवतें.

——श्री. **अण्णासाहेब कान्हेरे, पुणें.**

---

## एक विनोद :—

मॅट्रिकचे परीक्षेला जाण्यापूर्वी जो विवाहबध्द झालेला असेल त्याला उद्देशून राधारमण पुढील चरण म्हणत—

त्याची राणी तुळसादेवी घालित होती पाणी ।
पाणीं जोडुनि प्रार्थी गेले तैसचि घरा परत आणीं ॥

परीक्षेला जाण्यापूर्वी "पास" हा शिक्का लागलेला नसतो.

**श्री. वा. ह. फडणीस,** ( दाभोळ ).

## ध्येय साफल्य :—

राधारमणांचा संस्कृत वाङमयाचा दांडगा व्यासंग पाहून एकादे कॉलेज-मध्यें संस्कृतचे प्रोफेसर म्हणून त्यांची योजना होणें अत्यावश्य होतें. त्यासाठी तुम्ही कधीं प्रयत्न केला होता का ? असा मी त्यांस एकदां प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले- " मी शिक्षकाचा व्यवसाय करतों. या व्यवसायांत जें कांहीं साध्य करावयाचें तें मी साध्य केलें आहे. त्या-पेक्षां जास्त प्रतिष्ठा किंवा मान मिळविण्याचा राहिलेला नाहीं. या-करितां प्रोफेसरशिप् मिळविण्याची मला बिलकूल इच्छा नाही." 'असें कोणतें ध्येय तुम्हीं गांठलें " असा पुन्हां प्रश्न केल्यावर ते म्हणाले-- " कै. लोकमान्य टिळक हे हिंदुस्थानचे अनभिषिक्त राजे समजले जातात. त्यांच्या थोरल्या मुलास संस्कृत शिकविण्यास लायक शिक्षक म्हणून, मी त्यावेळीं पदवीधर नसतांनाही अनेक पदवीधर व संस्कृत विषयांवरील पारितोषिकें मिळविलेल्या शिक्षकांस मागें सारून माझीच निवड करण्यांत आली होती व ती स्वत: लोकमान्यांनीच केली होती. माझें काम पाहून माझा गौरवही त्यांनीं केला. तसेंच न्यू इंग्लिश स्कूलमध्यें संस्कृतचे शिक्षक म्हणून काम करीत असतांना त्यावेळचें मुंबईचे नामदार गव्हर्नरसाहेब यांनीं रँ. परांजप्यांसह एकदां शाळेला भेट दिली होती. सर्व वर्ग पहात पहात

जेव्हां ते माझ्या वर्गांत आले त्यावेळीं माझें अध्यापन पाहून त्यांस इतकी गोडी लागली कीं ते त्या ठिकाणीं बसले. तासाची घंटा झाल्याबरोबर मी काम बंद केलें, तेव्हां " तुमचा तास इतक्यांतच कसा संपला ? " अशी पृच्छा त्यांनीं केली. त्यावेळींही मी पदवीधर नव्हतों. नंतर त्यांनीं माझी मोठ्या आस्थेनें चौकशी केली व "मुलामुलींचें मिश्र वर्गांत इन्दुमती स्वयंवरासारखा भावनांची खळबळ उडविणारा विषयही तुम्ही फारच कुशलतेनें हाताळतां हें पाहून मला फार समाधान व आनंद झाला." असें म्हणून व हस्तांदोलन करून ते निघून गेलें. अशा दोन थोर अधिकारी व्यक्तिनीं प्रशंसा करून समाधान व्यक्त केलें यापेक्षां या धंद्यांत जास्त मिळविण्याचें कांहीं राहिलें आहे असें मला वाटत नाहीं."

श्री. रा. वा. दातार यांजकडून.

# : प्र स्ता व ना :

## ' राधारमणां ' चें काव्य–स्वरूप.

कला आणि साहित्य यांच्या भांडारांत भिन्न भिन्न देशीं भिन्न भिन्न काळीं मनुष्याची अनुराग–संपत्ति रचित आणि संचित होत आली आहे. या विशाल विश्वांत विशिष्ट देशाच्या लोकांनीं कोणत्या विशिष्ट गोष्टींवर प्रेम केलें तें त्यांचें साहित्य पाहिल्यानें समजूं शकतें. या प्रेमाच्या व्दाराच माणसांचा विचार करावयाचा असतो.

......एका काळच्या नीतीचें दुसऱ्या काळीं आपणांला ग्रहण नाहीं करतां येणार कदाचित्. पण त्या नीतीनें ज्या सौंदर्याला आनंदाच्या सत्य भाषेंत प्रकाशित केलें असेल तें सौंदर्य आपणाला नित्य नूतनच असेल. आजहि मोगल साम्राज्याचें शिल्प ताजें आहे. तें साम्राज्य व त्या साम्राज्याची नीति आपणांला पसंत असो वा नसो.

—रविंद्रनाथ ठाकुर

' राधारमण ' कवींच्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहितांना मला आनंद वाटत आहे. माझी भूमिका या बाबतींत अगदीं तटस्थपणाची आहे, असें म्हणतां येईल. राधारमणांचा मित्र, सहकारी अथवा विद्यार्थी यांपैकीं कोणतेंच नातें मला लाभलेलें नाहीं. मीं त्यांना केव्हांहि प्रत्यक्ष पाहिलें नाहीं. वयाच्या दृष्टीनें बोलावयाचें तर ते माझ्या पूर्वीच्या पिढीचे म्हणतां येतील. वैचारिक दृष्ट्या राधारमण हे टिळक युगाचे प्रतिनिधि म्हणावे लागतील. टिळकांच्या निधनाबरोबरच राधारमणांचे काव्य थांबलें. नंतर थोड्याच काळांत त्यांचा भौतिक देहहि नाहींसा झाला. महाडच्या राष्ट्रीय शाळेंत २१।२२ सालीं " काव्यदोहन " शिकवीत असतां ' राधारमणां ' च्या काव्याशीं माझा प्रथम परिचय झाला. त्याच सुमाराला महाराष्ट्र नाटक

मंडळीचे प्रमुख संस्थापक श्री. त्र्यंबक सीताराम ऊर्फ अण्णासाहेब कारखानीस यांच्याकडून दापोलीच्या शैक्षणिक प्रयोगांच्या आठवणी ऐकावयास मिळाल्या. अण्णासाहेब कारखानीस हे कांहीं काळ दापोली येथें राधारमणांचे सहकारी होते. त्यामुळें अण्णासाहेबांच्या तोंडून राधारमणाविषयीं क्वचित् मला ऐकावयास मिळत असे. यापेक्षां माझा राधारमणांशीं अधिक संबंध आलेला नाहीं.

राधारमण हे, कवि विद्यारसिक आणि राष्ट्रीय वृत्तीचे यशस्वी शिक्षक म्हणून महाराष्ट्र जीवनांत प्रसिद्ध होऊन गेले. राधारमणांच्या शिष्यमंडळांत श्री. के. नारायण काळे, सानेगुरुजी, यांच्यासारख्या विख्यात वाग्भटांचा समावेश होतो. रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोलीसारख्या आडवळणाच्या ठिकाणीं त्यांचें बहुतेक आयुष्य गेल्यामुळें आणि पंचेचाळिशीच्या सुमारासच त्यांचा जीवनग्रंथ समाप्त झाल्यामुळें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विशेष कदर झाली नाहीं असें मला वाटतें. त्यांच्या मृत्युनंतर पाव शतक लोटून गेल्यावर त्यांचा काव्यसंग्रह त्यांच्या चिरंजीवांकडून प्रकाशित केला जात आहे यावद्दल मी अंत:करणपूर्वक समाधान व्यक्त करतों. महाराष्ट्रांतील एका थोर शिक्षकाचा सन्मान करण्याचे प्रसंगीं मला सहभागीं होता येत आहे यांतच माझा आनंद आहे. आपल्या पित्याची वाङ्मयमूर्ति महाराष्ट्र शारदेच्या मंदिरांत प्रस्थापित करून एकाच वेळीं त्यांनीं आपलें पितृऋण आणि देशऋण फेडलें आहे असें मी समजतों. या त्यांच्या कामगिरीबद्दल महाराष्ट्रीय भाषिकांच्या वतीनें मी श्री. चिंतामणराव लिमये यांना धन्यवाद देतों.

'राधारमणां'च्या काव्यसंग्रहाच्या निमित्तानें माझ्या मनांतील एक भावना या ठिकाणीं व्यक्त करण्यास हरकत नाहीं. सध्यांच्या भारतीय भाषांत मराठी भाषेचें स्थान माझ्या माहितीप्रमाणें फार उच्च दर्जाचें आहे. ललित साहित्याच्या दृष्टीनें वंगभाषेचें पहिलें स्थान मान्य केलें तरी वाङ्मयाच्या सर्व शाखांच्या दृष्टीनें मराठी भाषा भारतांत जवळजवळ पहिल्या प्रतीची ठरेल. आधुनिक कालांत मराठींत पुष्कळ चांगल्या लेखकांनीं भिन्न भिन्न शाखांत विपुल लेखन केलेलें आहे. त्यांतील पुष्कळसा भाग नियतकालिकांतच पडून राहिला आहे. निरनिराळ्या लेखकांचे लेखसंग्रह व्यवस्थित रीतीनें प्रसिद्ध होण्याची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ दापोलीच्या

मंडळीचे प्रमुख संस्थापक श्री. त्र्यंबक सीताराम ऊर्फ अण्णासाहेब कारखानीस यांच्याकडून दापोलीच्या शैक्षणिक प्रयोगांच्या आठवणी ऐकावयास मिळाल्या. अण्णासाहेब कारखानीस हे कांहीं काळ दापोली येथें राधारमणांचे सहकारी होते. त्यामुळें अण्णासाहेबांच्या तोंडून राधारमणाविषयीं क्वचित् मला ऐकावयास मिळत असे. यापेक्षां माझा राधारमणांशीं अधिक संबंध आलेला नाहीं.

राधारमण हे, कवि विद्यारसिक आणि राष्ट्रीय वृत्तीचे यशस्वी शिक्षक म्हणून महाराष्ट्र जीवनांत प्रसिद्ध होऊन गेले. राधारमणांच्या शिष्यमंडळांत श्री. के. नारायण काळे, सानेगुरुजी, यांच्यासारख्या विख्यात वाग्भटांचा समावेश होतो. रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोलीसारख्या आडवळणाच्या ठिकाणीं त्यांचें बहुतेक आयुष्य गेल्यामुळें आणि पंचेचाळिशीच्या सुमारासच त्यांचा जीवनग्रंथ समाप्त झाल्यामुळें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विशेष कदर झाली नाहीं असें मला वाटतें. त्यांच्या मृत्युनंतर पाव शतक लोटून गेल्यावर त्यांचा काव्यसंग्रह त्यांच्या चिरंजीवांकडून प्रकाशित केला जात आहे यावद्दल मी अंत:करणपूर्वक समाधान व्यक्त करतों. महाराष्ट्रांतील एका थोर शिक्षकाचा सन्मान करण्याचे प्रसंगीं मला सहभागीं होता येत आहे यांतच माझा आनंद आहे. आपल्या पित्याची वाङमयमूर्ति महाराष्ट्र शारदेच्या मंदिरांत प्रस्थापित करून एकाच वेळीं त्यांनीं आपलें पितृऋण आणि देशऋण फेडलें आहे असें मी समजतों. या त्यांच्या कामगिरीबद्दल महाराष्ट्रीय भाषिकांच्या वतीनें मी श्री. चिंतामणराव लिमये यांना धन्यवाद देतों.

'राधारमणां'च्या काव्यसंग्रहाच्या निमित्तानें माझ्या मनांतील एक भावना या ठिकाणीं व्यक्त करण्यास हरकत नाहीं. सध्यांच्या भारतीय भाषांत मराठी भाषेचें स्थान माझ्या माहितीप्रमाणें फार उच्च दर्जाचें आहे. ललित साहित्याच्या दृष्टीनें वंगभाषेचें पहिलें स्थान मान्य केलें तरी वाङमयाच्या सर्व शाखांच्या दृष्टीनें मराठी भाषा भारतांत जवळजवळ पहिल्या प्रतीची ठरेल. आधुनिक कालांत मराठींत पुष्कळ चांगल्या लेखकांनीं भिन्न भिन्न शाखांत विपुल लेखन केलेलें आहे. त्यांतील पुष्कळसा भाग नियतकालिकांतच पडून राहिला आहे. निरनिराळ्या लेखकांचे लेखसंग्रह व्यवस्थित रीतीनें प्रसिद्ध होण्याची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ दापोलीच्या

' राधारमणां ' प्रमाणें जंजिऱ्याचे श्री. बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या लेखनाचाहि संग्रह प्रकाशित झाला पाहिजे. भिड्यांचे लेखन मुख्यत: वाङ्मय टीका या प्रकाराचें असलें तरी त्याचें महत्त्व कोणत्याहि प्रकारें कमी नाहीं. भिड्यांचे नांव केवळ उपलक्षण म्हणूनच या ठिकाणीं घेण्यांत येत आहे. माझ्या डोळ्यांसमोर अनेक लेखकांची नांवें आहेत. मराठी भाषेच्या अध्ययनाच्या दृष्टीनें असे लेखसंग्रह जितके प्रसिद्ध होतील तितके बरें. महाराष्ट्रांतील साहित्यसंस्था आणि पुण्याला निर्माण झालेलें मराठीचें विद्यापीठ यांच्या सहकार्यानें हें कार्य होणें अगत्याचें आहे. या दृष्टीनेंहि मी या सग्रहाचें स्वागत करीत आहे.

विश्वसंसार म्हणजे एकप्रकारें जीवनमरणाचा अखंड संग्रामच होय. मानवापर्यंतच्या सृष्टींतहि मरणाशीं झगडून यशस्वी होण्याचा प्रयत्न जीवनानें चालविलेला दिसतो. प्राणिसृष्टींत जीवनानें जातिरुपानें आपलें सातत्य टिकविलेलें दिसतें. मानव जीवनांत ही प्रवृत्ती अधिक बलवान झालेली आढळते. मानवाला देखील मरणानें ग्रासलेलेंच आहे. इतर प्राण्यांप्रमाणें मानवानेंही आपली जाति टिकवून धरण्यांत बरेंच यश मिळविलें आहे. पण या प्रयत्नांत त्याची मानवेतर सृष्टीपेक्षां विलक्षण प्रगति झालेली दिसून येते. मानवाचें ज्ञानसामर्थ्य, भावसामर्थ्य आणि क्रियासामर्थ्य विशेष प्रकारें वाढत चाललें आहे. त्यामुळें मानवाला व्यक्तिनिरपेक्ष अशी एक निराळीच सृष्टि निर्माण करतां आलेली आहे. ही सृष्टि म्हणजेच मानवाचें खरें स्वरूप होय. भौतिकसृष्टीच्या ज्ञानानें मानवानें आपली आत्मसृष्टी निर्माण केली आहे. ही आत्मसृष्टि भौतिक-सृष्टीपेक्षां अधिक सुदर आणि अधिक सत्यमय आहे. शास्त्रें, कला, नीति, अध्यात्म यांची जी सृष्टी तीच मानवाची आत्मसृष्टी होय. तिलाच मानवी संस्कृति असेंहि म्हणतात. मानवी संस्कृति ही केवळ भौतिक सृष्टीची देणगी आहे असें म्हणतां येणार नाहीं. मानवाच्या अंत:शक्तीनें, भौतिकसृष्टीच्या सहकार्यानें ही आत्मसृष्टी निर्माण केलेली आहे. या आत्मसृष्टीचा वारसा प्रत्येक मानवाला मिळण्यासारखा आहे. ज्या मानानें मनुष्य हा वारसा आत्मसात् करील त्या मानानें त्याचें जीवन सफल झाले असें म्हणतां येईल. हा वारसा मिळवून तो आपल्या शक्तीनें अधिक समृद्ध करणें हा मानवाचा मुख्य पुरुषार्थ समजला पाहिजे.

मानवाच्या या आत्मसृष्टींत साहित्याचें स्थान विशेष प्रकारचें आहे. भौतिक जड सृष्टि आणि शास्त्रीय ज्ञानसृष्टि या दोनहि सृष्टी मानवाच्या हृदयरसांत पूर्णपणें विरून गेल्यानंतर सौंदर्याची अभिनवसृष्टि जन्म घेते. हाच साहित्याचा प्रदेश होय. या प्रदेशांत मानवांतील चरम सत्याचें प्रकटीकरण होतें. मनुष्याच्या बाहेरची भौतिकसृष्टि कितीहि बदलली, त्याच्या बौद्धिक ज्ञानाचें क्षेत्र केवढेंहि पालटलें तरी त्याच्या हृदयाचे भाव स्थिरच राहतात. अखंड परिवर्तनशील मानवी जीवनांतील हाच स्थायी अंश आहे. तेंच जीवनाचेंहि परम सत्य होय. या परम सत्याचा युगानयुगींच्या साहित्यांत सतत अविष्कार होत आला आहे. यामुळेंच साहित्याला अक्षरस्वरूप लाभतें. याच दृष्टीनें भारतीय साहित्य–शास्त्रज्ञानों रसनिर्मिति हेंच साहित्याचें एकमेव लक्षण वा प्रयोजन मानिलें आहे. रससाहित्याला दिक्कालाची बंधनें बाधूं शकत नाहींत कारण कालाकालांमधून आणि देशादेशांमधून एकच महामानव जगत आलेला आहे. त्याचा पोशाख भिन्न असला, त्याचें भौतिक अन्न वेगवेगळे असलें, त्याच्या बौद्धिक ज्ञानाची पातळी कमीअधिक असली तरी त्याचें हृदय सर्वत्र सारखेंच स्पंदन करीत आलें आहे. याच कारणामुळें जगांतील कोणत्याहि काळाचे वा कोणत्याहि देशाचे साहित्य रसिक मनाला सारखेंच आल्हाददायक असल्याचा अनुभव येतो. भिन्न भिन्न शाखांच्या मानवांना सहभाव शिकविणारे आणि मानवमात्राच्या एकतेची प्रतीति आणून देणारें साहित्यासारखें दुसरें साधन नाहीं. साहित्याच्या अनुशीलनानें मानवकुलाचा बंधुभाव दृढ होण्यासारखा आहे. कोणत्याहि साहित्याचा याच व्यापक आणि उदार भूमिकेवरून अभ्यास झाला पाहिजे. साहित्याचे मूल्यमापन करीत असतांना मानवतेच्या मूल्यांचा हाच निकष उपयोजिला पाहिजे.

साहित्याच्या इतिहासांत जीवनाच्या इतर क्षेत्रांप्रमाणेंच विकास आढळून येत नाहीं असें नाहीं. हृदयाची प्रीति सनातन असली तरी प्रीतीचे विषय आणि प्रीतीच्या रीति यांच्या स्वरूपांत बदल घडून येणें अगदीं स्वाभाविक आहे माणसाच्या भोंवतालची भौतिक–सृष्टि मधून मधून बदलते. माणसाच्या भौतिक ज्ञानांत बदल झाल्यानेंहि माणसाच्या भौतिक संबंधांत अपरिहार्यपणें बदल घडून येतात. या बदलांमुळें माणसाच्या संस्कृतिविचारांत

आणि नैतिक ध्येय कल्पनांतहि परिवर्तनें घडून येतात. सामाजिक संस्था, राजकीय घटना, आर्थीक योजना यांच्या स्वरूपांत व आदर्शांत वेळोवेळीं मोठमोठ्या उलथापालथी होत राहतात. या सर्व अवस्थांतरांचा परिणाम साहित्यावरहि झाल्याशिवाय राहात नाहीं. कारण साहित्याचा सारा माल-मसाला याच सृष्टींतून घेतलेला असतो. सत्याचें प्रेम, न्यायाविषयीं निष्ठा, कल्याणाची कळकळ, सुखाची आवड, पावित्र्याची गोडी, मांगल्याची ओढ, विजयाची आकांक्षा, ध्येयासाठीं बलिदान करण्याची प्रेरणा या मानवी हृदयांतील सनातन वृत्ती असल्या तरी सत्य म्हणजे काय, न्याय कशांत आहे, कल्याणाचें स्वरुप कोणतें, सुखाचें तत्त्व काय, पावित्र्य आणि मांगल्य यांचें यथार्थत्व कशानें ठरतें, विजय आणि बलिदान यांनीं ज्या ध्येयांची सिद्धि करावयाची त्यांची व्याप्ति वा मर्यादा कोणती यांच्या बाबतींत कसलेंच सनातनत्व सांगता येणार नाहीं. जीवनाच्या सर्वांगीण विकासाच्या मार्गावर या सर्वांना वेगवेगळीं रुपें लाभत असतात समाजजीवनाच्या विकासाच्या विशिष्ट अवस्थेंत विशिष्ट ध्येयवाद जन्म घेतात आणि त्या त्या अवस्थेंतील साहित्यरचनेंतहि त्यांचें प्रतिबिंब पडलेलें आढळून येतें. साहित्याचें मूल्यमापन करितांना रससिद्धीबरोबरच या ध्येयदर्शी आशयाचाहि विचार करण्याची आवश्यकता असते. साहित्याचें आणखी एक अंग आहे. तें म्हणजे त्याचें शरीर. प्रत्येक कलेचें एक शरीर असतें. या शरीराच्या ठेवणींतहि वेगवेगळीं परिवर्तनें होत असलेलीं आढळून येतात. साहित्याच्या संपूर्ण कल्पनेंत या सर्व अंगांचा समावेश झालेला असतो. काव्य हा एक साहित्याचाच भाग असल्यामुळें काव्याच्या अभ्यासांतहि हीच दृष्टि राखावी लागते.

शरीर, प्राण आणि आत्मा हे अशा रीतीनें काव्याचे तीन घटक मानतां येतील. शब्द व त्यांची विशिष्ट रचना हें काव्याचें शरीर होय. जीवनाचें ध्येयदर्शन हा काव्याचा प्राण होय, आणि रसनिर्मिति हा काव्याचा आत्मा समजतां येईल. यांतील रसरूप आत्मा नित्य स्वरूपाचा असून शब्दरूपी देह आणि अर्थरुपी प्राण यांचीं स्वरूपें बदलणारीं, विकास पावणारीं आहेत. विवेचनाच्या सोयीसाठीं काव्याचे असे तीन भाग कल्पिले तरी काव्य हें स्वरूपतः एकजिनसीच असतें. कोणत्याही जिवंत वस्तूप्रमाणें त्याचा जिवंत-पणा राखून हे तुकडे वेगळे करितां येण्यासारखे नाहींत. अथवा आधीं कोठून

तरी हे तुकडे जमवून आणले तरी त्यांच्या एकीकरणानें काव्याची जिवंत वस्तु निर्माण होणार नाहीं. कवीच्या जाणिवेंत वेगळेपणानें असणारे हे अंश प्रतिभेच्या रसायनानें जेव्हां एकजीव होतात, तेव्हांच काव्याला जन्म प्राप्त होतो. पण कांहीं झालें तरी काव्यामध्यें हे तीन अंश प्रत्ययाला आल्याखेरीज राहात नाहींत. यामुळेंच निरनिराळ्या काव्यांचा मूल्य–निर्धारणेंत मतभेद उत्पन्न होऊं शकतात. नवें काव्य, जुनें काव्य, पुरोगामी काव्य, प्रतिगामी काव्य यांचीं भांडणें चालूं लागतात तीं देखील यामुळेंच. काव्याच्या बाबतींत पहिला प्रश्न हा पहावयाचा असतो कीं तें जिवंत काव्य आहे कीं काव्याचें प्रेत आहे. अनुभूतीशिवाय केलेली रचना म्हणजेच काव्याचें प्रेत होय. त्यांत प्राणहि नसतो आणि आत्माहि नसतो. आणि शरीर असलें तरी तें काल्यासारखें गार व सडण्याच्या पंथास लागलेलें असतें. या शवाला जवळ करणारा माणूस विकृतच समजावा लागेल. जिवंत काव्य वाचकाच्या मनांत सहभाव निर्माण करूं शकतें. काव्यांतील अनुभूतीनें वाचकाच्या मनांतहि नवी अनुभूति निर्माण होते. अशी अनुभूतीची जागती ज्योत निर्माण करण्याचें सामर्थ्य ज्या रचनेंत असेल तें जिवंत काव्य होय. सारीच जिवंत काव्यें एका अर्थानें नवकाव्यें म्हणतां येतील. अनुभुतीचा विषय जुना असल्यानें काव्याला जुनेपणा देण्याचें कारण नाहीं. जुन्या विषयाला शिळेपणा येतो तो कांहीं कालामुळें येत नाहीं. माणसाचें हृदय ज्या विषयांत रंगेल तो विषय त्याला ताजा वाटतो. हृदयानें नाकारिलेल्या वस्तू शिळ्या होतात. म्हणून अनुभूतीचा जिवंतपणा हाच काव्याला नवीनता देऊं शकतो. पण नवकाव्य याचा आणखीहि एक अर्थ आहे. अनुभूतींतहि विकास होऊं शकतो. आणि जेव्हां जीवनांत नव्या अनुभूति निर्माण होतात तेव्हां त्यांना प्रथमच आकार देणारें काव्य नवकाव्य ह्या नांवाला पात्र होतें. हे नवे अनुभव केवळ नवेच नव्हत तर ते मानवी जीवनाच्या उच्चतर अवस्थेचे दर्शक असतील तर त्या नवकाव्याला पुरोगामी काव्य असें म्हणतां येईल. जिवंत काव्य, नवकाव्य आणि पुरोगामी काव्य अशी काव्याची विभागणी केली तर पुरोगामी काव्य हें अधिक विकसित काव्य होय असें म्हणावें लागेल. पुरोगामी काव्यांत प्राचीनाचा धिक्कार असण्याचें कारण नाहीं. फक्त त्यानें असत्याचा धिक्कार केला म्हणजे झालें. प्राचीनांतील सत्य आपल्या भोंवतालच्या जीर्ण अस-

त्याचा त्याग करून उच्चतर अवस्थेला पोंचलें म्हणजेच त्याला पुरोगामी सत्य म्हणतात. सत्याचा स्वभावच पुरोगामी असल्यामुळें पुरोगामी सत्य हा शब्दप्रयोगहि पुनरुक्तिदोषानें दूषित समजला पाहिजे. परंतु सत्याचें पुरोगामित्व ज्यावेळीं विसरलें जातें त्यावेळीं सत्याची घोषणा करणाऱ्यांना त्याच्या पुरोगामीत्वावर अधिक जोर द्यावा लागतो. असत्य हें मात्र नेहमींच प्रतिगामी असतें. सामाजिक स्थित्यंतराच्या काळीं सत्य कोणतें आणि असत्य कोणतें याचाच निर्णय लागावयाचा असतो. यामुळेंच वाद माजतात. जीवनाच्या निखिल अंगांशीं प्रामाणिकपणा राखणारें जें तत्त्व तेंच जीवनाचें सत्य होय. या वाढत्या जीवन–सत्याची आपल्या जीवनांत प्रथम अनुभूति घेणारा आणि आपल्या काव्यांत त्या नव्या सत्याला अविष्कार देऊन सामाजिक मनाला व्यापकपणाच्या नव्या क्षेत्रांत नेऊन सोडणारा कवि हा त्या युगाचा महाकवि होय. समाजाला वेळोवेळीं अशा महाकवींचा लाभ होत आलेला आहे. जीवनविकासाच्या दृष्टीनें अशा युगानुयुगींचा महाकवींमध्येंहि जुना नवा असा फिरून भेद उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाहीं. म्हणून प्रत्येक युगाला आपला जीवनानुभव सामग्र्यानें अनुभविणारा असा नवा कवि निर्माण करावाच लागतो. यांत जुन्यांचा अधिक्षेप नाहीं. जीवनाची ती स्वाभाविक गरज आहे.

काव्यालोचनाची ही दृष्टि राधारमणांच्या काव्यसंभाराकडे वळविली असतां आपणाला काय आढळून येतें तें आतां पाहूं. आधुनिक मराठी कवींत 'केशवसुतां'ना नवयुगप्रवर्तक मानलें जातें हें सुप्रसिद्धच आहे. जिवंत काव्य, नवकाव्य आणि पुरोगामी काव्य या तीनहि संज्ञा 'केशवसुतां'च्या काव्याला अगदीं यथार्थपणें लावतां येतील. 'केशवसुतां'नंतर आजपर्यंत मराठींत पुष्कळ कवी आणि पुष्कळ चांगलें काव्य निर्माण झालें असलें तरी केशवसुतांना सामग्र्यानें मागें टाकणारा कवि अद्यापि जन्माला यावयाचा आहे असा माझा दृढ अभिप्राय आहे. पाश्चात्य संस्कृतीचा भारतीय संस्कृतीवर मर्मभेदक आघात झाल्यानंतर भारतीय मन नव्या आवेशानें आणि नव्या रूपानें नवा जन्म घेऊन उठलें त्याची महाराष्ट्रीय जीवनांत, काव्यक्षेत्रांत साक्ष पटविण्याचें काम केशवसुतांनीं केलें. राधारमणांचें काव्य केशवसुतांच्या काव्याहून कित्येक बाबतींत निराळें आहे. महाराष्ट्रांत पाश्चात्य विद्येच्या

संसर्गानें जो नवविचारांचा प्रक्षोभ झाला त्यांतून जीवनाच्या दोन प्रमुख ध्येयपद्धती निर्माण झाल्या. आगरकरांच्या द्वारा सर्वांगीण क्रांतिवादाची ध्येयपध्दति प्रकट होऊन महाराष्ट्रीय मनाला जोराचे धक्के देऊं लागली. ' केशवसुत ' हे या क्रांतिवलाचे उद्‌गाते झाले. याच सुमाराला टिळकांच्या द्वारा स्वाभिमानी राष्ट्रवादाची ध्येयपद्धति पुढें येऊन तिनें महाराष्ट्रांतील बहुसंख्य नवशिक्षितांचीं मनें काबीज केलीं. चिपळूणकर आणि टिळक यांनीं प्रवर्तित केलेला स्वाभिमानी राष्ट्रवाद महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सामाजिक वैशिष्टयामुळें महाराष्ट्रांत वैचारिक दृष्टया फारच बळावला. राष्ट्रीय स्वातंत्र्य ही सर्वांत प्रधान वस्तु मानून त्या स्वातंत्र्याच्या निर्मितीसाठीं सर्व शक्ति एकवटण्याचा आदेश या ध्येयपद्धतीनें महाराष्ट्राच्या बुद्धीला दिला. इंग्रजांनीं राज्य घेतलें तें महाराष्ट्रांत तरी ब्राह्मण पेशव्यांच्या हातून. शिवशाहीच्या नंतरच्या काळांत मराठा क्षत्रियांचें महत्त्व कमी होऊन ब्राह्मण मुत्सद्यांचें आणि लढवय्याचें महत्त्व वाढत चाललें होतें. जातिप्रधान समाजसंस्थेंत ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व परंपरेनें मान्य केलेलेंच होतें. ब्राह्मणांच्या परंपरागत सामाजिक श्रेष्ठत्वाला राजकीय अग्रणीपणाची जोड मिळाल्यामुळें महाराष्ट्रांत ब्राह्मणवर्गाचें महत्त्व विशेषच वाढलें. जुन्या संस्कृत पांडित्याचा वारसा ब्राह्मणांजवळ होताच. नव्या पाश्चात्य विद्येचीं द्वारें महाराष्ट्राला खुलीं झाल्यावरोबर तो नवा वारसाहि महाराष्ट्रांतील ब्राह्मणांच्या हातीं आला. या नव्या विद्येनें राष्ट्रवादाच्या नव्या कल्पना पसरूं लागल्या. त्यामुळें महाराष्ट्रांत परंपराभिमानी ब्राह्मणवर्गच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा उत्कट उपासक बनला. समाजजीवनांत राजकारणाला आणि राजकारणांत स्वातंत्र्योपासनेला नेहमींच महत्त्वाचें स्थान लाभत असल्यामुळें या स्वाभिमानी राष्ट्रवादाला विलक्षण गौरव लाभलें. महाराष्ट्रांतील ब्राह्मणवर्गाचे हे सर्व विशेष टिळकांमध्यें परिणत झालेले असल्यामुळें टिळकांकडे या ध्येयवादाचें नेतृत्व सहजच आलें. टिळकांनीं आपली सर्व पुण्याई राजकीय क्षेत्रांत खर्च करण्याचें ठरवून भारतीय स्वातंत्र्य हें आपलें जीवनकार्य मानलें. भारतीय स्वातंत्र्याचें विशाल ध्येय आत्मसात करण्याइतकी बुद्धीची विशालता टिळकांजवळ असल्यामुळें टिळक भारतीय असंतोषाचे जनक बनूं शकले त्यांनीं अखिल भारताला स्वराज्याच्या जन्मसिद्ध हक्कासाठीं निर्भय-

पण झगडण्याची स्फूर्ति दिली. या त्यांच्या महनीय कामगिरीमुळें भारताच्या आधुनिक इतिहासांत टिळकांचें नांव अमर झालें आहे. टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादांत भारतीय स्वातंत्र्याची नवी आणि पुरोगामी कल्पना सामावलेली असल्यामुळें त्या वादांतील इतर प्रतिगामी वैगुण्यें बराच काळपर्यंत महाराष्ट्रांत तरी स्पष्ट नजरेस येऊं शकली नाहींत. या स्वाभिमानी राष्ट्रवादी ध्येयकल्पनेचें प्रतिबिंब महाराष्ट्राच्या साहित्यांत आणि काव्यांत उमटणें अपरिहार्यच होतें.त्याप्रमाणें या ध्येयवादाचे पडसाद महाराष्ट्र साहित्यांत निनादित झालेलें आढळून येतात. शिवरामपंत परांजपे यांचें काळांतील सर्व साहित्य याच ध्येयवादानें रसरसलेलें आहे. काव्याच्या क्षेत्रांत गोविंद कवि आणि विनायकराव सावरकर यांनीं राष्ट्रस्वातंत्र्याचें स्फूर्तियुक्त उद्‌गान केलेलें आढळतें. सावरकरांचें काव्य पुढें भारतीय स्वातंत्र्यावरून हिंदू–राष्ट्रवादाकडे वळल्यामुळें त्यांचें काव्य ओजस्वी असलें तरी टिळकांच्या शुद्ध भारतीय राष्ट्रवादाच्या दृष्टीनें प्रतिगामीच म्हणावें लागेल. टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाचें यथार्थ गायन करणारा महाकवि महाराष्ट्रांत झालाच नाहीं. 'राधारमणां'च्या काव्यांत टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाचें गायन जेवढें आलें आहे तें सारें प्रामाणिक आहे यांत शंका नाहीं. पण त्याची व्याप्ति अगदींच मर्यादित आहे. महाकवीला लागणारी प्रतिभेची उत्कटता त्यांच्यामध्यें मोठ्या प्रमाणांत मुळांतच दिसत नाहीं. तथापि त्यांचें मन टिळकांच्या जीवनविषयक तत्वज्ञानानें परिपूर्ण भारलेलें होतें यांत तिळमात्र शंका नाहीं. पारतंत्र्याची खंत आणि स्वातंत्र्याची तळमळ त्यांच्या काव्यांत जागोजाग व्यक्त झालेली आढळते. या वृत्ती त्यांच्या जीवनांत बद्धमूल झालेल्या होत्या ही गोष्ट त्यांच्या आचरणावरूनच दिसून येते. या वृत्तीमुळें त्यांना अनेक वेळां स्वार्थत्यागहि करावा लागलेला आहे. स्वराज्यासाठीं टिळकांनीं प्रातिपादलेल्या चतुःसूत्रीपैकीं राष्ट्रीय शिक्षणासाठीं त्यांनीं प्रत्यक्ष प्रयत्न केला आणि टिळकांना राज्यद्रोहाबद्दल झालेल्या शिक्षेवर रचलेल्या काव्यामुळें त्यांची पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधील नोकरीहि त्यांना गमवावी लागली. टिळकांनीं राष्ट्रीय विभूतींच्या उत्सवांना आपल्या स्वातंत्र्य–प्राप्तीच्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान दिलेलें असल्यामुळें त्यांनीं नाना फडणीस यांच्या जीवनावर दहा सर्गांचें स्वतंत्र काव्य रचिलें.

'महाराष्ट्रवीरादर्श' नांवाच्या दुसऱ्या एका दीर्घ काव्यांत त्यांनीं मराठ्यांचें गुणगान आणि शिवभूपतीचा महिमा यांचें गायन केलें. खुद्द टिळकांच्यावरच त्यांचीं दोन काव्यें रचलेलीं आहेत. 'जहाल आणि मवाळ' नांवाच्या कवितेंत त्यांनीं जहालांच्या स्वार्थत्यागी परंपरेचें जोरदार समर्थन केलें आहे. अशा रीतीनें 'राधारमणां'च्या एकंदर काव्यरचनेचा निम्म्याहून थोडा अधिक भाग टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाच्या उद्गायनांत खर्ची पडलेला असल्यामुळें राधारमणांना टिळकांच्या जीवनादर्शाचे महाराष्ट्र-काव्यक्षेत्रांतील प्रामाणिक प्रतिनिधि मानले पाहिजेत.

'राधारमणां'नीं आधुनिक इंग्रजी काव्य रसिकतेनें आस्वादिलेलें असूनहि त्यांचे काव्यांतील आदर्श भारतोयच राहिले. मराठींतील मोरोपंतादि आख्यान-कवी आणि संस्कृतांतील कालिदास भारवि यांच्यासारखे विद्वत्-कवी यांच्या काव्यांचा राधारमणांच्या वुध्दीवर अतिशय दृढ परिणाम झालेला आढळतो. राधारमणांची रसिकता उच्चप्रकारची होती यांत संशय नाहीं. त्यांच्या काव्यांत कोठेंहि औचित्याचा भंग आढळणार नाहीं. हें औचित्य त्यांच्या जीवनाचें सहज अंग बनून गेलेलें होतें. शद्बांत दाखविण्या-पुरतें घेतलेलें वरवरचें सोंग नव्हतें. ही स्थिती अभिजात रसिकतेशिवाय कधींच प्राप्त होण्यासारखो नाहीं. संस्कृत कवींचा उत्तान शृंगार अथवा मराठी आख्यान-कवींचा आचरट अश्लिलपणा 'राधारमणां' च्या कृतींत आढळणार नाहीं. स्त्रीचें वर्णन करतांना राधारमणांनीं रसिकता व औचित्य या दोहोंचें मीलन साधलें आहे. तत्वज्ञानाच्या क्षेत्रांत त्यांचो भूमिका वेदान्त-वादी होती. मात्र त्या वेदान्ताचें स्वरूप आत्मशुद्धिमय आणि लोक-कल्याण-कारक असें होतें. या बाबतींत त्यांच्या मनावर महाराष्ट्रीय जीवनादर्शाचा विशेष परिणाम झालेला दिसून येतो.

राधारमणांची काव्यरचना साधारणपणें सन १९०० पासून १९२० पर्यंतच्या काळांत झालेली आहे. या संग्रहांत प्रथम छापलेली 'कालचक्र' ही त्यांची उपलब्ध असलेली प्रथम कृति होय. यांत शरद्कालापासून प्रारंभ करून वर्षाकालापर्यंतच्या संपूर्ण ऋतुचक्राचें वर्णन आलें आहे. कालिदासाच्या ऋतुसंहाराचा आदर्श कवीच्या समोर असला तरी यांत कालीदासाचे केवळ निर्जीव अनुकरण नाहीं. आपल्या कोंकणच्या जन्मभूमींतील सर्व ऋतूंचे

काव्यमय वर्णन यांत दिलेलें आहे. निरनिराळ्या ऋतुंतील निसर्गस्थिती आणि त्या त्या ऋतूंत येणारे महत्त्वाचे उत्सव व सण यांची चित्रें या काव्यांत चितारलेलीं आहेत. या पहिल्याच काव्यांत राधारमणांचे बहुतेक सर्व काव्य-विशेष प्रकट झालें आहेत. शिशिर कालाखेरीज इतर सर्व ऋतूंची वर्णनें कवीच्या आवडत्या उपजाति वृत्तांत आहेत. शिशिर काल वर्णन मात्र संस्कृत कवींच्या आवडत्या द्रुत-विलंबित वृत्तांत आहे. आणि त्याचा थाटही थेट संस्कृत कवीच्याप्रमाणेंच आहे. प्रत्येक विभागाच्या शेवटीं रुचिपालट म्हणून संस्कृत कवींच्या धर्तीवर मालिनी, वसंततिलका, पृथ्वी इत्यादि वृत्तांत कांहीं श्लोक घातले आहेत. यमकानुप्रासादि शब्दालंकार आणि उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास इत्यादि अर्थालंकार यांनीं हें वर्णन सुशोभित झालें आहे. संस्कृत कवींचे नानाविध संकेत सहजतेनें वापरलेले जागोजाग दृष्टीस पडतात. संस्कृत–शब्द–प्राचुर्यामुळें जागोजाग रचना प्रौढ भासेल क्वचित क्लिष्टताहि आढळेल. पण त्याबरोबरच सरळ सुबोध अशी प्रासादिक रचना क्वचित् लौकीक भाषेंतील सामान्य गद्यप्राय वाक्यांशासह भेटीस येईल. मधून मधून एकादा नवा संकेत, सामाजिक जीवनाच्या नव्या कल्पना यांचा वापर झालेला दिसून येईल. शिशिर कालांतील होलिकोत्सवाचें वर्णन देतांना कवीनें आपल्या अभिजात अभिरुचीची अभिव्यक्ति केली आहे. धर्माच्या नांवाखालीं आपल्या भोंवतालीं चालणाऱ्या अभद्रतेचा कवीनें तीव्र निषेध केला असून प्रासंगिकपणें धर्मांच्या सत्यस्वरुपाविषयींचे आपले विचार प्रकट केले आहेत. 'कालचक्रा 'चें स्वरूप या प्रकारचें असल्यामुळें येथेंच कवीचा चांगला परिचय घडून येण्याची सोय झाली आहे.

' फडणीस काव्य 'यानंतर ५।६ वर्षांनीं रचलेलें आहे. नाना फडणीसांना विभूतिपद देऊन त्यांचें साद्यंत चरित्र यांत वर्णिलेलें आहे. यांतील गुण-गौरव ऐतिहासिक चिकित्सेच्या दृष्टीनें तपासण्यांत अर्थ नाहीं. ज्या इंग्रजांच्या समोर भारतीयांनीं सर्वस्वीं हार खाल्ली त्यांच्या तत्कालीन संस्कृतीपेक्षां भारतीय संस्कृति त्याकाळीं निश्चित अध:पतित झालेली होती हा सिद्धान्त आज महाराष्ट्रांतील इतिहासज्ञ मोकळ्या मनानें कबूल करीत आहेत. पण १९०५ सालीं महाराष्ट्रांतील स्वाभिमानी राष्ट्रवादी लोक ही गोष्ट मान्य कशी करणार ? इंग्रजी सत्तेविरुद्ध वाटणारा त्वेष व्यक्त करण्यासाठीं

आणि आपला स्वाभिमान जागृत करण्यासाठीं त्यांना असल्या अनैतिहासिक विभूति–गौरवाचा स्वीकार करावा लागत होता. म्हणून या काव्याचें महत्व चिरकाल टिकूं शकणार नाहीं. त्यावेळच्या देशाभिमानी लोकांच्या मनोवृत्तीचा परिचय करून घेण्याच्या दृष्टीनें त्याचें महत्व अवश्य आहे. या काव्यांत वारंवार ब्राह्मण राज्याचा उल्लेख आलेला आहे. कोठें कोठें मराठी राज्य असेंहि म्हटलें आहे. यांतील संकुचितता देखोल अहेतुपूर्वक मानली पाहिजे. इंग्रजांना कपटी म्हणून प्रश्न सुटत नाहीं. नाना फडणवीस देखील कापट्यांत कमी नव्हते. शास्त्र, सामाजिक व राष्ट्रीय ध्येयवाद संघटनाकुशलता, ऐतिहासिक व भौगोलिक ज्ञान या सर्वच बाबतींत इंग्रज नाना फडणवीसांपेक्षां श्रेष्ठ होते. इंग्रजांची राष्ट्रभक्ति तर नानांना माहितहि नव्हती. तथापि राज्य बुडविणाऱ्या इंग्रजांपेक्षां राज्य गमावणारा नाना ममत्वाच्या दृष्टीनें महाराष्ट्रीयांना व विशेषतः ब्राह्मण सुशिक्षितांना जवळचा वाटावा यांत आश्चर्य नाहीं. टिळकांच्या भारतीय स्वातंत्र्याच्या पुरोगामी ध्येयासाठीं या सर्व विभूतिगौरवाचा उपयोग व्हावयाचा होता एवढ्याच दृष्टीनें त्याला महत्व होतें. जीवनविकासाच्या व्यापक दृष्टीपुढें त्याचा बेगडीपणा आतां उघडा झालेला आहे. या काव्यांतील 'राधारमणां'ची प्रमुख भावना स्वदेशभक्ताची व स्वातंत्र्य–उपासकाची असल्याचा प्रत्यय येत असल्यामुळें तें आजहि एकदां वाचण्यासारखें आहे.

'मोरोपंताचा प्रभुद्रोह' आणि 'आर्यमाता–विलाप' हीं दोन काव्यें लोकमान्य टिळकांच्या दोन वेळच्या बंदिवासाबद्दल आहेत. यांतील दुसरें काव्य भावना, भाषा या दोहोंच्याहि दृष्टीनें अधिक परिणामकारक झालें आहे. जणूं 'आर्यमाताविलाप' ही 'मोरोपंतांच्या प्रभुद्रोहा'ची' परिष्कृत आवृत्तिच आहे. पहिल्या कवितेंतून कित्येक संपूर्ण श्लोक अक्षरशः दुसऱ्या कवितेंत समाविष्ट करण्यांत आले आहेत. या शिवाय कित्येक श्लोकार्ध वा श्लोकपादहि दाखल करून घेतलेले आढळतात. न्यायमूर्ती दावर यांनीं निकालपत्रकांत लोकमान्य टिळकांच्या विरुद्ध जे अकारण कुत्सित उद्गार काढले होते त्यांच्या विरुद्ध त्यावेळीं महाराष्ट्रांत अत्यंत कटु भावना निर्माण झाल्या होत्या. त्या भावनांचें प्रतिबिंबहि राधारमणांच्या या काव्यांत

ठळकपणें उमटलेलें आढळतें. स्वातंत्र्यवादावरील निष्ठा घोर आपत्कालीं देखील टिकवून धरण्यासाठीं जी तीव्र जीवनश्रद्धा आवश्यक असते, तिचेंही चांगलें अविष्करण या काव्यांत केलेलें आढ़ळतें.

कालाची गति आणि राजकारणाची रीति कित्येक वेळां वक्र आणि विपरीत असते यांत शंका नाहीं. शिवाजीला लुटारू म्हणणाऱ्या इंग्रजांना पहिल्या महायुद्धांत आपल्या साम्राज्यरक्षणासाठीं शिवाजीचा जाहीर गौरव करावा लागला. आणि राधारमणांसारख्या जहाल राष्ट्रवादी कवीला शिवाजीच्या तोंडून ब्रिटिशांच्या साम्राज्यसंरक्षणाला मदत करण्यासाठीं मराठ्यांना उपदेश करावासा वाटला. 'महाराष्ट्रवीरादर्शा'चा प्रारंभ स्वाभाविक व म्हणूनच परिणामकारक आहे. टिळकांचा राष्ट्रवाद निःशस्त्र वहिष्कार योगावर आधारलेला होता. परंतु पहिल्या महायुद्धाच्या वेळीं हिंदी राष्ट्रवादाचें वळ साम्राज्यशाहीशीं असहकार करण्याइतकें वाढलें नसल्यामुळें लोकमान्य टिळकांनाहि विशेष कर्तृत्व दाखवितां आलें नाहीं. शस्त्रविद्येचें थोडें फार शिक्षण मिळेल तेवढ्यावरच संतोष मानण्याची वेळ आली होती. यामुळें ' राधारमणां ' च्या शिवाजीलाहि इंग्रजांच्या नोकरींत शिरण्याची कल्पना साजरी करून घ्यावी लागली !

' जहाल मवाळ ' या कवितेंत मवाळ पित्याचा जहाल होऊं इच्छिणाऱ्या पुत्राशीं झालेला संवाद वर्णिला आहे. महाराष्ट्रांत रानडे, गोखले यांचा पक्ष मवाळ समजला जात असे. टिळक हे जहाल पक्षाचे अध्वर्यु होते. या दोन पक्षांमध्यें अत्यंत वैरभाव त्यावेळीं निर्माण झालेला होता. साधनांची शुचिता सामाजिक अथवा राजकीय व्यवहारांत आचरण्याची आवश्यकता महाराष्ट्राच्या बुद्धीला कधींच फारशी पटलेली नाहीं. त्यामुळें प्रामाणिक मतभेद उदारपणें सहन करण्याची महाराष्ट्राला विशेष संवय नाहीं. यामुळें निरनिराळ्या विरोधी पक्षांत द्वेष आणि मत्सर तीव्रतेनें वाढलेला महाराष्ट्रांत नेहमीं आढळून येतो. टिळकांच्या वेळीं हीच परिस्थिति होती. गणेशोत्सवांतील मेळे हीन अभिरुचीचा कळस करीत असत. खुद्द टिळकांनीं देखील या प्रकारांचा कधीं जाहीर निषेध केला नाहीं. ' राधारमणां 'च्या प्रस्तुत कवितेंत या सर्व परिस्थितीचें प्रतिबिंब पडलेलें आहे. नामदार गोखले आणि

न्यायमूर्ति रानडे यांची थोरवी ओळखणाऱ्या 'राधारमणां'च्या लेखणींतून हा संवाद कसा उतरला याचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. राधारमणांची उच्च अभिरुचि या ठिकाणीं घसरल्याबद्दल विषाद वाटल्याशिवाय राहात नाहीं. या कवितेंत कोणाहि ऐतिहासिक पुरुषाचें नांव नाहीं हीच एक समाधानाची गोष्ट मानली पाहिजे.

राधारमणांचें संस्कृत कवींवरील प्रेम निरतिशय असल्याचें स्पष्ट दिसतें. त्यांतही भारवीवर त्यांचें मन विशेष जडलेलें होतें. भारवीच्या 'किरातार्जुनीय' काव्याच्या पहिल्या पांच सर्गांचें त्यांनीं आर्यावृत्तांत भाषांतर केलें आहे. त्यांच्या हातून अठराही सर्गांचें मराठींत रूपान्तर झालें असतें. तर मराठी वाचकांवर फार मोठा उपकार झाला असता, दुर्दैवानें तें व्हावयाचें नव्हतें. कालिदासाच्या खालोखाल भारवीचें काव्य संस्कृत साहित्यांत मान्यतेनें स्वीकारलें जातें. "भारवेः अर्थगौरवम्" हा संस्कृत रसिकांचा अभिप्राय प्रसिद्धच आहे. कालीदासाची कलाकोमलता भारवींत नसली तरी अर्थगांभीर्याच्या दृष्टीनें भारवि क्वचित् कालिदासालाहि मागें सारणारा आहे. द्युतांत राज्य हारवून बसल्यानंतर पांडवांना वनवास भोगावा लागतो त्यावेळीं धनुर्धर पार्थ समरांगणांत अजिंक्य ठरण्यासाठीं पाशुपतास्त्र मिळावें म्हणून पशुपति शंकराची आराधना करितो. अर्जुनाची निष्ठा परीक्षण्यासाठीं शंकर किराताचा वेष धारण करून येतात आणि नंतर किरातवेषधारी शंकर आणि पशुपतिपूजक अर्जुन यांचा घनघोर संग्राम होतो. अर्जुनाचा पराक्रम पाहून शंकर संतुष्ट होतात व अर्जुनाला पाशुपतास्त्राची प्राप्ति होते. अशी या संस्कृत काव्याची कथावस्तु आहे. प्रारंभींच्या सर्गांत धर्म, भीम, द्रौपदी इत्यादिकांची राजनीतिविषयक अतिशय मार्मिक व उद्‌बोधक चर्चा आलेली आहे. महाभारताच्या अभ्यासकांना भारवीचें हें काव्य प्रिय असावें हें अगदीं स्वाभाविकच आहे. लोकमान्य टिळकांचें या दोनहि ग्रंथावरचें प्रेम प्रसिद्धच आहे. गीतारहस्यांत साधनवादाची चर्चा करीत असतां टिळकांनीं महाभारताप्रमाणेंच भारवीच्या वचनाचाहि आधार दिलेला आहे. स्वराज्य साधनेंत निमग्न झालेल्या संस्कृताभिमानी टिळकांना व्यासभारवीचें आकर्षण असावें यांत आश्चर्य कसलें ? याच कारणामुळें राधारमणांच्या मनाचा ओढा भारवीच्या या

ग्रं. नं. ९२३६

राजकीय काव्याकडे वळला असला पाहिजे यांत शंका नाहीं. हिमालयवर्णन नांवानें या संग्रहांत शेवटीं जो एक मोठा उतारा आला आहे त्यावर भारवीची दाट छाया सर्वत्र पडलेली आढळून येते. भारवीनें आपल्या काव्यांतील १५ व्या सर्गांत जसे निरनिराळे अक्षरबंध रचिले आहेत त्या पध्दतीची चित्रकाव्य-रचनाहि हिमालयवर्णनाच्या शेवटीं आढळून येते.

या संग्रहांत राधारमणांची कांहीं संस्कृत-रचना दिलेली आहे. ती बहुतेक सर्व आपल्या इष्ट देवतेच्या—गजाननच्या गुणसंकीर्तनार्थ त्यांनीं केलेली आहे. त्या रचनेवरुन राधारमणांचें संस्कृतावरील प्रभुत्व दिसून येतें. याशिवाय त्यांची थोडोशी स्फुट कविता या संग्रहात शेवटीं दिलेली आहे. त्यांतहि त्यांची निसर्गप्रिति, कल्पनाशक्ति व निर्मळ अभिरुचि प्रत्ययास येते.

राधारमणांच्या काव्याचें स्वरूप आतांपर्यंत बऱ्याच विस्तारानें दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं स्वतःच म्हटल्याप्रमाणें—

**वृत्तवर्णरचना परिरक्षी**
**भिन्नता लघुगुरूंतिल लक्षी**
**अर्थसिद्धी करितो रुचिरा जो**

अशा प्रकारचे कवि ते स्वतः होते हें कोणाहि वाचकाला मान्य होण्यासारखें आहे. त्यांचा काव्याचा आदर्श त्यांनीं स्वतः पुरेपूर आचरणांत आणिला त्यांच्याच शद्बांत या लेखनाचा उपसंहार करितां येण्यासारखा आहे.

**सुवर्णे गुणे जी हरी अंतरंग**
**कधींही रसाचा करी जी न भंग।**
**सदा सेवितां शुद्ध जी भाव दावी**
**कवीची कृती ती सतीशी वदावी ॥**

हुबळी,
२७-१०-४९

—स. ज. भागवत

भाग दोन

# काव्य

# — प्रस्तावना —

( आर्यागीति )

श्रीमन्मंगलमूर्ते, वाग्देवी–जीवितेश हे तूंतें
साष्टांग नमन करितों पुरवीं तूं प्रणतभक्त-हेतूंतें १

श्रीद तुझें सिध्द जगीं भक्तेच्छा करिशी तूं सदा साच्या
स्फूर्तिसुमंडप घालीं, वाग्वल्ली-विस्तरास दासाच्या २

माझा प्रणिपात असो मत्ताता, " पांडुरंग " ज्या नाम
निर्मळ गंगाजळसें मन ज्याचें सत्य सदयता-धाम ३

" शंकर शंकर " वदतां जो पुण्यात्मा सुखें त्यजी प्राण
आशीःकवच मला तो धाडो न शिवोत विघ्नमय बाण ४

सद्गुणसरिता साध्वी सत्कुलजा स्वपतिसेवना सरसा
झेपावतो मदात्मा यत्स्मृति-पीयूष-सेवना सरसा ५

यन्नाम " अन्नपूर्णा " त्या मातेच्या सुरूप पदकमलां
वंदितसें लाभावें काव्यरणीं विजयरूप पदक मला ६

तातप्रतिनिधि नमिला, अग्रज ज्या " वासुदेव " हें नांव
ज्याची प्रसादहृष्टी विघ्नजलधिलंघनीं घडो नाव ७

नमिली अग्रज-जाया " यमुना " जी मायशी मला पूज्य
आशीर्वादोक्ति जिची अशुभावलिची करो कथा पूज्य ८

ज्यांहीं सुशिक्षण दिलें त्या गुरुचरणीं असो नमस्कार
हा काव्यपथ क्रमितां देवो मज इष्टसिद्धि सत्कार ९

वंदन नंदनसा मी पूर्वजसम पूर्वकविवरां करितों
प्रतिभा-रिक्थ-श्रीच्या अधिकारा तत्कृपाबळें वरितों १०

करितो कविपुंगव जे असती होतील वा तयां नमन
गुरुकार्यारम्भवशें स्वज्ञातिकडे वळेल कां न मन ? ११

अंतीं चुकेन कैसा करण्या रसिकांघ्रि-कमल-नमनातें
दृगनुग्रहेंच ज्यांच्या येतें कविच्या महत्त्व कवनातें १२

हंसक्षीरन्यायें स्वीकार तिचा करा रसिक आर्य
कर जोडुनि विनवुनि हें आतां आरंभितों पुढिल कार्य १३

---

# — कालचक्र —

( वसंततिलका )

या कालचक्ररचनावचनावलीतें
मांदारपुष्पततिशीं समभाव जीतें
पादांबुजीं रसिकवृंदगजाननाचे
मी अर्पितों प्रचुर भक्तिरसें मनाचे

# शरत्काल

( उपजाति )

परंपरा मंगल दुर्दिनांची
घेई रजा मेघरवें जनांची
आतां सख्या त्वज्जनन-क्षितीला
विभूषवी शारदकाललीला १

आरंभ होतां क्षणिं या ऋतूचा
त्वद्देशवासी जन अंबिकेचा
आरंभिती उत्सव उत्सवानें
जो पूर्ण होई विजयोत्सवानें २

गिरीशपत्नीपदपूजनाला
सुवर्णवर्णा तिलपुष्पमाला
कुमारिका कोमलशा करांनीं
गृहीं गृहीं गुंफिति गुंग गानीं ३

दलावलीला दसरा तरूच्या
स्थापीतसे पंक्तिस कांचनाच्या
जनां कथी हें जणुं थोर तत्त्व
वस्तूस ये कालवशें महत्त्व ४

शुष्यत्तृणाच्छादित पर्वताली
पिशंगवर्णांकित पूर्ण झाली

पयोदराजीविरहासह्य ती
यतिव्रतातें जणुं होय घेती ५

जोपासुनी पूर्ववर्यीं श्रमानें
आणूनियां पक्कदशे क्रमानें
शस्यस्थलीतें जगतीं त्यजोनी
पर्जन्य गेला गमतें निघोनी ६

प्रफुल्ल पद्माकर शोभताती
तारा नभीं दिव्य विराजताती
सुपक्क धान्यें धरणी विराजे
सख्या, शरत्काल विशेष साजे ७

विनम्र शालिप्रसवावलीला
आंदोलितां मारुतमंदलीला
विलोकुनी चित्त कृषीवलाचें
आनंददोलायित होय साचें ८

निरभ्रता-नील-नभस्तलाची
शोभा तशी शुद्ध जलाशयाची
समान हो; भूवर नाकवास
निर्मी शरत्काल गमे मनास ९

मंजुस्वना मंदचरा सुशांता
उच्चप्रसूत्यंकित सिंधुकांता
पात्रीं प्रसन्नोदक घेऊनी तें
भेटावया जाति सख्या पतीतें १०

तमालनीलांबरमध्यचारी
सख्या शरत्कांत दिगंत चारी
विराजवी व्योमनदीविशेष
विचित्र ! होतां घनकालशेष ११

वर्षाव तारापथ तारकांचा
करी जसा पुष्पतरू फुलांचा
रत्नोपदा दिव्य शरच्छ्रियेला
नभस्तलश्री जणुं दे विशाला १२

गृहाग्रभागीं नवशस्यमाला
फांसे करीं, आननिं दुग्धधारा
समर्पुनी लोक समोदवृत्ती
कोजागिरीचा दिन घालवीती १३

हरित्तृणास्वादन-पुष्टिशाली
गोवृंद संपादितवप्रकेली
निशावसानीं करण्या पसारा
सोडी वनीं गोपसमूह सारा १४

तृणाग्रभागीं उदयीं खगांचे
चकाकती बिंदु सदा दवाचे
वाटे तृणश्रीस सुमौक्तिकांनीं
शृंगारितो सूर्य, सख्या, करांनीं ॥ १५

टाकूनीयां सागर पूर्व कोप
स्वीकारितां शांत मनोज्ञ रूप

नौका उरीं पाय तदीय देई
लोकीं मृदुत्वें परिभूति येई १६

करी शरच्छ्री गृह सृष्टिरूप
शृंगारुनी उज्ज्वल रम्यरूप
प्रेरी तदर्थीं तव बंधुवर्ग
सदा जनां सद्गुरु हो निसर्ग १७

पश्चात्पुरोवर्तिगृहांगणातें
पवित्रवृंदावनभूतलातें
स्वदेशबंधू गृहभित्तिभाग
संस्कारशाली करिती सराग १८

गमे मना शारदकाल राजा
त्याची दिवाळी जणुं होय भाजा
येणार ती, यास्तव वीथि मार्ग
शृंगारितो सादर लोकवर्ग १९

दीपोत्सव द्रव्य दिसे दुकानीं
पळे घृतामोद, सख्या, दिशांनीं
मार्गांतुनी गांधिक लोक जाती
दीपोत्सवोपस्थिति सूचवीती २०

कन्या नवोढा शिबिकाधिरूढा
चित्तीं प्रमोदातिशयोपगूढा
श्वश्रूगृहा सोडुनि मातृगेहा
जाती, सख्या, भूषितचारुदेहा २१

स्थळीं स्थळीं दीपपरंपरेची
प्रभा, प्रभा सर्व हरी तमाची
शरद्वधू घालुनि हेममाला
करी गमे मंडित कंठनाला २२

वर्षर्तु-कारागत सूर्य चंद्र
जे लोककार्यी जपती वितंद्र
विमुक्त होतां जणुं लोक सर्व
दीपोत्सवातें करिती सगर्व २३

खाणें पिणें खेळ रुचे जनाला
प्रपंचचिंता न शिवे तयाला
चार्वाकशास्त्रोक्त मतें जनाला
येई दिवाळी जणुं सांगण्याला २४

दीपोत्सवाच्या परमावधीचा
ये वार तो भौमचतुर्दशीचा
प्रभातकाळीं करिती, सख्या रे
स्नानें सुखें मंगल लोक सारे २५

मुहूर्त लक्ष्मीशुभपूजनाचा
पाहूनि हो भाव असा मनाचा
सारूनि साध्याप्रति दूर हातें
कां यत्न हा साधनसंग्रहातें २६

आयव्ययाची तुलना कराया
संवत्सरीं लाभ किती ? पहाया

वाणिज्यजीवी जन मग्न झाला
त्यावांचुनी अन्य सुचे न त्याला २७

( वसंततिलका )

ओंवाळितें स्मितमुखी भगिनी त्रिजेला
बंधूस; तो धन यथोचित दे तियेला
संबंधबीज उभयांतिल या प्रकारें
प्रेमांकुरें न विलसेल कसें, सख्या रे ? २८

( द्रुतविलंबित )

शकटपंक्ति पथांतुनि संचरे
उपवनीं जल चंचल वावरे
उदय कुंभज तापस पावला
तुळशितें पतिलाभ घडे भला २९

( भुजंगप्रयात )

जहाजें शिडें सोडुनी शुभ्र खाशीं
सख्या, तोडिती सागराच्या जलाशीं
जणूं तीं मुलें सिंधु वाटे पिता तो
निजांकावरी कौतुकें खेळवीतो ३०

( उपजाति )

विभूषिता जी ‘ त्रिपुरी ’ पदानें
ती पौर्णिमा ये, सुहृदा, क्रमानें

असंख्यदीपावलिच्या मिषें कीं
अद्यापि जागे हरवीर्य लोकीं ३१

( पृथ्वी )

खळे न पळही, सख्या, विरहताप मच्चित्तिचा
सुचेल उपभोग रे मग कसा शरत्कोलिंचा
" वडो सुखद तोथिंचा ऋतु तुला " पुढें याहुनी
मुखीं न वदवे मला अहह ! ये गळा दाटुनी ३२

---

## हेमंतकाल

( उपजाति )

चेतोहरा शारदकाललीला
घेई, सख्या, कालवशें गतीला
हेमंतलक्ष्मी बहुरूक्षरूपा
स्वज्जन्मदेशीं विचरे विरूपा १

स्वीकारिते यद्यपि शीततेला
हेमंतकालांत निशा विशाला
खोडी जणूं हें बहुमान्य तत्त्व
शीतें पदार्थां जडतें लघुत्व २

निसर्गसिध्दक्रमलंघनाला
शीता तसें ये बळ पावकाला
जनांस शीतें बहु ताप होई
जो अग्निसंगें विलयास जाई ३

होतां प्रभात क्षितिमंडलाशीं
आच्छादिते धूम्रतुषारराशी
वाटे मही शीतनिवारणाला
घेई निजांगावरी शुभ्र शेला ४

विलोभवी संप्रति दक्षिणाशा
विप्रा तशी पूर्णपणें दिनेशा

तदाश्रयें आश्रयही द्युतीचा
लोकीं सुमंदद्युति होय साचा

नेणार हेमंत तरुत्रयाला
क्रमें क्रमें स्थाणुसमानतेला
वाटे अपर्णा म्हणुनी घडे ती
लतावली तत्तनुसंग घेती ६

भूजन्मदा पीडित फार झाली
शीतें; असें पाहुनि पादपाली
आत्मांगिच्या काढुनि पर्णचैला
आच्छादिते तत्तनु धन्यशीला ७

प्रभातकाळीं हिमबिंदुलिप्ता
वाटे वनश्री रडते सुतप्ता
स्वपुष्पपत्रावलिवित्तभार
कीं ने हरोनी हिमकालचोर ८

जो आत्मरूपीं शिव विष्णु धाता
आणूनियां तोषवि अत्रिकांता
त्या श्रीगुरूचा शुभ जन्मवार
आनंद दे भक्तजनां अपार ९

बालातपें सारवि ज्यास मित्र
वृंदावनीं त्या बसुनी पवित्र
संपादिती शीतविकंपितांगा
वेणी फणी या ललना शुभांगा १०

वकूल वृक्षीं पिकल्या फळांनीं
स्वचंचुशोभा हरिली ह्मणोनी
शुकावली चंचुपुटें कठोर
करी सरोषा जणुं त्यां प्रहार ११

पाषाणखंडें बदरीतरूला
पांथस्थ हाणी परि तो तयाला
अर्पूनियां गोड फळें निवारी
शत्रूसही सज्जन सौख्यकारी १२

निष्पेषयंत्रास्थित इक्षुदंड
देई सुधातुल्यरसा उदंड
विशेष शोभे गुण संकटांत
मित्रा, जसा दीप महातमांत १३

शुद्धद्वितीयाशशिखंडरूपा
फलावली तिंतिडिची सुरूपा
हेमंतलक्ष्मीश्रुतिभूषणांची
करी अपेक्षा जणुं पूर्ण साची १४

येई न येई उदया मरीची
ज्या लाभली संगति ती धनाची
तों आप्तबंधूंसह सुप्रसन्न
आस्वादिती लोक सुमिश्र अन्न १५

विलासवांच्छा विषयी जनांला
व्यायाम मल्ला बहुता क्षुधेला

सुपक्कता पूगफलावलीला
ही भेटवी रे हिमकाललीला १६

( वसंततिलका )

झोंबे तनूस, अधरीं वितरी क्षतातें,
योजी प्रयत्न तनुवस्त्रविकर्षणातें,
सीत्कारशब्द करवी, हिमकालवात
जारापरी विलसतो ललनाजनांत १७

( द्रुतविलंबित )

हिमतुषारहता बहु कोमली
न बिसिनी प्रसवे कमलावली
कमललोचनहीन सरोमुख
लव न दे नयनां, सखया सुख १८

कुसुमगंधभरा विखुरी खुरी
पनस बालफलप्रसवा वरी
मुकुल अस्फुट तो सहकार वी
मकरसंक्रमणार्थ निघे रवी १९

( मालिनी )

"मधुर तिळ गुळा या घे सदा गोड बोल"
श्रवणसुखद जे ते बोलती गोड बोल
अहह ! जरि मला हा अंतरे लाभ नामी
तुज तिळ गुळ द्याया योजिली योजना मी २०

( वसंततिलका )

हा लेखरूप हलवा तुजला अपूर्व
म्यां धाडिला, सुसखया, बहुभक्तिपूर्व
वाटो तुला सरस नीरस वा कसाही
घे गोड मानुनि, सखा सखिदोष साही २१

# शिशिरकाल

( द्रुतविलंबित )

वितरुनी निज वार्षिक भेटिला
समय हैमन संप्रति चालला
सहित घेउनियां निजसंपदा
शिशिर तो शिरतो ऋतु तत्पदा १

सकल-मंगल-मंदिर सुंदर
वितरि जो बहु विघ्नदरा दर
गणप उत्सविं तो स्तविती जन
भजन-पूजन-पूर्ण-पराधिन २

रुचिर मंजरि-गुच्छ-परंपरा
निघत भेदुनि पर्णपुटोदरा
बहुत आम्रतरूप्रति वांकवी
उपवना पवनाकुल शोभवी ३

भ्रमरपुंज सुमंजुल गुंजता
मधुपुटा सहकार-सुमास्थिता
अमरवर्ग जसा असितीं विधू
करितसे रित सेवुनियां मधू ४

रुचिर आम्रभवा विटपावली
कुसुमिता सुषमा बहु पावली

जशि सख्या मधुर-स्मित-संगता
सुतनुची तनुची रमणीयता ५

कुसुमगुच्छ जया नच शोभवी
ललित पल्लव तो सहकार वी
समयिं कांहितरी गुण दावुनी
जनमना नमनार्ह हरी गुणी ६

डुलति मंजुल मंजरि एकतः
ललित लोहित पल्लव अन्यतः
जणुं जरी-पदरी पट अर्पितो
स्वतनुला तनु लाल रसाल तो ७

विपुल-शीतज-ताप-कदर्थिता
अवनिची तनु देखुनि दुःखिता
मधुमिषें सहकारतरुच्छवी
सकरुणा करुणारस दर्शवी ८

सुमसमुच्चय चूतज चारुसा
कुसुमसायकसायकसा कसा
शिवतसे शिवरात्रिस जो महा
अशिवपा शिवपादसरोरुहा ९

शिशिरता क्रमपूर्व सख्या कमी
करित; हा हुतवाह-समागमी
उदय पावत फाल्गुन भूवरी
मुखरता खरता जनता वरी १०

अशुभ अश्लिल भीतिद भाकड
रजनिंच्या मुखिं आरड ओरड
परिसुनी जणुं धूततरुच्छलें
शिशिर हा शिर हालवि आपुलें ११

जनन-वर्धन-संसृति-कारण
युवति दुर्बल, त्यांस अकारण
जन कृतघ्नचि योजिति निंदण्या
स्वरसना रस नारक चाटण्या १२

अशुभ-शब्द-शरावलि भासुरा
चरचरा चिरि काळिज निष्ठुरा
म्हणुनि झांकिती नेत्र समूर्च्छना
धवरता वरतामरसानना १३

फरफरां नर निर्दय ओढिती
युवतिंची पथिं लाज समूळ ती
जणु तयां गृहिणी भगिनी नसे
न जननी जननी जनना असे १४

वदन ईश्वरनाम न घे कदा
कर कधीं नच वंदिति तत्पदा
श्रमतसे अबलां छळण्या परी
उभयही भयहीन परोपरी १५

नरक सद्मामुखीं परिषिंचिती
नरकतुल्य कुशब्दहि बोलती

तनुस पंच न जों असु सोडिती
सुनर कां नरकांतरिं लोळती १६

न वळवी पद उन्नतिच्या पथा
अवनतीप्रति पाववि सर्वथा
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा ? १७

विषयसंगरसीं मन रंगवी
षडरिभंग न जो परिवर्तवी
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा ? १८

सुनय-कल्पतरू लय पाववी
अनय-दुर्विषपादप वाढवी
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा ? १९

त्रिदिवमार्ग निरुद्ध करी जसा
निरयमार्ग समग्र खुला तसा
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा ? २०

श्रुतिस अप्रिय जो भयदायक
उघड जो दिसतो स्मृतिदूषक
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा ? २१

शिथिल जो करितो स्थितिबंधनें
वळवितो कुपथीं जनतामनें
अहह ! तो जनधर्म सुहृद्वरा
विहित का ? हित का ? वद का खरा ? २२

सकल फाल्गुनवाङ्मय तें जळो
अशुभ त्या महिन्या क्षय वा मिळो
बधिर भाव जडो अथवा भला
युवतिच्या वतिच्या नरजातिला २३

( वसंततिलका )

वस्त्रांवरी परमकुत्सित वर्णमाला
रेखोत लोक पशुचें पद पावण्याला
भित्तीवरी विमल निर्जरमंदिराचे
ती रेखण्या धजति हात कसे कुणाचे २४

वाचावया भयद वर्णपरंपरा ती
अंधासमान अबला असमर्थ होती
त्यांच्या मनीं म्हणुनि दुःख मुळीं न दाटे
स्त्रीचें अशिक्षणचि संप्रति लाभ वाटे २५

बीभत्स चित्ररचना रचिती अनेक
बीभत्स गायन सख्या करितात लोक
बीभत्स भाव धरिती कृति-केलि-वेशीं
बीभत्सता अवतरे तव जन्मदेशीं २६

तूं दूर, दूर सुभगा तुज हा प्रकार
पत्रप्रविष्ट परि पाठविला समोर
याकारणें कुपितभाव मनीं न यावा
हा लेख पूर्ण पुरुषोत्तम केशवा वा २७

# वसंतकाल

( उपजाति )

विलुप्त होतां शिशिरर्तु लोकीं
स्वारूपा सखया विलोकीं
विलासिनीशी मधुमासलीला
मोही जनांच्या सखया मतीला १

स्वदर्शनें भूषविणार भूमी
आनंददायी ऋतुराज नामी
निसर्ग हा यास्तव शुद्धचारी
तत्स्वागताची करितो तयारी २

जी कोमला कोकिलकंठवाणी
हो मुत्सुधेची श्रवणांस खाणी
वाटे मना चारणचारुलीला
दे जागृतीतें ऋतुंच्या पतीला ३

मुग्धभाराकुल पुष्पलीला
शृंगारिते वा बकुलावलीला
सख्या जणूं ती ऋतुराजयाची
करी सुवासाकुल वाट साची ४

लक्षूनि वर्षप्रतिपन्मुहूर्त
प्रजाजनांना सुखलाभ मूर्त

स्वारी निघाली ऋतुराजयाची
तत्स्वागता पंक्ति दिसे ध्वजांची ५

लेवूनि अंगीं नग पुष्परूप
शालू तसा पोपटि रम्यरूप
लतातरुश्रीं जणुं होय सिद्ध
स्वामी ऋतूंचा बघण्या प्रसिद्ध ६

जी शुभ्रवर्णांकित पुष्पमाला
पडे लतामुक्त धरातळाला
पाहूनि ती वाटतसे मनाला
मधूवरी लाजविसर्ग झाला ७

सख्या किती मारुत मंद चाले
पूगाग्रपुष्पांकुरगुच्छ हाले
गमे मिषें या ऋतुराजभाळीं
उद्यानभू चामर चारु ढाळी ८

मरंदपानीं रत षट्पदाली
सुमंजुगुंजारवसक्त झाली
वसंतसत्कार करावयाला
करी गमे सुस्वर गायनाला ९

उभारुनी रम्य नवा पिसारा
मयूर रानीं उडती भरारा
मयूरपिच्छें जणुं पुष्पकाला
वाही वनश्री मृदुमारुताला १०

स्थळीं स्थळीं सुंदर आंबराई
भारें फळांच्या बहु नम्र होई
मधूस ती भेट सुधाफळांची
शाखाकरांनीं जणुं देव साची ११

शीतामुळें वृक्ष लता अनाथ
देखूनि कष्टी ऋतुकालनाथ
पुष्पें फळें पल्लव त्यांस देई
संस्मर्यतेला निज भेट नेई १२

जसा जसा स्यंदन भास्कराचा
भित्रा विलंघी पथ उत्तरेचा
तसा तसा रश्मिसमूह त्याचा
धरी महा उज्ज्वल भाव साचा १३

अनंत--कुंदादिक--पुष्पजाती
ऋतूंत या सर्व फुलोनि जाती
वाटे मधुश्रीशुभमंदहास
पुष्पच्छलानें करितें विलास १४

तारुण्ययोगें तरुणी सुगात्री
शरत्प्रसंगें विधुयुक्त रात्री
तशी धरित्री ऋतुराजसंगें
विशेष वेधी रसिकांतरंगें १५

उत्साहतेजःप्रणयादिपात्र
घडे वसंतीं जडजीवमात्र

शीतव्यथार्ता जणुं सृष्टिदेवी
वसंत पुष्टिप्रद काय सेवी १६

वनस्थलीनें नव कोमला जी
केली असे धारण पर्णराजी
पाहूनि ती वाटतसे मनाला
वेष्टी धुकें कीं हिरवें वनाला १७

फुले वनीं किंशुक कर्णिकार
आरक्त शोभे नवपुष्पभार
वाटे मना कीं वन भक्तिशाली
मधुप्रचारार्थ धरी मशाली १८

कळी फुले कांचनकेतकीची
गुंगे तिथें पंक्ति सख्या अलींची
अद्यापिही शाप तिला शिवाचा
कलंकवी कीं अलिरूप साचा १९

प्रफुल्ल पुन्नाग विशेष शोभे
त्याच्या सुगंधा जनचित्त लोभे
वसंतलक्ष्मीशुभदर्शनातें
ये कृत्तिका पुंजचि भूतलातें २०

न शक्त आतां सहण्या श्रमातें
पाश्चात्त्य-विद्या वरि विश्रमातें
निवासजन्मस्थळ शीतदेश
पोळे जणुं यास्तव ती विशेष २१

प्रसिद्ध रामद्वय अद्वितीय
तो अंजनीनंदन वंदनीय
ऋतूंत या वार्षिक जन्म घेती
भक्तांस आनंद अपार देती २२

वनीं तरूंच्या घन सावलीला
संतोषदात्री बहु जी मतीला
सेवी सख्या झांकुनि लोचनाला
रोमंथलीलारस धेनुमाला २३

चंडस्वरूपी रवि सिद्ध झाला
नानाकरांनीं तनुकर्तनाला
या भीतिनें तोय जलाशयांचें
जाई सख्या भूदरिं खोल साचें २४

शीतस्वरूपी उपचार नाना
वसंतकाळीं रुचती जनांना
परोपकारा परि भूमिमाय
जाळूनि घेई निज पूज्यकाय २५

घटोदरींचें जल थंडगार
आनंद देई रसनेस फार
भुजंगनिर्मोकसमान चीर
काळांत या भूषवितें शरीर २६

सुगंधशाली जलसेक ज्याला
पंखा डुले तो डुलवी जनाला

वातायनें मोकळिं मंदिराचीं
प्रभंजना वाहति जाण साचीं २७

( वसंततिलका )

दोलाधिरूढ करुनी शितिकंठजाया
हारिद्रकुंकुमविधी वनिता कराया
होतीं समुत्सुक सख्या तव धर्मपत्नी
त्या देवतेजवळि हें विनवी प्रयत्नीं २८

" दे अंबिके शुभखने वरदान मातें "
" गेले तसे परत आण गृहा तयांतें "
" ओटी भरीन तव, ते परतोनि येतां "
मित्रा पुरे मज पुढें वदवे न आतां २९

———

## ग्रीष्मकाल

(उपजाति)

मार्गस्थ होतां मधुमासलीला
निदाघलक्ष्मी वरि तत्पदाला
मित्रा तिचें मी अवतारवृत्त
यथामती वर्णिन देइं चित्त १

उच्चण्डता भास्करमण्डलाची
भासे जनांना परमावधीची
वांटे करांनीं ज्वलदग्निधूली
पेरी महीमंडळिं रश्मिमाली २

जसा जसा उच्च चढे पदाला
तसा तसा निष्ठुर मित्र झाला
सहस्र पादें करितो प्रहार
म्हणूनि तापे धरणी अपार ३

घर्मव्यथाव्याकुलमंदवेग
निःशंक झाले रविचे तुरंग
लागे सख्या संप्रति त्यांस वेळ
आकाशमार्ग क्रमण्या समूळ ४

अदृश्य कीं लोळ हुताशनाचे
निश्वास कीं तप्तमहीमुखाचे

फूत्कार कीं ग्रीष्मभुजंगमाचे
वारे सख्या वाहति चंड साचे ५

उग्रस्वरूपी रवि बाह्य अंगीं
रसार्द्ररूपी परि अंतरंगीं
तेणें घडे मान्य तदस्तमान
उदार चित्ता तनुला न मान ६

संतप्त धूळी पवनप्रकीर्णा
दाही दिशा धुंद करी विवर्णा
पांथस्थचक्षुःकमलावलीला
झोंबे जशी तिक्तपरागलीला ७

चैतन्य जो ओतित जीवलोकीं
येतां खमध्या रवि तो विलोकीं
करी सख्या व्याकुल जीवमात्र
अतिप्रसंगें गुण दोषपात्र ८

ग्रीष्मीं सुमित्रा दिनमध्यकाळ
काळापरी क्रूर गमे कराळ
निर्वीर्य निश्चेतन तप्त शांत
चराचर स्तब्ध दिसे नितांत ९

पादप्रहारें व्यथिता खगाचे
छाया धरी पाय सख्या द्रुमाचे
तत्रस्थिता आश्रय दे पराला
साधु स्वदुःखीं सुखवी दुजाला। १०

करी जणूं भास्कर जातशोष
जलाशयींचें जल नामशेष
तदीयनाशें जलजंतुमाला
हताश होई वश अंतकाला ११

सह्याद्रिचे दुर्गम घोर रानीं
मध्यान्हकाळीं भडके दवाग्नी
विकर्तन क्रूर–काल–काय
जाळावया सिद्ध जगासि काय ? १२

पक्षी पशू वृक्ष लता अनेक
भक्षी शिखी एकसरें विशंक
कृष्णस्वरूपाकुलभूमिभागें
दुष्कीर्ति ठेवी जणुं पाठिमागें १३

महाप्रजापीडक जेवि भूप
निदाघ दे ताप जनां अमूप
स्वकीयपीडापरिहारपात्र
मेघाकडे लाविति ते स्वनेत्र १४

जेथें पडे संशय जीवनाचा
तेथें नसे प्रश्न दुजा छळाचा
सर्वत्र चाले बहु हाय हाय
प्रजा प्रभूःतें शरणार्थ जाय १५

सख्या कुळें तों तमिं काजव्यांचीं
चकाकतीं जेंवि फुलें नळ्यांचीं

वर्षर्तुचे अग्रग दूत होती
जनां निदाघातुर धीर देती १६

विहंगमांची नव चित्र कांति
सख्या समर्पी नयनांस शांति
जो कालमानोचित होय वेष
सदा जनीं तो विलसे विशेष १७

अश्वत्थ जोडी नवपत्रलीला
दे क्षुब्धता भेट पयोनिधीला
वारा सुटे दक्षिण सांगण्याला
प्रस्थानशाली घनराज झाला १८

चालूनियां अंबुदकाल आला
घाला स्वसत्तेवरि घालण्याला
मार्गीं कराया प्रतिरोध त्याला
मित्रा गमे सिद्ध निदाघ झाला १९

दोघे ऋतू हे रणशूर योध
आकाश ही संगरभू अबाध
मेघध्वनीनें करुनी सलामी
आरंभिती तुंबळ युद्ध नामी २०

सगार्जिता आक्रमितां नभाला
पयोदपंक्ती गमतें मनाला
तोफा रणीं सोडिति सत्य वीर
व्यापी नभा तन्मुखधूम्रपूर २१

तमालनीला नवमेघमाला
कठोर वर्षे करकावलीला
मनांत येई गुलिका शिशाच्या
परस्परीं सोडिति वीर साच्या २२

दिव्यप्रभाभासुरचंचलांगी
विद्युन्नटी नृत्य करी खरंगीं
खड्गास चक्रापरि भोंवळोनी
वाटे रणीं झुंजति वीर दोनी २३

संग्राम ऐसा घनघोर होई
कोणी न कोणा जणुं हार जाई
तेव्हां करीं इंद्रधनुष्य मेघ
घेई, करी वृष्टि शरें अमोघ २४

प्रत्यक्ष तेजोनिधि भास्कराचे
खंडीतसे जी कर चंड साचे
साहे मुळीं वृष्टि न ती तपाला
युद्धीं अकालीं विलयास गेला २५

नभस्तळीं अंबुद अंबुवर्षी
शोभे जयश्रीशुभसंगहर्षी
प्रसन्न झाली जलसिक्तगात्री
ग्रीष्मोग्रतापाकुल भूतधात्री २६

स्त्रीवर्ग मित्रा वटपौर्णिमेस
जेपे कराया वटपूजनास

अखंड सौभाग्ययशोनिधान
मागे तदा तो गुरुभक्तिमान २७

प्रभंजनांदोलित मेघराजी
संलग्न झाली गिरिशेखरा जी
पाहोनि वाटे गगनीं भरारी
घेण्या स्वपक्षां गिरि कीं उभारी २८

मी ओतितों भूमुखिं जीवनातें
हरी करांनीं सविता तयातें
ह्मणूनि रोषें घनराज साचे
करांस खंडी रवितस्कराचे २९

निजांबुधारेसम यत्प्रकाश
करी जनांचा परितापनाश
त्या ग्रासितो मेघ सुधाकराला
स्पर्धा वरी तुल्यगुणाश्रयाला ३०

( द्रुतविलंबित )

नवपयोधरचुंबित पर्वत
जलदकाल करी जणुं धूपित
सकल भूमितळीं अथवा कसा
सुरभिगंध सुटे मनमोहिसा ३१

सलिलसंततिसिक्त तरू लता
धरिति मोहक उज्ज्वल रूपता
नरकपूर्व चतुर्दशिचे दिनीं
समभिषिक्त जशा नर कामिनी ३२

9236

मुदितमानस मानव भूतलें
करिति सीरमुखोत्कषणाकुल
सतत संततिच्या करण्या हिता
जननि सोशिल ताप न कोणता ? ३३

तृणनवांकुर कोमल कोमल
करिति मंडित हें धरणीतल
घनजलें अभिषिक्त जणूं मही
हरित वस्त्र करी परिधान ही ३४

( उपजाति )

सुवर्णवर्णांकित भेक झाले
मुखीं तयांच्या श्रुतिघोष चाले
कीं वेदशून्य द्विजमंडळीस
नेती सख्या ते श्रुति संस्मृतीस ३५

( भुजंगप्रयात )

ध्वनी अंबुदाचा वनीं आयकोनी
करी नृत्यलीला शिखी मोद मानी
पयोदा जणूं भेटण्याला अनेक
मिळोनी नभीं उंच जाती बलाक ३६

निदाघीं मुखा वासुनी प्रेतरूप
सख्या जाहला, तोच कासार कूप
मुखीं दिव्य ओती रसा मेघकाळ
तदा स्वीकरी जीवनाचा सुकाळ ३७

अखंड सौभाग्ययशोनिधान
मागे तदा तो गुरुभक्तिमान २७

प्रभंजनांदोलित मेघराजी
संलग्न झाली गिरिशेखरा जी
पाहोनि वाटे गगनीं भरारी
घेण्या स्वपक्षां गिरि कीं उभारी २८

मी ओतितों भूमुखिं जीवनातें
हरी करांनीं सविता तयातें
ह्मणूनि रोषें घनराज साचे
करांस खंडी रवितस्कराचे २९

निजांबुधारेसम यत्प्रकाश
करी जनांचा परितापनाश
त्या ग्रासितो मेघ सुधाकराला
स्पर्धा वरी तुल्यगुणाश्रयाला ३०

( द्रुतविलंबित )

नवपयोधरचुंबित पर्वत
जलदकाल करी जणुं धूपित
सकल भूमितळीं अथवा कसा
सुरभिगंध सुटे मनमोहिसा ३१

सलिलसंततिसिक्त तरू लता
धरिति मोहक उज्ज्वल रूपता
नरकपूर्व चतुर्दशिचे दिनीं
समभिषिक्त जशा नर कामिनी ३२

ग्रं. क्रमांक ९२३६

मुदितमानस मानव भूतलें
करिति सीरमुखोत्कर्षणाकुल
सतत संततिच्या करण्या हिता
जननि सोशिल ताप न कोणता ? ३३

तृणनवांकुर कोमल कोमल
करिति मंडित हें धरणीतल
घनजलें अभिषिक्त जणूं मही
हरित वस्त्र करी परिधान ही ३४

( उपजाति )

सुवर्णवर्णांकित भेक झाले
मुखीं तयांच्या श्रुतिघोष चाले
कीं वेदशून्य द्विजमंडळीस
नेती सख्या ते श्रुति संस्मृतीस ३५

( भुजंगप्रयात )

ध्वनी अंबुदाचा वनीं आयकोनी
करी नृत्यलीला शिखी मोद मानी
पयोदा जणूं भेटण्याला अनेक
मिळोनी नभीं उंच जाती बलाक ३६

निदाघीं मुखा वासुनी प्रेतरूप
सख्या जाहला, तोच कासार कूप
मुखीं दिव्य ओती रसा मेघकाळ
तदा स्वीकरी जीवनाचा सुकाळ ३७

( मालिनी )

स्फटिक-विमल-तोया मालिका निर्झरांची
झुलु झुलु झुलु वाहे वृत्ति मोही जनांची
उपवर दुहितेला तेंवि शस्यावलीला
स्थळिं समुचित सिद्ध स्थापण्या लोक झाला ३८

( वसंततिलका )

देशीं तुझ्या घडति ज्या शुचिकाललीला
त्या सांगण्या तुज यथामति यत्न केला
मित्रा करीं सदयशील तयास मान्य
हें मागणें तुजशि मागतसें न अन्य ३९

---

# वर्षाकाल

( उपजाति )

घनप्रभूच्या सुखद प्रजेला
पुढील मी वर्णिन राज्यकाला
रुचो तुझ्या तो सखया मतीला
कसावसा पुत्र जसा प्रसूला १

स्थलांतर-प्रापित-शालिपंक्ती
विनम्रशीर्षा गलितांगकांती
मुखावरी अंबुकणांस वाही
स्नुषा जशी नूतन नाथगेहीं २

संसर्गरूढप्रणया क्रमानें
नांदे स्थळीं त्या बहु ती सुखानें
अल्पांकुरा श्यामल-चारु-रूपा
भोगी गमे मुग्धदशास्वरूपा ३

मघाजलद्वारमुखें पुढें ती
मित्रा शिरे यौवनमंदिरांतीं
हरिन्मणिश्रेणिभरें निजांग
शृंगारुनी तोषवि अंतरंग ४

मेघोदरापासुनि वारिधारा
अश्रांत वेगें पडतां झरारा

आंग्लांगनावक्त्रशशी सजाल
भासे तसा अंधुक भूमिगोल ५

नभस्तरूचे शिखरीं निवास
लाधे न नक्षत्रसुमोच्चयास
वर्षर्तु हा रावण गाढवीर्य
टाकी स्वकारागृहिं चंद्र सूर्य ६

अमेयतोयद्रविणप्रमत्ता
नदी स्वभावें कुटिलस्वयुक्ता
मार्गीं अमर्याद अशुद्ध सारी
मिठी परी नाथतनूस मारी ७

कधीं कधीं वृष्टि घडे सुयोगीं
सूर्यप्रकाशाकुल भूत्रिभागीं
समानकाळीं सुख दुःख वाटे
हांसे रडे भूमि म्हणूनि वाटे ८

या पारिजातादि महीरुहांला
आलिंगिते पुष्पविकासलीला
सायंतना पुष्पगणा बघून
स्त्रिया सख्या मोजिति कालमान ९

देतां रवी दुर्लभ दर्शनाला
सत्कार त्यातें जणुं द्यावयाला
सुरांगना इंद्रधनुःस्वरूप
उभारिती तोरण रम्यरूप १०

नव्या तृणें श्यामल शाद्वलांत
मंजूलशी पोंवरि वाजवीत
शिलातळीं टाकुनि अंगयष्टी
गोपाल धेनूंप्रति रंजवीती ११

जलप्रवेशें मृदु भूमिपोटीं
रोवूनियां तीक्ष्ण विषाणकोटी
कोठें वनीं पुष्ट निनादशाली
करी सुखानें वृष वप्रकेली १२

कोठें यदंगीं प्रसवांबु ताजें
उठावया यत्न करी पडे जें
तें चाटण्या पाडस कातराक्ष
सद्यःप्रसूता बहु धेनु दक्ष १३

सुहृद्वरा दोन महोक्ष कोठें
आरंभिती मस्तक युद्ध मोठें
निवारण्याला झड पावसाची
धेनू कुठें वाट धरी द्रुमाची १४

वत्सोत्सुका धेनु दिनावसानीं
कासेमुळें कुंठित शीघ्रयानीं
गृहाग्रभागीं गृहिणी दिव्यातें
लावीतसे तों परते गृहातें १५

निशामुखीं स्नान करूनि गोप
गोमंदिरीं दीप्त धुमीसमीप

प्रसन्न चित्तें निजकंबलाची
जलार्द्रता हारवितात साची १६

गृहीं गृहीं पन्नगपंचमीतें
व्यालग्रही हिंडवितो अहीतें
पाडोनि आधीं दशनां कराळ
न मान त्या जो घडला मवाळ १७

धेनुस्तनीं निर्मल दुग्धधारा
महीमुखीं संतत वारिधारा
शिरीं शिवाच्या अभिषेकधारा
ओतीतसे श्रावणमास सारा १८

शशांकमौली शुभ सोमवारीं
गौरी कुमारीप्रिय भौमवारीं
तो अंजनीनंदन मंदवारीं
नभीं सुपूज्यत्व धरी शरीरीं १९

रत्नाकरीं श्रावण पौर्णिमेला
विक्षोभशांतिप्रद नारिकेला
सोडी सख्या नाविक बद्धभाव
निष्ठे नसे कारण-कार्य-भाव २०

जन्माष्टमी अद्भुत जन्मलीला
तमालनीला यदुपुंगवाला
लावी पुन्हां लोकिं करावयास
होई दधि-क्षीर-रसीं विलास २१

पिंडी वसे मध्यगता शिवाची
जोडी अशी वा हरतालिकांची
सांगे जना मंगलदायकाची
स्वारी निघाली गणनायकाची २२

भक्तावलीचित्तचकोरचंद्रा
प्रधी-धुनीच्या धरणीधरेंद्रा
गृहीं गृहीं मंगलमंदिरातें
आराधिती लोक गजाननातें २३

शुकप्रभाश्यामल-शस्य पंक्ती
क्रमें क्रमें प्रौढ दशेसि येती
तदा तदापांडुर वर्ण सांगे
नवीन पोटीं फलगर्भ वागे २४

( भुजंगप्रयात )

शिखीच्या सुमित्रा रवीच्या कुमित्रा
जनप्राणयात्रा-निदानत्वपात्रा
घनांच्या प्रभूतें जराकाळ आला
करी क्षीण त्याच्या क्रमें जीवनाला २५

( वसंततिलका )

ये मास भाद्रपद हा प्रिय भिक्षुकांस
पिंडप्रदान करिती जन पूर्वजांस
शालिप्रभा रुचिरगर्भवती विराजे
वृद्धत्व कालविभवें घनराज साजे २६

लोकोपकार करण्या निज जीवनाला
वेंचूनिया जलदकाल सुधन्य झाला
सत्ता सख्या करुनि शारदकाल हस्तीं
लेख्यासहीत मग संपवितो स्ववस्ती २७

★

( मंदाक्रांता )

आतां सारे रसिक पुरवा एक हें अल्प कोड
माना 'राधारमण' कविचे वोबडे बोल गोड
तेणें माझी श्रमपरिवृता शारदा विश्रमास
सेवोनीयां वरिल मुदिता अन्यकाव्यप्रयास

# — फडणीस काव्य —

# सर्ग १ ला

( पूर्वजवर्णन )

गजाननाच्या पदापंकजातें
यच्चिंतनें सिद्धिस कार्य जातें
नमूनि, नानफडणीसलीला
समर्पितों मी रसिकावलीला १

एकीकडे पश्चिम सागरानें
एकीकडे सह्यमहीधरानें
मर्यादित क्षेत्र विशाल आहे
लोकांत जें कोंकण नाम वाहे २

सोडोनियां सायक तीक्ष्ण रागें
समुद्र-सीमा हटवोनि मागें
क्षत्रान्वयारण्यदवानलानें
निर्मीयलें जें भृगुनंदनानें ३

स्वीकारुनी नित्य महाश्रमांना
समर्पुनी सार पदार्थ नाना
यत्क्षेत्रवासी जन जन्मभूस
जोपासिती मल्ल जसे तनूस ४

परी शिला-संघ-जडांतरा जी
कधीं स्वबाळांवरि होन राजी

पोटापुरें अन्न तयां न देई
सापत्नमाता ह्मणवूनि घेई ५

कापोनि पूर्वी रिपुकंठनाळ
निर्मूनियां रक्तनद्या विशाळ
जेथिल शस्त्रें श्रम फार होतां
चित्रीं विसांवा जणुं घेति आतां ६

संहारुनी आयुध-काष्ठ-भारा
सिंचोनि दारिद्र्यमयांबुधारा
आंग्लप्रभूंचा नय कृष्णरूप
जेथील शौर्याग्नि गिळी सुरूप ७

सह्याद्रिपासोनि समुद्र दूर
नेई किती तो भृगुपुत्र शूर
हें मोजण्याच्या जलशृंखलाच
जेथें नद्या वाहति रम्य साच ८

स्वीकारुनी अद्रिशिरीं निवास
जेथें वनश्री करिते विलास
वारे जिथें वाहुनि थंडगार
आत्मा जनांचा करितात गार ९

सदा विवादाकुल दायभेदा
न पावती जेथिल बंधु खेदा
"आरंभशूराःखलु" हा तयांस
गोष्टींत या दोष शिवे न खास १०

शौर्यद्युतीचे जणुं कंठहार
न पावले यद्धट युद्धिं हार
भू-भूषणीं-भूत सुरालयातें
गेले कृतांता जणुं जिंकण्यातें ११

विद्या, कला, साहस, देशसेवा,
या सद्गुणांचा वहुमूल्य ठेवा
जेथें जनांच्या वसतो सुखानें
हृत्संपुटीं मुद्रित मत्सरानें १२

बृहस्पतीच्या सम बुद्धिमत्ता
ही घेउनी केवळ मालमत्ता
देशावरी जेथिल लोक जाती
देशोन्नतीचें ऋण फेडिताती १३

क्षेत्रांत त्या सुंदर भार्गवाचे
तीरावरी पश्चिम सागराचे
"वेळास" नामें श्रुत जी जगास
लाधे अशा अल्प पुरीस वास १४

राहे अधिष्ठानि जुनाट कोट
बाजू तिची उत्तर "बाणकोट"
रक्षावया तन्नगरी-निधीतें
वाटे उभा कालभुजंग धीतें १५

"सावित्रिच्या" स्वादुरसा मुखास
समुद्र चुंबी शुभ त्या स्थळास

पोटापुरें अन्न तयां न देई
सापत्नमाता ह्मणवूनि घेई ५

कापोनि पूर्वी रिपुकंठनाळ
निर्मूनियां रक्तनद्या विशाळ
जेथील शस्त्रें श्रम फार होतां
चित्रीं विसांवा जणुं घेति आतां ६

संहारुनी आयुध-काष्ठ-भारा
सिंचोनि दारिद्र्यमयांबुधारा
आंग्लप्रभूचा नय कृष्णरूप
जेथील शौर्याग्नि गिळी सुरूप ७

सह्याद्रिपासोनि समुद्र दूर
नेई किती तो भृगुपुत्र शूर
हें मोजण्याच्या जलशृंखलाच
जेथें नद्या वाहति रम्य साच ८

स्वीकारुनी अद्रिशिरीं निवास
जेथें वनश्री करिते विलास
वारे जिथें वाहुनि थंडगार
आत्मा जनांचा करितात गार ९

सदा विवादाकुल दायभेदा
न पावती जेथिल बंधु खेदा
"आरंभशूराःखलु" हा तयांस
गोष्टींत या दोष शिवे न खास १०

शौर्यद्युतीचे जणुं कंठहार
न पावले यद्धट युद्धिं हार
भू-भूषणी-भूत सुरालयातें
गेले कृतांता जणुं जिंकण्यातें ११

विद्या, कला, साहस, देशसेवा,
या सद्गुणांचा बहुमूल्य ठेवा
जेथें जनांच्या वसतो सुखानें
हृत्संपुटीं मुद्रित मत्सरानें १२

बृहस्पतीच्या सम बुद्धिमत्ता
ही घेउनी केवळ मालमत्ता
देशावरी जेथिल लोक जाती
देशोन्नतीचें ऋण फेडिताती १३

क्षेत्रांत त्या सुंदर भार्गवाचे
तीरावरी पश्चिम सागराचे
"वेळास" नामें श्रुत जी जगास
लाधे अशा अल्प पुरीस वास १४

राहे अधिष्ठूनि जुनाट कोट
बाजू तिची उत्तर "बाणकोट"
रक्षावया तन्नगरी-निधीतें
वाटे उभा कालभुजंग धीतें १५

"सावित्रिच्या" स्वादुरसा मुखास
समुद्र चुंबी शुभ त्या स्थळास

पाहे पुरी एक तटीं स्थिता ही
तो लाभ पारस्थ "हरेश्वरा" ही १६

सावित्रिच्या सुंदर संगमाची
विशेष शोभा चढवूं असाची
केला जणूं या पण दो स्थळांनीं
तदर्थ चाले श्रम दो दिशांनीं १७

काळें स्वयंभूत जगन्निवास
सेवी सदा सांग सुखें निवास
"हरेश्वर" स्थान ह्मणूनि साजे
तन्नाम सत्तीर्थगणीं विराजे १८

स्पर्धावशें कीं इतिहासपूर्व
"वेळास" हें तीर्थ घडे अपूर्व
विस्तारुनी विश्रुत "भानु" वंश
बृहस्पतीचा जणुं शुद्ध अंश १९

त्या शुद्ध वंशीं सुगृहीतनामा
आला "महादेव" नृसिंह जन्मा
गृहस्थधर्मीं रत जो सदार
कुलक्रमाचार करी उदार २०

दैवें तया पुत्रचतुष्टयाची
मिळे जणूं जोड महासुखाची
प्रत्यक्ष वाटे पुरुषार्थ मातें
आले स्वयें चालुनि तद्गृहातें २१

जेष्ठास "नारायण" नाम साजे
"हरी" दुजाचें अभिधान गाजे
तो "रामचंद्रा" भिध जो तृतीय
कनिष्ठ नामें "बळवंत" होय २२

विद्यापटू यौवनपुष्टगात्र
प्रपंच-भार-ग्रहणास पात्र
स्वपुत्र होतां सगळे पित्यानें
स्वर्लोकमार्गा वरिलें सुखानें २३

पुढें विभक्तास्थिति अग्रजास
रुचे त्यजी तो निज सोदरांस
एकत्र-वासोद्भव-सौख्य-लीला
सेवी सदा त्या अनुजत्रयीला २४

जातां असे वासर ये सुयोग
भानू-भटां जो जडवी सुयोग
भानूंस ज्यानें फडणीस केलें
भटां तसें मंत्रिपदासि नेलें २५

म्लेंच्छप्रभूचा कळतां कुहेतू
"बाळाजि" नामें भटवंशकेतू
श्रीवर्धनाहूनि करी प्रयाण
त्रिवर्ग भानूंप्रति ये सुजाण २६

त्याची मुखश्री सगळी गळाली
चिंता-चिताग्नींत गमे जळाली

गुप्तस्थळीं तो अनुजत्रयास
बोले प्रसंगोचित भाषणास २७

“ कोपा चढोनी हबशी नृपाळ
मत्प्राणहानीस्तव सर्वकाळ
अनन्यचित्तें यमसा टपे हा
म्हणोनि म्यां सोडियलें स्वगेहा २८

जिवंतची लोटुनि सागरांत
मद्बंधुला हा हबशी कृतांत
मारी महा निर्दय ठार, ऐसें
ऐकूनि मद्धैर्य गळे न कैसें ? २९

मातें जरी म्लेंच्छ धरील नीच
होईल माझी गति सत्य तीच
येतां मनीं हा नुसता विचार
उठे शरीरीं मम रोमभार ३०

भानू-भटांचा भुवनप्रसिद्ध
संबंध आहे जणुं सृष्टिसिद्ध
त्याचे दुवे घट्ट करावयास
द्या संकटीं आश्रय या जनास ३१

सांभाळ कीजे शरणागताचा
कित्ता सदा हा तुमच्या कुळाचा
त्याची प्रचीती बघण्यास आजी
आलों, असा दाखविण्यास राजी ३२

दा. क्र. ७२५२
शाखा (स्थळ प्रत)

या संकटांतूनि पडुनि पार
कसे बसे होउनि सदुपारें
हे पाय देशा शुभ लागतांच
आरंभ माझ्या उदयास साच ३३

साहाय्यदानें तुमच्या सुसाध्य
होईल हा अर्थ जरी असाध्य
नौकाबळें दुस्तर सागरास
उल्लंघितां काय पडे प्रयास ? ३४

बोलें मनःसाक्ष वृथा न बोल
धी-विक्रमें विस्मित भूमिगोल
करीन, मी उच्चपदा चढेन
सदा प्रसादा तुमच्या स्मरेन ३५

देईल जी भाकर देव मातें
मिळेल हो चौत तिचा तुह्मातें
ती अन्यथा गोड मला न लागे
संकल्प हा शुद्ध मनांत वागे ” ३६

इत्यादि तो बोलुनि धीर बोल
न जाहले जे लवमात्र फोल
राहे उगा; भानु महाभिमान
तत्काल देती अभयप्रदान ३७

भानुत्रयीची परिसूनि वाचा
आत्मा सुखावे भटपुंगवाचा

वाङ्निश्चयाची जणुं ती सुवाणी
उच्चस्थितीचा वरण्यास पाणी ३८

भानू तिथे रक्षणदक्ष बंधू
बाळाजि तो अद्भुत-बुद्धि-सिंधू
ते लागले सत्वर देशवाटे
भाग्योन्नतीला वरण्यास वाटे ३९

सह्याद्रिचा दुर्गम उंच घाट
मध्यें विराजे जणु अंत्रपाट
चढूनि ते तो 'तिवरा" निघाले
सापूर्व तारा नगरीस आले ४०

विलास-लीला-सरसी-मराळ
शाहू तिथें राज्य करी नृपाळ
वाची जणूं तो भटभालदेशीं
" चढेल हा अद्भुत योग्यतेशी " ४१

कुशाग्रबुद्धी धृति दूरदृष्टी
विलोकुनी विक्रम सत्त्वपुष्टी
दे पेशवाई नृप त्यास राजी
चाले पुढें वंशपरंपरा जी ४२

त्या लाभतां दुर्लभ पेशवाई
भानूंस तो दे फडणीसशाई
येतां महात्मे उदया स्वदैव
पूर्वोपकारा स्मरती सदैव ४३

एकत्र संवर्धित एक मूळ
परस्परप्रीतिरसार्द्र मूळ
हे वृक्ष भानू-भट-वंश-रूप
विस्तारले होउनि एकरूप ४४

निश्चिंत हिंदूपदपादशाही
छायेस त्यांच्या बहुकाळ राही
अद्यापिही गोड फळें तयांचीं
मुखें सदा तोषविती जनांचीं ४५

मूळींच कीं जो फडणीस झाला
‘हरी’ न भोगी चिर त्या पदाला
होती पुरे जों नच चार मास
तों मृत्यु गांठी सहसा तयास ४६

त्याचे पदीं ये ‘बळवंत’ भानू
ज्या सत्त्वमेरू जग सर्व मानू
जो प्राणमूल्यें मिरवी यशाचा
सौदा तसा स्वामिहितार्जनाचा ४७

त्याचा पुढें सोदर रामचंद्र
वंशव्रताला जपला वितंद्र
एवं तिघे भानु समुन्नतीस
पावोनि गेले मग सद्गतीस ४८

न पुत्र झाला हरिपंत यातें
एकेक लाभे अनुजद्वयातें

“ जनार्दना”ख्य प्रतिमा सुताची
कीर्तीच शोभे बळवंत याची ४९

येतां कुळाचा अधिकार हाता
तो मेंधळे-निर्मळ-वंश-जाता
वीरस्वसा जोडुनि धर्मजाया
लागे स्वसंसारपथ क्रमाया ५०

स्पर्धा स्वरूपी करिजे परींनीं
स्वनाथसेवाचरणीं सतींनीं
जिची सदा वल्गुवचीं पिकांहीं
ती “ रुक्मिणी ” नाम धरी विवाहीं ५१

असो नसो वा गुणयोग तीतें
स्त्री धन्य ती पूज्य असे महीतें
सन्मान्य कीं नायक या कृतीचा
“आई” पदें भूषवि देह जीचा ५२

शरन्निशा जेंवि शशांकसंगें
कीं पुष्पवल्ली मधुसुप्रसंगें
ती रुक्मिणी तेंवि विशेष साजे
तारुण्य विस्तार यदा विराजे ५३

अपार शृंगार सुखामृताचा
तिच्या समग्रावयवांत साचा
ठेवाच तारुण्य-सुयोग ठेवी
यथेच्छ त्या तत्पति धन्य सेवी ५४

पति प्रिया हीं नवयौवनाचीं
आस्वादितां गोड फळें तयांचीं
परस्परावेशित बाह्य अंगें
जशीं तशीं जाहलीं अंतरंगें ५५

हृद्युग्मसंघट्टनचूर्ण पार
करी गमे ऐहिक दुःखभार
असे सुखानें करितां विलास
वाटे तयां स्वर्गचि भू-निवास ५६

झाले विलासश्रम या द्वयास
लाभो तयांचें फळ योग्य त्यास
दिनक्रमें हें विधिच्या मनांत
आलें; क्रमानें पसरे जनांत ५७

विमल निजपतीचा वंश विस्तारण्यास
परम मधुर "आई" या पदा पावण्यास
प्रथम धरितसे ती रुक्मिणी गर्भ पोटीं
म्हणुनि जणुं तिचा तो हर्ष मावे न पोटीं ५८

# सर्ग २ रा

( जन्म, बाल्य व तारुण्यवर्णन )

अपत्यबीजांकुरवृद्धिचे मळे
प्रसूतिपुष्पप्रदवल्लिचे कळे
सुखाऽसुखाचे समकाळ सोहळे
दिनक्रमें लागति तीस डोहळे

उठे सदा दुःसह शूळ मस्तकीं
क्षुधा तिची तो बसवी समस्त कीं
अळें वळें अल्पाचि अन्न घे जरी
न वांतिनें तें उदरीं टिके तरी २

"कृशोदरी" या सुविशेषणास ती
चिरोपयुक्ता जणुं दे रजा सती
क्रमें तिच्या कीं गुरुभाव कुक्षिला
कृशत्व आलें इतरांगयष्टिला ३

जिवांत ये जीव तिच्या खरोखरी
गळे तिचा जीव परी परोपरी
तिला सदाही प्रिय जीं विभूषणें
त्यजी तयां देउनि थोर दूषणें ४

विशेष पूर्वीं रमणीय जी निकी
प्रभा पडे ती वदनेंदुवी फिकी

न चित्र हें भानुचि बाळ पातला
नभस्तलातुल्य तिच्या सुकुक्षिला ५

स्वबुद्धितेजें रिपुच्या मुखीं धुळी
भरील, तद्बुद्धि करील हा खुळी
स्वपुत्र, हें कीं सुचवावयासि ती
पिशापरी मृद्रस होय चाखिती ६

कधीं मनीषा कटुभक्षणीं धरी
कधीं तसे गोड पदार्थ आदरी
कधीं रुचे आम्ल कधीं दुजे रस
धरी दुजेही अभिलाष राजस ७

अनेक या दोहदकालकामना
शुभाननेच्या प्रिय फार ज्या मना
समस्तही त्या पुरवी तिचा पती
न कां तिला दोहद गोड वाटती ८

क्रमें वरी दोहद-दुःख-मुक्ति ती
पुढील गर्भस्थिति होय भोगिती
तदंगवल्ली निजपुष्टि पालवी
क्रमें क्रमें रम्य पुन्हां विराजवी ९

निजोन्नतीचा बहु गर्व वाहिला
पृथूदरें तो अजि सर्व हारिला
विलासिनीचें कुचयुग्म लाजलें
म्हणूनि कीं कृष्णमुखत्व पावलें १०

" सुपुत्र येवो उदरा तुझ्या गुणी "
भरूनी ओटी ललना असें कुणी
वदे तदा दाखवि कोप ती वरी
अपार आनंद मनीं धरी परी ११

दिनक्रमें सर्वहि गर्भदेवता
स्वकीय घेती परीपूर्ण रूपता
प्रसूतिचा सन्निध काळ पातला
तदंगिचा गौरव फार वाढला १२

उठे सदा टेकुनि हात मेदिनी
सुमंद चाले गजराजगामिनी
मुखावरी शांत गभीर पावन
प्रभा पडे विस्मय-बद्ध-लोचन १३

क्रमीतसे दुस्त्वर गर्भ मार्ग ती
पुरे नऊ मास अहर्निशीं सती
श्लथांगयष्टी बहु कष्ट पावली
क्षणक्षणा विश्रम इच्छुं लागली १४

उदार सर्वश्रुत भानुच्या घरीं
जगत्प्रभुप्रेषित ये कुणीतरी
म्हणूनि आनंद तिथें प्रवर्तला
तदाऽदराचा बहु थाट चालला १५

अरिष्ट निर्वात सुशांत सुंदर
तिथें सुशय्या विलसे मनोहर

दुजें प्रसंगोचित वस्तुजात तें
तदागमाची जणुं वाट पाहतें

अनेक दासी निजकार्यतत्परा
प्रसूतिकार्यी पटु सूतिकावरा
तसा कुळाचा गुरु तो महामती
समस्त तत्स्वागतसिद्ध राबती १७

हुताशनांगांगधराभितीं शकीं
जया जनीं "दुर्मति" होय नाम कीं
क्रमें क्रमें कृष्ण चतुर्थिचा दिन
सुमाघमासीं प्रगटे सुपावन १८

विशेष शोभे शुभ शुक्रवार तो
शशांक जेव्हां उदयास पावतो
प्रसन्न चित्तें गजवक्त्रमूर्तिला
नमूनि भक्तीं उपवास सोडिला १९

निशा निजार्धा बहुतेक पावली
तुलास्थिती रात्रिपतीस लाधली
बृहस्पती कर्कनिवास आदरी
शनी तसा सिंहसमाश्रया वरी २०

रवी कवी मंगळ सौम्य यांजला
प्रवेश कुंभीं समकाळ लाधला
द्वितीय राशींत विलास राहुला
घडे तसा वृश्चिकयोग केतुला २१

अशा सुयोगीं शुभदैवशालिनी
जनार्दनाची प्रिय ती नितंबिनी
सुपुत्र सौख्यें प्रसवे स्वकुक्षिचा
सुपुंज कीं मूर्तचि वंशकीर्तिचा २२

निघे जगीं या पहिला मुखांतुनी
स्वबालकाच्या ध्वनि त्यास ऐकुनी
उचंबळे जो मनिं हर्ष आइच्या
पलीकडे तो कविशब्दशक्तिच्या २३

सुनाद कर्णी सनयांतुनी पडे
दणाणले दुंदुभितुल्य चौघडे
धडाडली तोफ थरारली मही
सुटे ज्वलत्सुंदर दारुकामही २४

निधान येतां सुतरूप हें घरा
सुखार्णवीं मग्न अपार शर्करा
पिता सवें शाहुपुरींत वांटवी
धनप्रदानें द्विजसंघ तोषवी २५

प्रसूपित्याचे वदनीं तदा महें
प्रसादलक्ष्मी विलसे न चित्र हें
समस्त ती सृष्टि सुखास शोभवी
अपूर्व कांहीं शुभलाभ सूचवी २६

नवीन भानू उगवे धरातळीं
यथार्थ हें का बघण्या ख-मंडळीं

दिसे जणूं आधिंच भानु, नातरी
कशी निशा ती सरती क्षणा परी २७

पुढील दाशाहिक सर्व जे विधी
विशेष थाटें घडले यथाविधी
सुतासि "बाळाजि" सुनाम लाधलें
दिनक्रमें तें परिपूर्ण लोपलें २८

जनांत "नाना फडणीस " त्याजला
यथार्थ नामांतरलाभ जाहला
मराठि राज्यापहृतीस जागती
तयांस "ना" 'ना" वदवीच यन्मती २९

फुटे क्रमें तद्रसना-लतेवरी
पदोक्तिची कोमल रम्य मंजरी
तदीय लाभें जननी पिता किती
स्वकीय कर्णां कृतकृत्य मानिती ३०

जिथें जिथें पुत्र गृहोदरीं पळे
तिथें तिथें दृष्टि तयांचिही वळे
तदीय जी जी कृति चार वत्सर
गमे बहू ती पितरां मनोहर ३१

पुन्हां पुन्हां मोहिम शत्रूच्या वरी
निघे तदा जाय पिता बरोबरी
ह्मणूनि माता सुतशिक्षणार्थ ती
बहू करी यत्न परी न चालती ३२

कथा तिची काय ? वदेन मी तदा
वसेल ती येउनि माझिया पदा
द्विजासि मुंजीविण वा न ती वरी
म्हणूनि विद्या सुत तो न आदरी ३३

कथापुराणश्रवणीं सदा रमे
सुभक्तलीलामृत इष्ट त्या गमे
करूनि मूर्ती लघु तो मुरारिच्या
पुजी, धरी वृत्ति तदीय भक्तिच्या ३४

पुढें तयाचा व्रतबंध जाहला
सदाशिवें शिक्षणमार्ग दाविला
अतुल्य त्याच्या मतिचें दिसे बळ
निमित्त होती गुरुराज केवळ ३५

द्विजास विद्या उचिता समस्त त्या
तदीय जिव्हेवरी होति नाचत्या
गुणावली क्षत्रकुलोचिता तशी
स्फुरे तदंगीं न विशेष, अल्पशी ३६

न हो पुरें जों दशवर्ष त्याजला
विवाह त्याचा विधिपूर्व जाहला
प्रसिद्ध "गद्रे" कुलजा सुरूपिणी
वधू मिळे त्या सहधर्मचारिणी ३७

पुढें सपत्नी घडणार कीं तिला
जगीं यशःश्री जन बोलती जिला

वितुष्ट वा तुष्ट कळे न तीवरी
वधू "यशोदा" छलनाम ती वरी ३८

विवाह हा होउनि पांच वत्सर
पुरे न होती तंव काळ दुर्धर
जनार्दना नेउनि आपुल्या घरीं
कुटुंब लोटी गुरु-शोक-सागरीं ३९

अगस्त्यसा दुःसह शोकसागरा
गिळूनि नाना सकळांसि आसरा
घडे, जरी केवळ बाळ तो तदा
वशंवदा बुद्धिबळासि आपदा ४०

क्रमें मनीषोत्कटकुक्षिजीवन
विशुष्क संसार-तडाग-जीवन
सुसार शृंगार-शरीर-जीवन
विभूषवी तत्तनुभाग यौवन ४१

तदीय विस्तीर्ण ललाटपट्टिका
दिसे प्रधीची प्रियवास वेदिका
विचार-वापीजळ तेथ खेळतें
ह्मणूनि नेत्रद्वय पाणिदार तें ४२

परेंगितज्ञानजलप्रणालिका
बहू धरी उन्नत भाव नासिका
वदे जणूं "हा नर होइना कसा
समस्त नीतिज्ञ जनांत नाकसा" ४३

स्वदेशकार्यी मनिं गूढ योजना
त्वरावशें त्या न शिवोत आनना
ह्मणूनि दैवें जणु कंठ त्याजला
यथाप्रमाणाहुनि दीर्घ लाधला ४४

गुणावलीचा निधि वाढता वसे
ह्मणूनि वक्षःस्थल रुंद होतसे
भुजच्छलें नित्य समीप नांदती
भुजंग तद्रक्षणिं योजुनी मती ४५

खचूनि जावी नच संकटीं लव
कटीस लाधे दृढभाव यास्तव
तळीं मिळावें स्थळ शत्रुच्या कुळा
ह्मणूनि पादोदरतुल्य वर्तुळा ४६

दुजा शरीरावयवांसही नवी
विभूषवी यौवन काळची छवी
तदंग सामर्थ्य परी पडे उणें
भरूनि येतें मतिच्या महागुणें ४७

नवीन तारुण्य अपूर्व ती मती
गभीर मुद्रा रमणीय वाक्स्मृती
बघूनि संतुष्ट तृतीय पेशवे
तयांसि नाना सुततुल्य मानवे ४८

समस्त वस्त्रें इतमाम संपदा
समर्पुनी ते फडणीस या पदा

तयांसि नेती, जणुं तो बृहस्पती
न पेशवे कां मग इंद्र वाटती ४९

सवें निघे मोहिम हैदरावरी
प्रयाण नाना करिती बरोबरी
जयासवें पुण्यपुरीस पातले
त्रिवर्ष विश्रांतिसुखासि पावले ५०

तों पुण्यनगरी खवळोनि गेली
वीर्यप्रभा तदुदरीं अतुला उदेली
'मी' 'मी' असें ह्मणत ते भट सिद्ध झाले
युद्धार्थ पानपतच्या तुमुला निघाले ५१

# सर्ग ३ रा

( पानपतयुद्धवर्णन )

वाग्देवते ऊठ न अश्रु गाळीं
आलें चुके हें न तुझ्या कपाळीं
लाखों बळी जो तव पूर्वजांचे
संग्राम घे तो वद सारवाचे १

सोळा पुढें ब्यायशि अंक वास
सेवी अशा ये शकिं पौष मास
जो आठवा तद्दिन तो न खास
मृत्यूच वाटे उघडी मुखास २

हो जें यमाचें नरयज्ञवाट
रणांगणीं पानपतीं अफाट
सेना मराठी परकीय येती
परस्परां संमुख ठाण घेती ३

सदाशिवाधिष्ठित एक साचे
स्वामी दुजीचा अबदालि गाजे
हे दोन सेनापति सिद्ध झाले
त्यांच्या करींचें रणसूत्र हाले ४

प्रचंड झाला रणवाद्यघोष
हाले धरित्री घुमला खकोष

वीरांगसुप्ता झणिं शौर्य देवी
ऐकूनि त्यातें प्रतिबोध सेवी ५

रांगा रणा उद्यत सैनिकांच्या
लाटाच कीं विक्रमसागराच्या
सिंहध्वनीनें करुनी सलामी
आरंभिती तुंबळ युद्ध नामी ६

खिंकाळती वीर्यवशें तुरंग
चीत्कारती कुंजर युद्धिं दंग
हुंकारती वीर रणोत्सवानें
नादावती सर्व दिगंत त्यानें ७

बीभत्स हिंसा यम खाटिकाची
झाली सुरू ती बघवे न साची
ह्मणूनि वाटे रविदृष्टिआड
ओढी धुळीचा पट फार जाड ८

युद्धांगणीं तोफ यदा दणाणे
कर्णस्थ देवी त्यजिती स्वठाणें
संतप्त गोळे जणुं लाल रागें
संहारकर्मीं बघती न मागें ९

गर्भाशयापासुनि बंदुकांच्या
सीत्कारशब्दें गुलिका शिशाच्या
निघूनि जाती सुजवें अलक्ष्य
न भेदण्याला चुकती स्वलक्ष्य १०

सणाणती बाण रणीं अपार
खणाणती खड्‌ग सुतीक्ष्ण धार
चकाकती पट्टिश भोंवताले
भरारती भासुर तेंवि भाले ११

जशी झरारा झड पावसाची
तशीच शस्त्रास्त्रसमुच्चयाची
रणांगणा वृष्टि अखंड हाणी
सुटे परी मृत्युमुखासि पाणी १२

कायेन वाचा मनसा तसाच
दोन्ही दळांचा व्यवसाय साच
चाले जयश्री-परितोषणार्थ
त्यां तो गमे एकचि उत्तमार्थ १३

जीं कंठनाळां व्यतिरिक्त झालीं
धर्में नव्हे वीररसेंचि न्हालीं
असंख्य त्या वीरशिरोंऽबुजांनीं
वाटे जयश्री पुजिली तयांनीं १४

सर्वत्र वाहे समरांगणांत
खळा खळा लाल दिसे नितांत
पाहोनि तो रक्तरसातिरेक
वाटे तिचा होत महाभिषेक १५

युद्धांगणीं गंध विचित्र फांके
दोन्ही चमूंचे भटसिंह बाके

ओवाळिती धूप अनेक भावें
तिच्या पुढें कीं मनिं हेंच यावें १६

शस्त्रांस शस्त्रें घडतां प्रहार
जो संभवे अग्नि पवित्र फार
तेणें तिचा भासतसे मनाला
पंचारतीचा जणुं थाट झाला १७

लक्षूनि युद्धस्थळ पूज्य तीर्थ
तिथें तनू ठेउनि जे कृतार्थ
झाले तयांच्या पडल्या सुराशी
तिच्या निवेद्या जणुं सोय खाशी १८

प्रचंडनादें भट गर्जताती
तिचा जणूं ते स्तुतिपाठ गाती
मनीं तिचा ध्यास तयांस लागे
तद्रूपची होउनि वृत्ति वागे १९

संग्राम ऐसा घनघोर चाले
कोणी न कोणा लव हार आले
आर्यांकडे ना यवनांकडे ना
कोठें जयाचा कल तें कळेना २०

साहे न हा त्यां अतुलोपमर्द
म्हणूनि कीं आर्य जवान मर्द
सर्सावले चावुनि दांत ओंठ
कीं फोडण्या तो रिपु-सैन्य-कोट २१

झपाझपा हात उठे तयांचा
सपासपा हाणिति वार साचा
चराचरा कापिति कंठनाळ
तटातटा तोडिति सैन्यजाळ २२

जो जो कुणी वीर कुठें कसाही
युद्धार्थ त्यां संमुख सिद्ध राही
तो तो यमाच्या गृहिं नीट जावा
तद्देह विच्छिन्न रणीं पडावा २३

"अल्ला खुदा क्या गति हो हमारी"
बुंबा अशी म्लेंच्छसमूह मारी
पाणी मुखींचें उतरोनि जाई
मागें हटे धीर सुटे अगाई ! २४

मराठियांनीं बहु शर्थ केली
ती पाहण्या वृत्ति घडे भुकेली
ह्मणूनि वाटे स्थिर सूर्य राहे
खमध्यभागीं रणचित्र पाहे २५

संतोषली पाहुनि युद्धरीती
माळा जयश्री करिं घेउनी ती
आर्यांसि आली वरण्यास रागें
हा ! हा ! कशी ती परि जाय मागें २६

देखे रणीं भारत-वीर-पत्नी
माझ्या पुढें होतिल या सपत्नी

या कारणें कीं खवळोनि रागें
जाई जयश्री परतोनि मागें २७

गर्वें बहू ताठुनि वीर आर्य
गेले अवज्ञा दिसते अहार्य
शंका तिच्या ही मनिं कीं उदेली
वाटे जयश्री परतोनि गेली २८

आर्यां अविंधांपरि डामडौल
जुना नसे तो उसनाच फोल
रुचे न हा कीं वरकांति थाट
आर्यांकडे ती फिरवी स्वपाठ २९

हे झुंजले सोडुनि पूर्वरीती
मार्गांत आली तिज ही प्रचीती
न भ्रष्ट हे योग्य वरावयास
ह्मणूनि कां ती फिरवी मुखास ३०

साम्यासि ज्याच्या अभिमन्यु साजे
विश्वास जो बाळ रणीं विराजे
तो पाठिराखा मृत लाभतांच
गेली त्वरें ती निघुनीच साच ३१

पर्जन्यतोयें सुकल्या तलावा
जसा पुन्हां जीवनलाभ व्हावा
तसा इराणी-दळभार शेष
नव्या बळें धीर धरी विशेष ३२

कृतांतसा भेसुर आरडोनी
हिंदूवरी तो पडला तुटोनी
विश्वास जातां क्षणिं अर्ध मेले
ते दीन चित्तीं चरकूनि गेले ३३

अविंध ते निर्दय जे स्वभावें
आरंभिती कत्तल एकभावें
आला मराठ्यां मुखिं घालण्यास
कल्पांतिचा काळचि मूर्त खास ३४

करा करा चावुनि ओंठ दांत
सटा सटा हाणिती शस्त्रघात
धडा धडा धांवति धृष्ट जेथें
पटा पटा पाडिती आर्य तेथें ३५

कटा कटा काटुनि कंठबंध
थया थया नाचविती कबंध
छटा छटा छाटुनि हिंदुछाग
भरा भरा याजिति युद्धयाग ३६

धनुष्य पट्टा समशेर भाला
बंदूक इत्यादि रणायुधाला
घेऊनि तो वीर रणार्थ आला
कृतांत दे पाहुणचारा त्याला ३७

गजाश्रया वा तुरगाश्रया वा
जोडूनि जो आर्य रणार्थ यावा

काव्य १२७६

तो अध्वखेदप्रशमार्थ वाटे
लागे स्वयानासह मृत्युकाटे

तरंगती वीरशिरें असंख्य
नभीं पहाया जणुं घोर संख्य
असंख्य हस्तें रणरंग देवी
भासे मना कंदुककेलि सेवी ३९

छाया वरी हिंस्र विहंगराय
करी निजांकीं शिर भूमिमाय
असे रणश्रांत कितीक वीर
अखंड निद्रा निजती सुधीर ४०

महातरूंचा गण टोळधाड
येतां जसा जर्जर हो उजाड
तसा मराठी दळभार झाला
अविंधसेना मथितां तयाला ४१

चारी दिशां वाढुनि अब्धि भेट
देतां जसें लोपत जाय बेट
तसें मराठी बळ शीघ्र आटे
जेव्हां सभोंतीं परसंघ दाटे ४२

जसा धराकंपमहाप्रहार
विध्वंसितो रम्य पुरी उदार
त्या आर्यसेनेस तसा परांचा
हल्ला महादुर्धर होय साचा ४३

युद्धार्थ लक्षावधि सैन्य आलें
भूयिष्ठ त्यांतील अहा ! निमाले
सदाशिवाच्या निधड्या मनास
शिवे न चिंता अणुमात्र खास ४४

कृतांत घे ऐकुनि जीस धाक
क्रोधें अशी फोडुनि दीर्घ हाक
निर्वाणिचें युद्ध करावयाला
तो सूर्यपुत्रासम सिद्ध झाला ४५

दावी प्रतापी भट तो अपूर्व
रणीं चमत्कार अभूतपूर्व
शत्रूंसही कौतुक पाहुनी तें
वाटे, मुखीं घालिति अंगुलीतें ४६

क्षणक्षणक्षीणसहायभार
तो शोच्य पूज्य स्पृहणीय फार
दिसे रणीं संनिहितास्तकाळ
रवी जसा क्षीणमयूखजाळ ४७

कुडींतुनी जीव जसा निघावा
गेला कसा कोठ न तो कळावा
तसा त्यजोनी स्वचमूशरीर
तो जाहला क्षिप्र अदृश्य वीर ४८

" माझ्यावरी कां रुसलीस आजी "
" म्लेंच्छांवरी कां दिसतेस राजी "

असें जयश्रीस पुसावया तो
जणो तिच्या मागुनि गुप्त जातो ४९

उच्छेद हा निस्तुल युद्धकाळीं
माझ्या असे का लिहिला कपाळीं
विचारण्या हें चतुराननास
सदेह गेला जणुं तद्गृहास ५०

सदाशिवाला अशिवागमाचा
होतां असा स्पर्श अगम्य साचा
जी हीन दीन स्थिति तद्बळास
आली, न ती गोचर वाग्बळास ५१

गेलें जयाचें शिखरासि दैन्य
तें शीघ्र काढी पळ शेष सैन्य
करी इराणीदळ पाठलाग
तदा उणे त्या दशदिग्विभाग ५२

सदाशिवा सन्निध नित्य ठाण
त्याच्यासवें आपणही प्रयाण
करूनि लोकीं कृतकृत्य व्हावें
नाना रणीं थांबति याच भावें ५३

तों आर्यभूचें शुभ दैव वाटे
आलें तयांच्या जणुं आड वाटे
ह्मणूनि कीं वृत्ति फिरे तयांची
सुचे तयां बुद्धि पळावयाची ५४

शस्त्रास्त्रवस्त्रां त्यजुनी स्वयांना
कौपीनधारी पळतात नाना
पराभवातें निज पक्ष पावे
वैराग्य जाणो-हृदयीं बळावें ५५

तुरंग तो जन्मुनि धन्य झाला
कृतार्थ मानू जग त्या पटांला
रणायुधें तीं कृतकृत्य खास
नानार्थ जीं नाशविती स्वतांस ५६

ज्या दृष्टिपातें मुचकुंद मारी
मागूनि तो दैत्य पुढें मुरारी
धांवे तसा म्लेंच्छसमूह मागें
त्या भानुसिंहा धरण्यासि रागें ५७

कीं दुष्ट भस्मासुर शंकरास
धांवे जसा शीघ्र धरावयास
तसा इराणी-भट-संघ धांवे
नानांवरी, तन्मन भीति पावे ५८

बुभुक्षितां पंक्ति जशी वृकांची
धांवे स्वभक्ष्यग्रहणार्थ साची
वीरावली क्रूर तशी इराणी
धांवे धरी तद्ग्रहणीं शिराणी ५९

या भानुची कष्टमयी अवस्था
न पाहवे भानुस त्या दिवस्था

म्हणूनि कीं तो निज दृष्टिआड
घे अस्तकालात्मक वस्त्र जाड ६०

अश्वावरी बैसुनि ते महारी
नाना जवें धांवति पादचारी
प्रतिक्षणीं अंतर सूक्ष्मरूप
होई चढे शत्रुगणा हुरूप ६१

"गांठो अबी दुस्मन, सीर काटो"
हे शब्द जे ऐकुनि ऊर फाटो
उच्चारुनी ते भिडले समीप
कांपे भयें भानुकुलप्रदीप ६२

जगत्प्रभूच्या स्मरुनी पदांतें
नाना तृणीं लोटिति आपणातें
मातेपरी त्या नरपुंगवास
तृणस्थळी दे उदरीं निवास ६३

तें शोधितां उज्ज्वल भानुरत्न
होती रिपूंचे विफल प्रयत्न
तारावया देवचि सिद्ध ज्यास
मारावया कोण समर्थ त्यास ? ६४

जगत्प्रभूची करुणार्द्रदृष्टी
ही संगती घेउनि मेघवृष्टी
उल्लंघितां शत्रुदवानलास
बाधा न हो भानुकुलोत्तमास ६५

पुढें घडे दक्षिणदिक्प्रवास
भानूस होती प्रचुर प्रयास
अध्वश्रमें तज्जठराग्नि पेटे
परी न त्या आहुति योग्य भेटे ६६

तृषोपशांतीस मिळे न तोय
शीतातपक्लेश विशेष होय
धरातळीं टाकुनि अंगयष्टी
नाना निशा कंठिति फार कष्टी ६७

असे प्रयासें जिनगीस येती
नाना तिथें विश्रम सौख्य घेती
दैवें तिथें तद्रमणी यशोदा
आली प्रियादर्शननष्टमोदा ६८

झाली तिथें भेट परस्परांची
जी वाढ तोडी विपदंकुराची
माता मृता ऐकुनि अश्रुवृष्टी
घडे तयां दे भरपूर पुष्टी ६९

बाणे मनीं दुःसह मातृशोक
वाटे नको ऐहिक शुष्क शोक
वाटे तयां तीर्थपुरीस जावें
सदा तिथें सांबशिवा भजावें ७०

ओतीयलें जें हितचिंतकांनीं
अमोघ बोधामृत गोड कानीं

शोकाग्नि तेणें मनिंचा निवाला
सस्त्रीक नाना फिरती गृहाला ७१

रेवा नदीचें शुभ पुण्य पात्र
तरूनि नाना बहु पुण्यपात्र
होती फलप्राप्तिच कीं तयाची
भेटी घडे नंतर पेशव्यांची ७२

रणांगणींचा अशुभेतिहास
नाना स्वयें वर्णिति पेशव्यांस
प्रत्येक तच्छब्द अहीच खासा
घेई तयांच्या हृदयास डासा ७३

नाना पुढें सेविति सौख्यवास
गोदातटीं पावन जो जगास
तेथें विषाद व्रण तन्मनाचा
धरी क्रमें मार्ग विरोपणाचा ७४

तों नानांच्या श्रवणविषयीं तप्ततैलासमान
"श्रीमंतांची प्रकृति बिघडे" हें पडे वर्तमान
त्यांचे पाय त्वरित बघण्या वृत्ति झाली भुकेली
प्रस्थानाची ह्मणुनि सहसा सिद्धता सर्व केली ७५

---

## सर्ग ४ था.

( नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूबद्दल
नानाफडणीस यांचा शोक. )

प्रभुच्या पदपंकजाप्रती
वदण्या उत्सुक फार हो मती
म्हणुनी करितों त्वरा अती
क्रमितां मार्ग धराबृहस्पती १

शकुन प्रतिकूल सारखे
पुढच्या दुःस्थितिचे सदासखे
घडती पथिं नेत्रगोचर
दचके भानुकुळीं धुरंधर २

कळुनी जणु भावि दुस्तर
भय, नेत्रांबुज दक्षिणेतर
सहसा स्फुरणस्थिती वरी
भुज डावा अनुवाद त्या करी ३

कटु कर्कश काक आरडे
दिवसा भेसुर भालु ओरडे
रविला परिवेष कोंडितो
भुजगातें नकुलेंद्र खंडितो ४

भिडली हृदयासि काळजी
सुखनिद्रानुभवासि काळ जी
क्षण नीज जरी तया वरी
तिजला स्वप्न अनिष्ट संहरी. ५

पथ अर्ध सचिंत संपवी
द्रुत तो भानु कुलांबरीं रवी
कवळी तंव त्या भटेंदुची
मृतिवार्ता रसनाच राहुची ६

स्वमुखीं विषरुचया धरी
भुजगीची जणु ती सहोदरी
डसली हृदयासि बातमी
फडणीसां जडली महातमी ७

तनु शून्य गृहादि शून्य हो
क्षिति त्या शून्य दिगंत शून्य हो
नभ शून्य समस्त शून्य हो
मन शून्या जणुं विश्व शुण्य हो ८

बुडुनी उदकाशयीं वरी
जन येई फडणीस त्यापरी
तरुनी परिमोह-दुःस्थिती
सुखदुःखप्रद बोध सेविती ९

हृदया स्थिति शोक पावकीं
कढ आला करुणारसासि कीं

अति गद्गदतद्ध्वनी गमें
उमटे भानुविलापवाक्क्रमें १०

" फिटलें परिपूर्ण दैव तें
अजि झालीं बहु रुष्ट दैवतें
ह्मणुनी घडली अशी गती
मज अंतीं प्रभुची विसंगती ११

हतदैव अगण्य पातकी
गतजन्मीं रतलों असेन कीं
फळ हें पदरीं तरी पडे
प्रभुची भेट न शेवटीं घडे १२

शिव शंकर दोष कायसा
रचिला यास्तव दंड हा असा
नत भक्तजनासि योजिशी
मृतिशय्या प्रभुची न दाविशी १३

तुझिया मुखदर्शनाविणें
नरनाथा गमतें वृथा जिणें
परि त्या न इलाज या जनीं
म्हणुनी कुंठित पूर्ण मी मनीं १४

चतुरा गुणरत्नसागरा
रणधीरा जनकार्यतत्परा
भटमंत्रिकुळीं धुरंधरा
निधनें बा तव शून्य ही धरा १५

सुखवत्सर वीस जी सदा
रमणीशीं रमली तुझ्या पदा
विरहें उघडी पुरी पडे
सचिवश्री रुचिवेंद्र ती रडे १६

अहह श्रुत जें दिगंतरीं
फळ तें सुंदर गोड अंतरीं
गळलें वदनीं यमाचिये
भटवंशाम्रतरूसि दैन्य ये १७

श्रमुनी धरणीतळीं स्वयें
जन नेशी सुरसत्पदीं नयें
नृवरा तुज ये दिवास्थिती
मग कां ते बहु कष्ट भोगिती १८

अथवा वसले त्वदाश्रया
रणयानीं बसुनी सुरालया
जन जे बहुसंख्य पातले
तिकडे प्राणचि पंच गुंतले १९

म्हणुनी करिशी अति त्वरा
परलोकीं निघण्या दयाकरा
बहु इष्ट परत्रही तुला
स्वजनक्षेम जनेंद्रनिस्तुला २०

मृत पानपतीं रणीं महा
घडला दक्षिण देश सर्व हा

भटराजवधें पुन्हां तया
वधिशी कां शमना सुनिर्दया २१

हृदयीं तव मूर्ति रेखुनी
जन नेत्रोदक शुद्ध वर्षुनी
निज गौरविती गुणस्तवें
धरणी भूषविली तुवां भवें २२

रुचिर द्विजराज्यमंदिरा
दिसशी तूं कळशीं जसा हिरा
यमचोर अहा ! हरी तया
भा मग कां न ये लया २३

बहु दुःखित सर्व ही जरी
मम दुःखा अवधी नसे तरी
गुरु तात सखा प्रभू अहा
मम सर्वस्व हरी कृतांत हा २४

करिशी उपकार तूं किती
परकल्याणपरा न त्यां मिती
क्रमिले बहु जन्म मी जरी
लव त्यांची नच फेड हो तरी २५

नयना तव रूप तोषवी
अजि कां त्या जलबिंदु गाळवी
हृदया तव शील आवडे
अजि कां भेदक तें तया घडे २६

शिर धन्य तुझ्या पदग्रहें
हत तें शोकभरें सुदुःसहें
वचनामृतपान तुष्ट जी
तदभावें श्रुति ती कृशा अजी २७

निधना तुझिया नसे तुला
जनचिंताज्वर कीं वधी तुला
ह्मणुनी स्पृहणीय हो जरी
नियमें अस्पृहणीय तें परी २८

जगदीशमनोरथान्वयें
तुज नेई यमराज न स्वयें
हृदया मम शांति ही असे
जगदीशीं अणु दोष कीं नसे २९

शिव नाकपथीं तुला असो
लव बाधा सुकृताकरा नसो
तुजला शुभ लोक आदरो
तव आत्मा सुखशांतिला वरो " ३०

इति शोकपरोक्तिची पुजा
स्मृतिशेषप्रभुच्या पदांबुजा
दिधली फडणीसकिंकरें
निज वंशोचित भक्तिच्या भरें ३१

वरुनी गुरुशोकसंगती
पथ नाना अवशेष चालती

पतिच्या मरणें विपुण्य ती
दिसली पुण्यपुरी तयांप्रती ३२

फडणीस मनःसरीं भरे
बहु दुःखोदक संथ बावरे
नगरीक्षणवायुच्या जवें
जडलें क्षोभचलत्व त्या नवें ३३

भट राजकुटुंबिचे जन
पडती दृष्टिपथीं जसे घन
अड अश्रुभरांचुची घडे
मग ये पूर तया चहूंकडे ३४

मरणोत्तर सर्व ज विधी
घडले निःशिव ते यथाविधी
मग धर्म म्हणूनि माधवें
सचिवश्री वरिली रमाधवें ३५

नव यौवन देह भूपवी
मदना सुंदर रूप लाजवी
धृति विस्मित षण्मुखा करी
मतिची ताण बृहस्पतीवरी ३६

कुलशीलवती वधू रमा
गुणरूपें जणुं मूर्त ती रमा
शुभ-माधव-संगती वरी
मग तो मूर्त न कां गमे हरी ३७

वडिलांसम मुत्सद्दी महा
सम जो शौर्यगुणें पितामहा
पवनाग्निसमागमा परी
नय-शूरत्व-सुयोग भूवरी ३८

समशेर जशी रणांगणीं
मति तैशी नय-युक्तिवीक्षणीं
घडली नच कुंठिता कदा
ह्मणुनी त्या वश सर्व संपदा ३९

जनरंजनकाम हंस हा
विहरे संतत मानसीं महा
स्वयशोमय रम्य मौक्तिकें
वितरी माधव त्यास कौतुकें ४०

रण पानपतस्थ वाटलें
परिपूर्णग्रहणासमान तें
द्विजराज्यरवीस लोपवी
रिपुनक्षत्रगणा प्रकाशवी ४१

परि माधव मोक्षकाळसा
घडला शत्रुगणांसि काळसा
तद्रूपे द्विजराज्यभास्कर
निजतेजें धरणीतलावर ४२

रणशूर बलिष्ठ हैदर
द्विजसत्तेसि करी अनादर

जित जर्जर तो घडे रणीं
मग देई बहु दीन खंडणी ४३

हतकाम रणीं निजामही
तहनाम्यावरती करी सही
करितीं प्रणती पदावरी
तृण दांतीं धरुनी दुजे अरी ४४

फडणीस-सुबुद्धिसंपदा
गुरुकार्यावसरीं कदा कदा
मित माधव घे न तीं जणूं
समयीं न्यून पुढें पडो अणू ४५

दश माधव वर्ष तो धरी
सुखसत्ता धरणीतलावरी
सुखशांतिसमृद्धि पालवी
जनवृंदोपवना विभूषवी ४६

भटवंशशिखामणी करी
जनतारंजन आपणा परी
बघण्या जणुं त्या स्पृहा धरी
विलसे शारदकाळ भूवरी ४७

परिपक्व दशेसि पावती
शरदीं सुंदर सस्यसंतती
विविधा रुचिरा मनोज्ञशी
सुगुणश्री भटपुंगवीं जशी ४८

रुचिर स्फुरती ख-मंडळीं
ग्रह नक्षत्र शशी सुनिर्मळीं
जणुं माधव-शुद्ध-कीर्तिची
विलसे ती लिपि सृष्टिहस्तिची ५१

जन माधवशासनें जसे
शरदाच्या सुखदर्शनें तसे
सलिलाशय सुप्रसन्नता
हृदयीं वागविती प्रफुल्लता ५२

विनयें सचिवेंद्रमूर्तिला
फलभारें शुभशालिपंक्तिला
नतभाव विशेष शोभवी
जनचित्ता मग कां न लोभवी ५३

बघुनी घट संभवोदया
जलधीचा मद पावला लया
त्यजिला रिपुंच्या जसा गणीं
बघुनी माधवविक्रमा रणीं ५४

जलवर्षण मेघ संहरी
मदवृष्टी गज उन्मदें करी
घनपंक्तिमहाध्वनी गळे
रणयानोत्सुक अश्व खिंकळे ५५

पथ शुष्क सुगम्य जाहले
सरितांचे जलपूर आटले

रस वीर मनीं उचंबळे
रणशस्त्रीं बहु तेज पाजळे   २४

तों अक्षम्या श्रवणविषयीं दुष्कृती हैदराची
आली, क्रोधें बहु खवळली वृत्ति त्या माधवाची
संगें मोठा पटुतर रणीं घेउनी सैन्यभार
शौर्यश्रीचा त्वरित समरा तो निघे कंठहार   २५

---

ग्रं. क्र. ३९१३१५

# सर्ग ५ वा

( थेऊर येथील दरबार )

स्वभूषणीभूत चमूवरास
अनिष्ट मार्गी घडणार खास
कळूनि हें भू जणुं भीत हाले
मार्गी यदा तो दळभार चाले १

प्रचंड कोलाहल सैनिकांचा
उठे नभीं हो प्रतिशब्द त्याचा
कृतांतसेनाच गमे भयाण
करी ध्वनी कीं करितां प्रयाण २

उठे पदें ताडित धूलिपूर
नभस्तळीं तो पसरे सुदूर
" नेऊं नको नाथ " असें यमास
जाई गमे भू विनवावयास ३

मदोदकस्राव गळे गजांचा
धरातळीं घर्म तसा हयांचा
पुढें विपत्ति स्वपतीस वाटे
कळूनि ती भू द्रवलीच वाटे ४

पथांत वाहे प्रतिकूल वारा
पार्श्वस्थ हाले तरुवर्ग सारा

शाखाकारांनीं जणुं माधवातें
कथीतसे कीं " परता पुण्यातें " ५

पंक्ती पथीं हिंस्र विहंगमांची
छायाच चाले अशुभागमाची
पुढें असा माधवराज जाई
कृष्णातटा सन्निध ये अगाई ६

तों आडवा दुर्धर रोग त्यास
जे राजयक्ष्मा वदती जयास
वाटे सखा हो यम हैदरातें
प्रेषी तदर्थ प्रमुखानुगातें ७

अंगीं भिडे तो गदराज रागें
हा ! हा ! हटे माधवराज मागें
सुमेरुही कालवशें ढळेल
न ईश्वरीसूत्र कधीं टळेल ८

हताश रोगें हतवीर्य झाला
भटाग्रणी पुण्यपुरास आला
तिथें जगद्विश्रुत वैद्यराज
चिकित्सिती सादर रोगराज ९

सुयोजना शुद्ध रसायनांची
यथार्ह पूजा कुलदैवतांची
दानें ग्रहांचीं जपजाप चाले
ते मंत्रतंत्रादि उपाय झाले १०

पीरा न वाटे गुण माधवास
दिनीं दिनीं रोग चढे बळास
निस्तेज झाली तनु रक्तनाशें
शशिप्रभा जेंवि रविप्रकाशें ११

स्थळांतरातें करितां प्रवास
कधीं कधीं रोग रिघे लयास
या हेतुनें तो त्यजुनी पुण्यास
आला सवें माधव थेउरास १२

तेथें गदारी बहु उग्ररूप
जिंकावयाला उपचाररूप
शस्त्रास्त्रःष्टी करिती सुधीर
सर्वप्रयत्नें भिषगग्रवीर १३

झाले परी निष्फल सर्व यत्न
क्लेशीं बुडे तें भटवंशरत्न
गजाननाच्या शुभदर्शनाचा
दुःखीं तया लाभ घडे सुखाचा १४

दाटे हृदाकाशतळीं अपार
जसा जसा रोगमयांधकार
तारात्रयी इष्ट मनोरथांची
तशी तशी उज्ज्वल होय साची १५

अमूल्य ठेवा त्रिमनोरथांचा
निक्षेप पात्रीं करण्या तयांचा

स्वर्गप्रवासोन्मुख तो निमंत्री
थेऊर गांवीं दरबार मंत्री १६

आले तिथें तद्वचनानुसारी
समस्तराज्यप्रमुखाधिकारी
सभागृहीं सुंदर दीप्यमान
झाले यथास्थान विराजमान १७

यदाश्रयाचा अभिमान वाटे
यद्दर्शनें हर्ष मनांत दाटे
प्रवेश त्या मंत्रिधुरंधराचा
ते लक्षिती उत्सुक सर्व साचा १८

कृशा विवर्णा अनुभावशाली
सभागृहीं माधवमूर्ति आली
जी सृष्टिरम्या रमवी मनातें
परी गदार्ता भिववी तयातें १९

तदादरा सर्व सभा उठे ती
निजासनीं माधवराव येती
तदागमें सर्व सभा दिपून
गेली बसे ती नृवरा नमून २०

श्रीमंत ते सर्व सभासदांस
मंदस्वरें बोलति भाषणास
अमूल्य ज्यांतील सुवर्णभार
विराजवी माधवकीर्ति फार २१

" अहो नरश्रेष्ठ महाभिमान
देऊनि माझ्या वचनास मान
केलेंत हो मंडित या स्थळास
संतोष वाटे ह्मणुनी मनास २२

समागमाचा तुमच्या प्रभाव
वर्णूं किती ये मज मूकभाव
जणूं गणेशें दिधला मला हो
संजीवनी औषधिचाच लाहो २३

गेला लयाला मम रोग वाटे
उत्साह चित्तीं अतिमात्र दाटे
वरी दिसे क्षीण जरी असार
कुडींत सामर्थ्य भरे अपार २४

मदीय या ऐकुनि भाषणास
होऊं नका हो वश विस्मयास
होती जरी पूर्ण समस्त हेतू
मुमूर्षुला मृत्युच मोदहेतू २५

मृत्यूचिया मी क्रमितां पथातें
इच्छा भयें सोडिति अन्य मातें
इच्छा परी उत्कट फार तीन
देती मला अंतर लेशही न २६

केला तयांनीं यमही हताश
सोडी न माझ्यावरि कीं स्वपाश

" इच्छा " असे केवळ वर्ण दोन
मृत्यूसही हो उरती पुरोन २७

इच्छात्रयी ही मज भूमिलोकीं
ओढी तसा हा क्षय अन्य लोकीं
सजीव-निर्जीव-दशांतराळीं
लोळावयाचें मम ये कपाळीं २८

इच्छात्रयी तृप्त करावयाचें
सामर्थ्य अंगीं तुमच्याच साचें
तुह्माकडे ती धरुनी हुरूप
ये कीं तुह्मी मी मनिं एकरूप २९

अहो महावीर रणाग्रणी हो
हे राजनिष्ठ प्रिय मुत्सदी हो
तिला अविघ्नाश्रय द्यावयास
जगांत या पात्र तुह्मीच खास ३०

रिपू रणीं जर्जर थोर झाले
मदीय निष्कंटक राज्य चाले
तुह्माकडे ये श्रय हो तयाचें
होई पुढें केवळ नाम याचें ३१

अजूनपर्यंत मनोरथाला
सदैव माझ्या फळलाभ झाला
तुह्मींच त्या सर्व यशास पात्र
मी होतसें सत्य निमित्तमात्र ३२

प्राणव्ययेंही प्रभूच्या हितास
साधीतसां विश्रुत हें जनांस
आणाल का त्या अपवाद आज
अव्हेरुनी स्वामिनियुक्त काज ३३

गाजे जगीं निर्मल अद्वितीय
सुराजनिष्ठाव्रत युष्मदीय
त्याचा कसा भंग कराल आज
अव्हेरुनी स्वामिनियुक्त काज ३४

भागीरथीशी तुमची अखंड
लोकत्रयीं कीर्ति फिरे उदंड
लावाल का तीस कलंक आज
अव्हेरुनी स्वामिनियुक्त काज ३५

प्रभूक्त कार्या करण्या समस्तीं
केलेंत जें कंकण बद्ध हस्तीं
तें का अहो मुक्त कराल आज
अव्हेरुनी स्वामिनियुक्त काज ३६

इच्छात्रयी तृप्त करावयाचें
द्या यास आश्वासन येथ साचें
तिचें तुह्मां नंतर मी स्वरूप
वर्णीन हो सभ्य यथानुरूप ३७

बोला तरी कोण तदंगिकार
करावया धन्य असे तयार ? ”

बोलोनि हें माधव घे विरामं
प्रत्युत्तरप्राप्तिनिबद्धकाम ३८

वाणी अशी ऐकुनि माधवाची
झाली मती गुंग सभासदांची
प्रत्येक चिंती "नच म्यां उठावें
अन्यें कुणीं उत्तर तीस द्यावें" ३९

तटस्थ निःशब्द सचिंत भीत
सभा बसे जों स्थिर तों विनीत
सुधीर नाना फडणीस यांनीं
दिला तिला धीर निजां वचांनीं ४०

ते बोलती "श्रीनिलया नृदेवा
मी सिद्ध आहें करण्यास सेवा
संपादुनी कार्य निजप्रभूचें
होवो जगीं सार्थक या तनूचें ४१

फेडावया स्वामिकृतोपकार
प्रसंग येती अनुगां न फार
येतां जरी व्यर्थ करील दास
जन्मास आला मग तो कशास ४२

मुमूर्षुचें वांछित लोकराया
प्रवृत्त होती रिपुही कराया
जरी करीना चिरकाळ दास
जन्मास आला तरि तो कशास ४३

तुझ्या गुणाब्धे सुकृताकराच्या
उदात्त इच्छा असणार साच्या
फुटे सुशुक्ती जरि सागराची
पंक्तीच लाभे शुभमौक्तिकांची ४४

वांच्छा तुझ्या उन्नत या जनास
नेती महात्मन् बहु गौरवास
जशा अमूल्या मणिहेममाला
निजाश्रयीभूत करंडकाला ४५

अज्ञातवासोन्मुख पांडवांची
न्यस्ता जशी पंक्ति रणायुधांची
शमीतरूतें बहु मानदा हो
तशी मनीषा तव या जना हो ४६

देऊनि अग्नित्रितयास ठाव
जसा गृहा ये बहुपूज्य भाव
इच्छात्रयींचा रुचिरांगिकार
करी मलाही महनीय फार ४७

तुझे नृपाळा परिपूर्ण काम
करीन आतां मज हेंच काम
तदर्थ हा देह सदा झिजावा
मदंत तेणें बहु गोड व्हावा ४८

मदीय सन्मान्य पितामहाचा
बळी पडे स्वामिहितार्थ साचा

इच्छा प्रभूची करण्यास सिद्ध
तत्पौत्र होईल कसा न सिद्ध ४९

स्वभर्तृसेवा करितां वडील
गेले जगीं होउनि धन्यशील
इच्छा प्रभूची करण्यास सिद्ध
तत्पुत्र होईल कसा न सिद्ध ५०

नाना मला प्रेम करोनि फार
पुत्रापरी वागविती उदार
तत्पुत्रहेतू करण्यास सिद्ध
हा दास होईल कसा न सिद्ध ५१

समर्पुनी संतत अन्नपिंड
केला जयांनीं मम पुष्ट पिंड
इच्छा तयांची करण्यास सिद्ध
हा दास होईल कसा न सिद्ध ५२

भटाग्रणे मंत्रिवरा उदारा
बोले मनींचा अभिलाष सारा
तदर्थ हा सिद्ध असेच दास
सर्वस्वही वा गमवावयास ५३

करी न वा दास यथोक्त सेवा
पहावया हें तुजला नृदेवा
दीर्घायुरारोग्य गणेश देवो
त्वद्रोग नाशा गजवक्त्र नेवो" ५४

दा. क्र. 6252

उच्चारुनी ही बहुगोड वाणी
कृतार्थ नाना बसती ठिकाणीं
जी ऐकतां वृत्ति सभासदांची
आनंददोलायित होय साची ५५

कर्णीं पडे मंजुळ वेणुनाद
डुले जसा नाग, वरी प्रसाद
सुखें तसा माधवराय डोले
सभे यदा तें नररत्न बोले ५६

चिंतेसवें तो भटवंशकेतू
उठे सभेला कथण्या स्वहेतू
चित्तीं प्रमोदांकुर माधवाचे
आले तसे शब्द पुढील वाचे ५७

“ सदुक्ति ही भानुकुलाग्रणीची
चिंता हरी सर्वहि मन्मनाची
निवेदितों वांछित सावधान
द्या सभ्यहो सर्व तयास कान ५८

मत्तात बंधू गणगोत्त देश
हा ! हा ! वधी जो यवनी नरेश
तदीय सर्वस्वतृणासि चूड
लावोनि घ्या हो परिपूर्ण सूड ५९

उडींत ये या भटकेसरीच्या
लक्ष्मी परी दैवचि ज्या सुनीच्या

यथेच्छ त्या जंबुक हैदराचा
घ्यावा समाचार सुवीर साचा ६०

तृतीय हेतू कथण्यास लाज
वाटे परी सभ्य न त्या इलाज
केलें असे कर्ज अपार तातें
न फेडवे दुर्भग या सुता तें ६१

समस्त तें आज उद्यांचि द्याल
रोखे मला आणुनि दाखवाल
नाना तरी जो सुखलाभ मातें
होईल तो काय वदूं तुह्मांतें ६२

अबाध केलीत मदीय सेवा
नारायणीं प्रेम तसेंच ठेवा
सदैव एकी तुमच्यांत राहो
मराठिराज्याभ्युदया करा हो " ६३

सभासदां बोलुनि शब्द ऐसे
निजासनीं माधवराज बैसे
नित्यक्रमें आटपली सभा ती
स्वस्वस्थळा सभ्य निघूनि जाती ६४

कर्तृत्वशाली फडणीस नाना
प्रवर्तती स्वामिऋणप्रदाना
मित्राकरें घेववुनी हवाला
देती खतें आणुनि माधवाला ६५

आनंद झाला बहु तन्मनास
सेवी सुखें तो मग नाकवास
गेली सती तद्रमणी सुशीला
पती रुचे कीं मृतही सतीला ६६

नारायण व्याकुळ दुःखभारें
त्याचें करी उत्तरकार्य सारें
घेऊनि साऱ्या सह सेवकांस
अमात्य भावी परते पुण्यास ६७

जातां कांहीं दिवस मग त्या घेउनी राजनिष्ठ
नाना दादा प्रमुख सगळे कारभारी वरिष्ठ
साताऱ्यातें गमन करिती रामराजा तयांचें
जेथें हर्षें उचित करवी आदरातिथ्य साचें ६८

वस्त्रें जीं समुचित "पेशवे" पदातें
देई तो नरपति त्या भटाग्रणातें
आलिंगी अभिनव मंत्रिभा तयास
थाटें ये सहपरिवार तो पुण्यास ६९

## सर्ग ६ वा

( नारायणराव पेशव्यांचा वध. )

स्वारी येतां देखुनी पेशव्यांची
आनंदानें वृत्ति मोहे जनांची
झाली दारीं तोरणांची ध्वजांची
राहे जागा दुःखवार्ते न साची १

पूर्वी होतां रामचंद्राभिषेक
कैकेयीला होय दुःखातिरेक
आनंदीला तेंवि हो या सुकाळीं
आंठ्या आल्या मत्सरानें कपाळीं २

वाटे तीतें थाट नारायणाचा
मोडी सारा घाट भावी सुखाचा
अंगीं त्याच्या शोभतीं मंत्रिवस्त्रें
तन्मर्मा तीं लागतीं तीक्ष्ण शस्त्रें ३

कालिंदीचे अंतरीं कालियासा
आनंदीचे मानसीं द्वेष खासा
फूत्कारें त्या दुर्विधे मारण्याला
जन्मा कोणी कृष्णसा कां न आला ? ४

आनंदीचें चित्तकुंडीं अखण्ड
मात्सर्याचा अग्नि पेटे प्रचंड

तेणें जाणो ती वहू लाल झाली
सर्वांगाची तेंवि लाही उडाली ५

बांधी चित्तीं गांठ ती दुष्ट कृत्या
हत्यारूपीं साधण्या घोर कृत्या
एकांतीं त्याकारणें वल्लभातें
गांठी, आधीं गोड बोले तयातें ६

साम्योक्तीच्या तंतुनीं ती विशाळ
नारी निर्मी लाघवी रम्य जाळ
वायां जातां तें न ती हो हताश
योजी नाथीं क्रूर वाग्बंधपाश ७

बोले " घेतां पक्ष त्या कारट्याचा
अव्हेरीतां बोध माझा हिताचा
माझ्यापेक्षां मान्य तो आपणाला
त्या घ्या, देतें जीव राहूं कशाला ८

गेली कोठें आपुली लाज गाजी
दासाचे कां दास झालांत आजी
त्या दावाना मृत्युची नीट वाट
यापेक्षां घ्या लाटणें पोळपाट ९

शत्रू युद्धीं मारिले थोर थोर
ऐसा तोरा कां न हा एक पोर
तुह्मां हातें मृत्युपंथासि जाई
घाला हातीं बांगड्या भागुबाई १०

आहे पट्ठा मर्द भारी जगास
ऐशा गर्वें पीळ घालां मिशांस
गेला कोठें पीळ तो सर्व राव
बोला कांहो सेवितां मूकभाव ११

हा ! हा ! देवा काय मद्दोष झाला
माझ्या वांट्या नाथ नामर्द आला
सौभाग्याची कायशी चाड मातें
हो ना हेतू आपुल्या पूर्ण हातें १२

देतां आतां माझिया मान बोला
किंवा नाहीं या क्षणीं येथ बोला
नाहींपेक्षां देउनी जीव खास
स्त्रीहत्येचें पाप देतें तुह्मांस " १३

दुर्नीतिच्या राष्ट्रीची पट्टराणी
बोले तीं ही कर्कशक्रूर वाणी
दादांचें तें घाबरे चित्त फार
गेलें पाणी तोंडचें सर्व पार १४

दादा होती सर्वथा दीनरूप
देती तीतें पत्र इच्छानुरूप
स्त्रैणत्वाचें मान्यतापत्र कीं तें
दादांनीं त्या अर्पिलें भामिनीतें. १५

हस्ताघातें ताडुनी जो निजांका
युद्धीं ठाके झुंजण्या वीर बांका

राघोबा तो स्त्रीकरें होय चीत
गेली सद्दी पेशव्यांची खचीत १६

आनंदी तें घेउनी पत्र वाची
झाली नाहीं तृप्तता तन्मनाची
"मारावा" हे वर्ण ती दुःस्वभावा
योजी पत्रीं जेथ होते "धरावा" १७

सिंगालागीं ती सुमेराख्य दासी
धाडी त्यातें आणवी स्वस्थळासी
तेथें गोष्टी सांगुनी थोर थोर
गोंवी त्यातें ती प्रतिज्ञेंत घोर १८

द्याया ती त्या पुष्टि वाग्बंधनास
बोले "घेई बेल भंडार" त्यास
साधा भोळा तो करी सिंग तेंच
कृत्येचे त्या साधले डावपेंच १९

आनंदानें ती तदा फार डोले
त्याच्या हातीं पत्र देऊनि बोले
"या पत्रीं जें वर्णिलें काम वीरा
फत्ते त्याची त्वां करावी सुधीरा" २०

आनंदीचा दुष्ट तो हेतु आला
पत्रद्वारें त्याचिया प्रत्ययाला
पश्चात्तापें तो तदा फार पोळे
द्वैधीभावीं चंचलावृत्ति घोळे २१

बोले "गेली तोंडची जी ज़ुबान
होऊं काहो मी तिला बेइमान
मेरा स्वामी प्राणसे होय प्यार
त्याच्या कंठीं चालवूं का कटयार" २२

तोलायाला या अशा दोन बाजू
तच्चित्ताची वृत्ति होई तराजू
जाती दोन्ही पारडीं उंच नीच
आशा वाटे निर्णयाची उगीच २३

मातें योग्य स्वप्रतिज्ञापरत्व
या बाजूला शेवटीं ये महत्त्व
त्या मर्दानें पेशव्यांच्या वधाची
केली सारी सिद्धता शीघ्र साची २४

हेरंबाचे उत्सवीं जी सुभीत
होती वाटे तीच पीडा ळळीत
होतां, आली भेटण्या पेशव्यातें
चालोनी ये सिंग कीं तद्वधातें २५

हिंदुस्थानी सर्व बाणा तयाचा
अंगीं शोभे लष्करी वेष साचा
मध्या खोवी तीक्ष्ण तो शस्त्रभार
वाटे त्याची प्रेक्षकां भीति फार २६

संगें सेना घेउनी गारद्यांची
चाले वाट स्वामिच्या तो गृहाची

अश्वत्थामा पांडवांच्या वधातें
जाई जैसा तन्निवासस्थळातें २७

खड्गाघातें मारुनी द्वारपाळ
गेहीं जाई सिंग तो मूर्त काळ
मध्यान्हीच्या सेवुनी भोजनास
निद्रा लागे जेथ नारायणास २८

जागा झाला थोर कोलाहलानें
दृष्टी फेंकी भोंवतालीं भयानें
तों आधीं त्या वंदुनी पेशव्यास
काढी खड्गा सिंग त्या मारण्यास २९

पावे चित्तीं पेशवा थोर धाक
" काका काका " फोडुनी दीन हाक
देवागारीं शीघ्र तो धांव घेई
दादांलागीं हा ! मिठी घट्ट देई ३०

दादानांही सिंग तो आयकेना
" मारायातें हा मलाही चुकेना "
या भावें ते सोडिती पेशव्यास
नाहीं इष्ट प्राणसें प्राणियांस ३१

नानारीती दीन दीन स्वरानें
प्रार्थीयेलें त्यास नारायणानें
चित्तीं त्याचें ये तदा प्रेमपूर
टाकी शस्त्रा हातिंच्या सिंग दूर ३२

तों बोले त्या पापिणी बोल दुष्ट
आटे सारें प्रेम तो होय रुष्ट
बोलें पेटे आंतल्याआंत भारी
खड्गा घेई मारण्यातें उगारी ३३

चांपाजी जो स्वामिसंरक्षणार्थ
मध्यें येई तो तुटे हो कृतार्थ
लोकीं त्याच्या कीर्तिरूपी सुधेला
सद्भक्तें त्या अक्षयीभाव आला ३४

हा ! हा ! मारी सिंग तो पेशव्यातें
अज्ञानानें गुंतला जो पणातें
प्रारब्धा बा भाससी तूं बलिष्ठ
स्वामीतें कीं मारितो स्वामिनिष्ठ ३५

देण्या त्याच्या अग्न विच्छिन्नगात्रा
सायंकाळीं चालली प्रेतयात्रा
संगें जाती मुत्सदी कामगार
ज्या सर्वांना दुःख दे हा प्रकार ३६

नाना बापू अन्यही कारभारी
दादांचा ये त्यांजला वीट भारी
हें नाहीं हो चित्र, कीं सान थोर
स्त्रैणत्वें त्यां दोष देती समोर ३७

वाड्यामध्यें शोक केला स्त्रियांनीं
ऐकोनी त्या सोडिला धीर कांनीं

आनंदीला मात्र आनंद झाला
अन्यक्लेशें दुःख ना मत्सऱ्याला ३८

श्रीमंतांना द्यावया तीळ तोय
दाटी वारीं दाहळ्या थोर होय
नाना तेव्हां अन्य तत्पक्षगामी
नीरप्रांतीं योजिती युक्ति नामी ३९

लिंगें केलीं वाळुचीं त्यां समस्तीं
भावें प्रेमें स्पर्शुनी तीं स्वहस्तीं
घेती ऐसी आण ते सत्यवादी
'नानांचा कीं चालवूं वंश गादी' ४०

पूर्वामात्या मारवोनी अनाथ
आनंदीचे स्त्रैण ते प्राणनाथ
येते झाले पेशव्याच्या पदातें
होईना तें त्यां परी सौख्यदातें ४१

नाना त्यांचा पक्ष तो आपणास
राजी नाहीं या विचारें तयांस
चिंता चित्तीं धाक वाटे सदैव
लाभे कोणा दुष्कृतीनें सुदैव ४२

त्या पक्षाला राज्यतंत्रांत थारा
लाधेना तो आंचवे स्वाधिकारा
नाना त्यांचे अन्य जे जे सहाय
त्यां त्यां साधी कैद ये हाय ! हाय ! ४३

श्रीमंतांच्या दुःखवार्ता वधाची
तच्छत्रूंनां सौख्यदा होय साची
लंघाया ते विप्रसत्ता पहाती
दादा त्यांच्या पारिपत्यार्थ जाती ४४

"मागें यांना ठेवणें इष्ट नाहीं
मद्रोहाचा मंत्र होईल कांहीं"
ऐशी दादा मानसीं भीति घेती
संगें कैदी भानुसिंहासि नेती ४५

सेनेसंगें नीतिशास्त्रप्रवीण
जातां मार्गीं भानुवंशीं धुरीण
योजी कांहीं बुद्धियुक्तिप्रयोग
जेणें त्याच्या मुक्तिचा ये सुयोग ४६

येती नाना मुक्त होतां पुण्यास
दादांचे जे कारभारी तयांस
मंत्रें तंत्रें पाडिती मोहजाळीं
गंगाबाई मुक्त हो त्याच काळीं ४७

तिच्यासह पुरंदरा मनुजवर्य तो ये त्वरें
"गरोदर असे सती" कळुनि त्यास वाटे बरें
तदीय परि रक्षणा उचित दुर्ग तो थाटवी
विपक्षबलभंजना प्रचुर यत्न तो चालवी ४८

## सर्ग ७ वा

( सवाई माधवराव पेशवे व नानांचीं
कारस्थानें. )

होती सतीला नव पूर्ण मास
ईशप्रसादें प्रसवे सुतास
मरुप्रदेशीं तृषितास तोय
तसें तिला तें सुतरत्न होय १

कर्णीं पडे हें शुभवृत्त जेव्हां
नानांस झाला बहु हर्ष तेव्हां
निजप्रतिज्ञामय सागरास
तरावया नाव मिळे तयांस २

पृष्ठीं तदा साखर ये गजांच्या
तेथोनि जाई वदनीं जनांच्या
आनंदिच्या भीतिवशें गमे ती
दुष्प्राप्य उच्चाश्रय होय घेती ३

सनाम जो पूर्वज त्या सवाई
होवो असें इच्छुनि त्या ' सवाई '
पदासवें ' माधव ' नाम देती
बऱ्याकडे कीं जन धांव घेती ४

जगांत या जन्मुनि दीड मास
पुरा न होई नव माधवास
नानांमुळें तों घडला तयास
अपूर्व ऐश्वर्यपदीं निवास ५

कुमार खेळे सुकुमार कांत
सुवर्णरत्नांकित पालखींत
तेथें तयाचें पदपद्म सेवी
तदीय वंशोचित मंत्रिदेवी ६

दोरी करें ओढुनि पाळण्याची
धात्री करी निद्रित मूर्ति ज्याची
स्वराज्यसूत्रां सगळ्या विहार
करांबुजीं तो करवी कुमार ७

‘ जो ’ ‘ जो ’ असे सुंदर वर्ण कानें
जो जो करावी परिसोनि ज्यानें
कुमार तो माधव चारुगात्र
घडे जनीं या जयशब्दपात्र ८

शय्यागृहीं कृत्रिम मोर रावे
कटार शिक्केहि तसे दिसावे
साचित्य बाल्योचित भूषणांस
लाधे तदंगीं समकाळ वास ९

देशीं विदेशीं शिशु-पेशव्याचें
होई जनां शासन मान्य साचें

नाना तयाच्या वार्तिनें उदार
घेती स्वशीर्षी गुरुराज्यभार १०

अखंड नाना झटती सुतंत्र
करावया सर्वहि राज्यतंत्र
करावया तद्व्यवसायभंग
आला कुदैवें कठिण प्रसंग ११

स्वकीय लागे. अधिकारछाया
क्षणक्षण क्षीणदशेसि जाया
तत्पुष्टिकामी रघुनाथराव
घेती स्वचित्तीं भलतीच हाव १२

जाती विदेशीं करण्या उदीम
राज्येंच घेती परि जे गनीम
त्या इंग्रजांशीं रघुनाथराव
याचीतसे राज्यपदार्थ ठाव १३

जे अन्य राष्ट्रांतरिं फूट जेथें
उभारिती स्वध्वज नित्य तेथें
त्या इंग्रजांशीं रघुनाथराव
याचीतसे राज्यपदार्थ ठाव १४

सुनीति ज्यांची सुख दे विशेष
स्वर्गींच ठेवी जन नामशेष
त्या इंग्रजांशीं रघुनाथराव
याचीतसे राज्यपदार्थ ठाव १५

सारी जयां हांव सुधारण्याचा
वार्ता न ठावी असुधारण्याची
त्या इंग्रजांशीं रघुनाथराव
याचीतसे राज्यपदार्थ ठाव १६

वाणिज्य राष्ट्रांत करावयास
विनम्र जे प्रार्थिति पेशव्यास
त्या इंग्रजांची धरण्यास कास
लज्जा न वाटे भटवंशजास १७

जोडी खवा चोरुनि मांजरांची
जशी निजार्थातुर वानराची
भेटी तशी वंचक इंग्रजांची
स्वारी अहा ! घे भटवंशजाची १८

देऊं करी त्यांस मुलूख पैसा
अखेर त्याचा मग होय कैसा
एकीकडे सारुनि ते सचोटी
तदंगिकारा करिती न खोटी १९

नानामिषें विश्वसनीय चार
देशीं विदेशीं करिती प्रचार
ते सांगती येउनि हा प्रकार
नानांस चिंता जडली अपार २०

मराठिराज्यस्थितिबंधनांस
तदा न होता धरबंध खास

सं. नं. ............

सुमेरसिंग प्रभुकं…ताळ
नेव्हांच तोडीं जणुं …ज्वाळ २९

शिंदे तसे होळकर प्रवीर
शौर्यद्युतीचे जणुं कंठहीर
मराठिकक्षेंतुनि दूर जातां
संपादण्या स्वार्थ सदा पहाती ३०

वडोदचे गायकवाड शूर
आटे तयांचा प्रभुभक्तिपूर
प्रसिद्ध सेनापति भोंसल्यांस
केलें गृहींच्या कलिनें उदास ३१

बापू द्विसंधानपटु प्रसिद्ध
दादांस झाले मिळण्यास सिद्ध
विपक्ष मोरो फडणीस घेतां
बंधुत्व सारें विलयास नेतां ३२

इच्छा अशी हैदरखान दावी
स्वारी मराठ्यांवरि कीं करावी
निजाम केव्हां उलटेल याचें
मुळीं न होई अनुमान साचें ३३

छदामही कोशगृहीं मिळेना
युद्धार्थ सेना जवळी असेना
राज्यीं दुहीरूप कराळ घेई
अजिंक्य गोरा समरास येई ३४

चौफेर या दुर्धरसंकटाची
परंपरा "आ" पसरोनि साची
चालोनि आली; द्विजराज्यदेवी
वाटे जनां सत्य विराम सेवी २७

देशाभिमान—प्रभुभक्ति—रूप
द्विधार ही खड्गलता सुरूप
अमोघ हातीं फडणीस घेती
स्वदेशशत्रूंप्रति तोंड देती २८

स्वबुद्धिच्या अद्भुत विक्रमानें
चाणक्यही विस्मित होय ज्यानें
नाना तयारी करिती रणाची
प्रचीति येई समयीं गुणाची २९

सोडी जयश्री न पदारविंदा
ज्याच्या रणीं तो रणशूर शिंदा
योजूनि कांहीं हितमंत्र कानीं
नेला स्वपक्षीं वळवूनि त्यांनीं ३०

समर्पिला होळकरा अपार
सर्वार्थसिद्धप्रद अर्थभार
त्याच्या तदा पूर रणोत्सवाचा
फिरे वळे योग्यदिशेसि साचा ३१

मंत्रप्रयोगें रणबद्धकाम
जागींच तो शांतविला निजाम

चाटूक्तिनीं हैदरखान नाग
सोडी मनींचा म्हणिं सर्व राग ३२

युक्तिप्रयुक्ती लढवूनि नामी
बापूंस केलें निजपक्षगामी
नेलें स्वबंधूस महापदातें
कशी न जाई दुफळी लयातें ३३

आतां पुढें प्रश्न उरे व्ययाचा
तदर्थ नाना खजिना स्वतांचा
समग्रही मुक्त करूनि देती
" उदार " लोकीं म्हणवूनि घेती ३४

निःशेष युद्धोचितसाधनांची
सुसिद्धता सत्वर होय साची
पुरंदराहूनि रणार्थ नाना
प्रचंड सेना करिती रवाना ३५

जळीं स्थळीं युद्ध करावयाचा
कळे तदा आशय इंग्रजाचा
तदर्थ नाना धुळपां तयार
ठेवावया सांगति आरमार ३६

मुंबापुरी सोडुनि आंग्लसेना
तुला जिला शौर्यगुणीं असना
निघे त्वरें पुण्यपुरीकडे ती
दादांसवें चालुनि होय येती ३७

रोधी तळेगांव पुरःप्रयाण
स्वीकारिती यास्तव तेथ ठाण
दोन्ही चमूसागर गौर कृष्ण
परस्परांशीं भिडण्यास तृष्ण ३८

रणांगणाची रचना सशास्त्र
सशास्त्र वाद्यध्वनि आयुधास्त्र
समस्त शास्त्रोचित हालचाली
सेना अशी आंग्ल रणार्थ आली ३९

कावा गनीमी चिर पाठ जीतें
सेना मराठी झणिं तोंड तीतें
देई, तदा संगर-रंग-देवी
प्रवेश हिंसामय आद्य सेवी ४०

छाया भयाणा रण-दुर्दिनाची
व्यापी मुखश्री रणमंडळाची
उल्हाटयंत्रोत्थित धूम्रराशी
मेघापरी झांकितसे नभाशी ४१

तोफांतुनी नाद उठे प्रचंड
वाटे धरित्री करितो दुखंड
झडे तशी फैरहि बंदुकांची
चाले दिवाळी जणुं अंतकाची ४२

आरक्तवस्त्रांसम रक्तपूर
विस्तारती संगरभूत दूर

कीं घातल्या पायघड्याच वाटे
त्रेण्या जयश्री-विहिणीस वाटे ५३

युद्धस्थळी तीर्थपुरीच वाटे
यात्रेस तेथें भटसंघ दाटे
तदादरातिथ्य करावयाला
वाटे स्वयें भिक्षुक काळ झाला ५४

चाले असें तुंबळ युद्ध फार
गोरा करी तो अनिवार मार
बेजार हिंदू सरदार भीत
माघार घेती घडती न चीत ५५

हाले जसा वृक्षसमूह वातें
परी न सोडी निज आसनातें
मागें तसा हिंदुगण प्रयाण
करी न सोडी परि मूळठाण ५६

नव्या दमें ते रणरंगधीर
पुन्हां पुन्हां दक्षिणदेशवीर
त्या श्वेतवर्णी भटमंडळास
पाचारिती युद्ध करावयास ५७

विलायती सैन्य कवायती तें
दावी बहू युद्धचमत्कृतीतें
स्वलोहनाडींतुनि अग्निवृष्टी
करी जिणें विस्मित होय सृष्टी ५८

तीं काळदूतीसव अग्निवृष्टी
निवारण्या झांकुनि हिंदु दृष्टी
अनन्यचित्तें करिती प्रयास
न लाभली सिद्धि परी तयांस ४९

नानांस हें दुःखद वर्तमान
कळे, निमालें क्षण देहभान
खंबीर ते पूर्ण परी मनाचे
आधीन होती नच संकटाचें ५०

पाटीलबोवा हरिपंत यांस
तात्काळ ते पाठविती रणास
जो पानशेऽधिष्ठित तोफखाना
युद्धार्थ तोही करिती रवाना ५१

कसे बसे जे निजयुद्धकार्य
करीत होते सरदार आर्य
साहाय्यलाभें बहु धीर त्यांस
आला, चढे रंग रणोत्सवास ५२

मारूं मरूं वा समरांत आजी
गडी मराठे रणशूर गाजी
अशी प्रतिज्ञा करुनी सुघोर
होती रणा सज्ज उभे समोर ५३

धडा धडा तोफ रणीं धडाडे
कडा कडा बंदुकही कडाडे

सणा सणा बाण करी सणाणा
करी तदा आंग्लचमू ठणाणा ५४

करी मराठा अनिवार मारा
मृत्यूविणें आंग्लवळा न थारा
जो जो करी तें लढण्या उपाय
तो तो झणीं निष्फलतेस जाय ५५

सेना मराठी रिपुकोट फोडी
त्यातें रणीं ती मनसोक्त झोडी
मागें विजारीभट पाय घेती
"अजिंक्य" ही कीर्ति लयास नेती ५६

जसें जसें इंधन आंग्लरूप
संग्रामकुंडांत पडे विरूप
तसा तसा आर्यबळीं प्रचंड
शौर्याग्नि पेटे भडके अखंड ५७

काळ्या चमूची रचना पहाया
आकाशिंचा बाप जणूं बहाया
झाडावरी इष्टुर फांडका तो
चढे विपक्षीय चमू पहातो ५८

स्वर्गप्रयाणोन्मुख त्याच वाटे
लागे तया पोंचविण्यास वाटे
अमोघसंधानकलानुरागी
कोणी मराठाभट तोफ डागी ५९

तेथें करी अद्भुत शौर्य वास
त्याच्या जणूं उत्सुक दर्शनास
गोळा उरीं आंग्ल बहादुराचे
लागे उडाले तुकडे धडाचे ६०

दुःखप्रभा संभ्रमभीतिवाई
हिंदुसवें आंग्लचमूंत जाई
होई तदा ती बहु दीनवाणी
आणी मुखींचें नयनास पाणी ६१

घेऊनि नंगी समशेर हातीं
प्रवर्तती आर्य विपक्षघातीं
तदा चमत्कार अपूर्व झाले
वर्णूं किती ते रसना न चाले ६२

म्लेंच्छांवरी ते पडले तुटोनी
गेले परी म्लेंच्छाचे ते तुटोनी
गले तुटोनी तरिही जगास
वाखाणिती ते रिपुच्या यशास ६३

हातीं शिरें घेउनि झुंजताती
कंठावरी तीं परि नांदताती
तीं आर्यखड्गें उडती नभांत
येती नभांतूनि रणांगणांत ६४

कितीक गोरेभट हीनदीन
रणांगणीं नाचति कंठहीन

युद्धस्थळीं कीं हिणवी नभातें
राहू तुला एक अनेक मातें ६५

रणांगणीं ज्या मृतवीरराशी
कितीक त्यांच्या दडले तळाशीं
आश्चर्य वाटे शरणागतातें
देती व्यसूही भट आश्रयातें ६६

कितीक सोजीर रणायुधांतें
त्यजूनि दांतीं धरिती तृणातें
कालत्रयींही घडती न दास
त्यां ये विधे ही ! स्थिति इंग्रजांस ६७

बाकी उरे जें बळ तें अशेष
पळूनि जाई भय घे विशेष
काळ्या चमूचा मग एक भाग
त्याचा करी सत्वर पाठलाग ६८

पराभवें या सितसैनिकांचा
खग्रास होई मुखचंद्र साचा
काळी चमू ती जयसंगशाली
विशेष शोभे कृतकृत्य झाली ६९

जाणो मराठाबळधन्यवाद
भरे दिगंतीं जयवाद्यनाद
करूनि या अद्भुत विक्रमास
गेली चमू शिघ्र पुरंदरास ७०

नानांस ही शत्रुपराभवाची
वार्ता जणूं हो सुतसंभवाची
कसा करावा तह इंग्रजाशीं
विचार हा ते करिती मनाशीं ७१

समुद्रयुद्धीं धुळपें बहार
केली रिपू पावति पूर्ण हार
दिनक्रमें हें शुभवृत्त आलें
दुग्धीं पडे साखर तेंवि झालें ७२

पुढें घडे तो तह सालबीचा
आरंभ जो लांबवी इंग्रजीचा
दादांस गोदातटवास भाग
पडे, न लाभे लव राज्यभाग ७३

जाळोनी रिपुसंघशुष्कतृण तें बुद्धिप्रभावानळें
नेवोनी भटराजराज्यतरुला संफुल्लभावा बळें
नाना धीर उदार नंतर असा हेतू मनीं आणिती
न्यावें पुण्यपुरीस कीं सुसमयीं त्या बाळमंड्याप्रती ७४

# सर्ग ८ वा

( कापट्यपरिस्फोट )

तो मुहूर्त धरिला गमनातें
जो रुचे गणकवर्य-मनातें
सिद्धता अवसरोचित तूर्ण
भानुराज करवी परिपूर्ण १

ये क्रमें शुभ अपेक्षित वार
पेशवा शिशुसवें परिवार
लागला निजपथक्रमणातें
सूर्य कीं मकरसंक्रमणातें २

ज्याचिया तनुस कांचन रत्नें
लाविला भरजरी कुथ यत्नें
त्या विनायकगजीं सुकुमार
शोभला सु-भटवंश-कुमार ३

मस्तकीं ढळति धन्य उदंड
चामरें रुचिर कांचनदंड
हेमदंडपरिभूषितपाणी
बोलती जन पुढें " जय " वाणी ४

पादचारि-रथ-वाजि-तुरंग
चालले बळ सवें चतुरंग

होतसे मधुर मंगळ वाटे
वाद्यघोष• गगनोदर दाटे ५

येतसे स्वपति ही शुभवार्ता
जाहली श्रुत तदा विरहार्ता
दंग पुण्यनगरी सुखरंगीं
होउनी डुलत हर्षतरंगीं ६

सर्व सद्‌गुण-कला-प्रियगेह
भूषवी रुचिर ती निजदेह
चातकी घन तशी स्मितमिताक्षी
उत्सुका स्वपतिचा पथ लक्षी ७

पातला सचिव पुण्यपुरातें
ऊत येत जनहर्षपुरातें
नाथदर्शन-सुखामृतवृष्टी
लाभतां निवतसे जनदृष्टी ८

पावतां उदयबिंब रवीचें
शोभतें मुख जसें सरसीचें
पुण्यपत्तन तसें बहु शोभे
मंत्रिदर्शन यदा शुभ लाभे ९

क्षीरमार्ग विलसे भ-गणांनीं
तेंवि पुण्यपुरमार्ग जनांनीं
कौतुकें बघत त्या भटबाळ
ये गृहा निज मनोज्ञ विशाळ १०

मंत्रिबाळ करितां निजवास
ये महत्त्व बहु पुण्यपुरास
तेथ तत्प्रतिनिधी फडणीस
शासिती नयबळें जगतीस ११

भानुसिंह नृप-नीति-नटीला
नाचण्या विविध नृत्यगतीला
देशकालगति पाहुनि लावी
राज्यरंग सुषमा बहु दावी १२

वृत्त-वर्ण-रचना परिरक्षी
भिन्नता लघुगुरूतिल लक्षी
अर्थसिद्धि करितो रुचिरा जो
भानुराज कविच्यासम साजो १३

लोककार्य करण्या करभार
वेंचितो सकळ भानु उदार
उच्च पूज्य पदवीप्रति आला
व्योमभानुतुलनाक्षम झाला १४

धाक शासनभयें कुजनांतें
तोष दे गुणभरें सुजनांतें
कांपवी रिपुगणासि थरारा
वाटवी बहु जनांसि दरारा १५

हीन-दीन-विपदार्त-जनांचा
तो पिता पुरुषपुंगव साचा

दान-धर्म-करुणादि-यशाची
शुभ्र शाल तनु भूषवि त्याची १६

सांगती पटु अवंचक चार
सर्वही स्व-पर-राष्ट्र-विचार
आणिती सकळही जगतातें
भानु भानुसम दृष्टिपथातें १७

सांगुनी हितगुज स्वमनींचें
श्रोत्र शत्रु रिझवी रमणींचें
तेंहि हो विदित त्या लवलाहीं
गुह्य-भेदन-कला अतुला ही १८

दत्तवास-तरुच्या कुसुमांचें
मूळ जेंवि फलसूचित साचें
राज्यकार्य अतिगुप्त तदीय
तेंवि हो फलवशें अनुमेय १९

भानुची सुखद संगति साजे
विप्रराष्ट्र-शतपत्र विराजे
कीर्ति-गंध भरला भुवनांत
गुंगती मनुजभृंग सुखांत २०

त्या स्वदेश-जन-कार्य-परातें
एकदा चतुर भानुवरातें
इंग्रजी कपटशील वकील
येउनी वदत बोल पुढील २१

" ऋद्धि-सिद्धि-युत पंडितराज
हेतु एक धरुनी मनिं आज
पातलों तुमचिया चरणांशीं
माझिया श्रवण द्या वचनाशीं २२

खाद्य-पेय-वसनादि उदारा
माझिया उचित जे परिवारा
ते पुण्यांत मिळती न पदार्थ
कष्टपूर्ण गमतो चरितार्थ २३

जे तदर्थ अमुचे बहु हाल
ते जरी सकल दूर कराल
नित्य थोर तुमचे उपकार
आमुच्या स्मृतिपथीं वसणार २४

जे अह्मांप्रति पदार्थ जरूर
मुंबईस मिळती भरपूर
नित्य तेथुनि तदानयनाची
संमती विनय हा अजि याचा २५

आंग्लवक्त्रकृत या विनतीस
शीघ्र मान्य करिती फडणीस
तो वकील परितुष्ट सकाम
जातसे करुनि त्यांस सलाम २६

येरझार करिती तदगारीं
अन्नपान-शिबिका प्रतिवारीं

चालला क्रम असा बहुमास
जाहला विदित सर्व जगास २७

त्यांत जो प्रथम चित्रविशेष
तो घडे दिनवशें स्मृतिशेष
वास्तपुस्त शिबिका-गमनाची
घे कधीं न कुणिही पथिं साची २८

तों स्वराज्य-परिरक्षणदक्ष
शत्रुकृत्यविनिवेशितलक्ष
पाठवी चतुर भानुकुलेश
मार्गरक्षक जनांसि निदेश २९

“ ताम्रवर्ण शिबिका पथिं आजी
दृष्टि गोचर घडेल तुह्मां जी
रोधुनी द्रुत तिच्या प्रगतीतें
नीट रक्षण करा मग तीतें ” ३०

कार्यनिष्ठ बहुदक्ष जकाती
ताम्रवर्ण धरिती शिबिका ती
इंग्रजी विदितवृत्तवकील
होतसे सपदि संभ्रमशील ३१

तो करी परि सर्व भ्रमभंग
शांतवी चलित चित्ततरंग
घोळवी निजमनीं क्रमपूर्व
या विचारसरणीस अपूर्व ३२

" इंग्रजी कपटबंध फसेल
हें कधींहि सहसा न घडेल
वित्तलोभवशचित्त जकाती
रोधिती मज गमे शिबिका ती ३३

मार्गरक्षक ज़री धन-काम
त्यां मिळेल नच एक छदाम
सांगुनी सकळ पंडितराया
प्रार्थितों उचित दंड कराया ३४

जुमहेर फिरती बहुसाळ
तन्मुखें परिसुनी छलजाळ
पंडितेंच शिबिकेप्रति वाटे
विघ्न हें करविलें मज वाटे ३५

मागणें तरिहि जाउनि दाद
हाचि मन्मन कथी हितवाद
नष्टऊन अथवा मम दोष
तें तसा करिल पंडित रोष " ३६

आत्मनीतिकुलटेश कुशील
साध्विशी नटविण्यास वकील
तो करी गमन भानुवरातें
जो बसे निजसभासदनातें ३७

जोडुनी उभयही निजहात
आदरें करुनियां प्रणिपात

वृत्त तो सकल त्याप्रति सांगे
दाद दीनमुख नंतर मागे ३८

भानु तें सकल ऐकुनि घेती
शांतवृत्ति मग उत्तर देती
" धर्मशील करिती मम भृत्य
आजपावत न ईदृश कृत्य ३९

हें कळे न मज जे नयशील
आज कां अनय ते करितील
पारिपत्य शिबिका बघुनी ती
त्यां करूं उचित ही नयरीती " ४०

भानुराजवचनें शिबिकेसी
आणिती अनुग शीघ्र सभेसी
तों वकील चरके स्वमनांत
छद्म कीं निज कळेल जनांत ४१

मोकळी करविली शिबिका ती
आंत जों सकळ लोक पहाती
तों दिसे उघड दृष्टिसमोर
वस्तुजात समरोचित घोर ४२

तो तदा कुटिल आंग्ल वकील
जाहला चकित खिन्न खजील
भानुवंशवर तोंच तयास
बोलला उचित या वचनास ४३

" शस्त्र अस्त्र तुमचे जन खाती
ये प्रचीति आजि पूर्ण मला ती
या हवेस पचती न परी तीं
रोधिली ह्मणुनि भृत्यगणीं तीं ४४

दारु जी वहनांतुनि आली
तोफ-बंदुकमुखीं तिज घाली
ती मनुष्य-जठरोचित नाहीं
रोधिली ह्मणुनि भृत्यगणांहीं ४५

अन्नपान-शिबिकानयनाचा
म्यां रुकार दिधला परि त्याचा
हा अनिष्ट घडला परिणाम
इंग्रजी नय ठरे छलधाम ४६

होतसां तुह्मिच शासनपात्र
दोष ये न अनुगां अणुमात्र
काय शासन करूं मज सांगा
लागलें प्रबळ दूषण आंगा " ४७

भानुचें वचन हें परिसोनी
तो वकील जुळुनी कर दोनी
" भो क्षमस्व भगवन्करुणाब्द "
बोलला विनत हे मृदुशब्द ४८

" मुंबईस शिबिका दवडावी
गोष्ट ही पुनरपी न करावी "

इंग्रजा कथुनि हा उपदेश
पाठवी परत भानुकुलेश ४९

तो सर्वे निजगृहास्थिति सेवी
पुस्तकीं लिहुनि हें मग ठेवी
' जों वसे चतुर पंडित नाना
तों अजिंक्य भटराज्य परांना ' ५०

विप्रधेनुगण नित्य रिपूतें
जिंकण्या प्रबल धूर्त टिपूतें
तो ससैन्य मग भानुललाम
चालला रिपुहि ये रणकाम ५१

युद्धयोग बहु तुंबल झाला
शत्रुचा समरदर्प निमाला
खंडणी विपुल दुर्ग बदामी
भानुराज करिती करगामी ५२

येउनी विजययुक्त पुण्यास
पारिपत्य करवी गिलच्यांस
सूड पानपतच्या समराचा
घेववी सफल-संगर साचा ५३

होई विवाहविधि त्या मग माधवाचा
तद्वर्णना पुरतसे कविची न वाचा
नानांस वृत्त कळलें तंव कीं निजाम
होऊं बघे समयलंघन बद्धकाम ५४

---

# सर्ग ९ वा

( खर्ड्याचा युद्धप्रसंग )

पाश्चात्त्य-पूर्वात्य-रणागमाचें
रहस्य जाणे परिपूर्ण साचें
तो वीर वीर्यार्णव सव्यसाची
शिंदा धरी वाट सुरालयाची ॥ १

जो जामदग्न्यासम विप्रवीर
युद्धीं विराजे रणरंगधीर
कालोदरीं तो हरिपंत वास
सेवी यशःश्री वितरी जगास ॥ २

या दोन सेनापतिंचा विराम
करी मराठीबळ मंदधाम
शौर्य-द्युतीचे जणुं हात दोनी
दुर्दैवयोगें पडले गळोनी ॥ ३

ही पेशव्यांची विधिदत्त हानी
ऐकूनि आनंद निजाम मानी
वाटे तया पूर्वपराजयाची
ये वेळ ही फेड करावयाची ॥ ४

निजामशाहींत असे सुजाण
मशीर उल्मूलुख जो दिवाण

तोही तसा बोध करी तयाला
अग्नींत कीं आज्यनिपात झाला ५

निजाम उन्मत्त मदांध मानी
तो पेशव्यातें तृणतुल्य मानी
ह्मणूनि कीं माधव भावलिप्त
तच्चित्तकोपाग्नि करी प्रदीप्त ६

जो पेशव्यांचा अभिमानशील
गोविंद काळे ह्मणुनी वकील
मागे यदा तो करभार सर्व
मशीर दे उत्तर त्या सगर्व ७

" त्वत्स्वामिहस्तीं दमडी पडेल
ही गोष्ट आतां न कधीं घडेल
संग्राम-कंडू-शमनोत्सुका ही
अस्मच्चमू वाट तदर्थ पाही ८

प्रसिद्ध हे बम्मन भातखाऊ
आम्ही पिढीजाद असों लढाऊ
दुग्धीं जरी वायस नित्य न्हाती
ते राजहंसांसम काय होती ? ९

जे दर्भ हातीं धरिती अखंड
ते आज घेती भट राजदंड
सोडोनि जाती निज नित्यधर्म
अंतीं तयां दुःख मिळे न शर्म १०

कटीस कौपीन विभूति अंगीं
तुंबा करीं ते फडणीस संगीं
वेषें अशा माधव पेशव्यास
देतोंच काशींत विशंक वास " ११

इत्यादि तो मूढ वजीर वाची
दुरुक्तिनामावलि माधवाची
निजामशाहींत गमे मनाला
जन्मा पुन्हां तो शिशुपाल आला १२

" ही वल्गना कां करितां वृथाच
होईल तच्छासन योग्य साच "
देती असें उत्तर अल्प काळे
क्रोधाग्नि ज्यांच्या हृदयीं उफाळे १३

सिगेसि नेण्या अवधीरणाशा
तो म्लेंच्छमंत्री करवी तमाशा
तद्दर्शना उत्सुक फार झाले
निजाम त्याचे सरदार आले १४

भ्रूभंगसंज्ञा करितां वजीर
तेथें तदर्थज्ञ तमासगीर
नाना तसें माधवराव यांचें
विद्रूप ते आणिति सोंग साचें १५

काळे तिथें प्रेक्षकमंडळांत
होते तयां कोप चढे नितांत

आरक्त झाला मुखभाग सारा
त्यांचा तसा ओंठ हले थरारा १६

निजामराज्यस्थितिहानिहेतू
ते भासले मूर्तचि धूमकेतू
कल्पांतमेघध्वनिचंड बोल
ते बोलती जे घडले न फोल १७

'हाणूनि माथां उपहासदंड
कां सिंह हा चाळवितां प्रचंड
जंबूक हो ! तो करणार चाल
तेव्हां कसें जीवित वांचवाल ? १८

या मानभंगें खवळोनि सर्व
मराठिसेनार्णव तो अखर्व
येईल कल्पांतसमुद्रतुल्य
लंघील हें राष्ट्र रये अतुल्य १९

निवारण्याला प्रगती तयाची
त्र्याली असे माय जगीं कुणाची
समीप आला तुमचा विनाश
समोर हा रंग न, कालपाश २०

माझा प्रभू वासवतुल्य कोठें
निजाम हा कीटक तुच्छ कोठें ?
त्यानें अवज्ञा लटकी तयाची
कीजे जशी श्वान करी गजाची २१

नाना विचारी गुरुतुल्य कोठें
मशीर हा मर्कटचार कोठें ?
सहाय एका रणशूर वीर
दुजास हे क्षुद्र तमासगीर २२

मशीर जे नीच सहाय त्याचे
करूनि त्यां पंजरबद्ध साचे
गृहीं गृहीं पुण्यपुरांत सर्व
दावीन लोकां सगळ्या सगर्व २३

विटंबना मत्प्रभुची अपूर्व
केलीत ही हो अविचारपूर्व
शिक्षा अशी घ्याल यथार्ह त्याची "
अमोघ वाणी न ढळे द्विजाची २४

काळे अशी धीर-गिरा वदोनी
निघोनि जाती स्थळ तें त्यजोनी
पुण्यास येती द्रुत ते सुवृत्त
नानांप्रती सांगति सर्व वृत्त २५

" युद्धीं करूं जर्जर कीं निजाम "
ठरे असा निश्चय तेथ ठाम
तत्सिद्धता पोक्त करावयास
अश्रांत नाना करिती प्रयास २६

जे जे मराठी सरदार त्यांना
चारी दिशा प्रेषिति लेख नाना

" त्वरावशें पुण्यपुरीस यावें
समस्तही सैन्य सवें असावें " २७

मानूनि ती लेखलिपी प्रमाण
वीर प्रतापी करिती प्रयाण
सवेग ते पुण्यपुरीस येती
स्वस्वस्थळीं सैन्यनिवास देती २८

सद्भासिता वीरगणावलींनीं
कीं शौर्य-धैर्योपवनस्थळींनीं
ती पेशव्यांची कुलराजधानी
शोभे स्वताला कृतकृत्य मानी २९

दिनक्रमें निश्चित वार आला
एकत्र सारा दळभार आला
नानांसवें माधवराव साचीं
सूत्रें स्वहस्तीं धरिती तयाचीं ३०

प्रस्थानभेरी झडती प्रचंड
मराठिसेनार्णव तो अखंड
रणोत्सवा-पूर्ण करी प्रयाण
संगें विराजे भगवें निशाण ३१

वाग्देवते भाग्य तुझें विशाळ
लाधे तुला हा शुभ पर्वकाळ
कीं पाहसी दृष्टिपथासमोर
सारे मराठीभट सान थोर ३२

लाधे तुला हा न पुन्हां सुयोग
त्याचा करी तूं उचितोपयोग
त्यांच्या सुनामग्रहणें स्वतांस
अगे करीं पावन वाचकांस ३३

विख्यात तो वंशज भोंसल्यांचा
चाले रघोजी निधि विक्रमाचा
शिंदा तसा दौलतराव शूर
शोभे धृतीचा जणुं कर्णपूर ३४

रणा निघे होळकर प्रतापी
नामें तुकोजी रिपुसंघतापी
जाई तसा गाइकवाड वीर
" फत्ते " पदें भूषित सिंग धीर ३५

निघे कराया घनघोर आजी
पराक्रमी घोरपडे तुळाजी
स्वकीय निंबाळकर प्रभाव
दावावया चालति जानराव ३६

रावे जयश्री चरणीं जयांचे
" भाऊ " दुजेही पटवर्धनांचे
ते शोभती वंशज तेथ साचे
सांचे जणूं शौर्य यशोरसाचें ३७

थोरात-पोवार-चव्हाण-काशी
वंशांतले या भट शौर्यराशी

विराजती तेथ तसे सुधीर
ते मोहिते-जाधव-वंशवीर ३८

परांजपे-पंडित-पानशांस
पुरंदरे-बेरड-भोइटथांस
रास्ते-शितोळे-शिरके भटांस
लाधे तदा सैन्यगणीं निवास ३९

पेठे सविंचूरकर प्रसिद्ध
ससैन्य होती रणयानसिद्ध
रणार्थ ओढेकर गोडबोले
स्वकीय सैन्यासह ते निघाले ४०

करावया स्वामिहितार्थ जन्य
हे धन्य जे वीर असंख्य अन्य
जाती क्रमें ते खरड्यास येती
युद्धार्थ तेथें मग ठाण घेती ४१

निजामही तेथ ससैन्यभार
युद्धप्रसंगार्थ वसे तयार
दोन्ही चमू त्या करुनी सुघोष
परस्परांशीं भिडती सरोष ४२

करी पदाती-वरि चाल पत्ती
वरी गजाशीं रणयोग हत्ती
अश्वावरी अश्व रणीं निघाला
गांठी तिरंदाज तिरंदजाला ४३

३७३१५३

तोफेस हो तोफ विवादशाली
बंदूकिला बंदुक साद घाली
भाल्यास भाला भिडण्यास येई
खड्गास खड्ग प्रतिघात देई ४४

व्यापी रजःचूर नभस्तलातें
स्वर्गप्रयाणोन्मुखवीर त्यांतें
सोपान कीं मृण्मय भूमिदेवी
उभारुनी उंच रणांत ठेवी ४५

असंख्य नानाविध शस्त्रभार
करी झरारा बहु येरझार
रणांगणीं कीं करण्या उदीम
वाटे यमाचे फिरती मुनीम ४६

रणांगणीं रक्तनदी खळाळे
रक्तप्रभा वीरगणीं झळाळे
संग्रामदेवी गमतें मनास
कीं खेळती रंगरसीं विलास ४७

भरे निनादें बहु धूर सोडी
निजोदरीं लोक असंख्य जोडी
प्रेतें गमे कीं बनवावयाची
युद्धस्थळी ती गिरणी यमाची ४८

गडी मराठे रणशूर मर्द
अनन्य चित्तें करिती विमर्द

विराजती तेथ तसे सुधीर
ते मोहिते-जाधव-वंशवीर ३८

परांजपे-पंडित-पानशांस
पुरंदरे-बेरड-भोइटथांस
रास्ते-शितोळे-शिरके भटांस
लाधे तदा सैन्यगणीं निवास ३९

पेठे सविंचूरकर प्रसिद्ध
ससैन्य होती रणयानसिद्ध
रणार्थ ओढेकर गोडबोले
स्वकीय सैन्यासह ते निघाले ४०

करावया स्वामिहितार्थ जन्य
हे धन्य जे वीर असंख्य अन्य
जाती क्रमें ते खरड्यास येती
युद्धार्थ तेथें मग ठाण घेती ४१

निजामही तेथ ससैन्यभार
युद्धप्रसंगार्थ वसे तयार
दोन्ही चमू त्या करुनी सुघोष
परस्परांशीं भिडती सरोष ४२

करी पदाती-वरि चाल पत्ती
वरी गजाशीं रणयोग हत्ती
अश्वावरी अश्व रणीं निघाला
गांठी तिरंदाज तिरंदजाला ४३

तोफेस हो तोफ विवादशाली
बंदूकिला बंदुक साद घाली
भाल्यास भाला भिडण्यास येई
खड्गास खड्ग प्रतिघात देई ४४

व्यापी रजःचूर नभस्तलातें
स्वर्गप्रयाणोन्मुखवीर त्यांतें
सोपान कीं मृण्मय भूमिदेवी
उभारुनी उंच रणांत ठेवी ४५

असंख्य नानाविध शस्त्रभार
करी झरारा बहु येरझार
रणांगणीं कीं करण्या उदीम
वाटे यमाचे फिरती मुनीम ४६

रणांगणीं रक्तनदी खळाळे
रक्तप्रभा वीरगणीं झळाळे
संग्रामदेवी गमतें मनास
कीं खेळती रंगरसीं विलास ४७

भरे निनादें बहु धूर सोडी
निजोदरीं लोक असंख्य जोडी
प्रेतें गमे कीं बनवावयाची
युद्धस्थळी ती गिरणी यमाची ४८

गडी मराठे रणशूर मर्द
अनन्य चित्तें करिती विमर्द

त्यांचा न साहे रिपुला प्रताप
झाला बहू जर्जर तो सताप ४९

म्यानांतुनी खड्गलता कराळ
काढूनि ते कापिती कंठनाळ
जिव्हा यमाच्या जणुं जातशोष
आस्वादिती रक्तरसा संतोष ५०

भाले मराठी-भट-हस्त-वासी
विदारिती शत्रुभुजांतरांसी
कीं भक्षिती देह-समीर नाग
रत्नप्रभा-भासुर-तुंड-भाग ५१

दशानना ऽशोकवना बळानें
विध्वंसिलें अंजनिच्या सुतानें
शौर्यें मराठी भटसंघ झोडी
तसें निजामीबळवृंद तोडी ५२

मुखीं फलश्रीयुत शालिमाला
पडे जशी खंडित भूतलाला
वीरावली श्मश्रुमुखी पराची
तशी पडे विद्धरणांत साची ५३

चौफेर लागे वणवा वनाला
पक्षी पशूंच्या मिति ना भयाला
होई तसें त्या परसैनिकांस
पळूनि जाती दशदिङ्मुखांस ५४

रणांगणा सोडुनि तो निजाम
पळे भयें व्याकुल मोघकाम
स्वरक्षणाला खरड्यांत आला
वेढी तिथें माधवसैन्य त्याला ५२

तेथें मिळेना लव अन्नपाणी
झाली निजामस्थिति दीनवाणी
वाटे तया हा टळण्या अपाय
तहाविणें अन्य नसे उपाय ५३

तो मागणी दूतमुखें तहाची
सुदुर्दशापन्न निजाम याची
नाना तहीं सांगति बाब जी जी
तीतें करी तो गतगर्व "जी" "जी" ५७

मशीर त्याचे खळ साथिदार
सपत्तिचा लाभ तसा अपार
मुलूख वाटे तितुका मनास
लाभे तदा त्या भटपुंगवास ५८

पुढें जयश्री शुभसंगशाली
भटेन्दुची मूर्ति पुण्यास आली
त्या वेळचा थाट "अवर्णनीय"
या पांच वर्णांनिच वर्णनीय ५९

युद्धार्थ आले सरदार नाना
वस्त्रें अलंकार यथार्ह नाना

समर्पुनी बोळविती तयांस
देती अनुज्ञा मग जावयास ६०

भानूत्तमाचा शुभकीर्तिपूर
लोकीं फिरे या विजयें सुदूर
प्रजा प्रभूतें विनवी अखंड
"नानांस आयुष्य असो उदंड" ६१

देती स्वदेशार्थ शरीर वित्त
विवेक विद्या नय बुद्धि चित्त
अजूनही त्यास्तव लोक "नाना"
नामश्रवें डोलवितात माना ६२

त्यांच्या प्रयत्नें द्विजराज्यशाखी
उबारला पुष्टिरसासि चाखी
क्रमें क्रमें पुष्पविकास दावी
आशा फळाची जनतेस लावी ६३

निजविभवनभाचे मध्यभागीं विराजे
शुभगुणकिरणांनीं भानुची मूर्ति साजे
अवनतिपथ तीतें यापुढें लागणार
विधि-समय-नियोगा कोण जाईल हार ? ६४

# सर्ग १० वा

(नानांचे शेवटचे दिवस.)

अहह ! हत विधीचा ये असा दुर्विलास
श्रम भयद मतीचा ग्रासितो माधवास
मम मन मज सांगे त्या न तो बुद्धिदोष
शिव ! शिव ! परी गांठी विप्रराज्या त्रिदोष १

श्रम-कलुषितचित्तें एकदां तो महालीं
स्थित, भटकुलकेतू घे उडी नीट खालीं
ललित तनु न त्याची विप्रराष्ट्रीय देवी
मज गमत मुमूर्षू भूवरी अंग ठेवी २

हर ! हर ! रसिकांच्या तापलें तेल कानीं
थर थर थर पावे ओतितां कंप वाणी
नृपति-पतन-वार्ता ऊठली जी सकाळीं
अवचित पविपाता-तुल्य सर्वांस झाली ३

पसरत जलपात्रीं स्नेह-बिंदू क्षणांत
त्वरित नगर-भागीं संचरे तेंवि मात
अहह ! कहर झाला; पुण्यपौरांतरंग
अशुभ परिसुनी हें वृत्त झालें दुभंग ४

झडकरि पुरमार्गी लोटले लोकसंघ
पुढति पळति जैसे वारिधीचे तरंग

भर भर 'शनिवार'–द्वारमार्गासमोर
पुसति कुशल जैसें तोय मेघास मोर ५

श्रवण करुनि कानीं दूत जी मात सांगे
विकलहृदय नाना धांवले शीघ्र आंगें
अपशकुन पुढें तों लागली हाय ! ठेंच
पुढिल अपयशाचें जाहलें मूळ तेंच ६

स्खलन-पतन-योगें वेदना होय गाढा
लगबग परि आले, पावले राजवाडा
निरखुनि नयनांहीं स्वामिचा देह भग्न
हृदय गलित झालें गाढशोकीं निमग्न ७

शिव शिव ! कर डावा मोडला माधवाचा
वदन विकळ झालें जाहली बंद वाचा
शित-जल-नलिकेचें टोंक जंघेंत गेलें
हर हर ! अविचारें माधवा काय केलें ८

मग झडकरि वैद्या आणवी भानुरत्न
खटपट बहु त्यांहीं थोर केले प्रयत्न
परि विधि उफराटा जाहला स्पष्ट जेथें
मनुज-कर यशस्वी काय होणार तेथें ? ९

झगडुनि भिषगांहीं नेटके दोन तीन
दिवसवरि सुयत्नें रक्षिले प्राण दीन
विधि-लिखित-नियोगें संपतां अल्प आयू
न कळताचि पळाला चोरसा प्राणवायू १०

नव-कुसुम-कळीशी यौवनोद्भिन्न काया
निज-जनपद-कार्यी योग्य होती झिजाया
परि बहु अविवेकें माधवा ! लोकराया !
खचित दवडिली बा ! यौवनामाजि वायां ११

फडणिसवर सांगे बोध तूतें हिताचा
अनुचित गमला का तो तुला सांग साचा
असुलभ नयवेत्ता सांगतां योग्य गोष्टी
कलुषित मन झालें बा तुझें काय कष्टी ? १२

तव पितृवध केला राघवें राज्यलोभें
हितकर तव धांवे सांडुनी सर्व तो भें
प्रबळ रिपु असोनी स्वामिकार्यार्थ रक्षी
वससि शिशुपणीं जैं माधवा मातृकुक्षीं १३

विदित तुजसि सारें माधवा पूर्ववृत्त
असुनि, अहितमार्गीं लाविलें केंवि चित्त ?
तव जनकवधानें धन्य लोकांत या जी
विमलभटकुलाधी पुत्र तीचाच बाजी १४

कथिति तुजसि नाना स्नेह त्याचा त्यजावा
कपटपटु असो या पिंजऱ्यामाजि रावा !
हितवचन रुचेना वाटला काय जाच
म्हणुनिच सजशी का आत्मघातासि साच १५

परि उगिच मृताला कासया दोष लावा
विधिबळ उफराटें सर्व त्याचाचि कावा

पुढिल विरस गोष्टी सत्य संक्षेपपात्र
कशितरि परिसावी सांगतों मूळमात्र १६

विषम मरण ऐसें लाधलें माधवासी
दुरितजलधि घेरी भानुवंशोत्तमासी
विधिविलासित खोटें होय तेणेंचि चूक
अनुचित पुरुषाचीं जाहली नेमगूक १७

त्यजुनि सकल लज्जा राज्यसंपत्तिसाठीं
शरण परकियांना वीर गेला मराठी
रणपटु रघुनाथ स्त्रैण विख्यात लोकीं
अनुगुण सुत त्याचा रावबाजी विलोकीं १८

सचिवपद यशस्वी पेशव्यांचें कुकाचें
अहह ! अशुभ हस्तीं कोंवि गेलें तयाचे
अखिल-विपिनरायें गर्जना जेथ केली
शिव शिव रडतीं कां त्या स्थळीं आज कोल्हीं १९

नयविरहित झाली राज्यसत्ता पुण्यास
चतुर पुरुष चित्तीं पावले धाक खास
अभिनव विजयश्री पार देशांतराला
गमन करित; हाहा ! कोण आकांत झाला २०

" हरहर " रव पूर्वी युद्धसंधानकाळीं
अनवरत निघाला कोंदला अंतराळीं
अजि समयवशें तो जेवितां विप्रपंक्ती
श्रवणविषय गांठी, दे मना फार खंती २१

सकळ भटकुळींचे वीर्यवान् शूर राजे
स्वजनपदहितार्थी धांवले संगरा जे
निगम-विहित त्यांहीं सोडिलें ब्रह्मकर्म
निज-जन-सुख-दानीं मानिलें थोर शर्म २२

परि नियति-नियोगें रावबाजीस चित्तीं
अनुचित गमली ती वाटतें क्षात्रवृत्ती
ह्मणुनि अमित केले भोजनादि प्रकार
विमल "भट" कुळाला जोडियेला "ट" कार २३

शकुनि कुरुपतीला साह्य दुर्बुद्धि झाला
अनयरतिमुळें ये अंधता अंधजाला
कथिति हित तयाला द्रोण-भीष्मादि वृद्ध
कुरुवर अवमानी बोध त्यांचा विशुद्ध २४

सुर-गुरु-सम नाना बुद्धिसंपन्न होते
कपि-कर-गत-रत्नासारिखे जाहले ते
अजवरि मति ज्यांची गाजलीसे विशाळा
शिव! शिव! कशि त्यांना लाधली बंदिशाळा २५

तनु मन धन ज्यांहीं ओपिलें स्वामिकाजीं
अवचित करि त्यांचा घात हा रावबाजी
मधुर मधुर बोले स्नेह अत्यंत दावी
परम कुटिल त्याची काय लीला वदावी २६

चतुर फडणिसांचा ऐकता बुद्धिवाद
अमित न करिता तो राज्यकार्यी प्रमाद

सुचिर तरि सुखानें नांदता भाग्यशाली
प्रखर कलहवन्ही पेटता कां अकालीं २७

शिव-नृपति-करांहीं रोविला राज्यरोपा
विविध-पुरुष-रक्तें पावला नीट जोपा
जतन करुनि मोठी पाळिला पेशव्यांनीं
मग फडणिस माला-कार झाले निदानीं २८

हर हर ! परि बाजी तीक्ष्ण हातीं कुठार
धरुनि करि तयाच्या मूलदेशीं प्रहार
कडकडुनि निमाला वृत्त हें दुःखकारी
स्मरुनि विकळ होती अंतरंगीं विचारी २९

पुढिल कथन येथें व्यर्थ तें कासयाला
गुणगणयुत ऐसा स्वामि राज्यास आला
पुलकित वपु होते वर्णितां तो प्रसंग
चरित फडणिसांचें पावलें येथ भंग ३०

* * *

मरण मरण पावे जे महात्मे तयांचें
जननचि फिरुनी हो मृत्युकाळीं तयांचें
क्षणिक जरि तयांचा देह अदृश्य झाला
सुतनु शुभ यशाची भूषवी भूतलाला ३१

* * *

नयनिपुण महात्मन् धीपते भानुराज
तव गुणगण साक्षात् गातसे काव्य आज

तुजसम भुवनीं या भासती तूंच मात्र
नच इतर नयज्ञ त्वत्तुला-लेश-पात्र ३२

पढवुनि नयविद्या 'ग्लॅड'-पूर्व-'स्टनातें'
दवडिशि इहलोकीं वाटतें मन्मनातें
तुजसि परि न लाभे सौख्य तें गोड फार
अनुभविति गुरू जें दे यदा शिष्य हार ३३

प्रियतर तव शिष्य ' प्रिन्स बिस्मार्क ' वाटे
हृदयिं परि तयाच्या हीच कीं भीति दाटे
" निज-नय-पटुता हो न्यून आर्यप्रदेशीं "
ह्मणुनिच जणुं तो घे जन्म शर्मण्यदेशीं ३४

त्वदनुकरणशाली आत्मदेशोन्नतीस
नयनिरत सदा जो योजिताहे मतीस
विदित सकललोकीं तो 'इटो' त्वत्तुलेला
समुचित घडतो का पाहण्या हा भुकेला ३५

* * *

मदनरिपुशरीरा भूषवी जेंवि भूती
निज-जन-हितकारी तेंवि राष्ट्रा विभूती
भजन पुजन त्याचें राष्ट्रभाग्योन्नतीस
प्रमुख निपट वाटे हेतु विद्वन्मतीस ३६

उदरिं भरतभूच्या त्या बहू जन्म घेती
पद फडणिस नाना त्यांमधीं श्रेष्ठ घेती

नय-मति-गुणरूपी थोर संपत्तिभार
पुढिल निजपिढ्यांना अर्पिती ते उदार ३७

अहह ! परि तयाची फारशी वास्तपुस्त
शतकवरि न कोणी घे वसे राष्ट्र सुस्त
स्मृति-विरति-धुळीचा लोपवी लेप त्यास
क्षणभरि भय वाटे तो रिघे कीं लयास ३८

' फडणिस संस्था " ही केशवेच्छें निघाली
स्मरणविग्रहधूळी झाडण्या सिद्ध झाली
अविरत करिताहे ती तदर्थ प्रयास
निज गणपति देवो सिद्धिदाता यशास ३९

* * *

आतां सारे रसिक पुरवा एक हें अल्प कोड
" तुह्मां 'राधारमण' कविचे बोल लागोत गोड "
नम्रत्वें ही करुनि विनती खिन्न ही काव्यदेवी
विश्रांतीचें अमृतसम तें या स्थळीं सौख्य सेवी ४०

———

# — मोरोपंताचा प्रभुद्रोह —

# मोरोपंताचा प्रभुद्रोह

( निग्रहप्रकार )

स्वभक्तभयभंजका, सकलकामनापूरका
विशुद्धमतिदायका, सुरसवाग्वधूकामुका
नमूनि गणनायका, नवल जें सुषुप्तींत मी
जसें निरखिलें तसें, उमटवीन काव्यक्रमीं १

तरंगततिनीं सदा, विषम सिंधुपृष्ठावरी
भुजंगपति विस्तरी, धवल अंग बेटापरी
फणावलिमिषें तिथें, समरसिद्ध नौकावली
करी रिपुंस वारुनी अभय-शांतिची सांवली २

वसे सुखद त्या स्थलीं भगवती जगत्स्वामिनी
अमोघबलसेविनी, सकलशत्रुसंतापिनी
मणिप्रवरशोभिनी, विमल-धी-कला-संगिनी
सुरूपगुणशालिनी, हरि-सुमूर्ति मायाविनी ३

सुमंत्रिसहिता सदा, सकल सृष्टिसूत्रांस ती
करीं सहज चाळवी, चरणिं वागवी श्रीसती
तदीय पद-पंकजा, प्रणति पंच भूतांसही
अवश्य करणें पडे, अतुल ऋद्धि हो सिद्धिही ४

समस्त विषयांवरी, सम वसें तिची भावना
श्रुतिप्रकट गोष्ट ही, स्मृतिमधें दुजा भाव ना

परी अधिक ती धरी, प्रणय आर्यभूमीवरी
श्रुतिस्मृतीविरुद्ध ही परि खरी असे वैखरी ५

गळां पडुनि आवळी, प्रणयपाश जों जों गळा
अपूर्व कृतिची स्फुरे, अति विचित्र तों तों कळा
समुद्रतलवासिनी, परमपूज्य ती देवता
करी भरतभूहिता स्वगत पूज्य ती देवता ६

विहार पशुच्या क्रमीं, नरपशुव्रतीं सारता
वदान्यवरवंचना, परमदारुणक्रूरता
प्रमोद अबलावधीं, विहरणें परस्त्रीसह
रची विविध दोष ती, विविधरूपिणी दुःसह ७

अशा कृतिमुळें तिला, बहुत लाविती दूषणें
परी निमुट आयके, जणुं तयां गणी भूषणें
"नुरो भरतभूमिला, मजविणें दुजा आसरा"
तिच्या मनिं न सांपडे, इतर हेतुला आसरा ८

गमेल तिज इष्ट तें, करुनि इष्ट त्या हेतुला
कृतार्थ करण्या करी, श्रम-परंपरा निस्तुला
परंतु तिज आवडे, अधम येति दुष्टाग्रणी
अनार्य जन आर्य हे खल कृतघ्न जैसे फणी ९

सुखी सधन लोक तों, त्यजिति हा प्रभुद्वेष न
वळे प्रभुकडे सदा, कठिण काळ येतां मन
असें मनुनि ती मनीं, प्रथम आर्यभूसंपदा
करी स्वपदवासिनी, मग पुढें सरे आपदा १०

अवृष्टि अतिवृष्टिही, फिराति घोर सांथींसवें
हताश जन जाहले, विपुल ढाळिती आंसवें
स्मशानमुखिंची प्रभा, निशिदिनीं वसे कायम
गमे मनुजहीन ही, भरत-भू करी का यम ११

दशा भरत-भूमिची, बघुनि ती सुखा पावली
वदे स्वमनिं जों, 'अतां सफल वासना जाहली'
तिच्या निकट पातला, मुनिमृगेंद्र तो नारद
सजीव जणुं पत्र जो, त्रिभुवनस्थवृत्तप्रद १२

करी सतत जो स्थिरा, भुवन-भव्य-पक्षीं मती
प्रणाम मुनिपुंगवा, करुनि त्या पुसे क्षेम ती
करीं धरुनि त्रैसवी कनकविष्टरीं सादर
वदे मग मुनी नसे, सरळ भाषणीं ज्या दर १३

जगात्रितयशासका, प्रभुवरा रसानायका
प्रपंचभयहारका, सकलकामनादायका
प्रभो सकल जाणसी, कथिन मी परी जें तुला
करीं श्रवण आदरें, पुरविं या मनोहेतुला १४

करीं विधिवशें विभो, गमन आर्य भूमीप्रती
तुझ्या निकट पातलों, त्वरित तेथुनी संप्रती
भयावह तिची दशा बघुनि मूक वाग्देवता,
दयारसनिधी गमे वदसि ' पाववूं देवता " १५

सुदैन्य उजवीकडे नृपति-कोप डावीकडे
अवग्रह उभा पुढें गदधुरीण पाठीकडे

धरा पदतलीं हले वरुनि वज्र माथीं पडे
अशा गहन संकटीं अहह ! आर्यभू सांपडे १६

प्रिया पतिविना रडे, पति सतीविना ओरडे
मृतात्मज पिता घडे सुत वितात शोकीं पडे
प्रसू शिशुविना झुरे शिशुस माय दूरी सरे
विबंधु भगिनी फिरे अनुज ती विना बावरे १७

अशौचमलिनप्रभा सकल भूसुखा सारवी
ग्रहग्रसनहीन कीं ग्रहणघोरवासा रवी
गमे गगनीं भोगतो, तुजसि अर्चना अंतरे
भले वदति माधवा " बघसि कां पुरा अंत रे' १८

विपन्न जन मारिती तुजसि हांक दीनस्वरें
परी श्रवण झांकिशी रिझविशी न त्यां उत्तरें
म्हणूनि जन बोलती उघड सर्व रागावुनी
प्रभूस निजवी कली हित न ईश्वरा गावुनी १९

अशेषजन-वृत्ति जों तुजकडे असे कावली
मयूर कवि-वर्य तों प्रगटवी स्व केकावली
करूनि कवि-कीर्तिचा कळस जी तया वृत्तिचा
असंभव निदर्शवी उभय-संभवा-वृत्तिचा २०

सदा सुरसदायिनी, चरणचारुताधारिणी
सुवर्णपदशालिनी, विविधदैवताधारिणी
मयूरकविची कृती मजसि धेनुशी वाटते
कितीक वदती परी 'अवगुणा करी वाट ते' २१

श्रुति-स्मृति-पुराणीं जो सुरमुनीश्वरीं गायिला
विशेष महिमा असे उचित सर्व तो गायिला
अशुद्धवदनामुळें तिजसि दूषणें लागती
मयूरकृतिला तशी प्रभुविरोधिनीला गती २२

स्मशानसम भासलें मज महानिराशावळ
परिस्थिति चिता गमे, जन-दिकोप उग्रानळ
मयूर कवि अग्न दे स्वकृतिवायुसंधुक्षित
जिवंतचि जळे तुझा प्रतिनिधी जणूं संस्थित २३

तुझ्या प्रतिनिधीसवें तव सुमंद-सत्ता सती
सजे विकळ जावया, सुदृढ तोचि घे ध्यास ती
समस्त जन पाहती कुतुक तें तिच्या रक्षणा
त्वदीयकुशलेच्छुंचा श्रमहि चालला या क्षणा २४

तुम्हांसचि कळे बरें उचित तें करा यापुढें
मदीय मति कायशी सकललोकरायापुढें
अशा वदुनि वाणिला सुविषमुक्तता राजसा
अदृश्य मुनि जाहला गगनमुक्त तारा जसा २५

प्रवृत्तिमय जागृती मुनि महातपा चारण
करी प्रभुसि अर्पितां प्रभु यमास पाचारण
करीं ग्रहणपात्रिका वितरुनी स्वनामांकिता
वदे धरुनि आण त्या कविस शीघ्र नामांकिता २६

करी कुवलया सदा नवरसार्पणें गार जो
परार्थ निजदेहही झिजवि मान्य आर्यांस जो

प्रसाद भुवनांतरीं विदित योग काव्यासह
मयूर-कविचंद्र तो ग्रहण भोगितो दुःसह २७

( जनक्षोभ )

यदा कविस लागती ग्रहण-वेदना दुःसहा
तदा गजबजोनि हे सकल जाय सर्वंसहा
जशी घनवनस्थली खग पशूंस जी आसरा
तदंतरिं सणाणतां सहज बंदुकीचा छरा २८

स्वयें ग्रहणवन्हिनें कवळिला असे तो जरी
तरी अधिक राग तो प्रकट सर्व लोकीं करी
कसास उतरे पुरा जनहितेच्छु; तन्मोचन
न कां झटति व्हावया सकल एक चित्तें जन २९

स्त्रिया पुरुष अर्भकें सकल-वर्गवर्णातलीं
मयूरकविच्या गमे असति कीं कुटुंबांतलीं
कशास वदतों " गमे " खरिंच तीं तशीं तो पिता
तदीय करण्या हिता तनुमनाधना ओपिता ३०

स्त्रिया पुरुष अर्भकें सकल-वर्ग-वर्णातलीं
चुकूनि वदलों असें, अबहु गाळितों त्यांतलीं
खरीं असति पूज्य तीं मिळवितां तयां सोडितां
न मूळ गणनेंत ये लवहि बाध कीं तत्त्वतां ३१

स्वपक्ष परपक्ष हा विफलपक्ष आटोपला
स्वजाति परजाति ही कलह शुष्क हा संपला

शिशू-तरुण-वृद्ध या मिळत भेदभावा गती
धनी अधन सारखे जन लघू गुरू वागती  ३२

विमुक्त घडतो कसा कविकुलेश या वृत्तिचा
प्रचंड भडके शिखा प्रळय वन्हिच्या तोडिची
तिनें हृदय-कुंडिच्या अखिल जाळिल्या वासना
म्हणूनि विषया दुजा भरतभूजनीं वास ना  ३३

विचार दुसरा खळे, इतर कामना मावळे
दुजी न रुचि आढळे, मति न अन्य कामा वळे
न अन्य नयनां कळे, वदन अन्य बोलीं खिळे
दुजें श्रुतिस नातळे, सकल तन्मयत्वा मिळे  ३४

अवंचक चहूंकडे चतुर चार नानामिषें
प्रवेश करिती जनीं विविध टाकिती आमिषें
मनोमय-गृहांतुनी भुरळ घालुनी वृत्तिला
प्रभुश्रुति-पथाचिया सतत आणिती भेटिला  ३५

समस्त कळतां अशी प्रभुवरासि वस्तुस्थिती
मिळे विपुलविस्मयें वदनिं अंगुलीला स्थिती
तटस्थ मति होतसे विलग ओष्ठही जाहले
तदीय हृदयीं तदा विविधभाव हे लोटले  ३६

' अहा सकलभूतलीं परमधन्य ती मावली
' विभूति उदरीं जिच्या भुवनमान्य ही मावली
' परोपकृतिचें करीं रुचिर बांधुनी कांकण
' जिनें मिळविलें जगीं विमल कीर्तिचें आंदण  ३७

' स्वदेशसमुपासनें भजनिं जे तुझ्या लागती
' प्रभू बहुबलाढ्यही वचकुनी तयां वागती
' प्रभूंस महती किती सकल सृष्टिचीं राहटी
' फिरे उलट द्यावया उचित धैर्य त्यां संकटीं ३८

' जरी घडति आपदा जन न सोडिती तत्पदा
' जरी पडति बंधनीं मिळविती यशसंपदा
' जरीं न नृपलक्षणें जनाभिषक्त ते भूपती
' घडो मरणहीं तरी, अमर होऊनी नांदतीं' ३९

विचार लहरी अशा हृदयसागरीं घोळती
असंख्य जनपूर तों प्रभुसभोंवते लोटती
' विलंब न करा प्रभो कविवरासि-द्या सोडुनी '
असा करुनि घोष ते गगन टाकिती कोंडुनी ४०

प्रभु त्वरित बेटसा मनुजसागरें घेरिला
क्षण स्तिमित जाहला वज्र घडे जणूं घेरिला
सजीवलहरी परी तडक तच्छरीरावरी
गमे पडुनि आणिती प्रभुसि देहभानावरीं ४१

सुमंत्रकुशलाग्रणी जगदधीश तो लाघवी
सरे न निमिषार्ध जों, नवल थोर तों दाखवी
पुरी खिळुनी टाकिली जनकरांघ्रिचीं चेतना
मुखाक्षिरसनाव्रजा गमति चित्रसे ते मना ४२

अनंतर उभारुनि स्वकर तो तयां लक्षुनी
वदे वचन तें परी जन न आयके तें कुणी

‘ नको इतर, सोडुनी कविस द्या ’ अशी हांक ते
नभीं पसरती जिला प्रलयगर्जना लाजते ४३

स्वमंत्रबळ योजुनी प्रभु खिळी जनांचें मुख
सगर्व फिरवी क्रमें विजय-दृष्टि त्यां संमुख
तदा कुपित-दृष्टिनें प्रखर-खड्ग धारेपरी
अदृश्य करिती व्रणां जन जनेंद्रदेहावरी ४४

प्रभू नयन झांकवी जन सुदीन होती तदा
उपाय नुरला दुजा धरिति घट्ट इच्छापदा
कटु स्ववचनावली मधुलवें क्वचित् मिश्रिता
अशेष जनमंडला परिसवी जगत्पालिता ४५

“ अहो सकल आर्यहो, अजि अनार्य का जाहलां
सुधर्मपथ सोडुनी अधममार्गि कां चाललां
सुभक्ति तुमची सदा प्रभुपदीं असे गाजली
असें असुनि आज कां, त्यजुनि ती तुम्हां चालली ४६

अवश्य करणें पडे विनवणी प्रभूच्या पदीं
तरी विफल मार्ग हा, अनय लोटितो आपदीं
चला नयन झांकुनी मदुपदिष्ट मार्गें सदा
तयांत हित, अन्यथा अहित, हें न मिथ्या कदा ४७

न वक्र तनु-रोमही झगडतां तिन्ही लोक हो
अपाय करण्या तया धजतसां कसे मूढहो
विरोध करितां वृथा प्रभुसवें न हें चांगलें
हटें भिडुनि अग्निशीं तृण कधीं असे वांचलें ४८

मदीय-मुख-मारुतें सकल-मेदिनीमंडळ
उडेल गगनोदरीं विदित हें तुम्हां मद्बळ
तुम्हां मशकमूर्तिची मजपुढें कथा कायशी
विरोध विभुचा कुणा जगतिं या करी का यशी ४९

दशानन महाबळी प्रभुविरोध घे त्या बळीं
वसे प्रभुवरा छळी ह्मणुनि भूतळीं तो बळी
प्रभूसि रिपु आकळी कुगति कंस घे आगळी
कुरूंस यम निर्दळीं करितिं जें प्रभूशीं कळी ५०

असंख्य जन अन्यही प्रभुविरुद्ध जे वागले
कृतांतरिपुच्या पथा सकल बापुडे लागले
ह्मणूनि समजा मनीं प्रभुशिं वैर जे मांडिती
स्वकीयवसनांवशीं निपट आग्नि तें बांधिती ५१

मुळीं न हृदयीं धरा प्रभुविरोधसर्पास या
मदुक्त उपदेश घ्या दुरित पाववीं जो लया
कुबुद्धि न सुचो अशी नच यशा शिवो काळिमा
प्रमाद पहिलाच हा करितसें ह्मणूनि क्षमा ५२

तुह्मी सकल मागतां कविवरासि द्या सोडुनी
पसंत मज, आयका परि अटी तया लागुनी
त्रिलक्ष धन राहुं द्या जन कुणी भला ओलिस
मदुक्त-नय रीतिनें उघड हेंचि ये ओलिस ५३

असेल जरि मान्य हें कविस देतसें सोडुनी
परी दिवस नेमितों हजर तो असो त्या दिनीं

सदोष, गत-दोष, का कविकृती असे ती कशी
यथाविधि घडेल हो उचित ती तदा चौकशी ५४

स्वमंत्र विभु संहरी प्रथम मुक्त होती जन
भयें जन न आदरें प्रभुसि घालिती वंदन
तिथेंच धन अर्पिलें जन भला दिला त्यासवें
मिळे कविस मुक्तता परम हर्ष लोकां सवें ५५

( परीक्षणप्रकार )

असे जलधिवेष्टिता प्रभुपुरी जगीं विश्रुता
यदीय भुवनाद्भुता मतिस गुंगवी चारुता
धरी रुचिर "मोहिनी" ह्मणुनि नाम जी सार्थक
जिला बघुनि होतसे नयनवृत्तिचें सार्थक ५६

जिला वदति आद्यभू भुवनिंच्या घडामोडिची
दुजी भरतभूमधें नच पुरी जिच्या तोडिची
असंख्यजनपोषणा सतत मायशी जी करी
कवींद्रकृति-निर्णया प्रभुसि वाटली ती बरी ५७

विशाल गगनस्पृशी, रुचिर शांत भव्याकृती
प्रशस्त नयमंदिर, प्रगटवी प्रभूची कृती
जिथें सुर-गुरु स्वयें स्मृति-नयप्रपंचीं कृती
प्रभूक्तदिनिं पातला निरखिण्या कवीची कृती ५८

महाकुतुकरश्मिनें जनसमूह आकर्षिला
तुडुंब नय-मंदिरीं निरवकाश तो कोंबिला

उभे सदन वेष्टुनी स्थळ न ज्यां मिळे अंतरीं
मनुष्यमय निर्मिलें सदन तें गमे अंतरीं ५९

असंख्य-मुख-निर्गत प्रलयगर्जितासारखा
प्रचण्ड परि अस्फुट स्वरसमुच्चय स्वमुखा
विदीर्ण सहसा करी, दचकला जणूं भास्कर
क्षणैक म्हणुनी घडे गगनमध्यभागीं स्थिर ६०

तदा सुरगुरू तसे प्रभुसि वाटले जे भले
नऊ चतुर पंच ते शुभनयासनीं शोभले
वकील जन अन्यही प्रभुनियुक्त ते पातले
पवित्र कविपादही नयगृहांतरीं लागले ६१

क्षणें विलय पातला, सकल मिश्र कोलाहल
करीं परम शांतता प्रकट पूर्ण सत्ताबल
भरे कविकुलेंदुची सकललोचनीं मूर्ति ती
परस्परवियोग कीं, म्हणुनि पापण्या सोशिती ६२

सुशांत नयमंदिरीं धरुनि नित्यरीतिक्रम
घडे कविकुलेंदुचा कृतिनिरीक्षण-प्रक्रम
तया श्रवण अर्पिती जन अनन्यचित्तें जसे
न सुस्वर नटाचिया मधुर गायना ते तसे ६३

स्वयें प्रभुविरोधिनी असुनि अन्य लोकांप्रती
" विरोध विभुचा करा " म्हणुनि होय कीं सांगती
मयूरकृतिला असें उघड द्यावया दूषण
वकील विभूपक्षिचा उठुनि बोलला भाषण ६४

नयासनविभूषणा सुरगुरो सुधीसागरा
अहो चतुर पंच हो उचित निर्णयातें करा
वदे मधुर भाषण भ्रमद दोष-निवृत्तितें
वकील कविचा न तें भ्रम करो मनोवृत्तितें ६५

विचार कु-सु-पूर्व जे कविमनीं सदा घोळती
प्रबंधमयदर्पणीं प्रतिफलत्व ते पावती
प्रमेय नयनापुढें भुवनमान्य हें राखुनि
कवींद्र-कृति पारखा विनवितों तुम्हांलागुनी ६६

" मला निरखितां भवत्चरणकन्यका आपगा
म्हणे अगइ ऐकिलेंहि न कधीं असें पापगा
कर श्रवणिं ठेविते नुघडि नेत्र घे भीतिला
न घालिन भिडेस मी जरिहि कार्यलोभी तिला ६७

जयें परम घोर हा, दुरितमेरु हो जोडिला
पुरेल नच वाल्मिकी, तिळहि ज्याचिया जोडिला
अशा कविकुलाधमा प्रभुविरोध येना कसा
जया जगतिं लेखिती, सकल-पातकीं नाकसा ६८

अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा
जिहीं स्वचरितस्थळीं पिकाविला अघांचा मळा
अशां स्थळ मिळे जरी प्रभुरिपूंस काव्यांतरीं
तिथें प्रभु-विरोध घे वसति जेविं काव्यांतरीं ६९

वरील वचनावली कविमुखांतुनी ज्या निघे
कसा प्रभुसुभक्त त्या उलट पक्ष मानूनि घे

कळे न मुळिं हें मला थबकली मतीची गती
असे न भुवनत्रयीं दुरित-भक्तिची संगती ७०

उणें प्रभुसि बोलणें, विफल दोष त्या लावणें
अभक्ष्यवश मानणें, विषयवासना लादणें
न मान लव राखणें, मतिविनाश आरोपणें
न कोण बुध हीं म्हणे, प्रभुविरक्तिचीं लक्षणें ७१

सदोष दिसते जरी प्रभुचरित्रलीला वरी
विदोष परि अंतरीं जनहितावलीला वरी
सुमंद-मतिला कळे कविस या न सिद्धांत हा
म्हणूनि गणिला असे प्रभुविरोधसिद्धांत हा ७२

निवास मिळतो अशा क्षितितळीं असंख्यां जनां
खरीच नुमजे जयां गहन ईश्वरी योजना
परी न कविकीटसे प्रभुसि तें वृथा निंदिती
' अतर्क्य महिमा तुझा ' म्हणुनि त्यास तें वंदिती ७३

अशीं जनमनांतुनीं विमल भक्तिची निर्झरी
गतानुगतिनें निघे प्रभुपयोनिधीला वरी
कुशब्दगिरिनीं तिला अडविण्या झटे हा कवी
तयां उचित योजणें प्रखर शासनाचा पवी ७४

अनादरपदक्रमें उघड ताडितो ईश्वरा
नसे अजुनि जन्मला त्रिभुवनीं असा मोहरा
नृशंस शिशुपालही सदसदर्थवाची पदें
स्तवीं तशिंच दूषवीं छल-पटु प्रभूचीं पदें ७५

करी सकल सृष्टिचें अविरतश्रमें पालन
त्यां प्रभुसि काय हो स्तुतिविणें दुजें वेतन
प्रभुस्तुतिस साच त्या कविकलंक ये आडवा
जगद्धननदोष तो रचितसे मनीं वागवा ७६

सयुक्तिक न हीं दिसे विफळशी गमे वल्गना
अहो सकल सभ्य हो करुं नका अशी कल्पना
असे कविकुबुद्धिचे तुटति थोर तारे कसे
प्रचीत बघणें तरी बघुनि घ्या उतारे कसे ७७

" न पावासि म्हणोनि मी म्हणतसें तुला आळशी "
" पडेल समजाविशी तशि करोत कां लाजशी ? "
" सदैव अपराध हे रचितसें असे कोटि गा "
" स्वयेंहि कथितों नसे तिळहि लाज मी कोटिगा " ७८

" भलें स्मरण जाहलें समयिं कंसदासी करें "
कशी उजरली समुज्वलदया-सुधासीकरें
तुम्हां स्वरिपुची तशी बटिक आवडे मत्कृती
नको न सजवे असा बहुत काय मी दुष्कृती " ७९

" जिणें रस पहावया प्रशिथिलीं रदीं चावलीं
सुवासही कळावया प्रथम नासिकीं लाविलीं
तुम्हांसि शबरी तशीं बदरिका फळें दे जुनीं
कथा अशि असो स्वचरितें तुम्हीं मेजुनी " ८०

असे अमित दाखले कविकृतींत हो दाटले
तुम्हास परि दाविले प्रमुख जेवढे वाटले

प्रभू कविमनीं सले ठरविण्या पुरें जाहले
मदीय वच संपलें उचित तें करा हो भले ८१

असा निपट रावुनी कपटयुक्त कोटिक्रमीं
करी विकट दोष तो प्रकट सर्व काव्यक्रमीं
करी विकट कार्य हें सुघटसें बसे नंतर
उठे उलट पक्ष त्या तिखट द्यावया उत्तर ८२

" अहो सकल सभ्य हो नयगृहांत ज पातले
असो नृपति रंक वा समसमान ते जाहले
असें स्वमनिं वागवा रसिकवर्यता स्वीकरा
कवींद्रकृति पारखा मग यथार्थ जें तें करा ८३

" सदोष कविराज हा ठरविण्या उतारे दिले
समग्र कृतिपासुनी विलग ते जरीं पाहिले
पदच्युतिविरूप ते नृपतिसे न कीं शोभती
यथास्थलनिवेशित प्रचुर चारुता पावती ८४

" मयूरकृतिचें करा मनन हो अशा रीतीनें
किती मग कळेल कीं प्रभुविरोध केला तिनें
दिलें उलट बाजुनें तिजसि जें महा दूषण
शिशूसहिं गमेल तें तिजसि थोर ही भूषण ८५

" असें परम पातकी बहुत दुष्कृती दीन मी
तुझ्या पतितपावना पदसरोरुहातें नमीं "
पराशरसुतादिक प्रभुसि जे असें बोलले
तपोगगनसूर्य ते म्हणुनि पातकी जाहले ? ६८

असे विनयरीति ही सकल संत जी पाळिती
अहंपणतृणा जिची धरुनि आंच ते जाळिती
तिच्याच कविवर्य हा सरळ पातला आश्रया
तिथें प्रभुविरोध का प्रभुसुभक्ति ये प्रत्यया ? ८७

अजामिळ अघासुर व्रजवधू बकी पिंगळा
जिहीं स्वचरितस्थळीं पिकाविला अघांचा मळा
अशां गति दिली प्रभो मज न, भाव हा प्रेमळ
तदुक्तिसहि दूषावि प्रभुविरोधरूपी मळ ? ८८

प्रभो तुज अनन्य मी शरण धांव गा पाव गा
अपार भवसागरा उतरुनी झणीं लाव गा
नसे गति तुझ्याविणें धरितसें तुझी कांस रे
न कां मजासि पावशी सदयता तुझी का सरे ८९

असा विमल भाव जो धरुनि अंतरीं आळवी
प्रभूसि करुणस्वर प्रभुविरोध तो सत्कवी
करील, नच संभवे गगनपुष्पसें हें कदा
मनोरम कृतींत तो कुठुनि त्याचिया घे पदा ९०

अहो मलयजापरी प्रभुपदाब्जसेवा-तपें
कुडी झिजविली जयें खरचुनी तपेंच्या तपें
कमी अधिक तो जरी समायिं बोलला क्षम्य तें
निसर्गनियमें तया अशिच योग्यता लाभते ९१

‘अतर्क्य महिमा तुझा गुणाहि फार बा हे विधी
श्रुतिज्ञाहि म्हणे सदा स्तविल आमुची कैंवि धी

तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ९२

अशा वचनमौक्तिकें रसिककर्ण जो तोषवी
प्रभुस्तुति-नदीरया अडविणार तो का, कवी
असेल जरि शक्य हें मग यथार्थ ही योजना
मुळीं न कळली तया गहन ईश्वरी योजना ९३

जशी जनकनंदिनी, दशमुखें वनीं गांजितां
जशी द्रुपदकन्यका फरफरां सभे आणितां
मयूरकृति ही तशी, त्रिविधताप हे जाचितां
प्रभो मजसि सोडवी म्हणुनि आरडे तत्त्वतां ९४

कदुर्य विभवक्षयें, जननिवांचुनी बालक
जलारहित मीन कीं घनजलाविणें चातक
तसा प्रभुकृपेविणें, तळमळे रडे आरडे
तया कविकुलोत्तमा प्रभुविरोध कैसा जडे? ९५

प्रभुस्तवनशालिनी सुरसभक्तिची जी खनी
तुम्हां दिसतसे जरी कृति अशी प्रभुद्रोहणी
सहस्रकिरणीं तपे गगनमध्यभागीं रवी
तया नयन झांकुनी वदतसां निशेची छवी ९६

विदोष करण्या असें, कविकुलाग्रणीची कृती
वकील वदला बहु, स्मृतिनयोक्तमार्गीं कृती
बसे मग यथास्थळीं, समुचितोपसंहार ही
घडे, ध्वनित जो करी, कविवरीच ये हार ही ९७

सगर्भयुवतीपरी, तदनुनिर्णयोपस्थिती
यथासमयिं भोगिते प्रवस-वेदनांची स्थिती
"सदोष" "गतदोष" वा जनन उक्ति घे कोणती
समग्र जन उत्सुक, स्तिमित होउनी पाहती ९८

" सदोष " विषमोक्ति ही, प्रखर शस्त्रधारेपरी
सुविव्हळ जनां करी, हृदयमर्मभागा चिरी
मिळे वसति बंधनीं, कविस सार्ध संवत्सर
गिळी सुकविरत्न हें अनयमत्स्य हो दुर्धर ९९

सुदीन कविची दशा, सहचरी विजेची घडे
क्षणें गमन ती करी, भरतभूत चोहींकडे
प्रचंड-पविपातशी, श्रवणिं आदळे ज्याचिया
हरी प्रबळ मूर्छना, सकळ वृत्तिला त्याचिया १००

कवीन्द्र गतिची कथा सकल वृत्त-पत्रांवरी
बसूनि सुखरूप ही गमन सर्व ठायीं करी
तदादर करावया पथिं पथीं जनांचे थवे
समुत्सुक उभे तयां इतर कांहिंही नाठवे १०१

अपूर्व युतियोग जो बहुत दीर्घ काळें घडे
अनन्यमतिनें जसे गणक पाहती त्याकडे
सहस्रपट त्याहुनी अधिक एकचित्तें जन
कविप्रकरणा निजा करिती दृष्टिचें भाजन १०२

घडे धनिक-मंदिरीं श्रुतिस गोड तद्वाचन
अहो श्रवण-लालसा ! मज तिचें न हो वर्णन

निरुद्ध करुनी तदा दळणकांडणाची क्रिया
तया श्रवण अर्पिती श्रवणलुब्ध शूद्रास्त्रिया १०३

(आर्यभूचा शोक)

सदा भरतभूमिचें हृदय दुःखदाहें द्रवे
सुतप्त नयनाश्रुंच्या गतिवशें जणूं तें स्रवे
घडे म्हणुनि शून्य तें मग कशी न हो शून्य ती
मनोरथमयी सुधा सतत तेथ जी नांदती १०४

शरीर कृशता धरी, वदन पांडुता स्वीकरी
रुची न रसना वरी, लवहि अन्न पाण्यावरी
न हस्त पद वा करी, उचित आपुली चाकरी
न वस्त्र नग आदरी, विकळ आर्यभू-सुंदरी १०५

स्वदेशहिततत्परा अतुल बुद्धिच्या सागरा
अह शुभगुणाकरा, विमल कीर्तिच्या आगरा
अहा कविधुरंधरा, सकळ शोभवीशी धरा
मदीय कुशिंचा हिरा मजसि नित्य तूं आसरा १०६

सुदीन तुजवीण मी असुविणें जशी वा कुडी
रुते व्यसनकर्दमीं अहह ! गायशी बापुडी
बहु कुदिन कंठिले तुजकडे बघोनी पहा
परी मम विपत्तिचा अजि घडे कडेलोट हा १०७

“करूं छळ तुझा वृथा” प्रभुमनांत होतें जरी
किमर्थ नयनीतीचा विफल थाट केला तरी

असाच अथवा असे उचित राजनीतिक्रम
अनीतिंत सुनीतिचा उदय पोखवावा भ्रम

अहा कविवरा मिळे, तुजसि कोरडी भाकरी
सदन्न मजला गमे, म्हणुनि कालकूटापरी
तनूस कपडे तुझ्या, अशुभ तोकडे लाभती
मदीय बरवे तरी, कफनसे मला वाटती १०९

कशी कुसुम-कोमला तुजसि नीज ये फत्तरीं
असें शयनकंटकीं भ्रमत याचिया उत्तरीं
स्वरूप तव साजरें अजि विरूप झालें खरें
असें स्मरण होउनी मजासि बा भरे कांपरें ११०

कवे कुदिन कंठिशी कठिण कामकाजीं कसे
तुला न सणवार तो विदित बंधनीं बा असे
विषादविष यामुळें हृदयसंपुटीं दाटतें
मदीय सुख-शांतिचे दिवस चालले वाटतें १११

महा कुशल सर्वदा गलितधैर्यसंजीवनी
असा उमटला तिच्या हृदयिं शून्य आशाध्वनी
" अपील विभुच्या पदीं कविकुलेश-मुक्तिस्तव
करीं भरतभूमि गे " म्हणुनि जो करी प्रस्तव ११२

कविप्रकरणीं तिचा व्यय अपार पूर्वी घडे
न कोशसदनीं तिला धन अवश्य तें सांपडे
सुवर्ण तनुची त्वचा म्हणुनि आपुल्या सोडवी
अपील करण्यास जो उचित खर्च तो चालवी ११३

अहर्निश अखंड ती, बहु परिश्रमातें करी
भगीरथहि पाहुनी, वदनिं अंगुलीतें भरी
परी विफल जाहला, सकलही खटाटोप तो
प्रभूस कविदंड कीं उचित सर्वथा वाटतो ११४

प्रयत्नगति खुंटतां प्रभुवरी बहू कोपली
दुजें करिल काय ती ? रडुनि शांतता पावली
तशीच भरतावनी परमसंकटोद्वेजित
अधीर कविदर्शना दिवस बैसली मोजित ११५

" हटें कृतिस आपुल्या जडविला सुदोषग्रह
असंशय विदोष ती " दृढ असा कवीचा ग्रह
सुखें स्वसदनीं तसे दिवस बंधनीं तो क्रमी
न चित्त, तनु सांपडे अनयदत्त दण्डक्रमीं ११६

शरार्त हरिणी जशी उलटते शिकारीवरी
करील मजशीं अतां भरतभूमिही त्यापरी
सदैव भयबंधनीं प्रभु अशा पडे त्याजशीं
कवीन्द्र सुटल्याविना सुखद मुक्ति लाभो कशी ११७

सरे पडुनि बंधनीं कविस एक संवत्सर
" विमुक्त कवि जाहला " सुखदवर्ण तो सुंदर
महत्त्व बहु आणिती सकल वृत्तपत्रांप्रती
सुवर्णसम का न ते मुदित दृष्टिला वाटती ११८

आर्यावर्तात साऱ्या श्रुतिसुख सनया चौघडे वाजताती
होई दाटी गुढ्यांची प्रमुदित जन ते शर्करा वांटिताती

ब्रह्मानंदाहुनीही सकल जन-मना थोर आनंद झाला
ज्याच्या मुक्तिप्रसंगें वदा जन असो आयुरारोग्य त्याला ११९

अनुष्टुप्

त्याच कोलाहलें वाटे जागृती मज लाभली
अमूर्त स्वप्नलीला ती शब्दमूर्तींत गोंविली १२०

पृथ्वी

स्फुटप्रतिफलच्छलें सकलदेशभक्ताग्रणी
कृतीस मम भूषवी ‘ टिळक ’ वंशचूडामणी
म्हणूनिच हरील ती भरतभूजनांच्या मना
अलंकृति दुजी नसे तिज नसो, तिचें काम ना १२१

मंदाक्रांता

आतां सारे रसिक पुरवा एक हें अल्प कोड
तुम्हां राधारमणकविचे बोल लागोत गोड
तेणें माझी श्रमपरिवृता वाग्वधू विश्रमास
सेवोनीयां, वरिल मुदिता अन्यकाव्यप्रयास १२२

# — आर्यमाता विलाप —

# आर्यमाता विलाप

( मालिनी )

थळ थळ थळ अश्रू शारदे तू न गाळीं
तुजशि उचित नाहीं मोह हा कार्यकाळीं
कठिन मन करीं गे आंवरीं अश्रुपात
निपट पदरिं येतो नातरी कार्यघात १

तुज तिलकवियोगें दुःख वाटे अपार
कवन-रुदन-योगें तें करीं मंदसार
निज मन निववाया मार्ग तूतें न अन्य
समयिं समुचितार्थां साधुनी हो सुधन्य २

मृगमदसमवर्णी कीर्तिगंधी सुवृत्त
सतत भरतभूच्या भद्रदाना प्रवृत्त
तिलक भरतभूचा दिव्यशोभानिधान
अहह ! गळुनि जाई रम्य दैदीप्यमान ३

निजमुख पसरोनी दंडमत्स्यें अघोर
शिव ! शिव ! गिळिलें हा आर्यभूरत्न थोर
धरणिवरि उदंत स्वांतभेदी कराळ
दुनतर पसरे हा मूर्त उत्पात काळ ४

परिसुनि तिलकाची दुःसहा दण्डवार्ता
श्रुति थर थर कांपे दुःखशीतज्वरार्ता

स्मृति विकल सुखांकीं विस्मृतीच्या त्रिसावे
गलितधृति पुराणस्वांतही भंग पावे ५

भयज-विपुल-कंपें हादरे भूमिगोल
श्रमशिथिल शिरांचा सांवरी शेष तोल
जलनिधि निजसीमा सांडुनी क्षुब्ध भारी
मुखकवळ कराया धांवती भूमि सारी ६

नयनजलसमुद्रीं आर्यभूच्या दिनेश
सपदि पतन पावे सोडुनी स्वप्रदेश
रविविरहवशें कीं चंद्र तारा निराळ
भयदजलदपाशीं अर्पिती कंठनाळ ७

निबिड तिमिर दाटे दिङ्मुखीं काळरूप
विगुण विकल भासे सर्व शून्यस्वरूप
प्रलयसमय साक्षात् आर्यभूच्या मुलांस
विवृत वदन धांवे क्रुद्ध कीं खावयास ८

परहितपरपूर्वी राम जातां वनाला
दशरथनगरीं जो थोर आकांत झाला
तिलक-विरह साऱ्या आर्यलोकां तयाचा
कटु अनुभव आजी चाखवी तीव्र साचा ९

अनय सुर-रिपूंचा द्वारकाद्वीपवास
व्रजवसतिपरा त्या दे यदा माधवास
उघड मृतकला त्या गोकुळश्रीस आली
अजि तिलकवियोगें आर्यभू तेंवि झाली १०

वदनकमलशोभा शून्य दृक्तेज शून्य
हतबल तनुयष्टी शून्य हृत्कोश शून्य
चलन वलन शून्य ज्ञानधीधर्म शून्य
तिलक-विरहदग्धा आर्यभू शून्य शून्य ११

विधि-समय-नियोगें हा सरे शून्यभाव
स्फुरण तदनु पावे चित्कलेचा प्रभाव
प्रथम हृदयकुंडीं क्रोधवन्ही उफाळे
गर गर फिरवी ती उग्र आरक्त डोळे १२

प्रकुपित भुजगीशी आर्यभू सज्ज राहे
स्वरिपुहृदयमर्मी घ्यावया दंश पाहे
वदन निज उभारी घोर फूत्कार टाकी
क्षणभरि रिपुही तें पाहुनी नेत्र झांकी १३

" विष जवळि असेना लेशही औषधातें "
"नच निजरिपुदंशा एकही दांत मातें "
स्मरण अशुभ होई हें यदा, त्या प्रसंगीं
बहुत जळफळे ती आर्यभू अंतरंगीं १४

" खरतर विष माझें दंतही तीक्ष्णधार "
" अहह ! हरुनि नेई दिव्य मंत्रप्रचार "
स्थिति निज कळतां ही ती करी हाय ! हाय !
प्रतिहत बहुरोषें आदळी हातपाय १५

निघुनि हिमगिरीचा शीत निष्यंद पाहीं
शुचिसमयिं रिघावा तप्तगंगाप्रवाहीं

कुपित भरतभूच्या हृत्प्रदेशीं तसाच
हळु हळु पद ठेवी शोक अत्युग्र साच १६

घळ घळ घळ नेत्रीं लोटल्या अश्रुधारा
थर थर थर कांपे क्षीण तद्देह सारा
शुचि समय गमे कीं संपतां क्रोधरूप
प्रबल पवन वर्षे देव अश्रुस्वरूप १७

प्रतिहतगति कंठीं हुंदके क्रूर फार
हिसकिति हृदयातें जेंवि विद्युत्प्रहार
मुख गलनलिकेचें रुद्ध तेणेंच होय
जठरिं न उतरे कीं, लेश ही अन्न तोय १८

जलधर समयाच्या निर्गमें चातकीतें
विभवविगमकाळीं लोभिचित्तस्थितीतें
जलरहित झषीतें प्राण जातां तनूतें
कठिन तिलकलोपें तेंवि हो आर्यभूतें १९

भय चकित सचिंत व्यग्र उत्साह हीन
विकल विवश शून्य स्तब्ध ती हीन दीन
तिलक-वर-वियोगें आर्यभू हो हताश
हत विधि जणुं कंठीं अर्पितो काळपाश २०

धृति हृदयिं वसेना स्वास्थ्य चित्तीं असेना
उचित कृति सुचेना अन्नपाणी रुचेना
वसन तिज पटेना सौख्यही आठवेना
विरह पळ तुटेना शोक मागें हटेना २१

व्यसन-विषम-पंकीं ती रुतें दीन गाय
करुण-वदन-नेत्रा हंबरे हाय ! हाय !
उलुनि हृदय जाई तेधवां प्रस्तराचें
मृदु मन मग कैसें न द्रवे मानवाचें २२

तिलक-विरह-जन्मा आर्यभू-शोक एक
विषय-विविधतेनें वेष घेई अनेक
क्रकच हृदयमर्मी तैल संतप्त कार्नी
ज्वलन तनु-विभागीं काळ आयुष्यमार्नी २३

गर गर गर हिंडे भ्रांत ताचित्त भारी
बघुनि जणुं तया घे लाज आवर्तवारी
विधुर भरतभूमी भालविन्यस्तपाणी
पुढिल वचनसूत्रें त्याजला स्थैर्य आणी २४

करुनि भरतभूच्या शोक-संकीर्तनातें
रिझवि जनमनातें शारदे तूं स्वतातें
कटु परि महतांचा गोड गे शोक-कंद
विषतरुकुसुमांचा दिव्य जाणो मरंद २५

---

( पृथ्वी वृत्त )

तदा भरतभू म्हणे " तिलक-वंश-चूडामणे
प्रधीवर-शिखामणे सकल-देश-भक्ताग्रणे
गुणांबुजनभोमणे सुकृति शुक्ति मुक्तामणे
महाजन-शिरोमणे स्वजन-साध्य-चिंतामणे १

अगा शुभगुणाकरा विमल कीर्तिच्या आगरा
ससत्त्व गुरु भूधरा अतुल बुद्धिच्या सागरा
स्वदेश हित-तत्परा स्वजन-ऋद्धिच्या निर्झरा
विपत्तिमिर-भास्करा सकल भूतिच्या मंदिरा २

मदुन्नति-वधू-वरा मदरि-दानव-श्रीकरा
दयामृतपयोधरा अनाभिषिक्त राजेश्वरा
महाशयधुरंधरा सकळ शोभवीशी धरा
मदीय कुशिचा हिरा मजासि नित्य तूं आसरा ३

पतिप्रणयबंधनें विविध विघ्न-दुःखावली
करी स्थिरमनें जशी सहन ती सती माउली
त्वदाश्रयबळें तशी मनुजासिंह मी सर्वथा
मनें विभय, सोशिली त्रिविधताप-कष्ट-व्यथा ४

अवृष्टि मम लोचनीं विपुल अश्रुवृष्टी करी
विशेष अतिवृष्टिनें हृदय शुष्कता स्वीकरी
अनेक गदराज जे अगद वर्तती तेवढे
समृद्धि-शिखरावरी मम दरिद्रता ती चढे ५

सुदैन्य उजवीकडे नृपतिकोप डावीकडे
अवग्रह उभा पुढें गदधुरीण पाठीकडे
धरा पदतलीं हले वरुनि वज्र वाटे पडे
अशा विविध संकटीं नृवर गाय ही सांपडे ६

भुजाश्रय परी तुझा मजासि सर्वदा सांवरी
मृकंडुसुतमूर्तिला वट जसा युगांतीं धरी

कसें अनयतस्करें नरमणे तुला चोरिलें
उदात्त मम उच्च जें शुभ समस्त तें हारिलें ७

सुदीन तुजवीण मी असुविणें जशी बा कुडी
रुते व्यसनकर्दमीं अहह ! गायशी बापुडी
उपाय न सुचे पुढें शरण काय आतां मला
निराश्रयचि आसरा मज दुजा न वाली भला ८

बहू कुदिन कंठिले तुजकडे बघोनी अहा
परी मम विपत्तिचा अजि घडे कडेलोट हा !
तुझें करुनि दुःख मी स्वगत दुःख नेतें लया
न मार्ग दुसरा दिसे विष विषेंचि पावे क्षया ९

करूं छळ तुझा वृथा प्रभु मनांत होतें जरी
किमर्थ नय-रीतिचा विफळ थाट केला तरी
असाचि अथवा असे उचित राजनीति क्रम
अनीतिंत सुनीतिचा उदय पाववावा श्रम १०

तुझ्या कृतिपरीक्षणा सुरगुरूपमा सुंदरा
कुणी अहह ! नेमिलें असितवर्त्मभाक् 'दावरा'
खगेंद्र मशकापुढें सलिल सिंधु बिंदूपुढें
महेंद्र भणग्यापुढें दिससि तूं तसा त्यापुढें ११

नयप्रहसनक्रमीं विकट बुद्धिच्या खंदकें
नयासन विदूषकें अनयरंगभूनायकें
प्रयोगपटु 'दावरें' थयथयाट जो मांडिला
खुले बहुत तो यदा प्रकटली निशा जोडिला १२

सरे प्रथम याम जों अशुभ कृष्ण त्या रात्रिचा
नयप्रहनसत्कर्मी जनन अंक घे शेखिचा
तदा हिडिस शोच्य जे विविध रंग वा वर्तती
तयां बघुनि ऐकुनी नयन कर्ण ते कांपती १३

अखंड उरलासि जो दशदिशां यशें व्यापुनी
विदेशवसतीस त्या तुज षडब्द कीं प्रेषुनी
प्रयोग कृतिचा जसा सुनय-देवतेचा तसा
करी अहह ! अंत तो नयपटू तमीं काळसा ! १४

'अरण्य' 'वनवान्हि' वा सरळ भाव 'दार्वी' वसे
'हुताशन' 'ददाति' वा उघड अर्थ 'र' चा असे
'वनाग्नि' 'वनवान्हिद' प्रकट अर्थ वी 'दावर'
यथार्थ निजनाम तो उभयथा करी भूवर १५

असे सकल सह्य हें परि असह्य ही वैखरी
'तुझा कृतक कीं असे प्रणय आर्यभूमीवरी'
असंशय कुशब्द दे हृदयलाघवद्योतक
स्वतेज मिरवी कसें रविसमोर खद्योतक १६

नयानस-विभूषणा ज्वलनपूजका दावरा
षडब्दवरि धाडुनी तिलकवर्य देशांतरा
नकां करुनि आर्यभू विपिन तृप्ति तूं भोगिशी
स्वयें ज्वलनरूप तूं ज्वलन कां तया लाविशी १७

करी दिवस कृत्य जें रजनिकृत्य तें दावर
धरी रजनिरूप कीं कुपित त्यामुळें वासर

निशा विगततारका दिवसरूप घे काय ती
विभूति-वर-दंड दे उलट सृष्टिचक्रा गती १८

मदुद्धरण बीज जें जनमनःस्थलीं पेरिलें
तया उदक घालितां तुजसि संकटें घेरिलें
'चढो तरुदशेसि तें सुफल हो' असें इच्छिसी
शुभाशुभ तदर्थ कीं ह्मणुनि दुर्दिन प्रेषिसी १९

त्रिशंकुसम "डावर" क्षितिपकौशिकोत्थापित
करी सुरवरोपमा छळ तुझा वृथादर्पित
निसर्गनियमें तया गति नसे दुजी याहुनी
अधोमुखचि राहणें इहपर स्वयें सांडुनी २०

विपद्गिरि-परंपरा तुजवरी अशी कोसळे
मनोध्रुव तुझा अगा धृतिनगा परी ना ढळे
अहा उलट चित्र हें सुदृढ जाहला तो परी
प्रसंग पडतां पटे गुणबल-प्रचीती खरी २१

'सुखस्थितिहुनी सदा अधिक आर्यभूचें हित'
'करील मम दुःस्थिती विदितमस्तु हें निश्चित'
त्वदीय चतुराननीं विमल ही भविष्यश्रुती
अमोघ उदयास ये मुदित हो मदीय श्रुती २२

भविष्यसमयीं तुझ्या सफलता भविष्योक्तिला
असंशय वरील हें नियत वाटतें बुद्धिला
समुन्नतिपदा न जों पदरजें तुझ्या पावला
तुरंग, बहु इष्ट तों शकुन होय दुःखीं मला २३

स्वपक्ष परपक्ष हा विफल पक्ष आटोपला
स्वजाति-परजातिचा कलह शुष्क तो संपला
शिशू तरुण वृद्ध या मिळत भेदभावा गती
धनी अधन सारखे लघु महानही वागती २४

स्त्रिया पुरुष अर्भकें सकल वर्ग-वर्णातलीं
तुझ्या तिलकसुंदरा गमति कीं कुटुंबांतलीं
वदें ' गमति ' कासया खरिंच तीं तशीं तूं पिता
तदीय करण्या हिता तनु मना धना ओपिता २५

" विमुक्त घडतो कसा तिलकराज " या वृत्तिची
प्रचंड भडके शिखा प्रळयवन्हिच्या तोडिची
तिनें हृदय कुंडिच्या अखिल जाळिल्या वासना
म्हणूनि मम अर्भकीं इतर वृत्तिला वासना २६

विचार दुसरा खळे इतर कामना मावळे
न अन्य नयनां कळे वदन अन्य बोलीं खिळे
दुजी न रुचि आढळे मति न अन्य कामा वळे
दुजें श्रुतिस नातळे सकल तन्मयत्वा मिळे २७

अहो स्वजन मान्यता मज न हो तिचें वर्णन
तुझें अशुभ ऐकुनी करिति शूद्रही रोदन
हताश आतिशूद्रही रडति खिन्न त्यांच्या स्त्रिया
अपूर्व जडसृष्टिही दृढ वरी विषादक्रिया २८

अहा ! जलदगार्जितें गगन खिन्न तें आरडे
अखंड जलवर्षणें घळघळा जणूं तें रडे

तुझी स्थिति न पाहवे रविस तो पयोदीं दडे
विषाद-मलिन प्रभा सकल दिङमुखांतें जडे २९

तुझा जनक धन्य तो जननि जी तुझी धन्य ती
तुझें जनन धन्य तें जननभू तुझी धन्य ती
त्वदीय कुल धन्य तें चरित जें तुझें धन्य तें
तुझें सकल धन्य तें अशुभ ही तुझें धन्य तें ३०

जरी घडति आपदा जन न सोडिती त्वत्पदा
जरी पडशि बंधनीं मिळविशी यशःसंपदा
बिडी करपदीं जरी अनभिषिक्त तूं भूपती
कधीं मदुदरीं दुजी तिलक-मूर्ति हो जन्मती ३१

तुझ्या इतर बांधवीं गुण तुझा न एकैकही
प्रकर्षविभवें वसे स्थिति खरी परी शोच्य ही
तुझीच उपमा तुला गुणगणीं दुजी व्यर्थ ती
विभूति दुसऱ्या अशा मदुदरीं कधीं जन्मती ? ३२

मदुद्धरणकारणीं विविध भाग लोकाग्रणी
प्रयत्न विविध स्थळीं करिति जे दुजे सन्मणी
गुणें तव समस्त ते मिळति एक केंद्राप्रती
विभूति दुसऱ्या अशा मदुदरीं कधीं जन्मती ३३

मदुद्धरण-भाग तो अचलराज गोवर्धन
तया उचलण्यावरी श्रमति सत्य नाना जन
तयांत गमतो मना तिलकराज तो श्रीपती
विभूति दुसऱ्या अशा मदुदरीं कधीं जन्मती ३४

मदुन्नतिसुकार्य जें तिलक-नामक ब्रह्म तें
विवर्त-विविधत्व जें सकळ तेथुनी जन्मतें
वरी स्थितिस तेथुनी विलय तेथची पावतें
विवर्तमयजाल तें तिलक-बंधनें लोपतें ३५

मदीय तनु चित्कला तिलकमूर्ति ती हो खरी
मला निकट दूर ती म्हणुनि मी रडें घाबरी
वरी मम अशेषही चळवळीस जीवन्मृती
असें बघुनि मानसीं अहह ! लोप पावे धृती ३६

स्वदेश-समुपासने तुजसि कोण आपंगिता ?
अपूर्व-मति-संपदे तुजसि कोण संगोपिता ?
जगन्मत मनस्विते तुजसि कोण गे सोयरा ?
कथीं शुभयशःश्रिये तुजसि कोण गे आसरा ? ३७

स्वदेश-हित-तत्परा तुजविणें 'स्वदेशी' रडे
सुयोग-घटना-प्रभो क्षय 'बहिष्कृती'तें जडे
सुशिक्षणकलापटो विकल 'राष्ट्रशाला' घडे
अतर्क्यधृतिच्या नगा धृति तुझ्याविणें ओरडे ३८

तुझ्याविण नसे मुळीं गजमुखोत्सवीं उत्सव
तुझ्याविण शिवाजिचा विरस तो गमे उत्सव
तुझ्याविण निषेध जो विफल मद्यपान-कर्मीं
तुझ्याविण सुधा कडू, विष सुधा तुझ्या संगमीं ३९

विहंगपतिला नभीं मृगपतीस कीं काननीं
नशी नृपतिवैभवें वसति ज्यास सिंहासनीं

असे उचित त्या कशी अहह ! ती मिळे बंधनीं
प्रभाव परतंत्रते विलसतो तुझा हा जनीं ४०

सुवर्णवलयांपरी सकल राज्यसूत्रांप्रती
करीं सहज चालवी, अशि अगाध ज्याची मती
तदीय मणिबंधनें शिरति शृंखला बंधनीं
प्रभाव परतंत्रते विलसतो तुझा हा जनीं ४१

अमूल्य नररत्न जें सतत मांत्रि हेमावृत
विलास करण्या करी, चतुर तो विधी प्राकृत
तयास तिमिरायसीं बुडवि हाय ! बंदीजनीं
प्रभाव परतंत्रते विलसतो तुझा हा जनीं ४२

सुधामधुर वाङ्मया धरुनि लेखनी जो कर
लिही अतुल; डोलवी भुवनमान्य विद्वद्वर
शिलाशकलकार्य तो अहह ! कां करी बधनीं
प्रभाव परतंत्रते विलसतो तुझा हा जनीं ४३

प्रचंडतर गर्जना स्वरिपु-मंडळी-तर्जना
नृसिंहचि नृसिंह जो करुनि कांपवी कानना
शृगालशिशुही तया हंसति हाय ! कां बंधनीं
प्रभाव परतंत्रते विसलतो तुझा हा जनीं ४४

स्वकीय-शिरिं लागतां भुवनमान्य जीं पावलें
असंख्य जन मानिते जनन धन्य कीं जाहलें
अदृश्य अजि तीं कशीं अहह ! जाहलीं बंधनीं
प्रभाव परतंत्रते विसलतो तुझा हा जनीं ४५

अहा नरवरा मिळे तुजसि कोरडी भाकरी
सदन्न मजला गमे ह्मणुनि कालकूटापरी
तनूस कपडे तुझ्या अशुभ तोकडे लाभती
मदीय बरवे परी कफनसे मला वाटती ४६

कशी कुसुमकोमला तुजसि नीज ये फत्तरीं
असें शयन पावकीं भ्रमत याचिया उत्तरीं
स्वरूप तव साजिरें अजि विरूप झालें खरें
असें स्मरण होउनी मजसि बा भरे कांपरें ४७

अगा कुदिन कंठिशी कठिण कायकार्जी कसें
तुला न सणवार तो विदित बंधनीं वा असे
विषादविष यामुळें हृदय संपुटीं दाटतें
मदीय सुख-शांतिचे दिवस चालले वाटतें ४८

'हठें कृतिस आपुल्या जडविला सुदोपग्रह
असंशय विदोषती' दृढ असा तुझा हा ग्रह
ह्मणुनि दिन कंठिशी स्वगृहिं तेंवि वंदीं सदा
तनू अहह! सांपडे न मन दंडपाशीं कदा ४९

'शरार्त हरिणी जशी उलटते शिकारीवरी
करील मजशीं अतां भरतभूमिही त्यापरी'
अखंड भय-बंधनीं नृप तुझा पडे त्याजशी
त्वदीय सुटकेविना सुखद मुक्ति लाभो कशी ५०

प्रयत्न-गति खुंटली मम वृथा असे कोपणें
करूं इतर काय मी रडुनि शांतता पावणें

अगा तिलकसुंदरा परम संकटोद्वेजित
अधीर तव दर्शना दिवस बैसतें मेजित ५१

असा करुनि शोक ती भरतभू उगी राहिली
सुषुप्ति शमनस्वसा तंव सखी तिला भेटली
स्वकीय भुज-पाश ती मृदुल आर्यभूचे गळां
करी; हळुहळू गळे सकल जागृतीची कला ५२

( शार्दूल विक्रीडित )

तों स्वप्नागत दिव्य भूप तिजला घेई निजांकावरी
तद्दुःखानदग्ध देह-लतिका दोर्दण्डयुग्मीं धरी
ती तत्काळ परंतु दूर निसटे विद्युल्लतेच्या परी
त्यातें लक्षुनि दीन-धीर-वचना बोले अशी वैखरी ५३

'प्रेमा बाळ मदीय लाल करितो निःसीम माझ्यावरी
हा त्याचा अपराध कीं ? अनय का ? दुर्वृत्ति का ? हो तरी
कां त्याच्यावरि रोष दोष नसुनी केला तुम्हीं हा महा
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे अन्याय ! अन्याय ! हा ५४

जो विद्यापटु दानशूर धृतिमान् कर्तृत्वशाली गुणी
माझ्या कां तुमच्या हिता जपतसे यत्तुल्य नाहीं कुणी
त्या पुत्राप्रति बाप सापचि जणूं डंखी सुरोषें पहा
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे अन्याय ! अन्याय ! हा ५५

माझा ईश्वर-सृष्टिदत्त असता प्राणेश देवा जरी
बाळाचें बहु कोड कौतुक सदा निःशंक होतें तरी

तो नाहीं ह्मणुनी विपत्ति मजला ग्रासी अशी दुःसहा
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे अन्याय ! अन्याय ! हा ५६

अर्थप्राप्ति अभीष्ट सिद्ध करण्या शब्दांस कां पीडिलें
न्यायाचें तरि सोंग तें विफल कां अन्यायपात्रा दिलें
माझें सांत्वन हें नसे परि असे दुःखावरी डाग हा
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे अन्याय ! अन्याय ! हा ५७

जी सद्यःफलबुद्बुदप्रसविती अंतीं अनर्थप्रदा
त्या दुर्नीतिसवें कसे रमतसां भोगाल हो आपदा
गेली शुद्धि कुठें कुठें सुनय तो पुत्रीं कसा द्वेष हा
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे अन्याय ! अन्याय ! हा ५८

जो गंगाधरपुत्र विश्व विजयी त्या द्या विदेशा पदा
जी तत्काळ-विपाद्विलास-चपला अंतीं सुभद्रप्रदा
ती सन्नीति कुलांगता तिजसवें केला घटस्फोट हा
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे अन्याय ! अन्याय ! हा ५९

लोकद्वेष विराट शेष खवळे सद्रत्नहानिमुळें
फूत्कारें वदनीं सहस्र गमतें खाणील पाळें मुळें
नाहीं सहशराज्यपद्धति अशी तच्छांतिचा मंत्र हा
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे अन्याय अन्याय ! हा ६०

क्षुद्रा 'इज्जत' या जगांतुनि अजी जावो जळो इभ्रत
लागो आग कुनीतिकृष्णवदना, पेटो सुराज्यव्रत
माझा बाळ मदीय जीव मम जो ब्रह्मांड त्या दंडिलें
हा ! हा ! हाय ! उपाय काय न सुचे मच्छीर्षकीं वेधिलें ६१

असे ऐकुनि शब्द तो नरपती पावे अदृश्य स्थिती
येती भारत-बाळ मातृनिकटीं दुःखा न ज्यांच्या मिती
त्यां पाहोनि हताश 'आर्यजननी' प्राणप्रदानोन्मुख
बोले भाषण कर्णतोषण असे प्रेमें उभी संमुख ६२

( वसंततिलका )

'सर्वार्थ कल्प-लतिका जगिं होय आशा
सर्वार्थ-नाशक तिची भगिनी निराशा
आशा धरा स्मरुनि त्या जगदीश्वराला
येईल निश्चित दया तुमची तयाला ६३

वेदान्त-धर्म अविनाश अनादिसिद्ध
कल्पांतिंही अभयदायक हें प्रसिद्ध
त्या आदरा स्मरुनि नित्य परात्पराला
येईल निश्चित दया तुमची तयाला ६४

जें राष्ट्रमंदिर असे तुमचें सुधन्य
पाया परेशचि सुनिश्चल त्या, न अन्य
त्यातें जपा स्मरुनि नित्य निरंजनाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ६५

पूर्वेतिहास तुमचा विलसे अपूर्व
त्याचें करा सतत चिंतन भक्तिपूर्व
त्या द्या विवर्तन पुढें स्मरुनी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ६६

विश्वास आत्मगत जो दृढ नित्य पूत
तो सिद्धिचा सकल संमत अग्रदूत
त्या मानसीं दृढ धरा स्मरुनी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ६७

जो पूर्वजांत तुमच्या विलसे अहार्य
दुर्वार्य निश्चय वशीकृत-सर्व-कार्य
त्याचा समाश्रय करा स्मरुनी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ६८

शापात् शरादपि असें बळ पूर्वजांस
तें लाभलें प्रखर दीर्घ तपें तयांस
त्याचा सुसंग्रह करा स्मरुनी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ६९

हें सिद्ध कीं सतत ' यत्न परंपरांहीं
होई ' अशक्य ' चि ' अशक्य ' दुजें न कांहीं
हें वागवा मनिं सदा स्मरुनी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७०

जो पूर्ण सागर सदा करुणा रसाचा
जो नित्य चालक समस्त चराचराचा
जावें तुम्हीं शरण त्या करुणाकराला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७१

रक्षीतसे जननिच्या जठरीं मुलाला
पाळीतसे घनशिलोदरिं भेकबाला

जावें तुम्ही शरण त्या नत-रक्षकाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७२

पूर्वी भयंकर असे बहुधा प्रसंग
आले परी न खचलें मम अंतरंग
माझी असे सकल लाज परात्पराला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७३

मत्स्यावतार जगतीं धरुनी परेश
संक्षुब्धसिंधुजठरीं करुनी प्रवेश
रक्षी श्रुतींस मनुतें मुनिसप्तकाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७४

ज्याचें मुनींसहि कळे न यथार्थ रूप
तो या जगीं अवतरे अज कूर्मरूप
पृष्ठीं धरी पृथुतर क्षितिमंडळाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७५

माया अनंतर धरी प्रभु सूकराची
पिडा हरी सकलही धरणीतलाची
दंष्ट्राबळें उचलुनी वरती जगाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७६

प्रल्हाद-रक्षण-समुत्सुक तो परेश
घेई पुढें नृहरिचा दृढमिश्र वेश
स्तंभांतुनी प्रकटला नत-रक्षणाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७७

११५०४
३९१३५३

जन्मे पुढें नरहरी बटुवेषधारी
याची बळीजवळी भू त्रिपदाप्त सारी
त्या भूतळीं दडपुनी चढवी यशाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७८

घेऊनियां निजकरीं परशू कराळ
राजन्यवंशवन खंडुनियां विशाळ
छाया करी सुखद जो प्रभु मच्छिराला
येईल निश्चित दया तुमची तयाला ७९

लोकानुरंजन-मनोरथ एक संगीं
घेऊनि, रामनट ये अवतार-रंगीं
दे प्राण रावणवधें भुवनत्रयाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८०

हो नंदनंदन विभू रिपुकंदनातें
आनंदकंद सुखवी व्रजमंडळातें
गीतामृतें निववितो अवघ्या जगाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८१

पूर्वी अनंत अवतार असे अजाचे
झाले; पुढें अमित ते घडणार साचे
दे ताम्रशासन असें विभु जो तुम्हांला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८२

'रक्षावया सुजन दुर्जन मारण्याला
स्थापावया विहित धर्म युगा युगाला

जन्मेन' ही सनद दे प्रभु जो तुम्हांला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८३

वेदान्तकल्पतरुनंदनभू विराजे
जी देवधर्मनियमें सविशेष साजे
ती आर्यभू उबगवेल कशी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८४

देवाश्रयेंचि सगळा परतंत्र भाव
जाई लया; अवनतीस मिळे न ठाव
टाकोनि द्या प्रभुवरी अथवा हवाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८५

ठेवा सदा प्रभुवरी दृढ पूर्ण निष्ठा
आपत्तिची तिजपुढें न उरे प्रतिष्ठा
निष्ठा असे सुरभि; तीस भजा अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८६

भेटे न मुक्तिरमणी प्रभुधामवासी
कीं आत्मशुद्धि वशगा न, वसे तुम्हांसी
आधीं करा वश तिला स्मरुनी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८७

तृष्णा जला मरण कीं अमृताशयाला
ग्रासील वा तिमिर भास्करमंडळाला
शीतव्यथा हुतवहा; परि आर्यभूस
येईल नाश न कदापि, भजा प्रभूस ८८

आतां वदा स्वकृतिनें प्रिय मूकवाणी
अंगीं भरा धृतिबळें नयनीं न पाणी
सेवा सदा तिलकमार्ग भजा अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला ८९

जावोत दुर्दिन लया तुमचे अशेष
दारिद्र्य दुःख निरसो तुमचें परेश
इष्टार्थ-सिद्धि सुलभा विलसो अखंड
राहो शिरीं प्रभुकृपा तुमच्या उदंड' ९०

( भुजंगप्रयात )

विचित्रा अशी पाहुनी स्वप्नलीला
वरी आर्यभू शोकभू जागृतीला
स्मरोनी अहा ! स्वप्नवृत्तांत सारा
रडे, लोटल्या लोचनीं अश्रुधारा ९१

( मंदाक्रांता )

आतां सारे रसिक पुरवा एक हें अल्प कोड
तुम्हां राधा-रमण-कविचे बोल लागोत गोड
तेणें माझी श्रमपरिवृता शारदा विश्रमास
सेवोनीया वरिल मुदिता अन्यकाव्यप्रयास ९२

---

# महाराष्ट्रवीरादर्श

## १. "आम्ही मराठे गडी"

(शार्दूलविक्रीडित)

(१)

धारातीर्थ पवित्र लक्षुनि पुढें जाती सदा शीघ्र जे,
पंचप्राण तृणासमान गणुनी घेती रणीं ठाण जे.
लग्नाचीच गमे जयां सुघटिका युद्धोत्सवाची घडी,
ऐसे कोण जवानमर्द जगतीं ? आम्ही मराठे गडी !

(२)

ज्यांची पाहुनि दृष्टि कोपकुटिला, सारी थरारे मही,
ज्यांची ऐकुनि हाक, धाक पडला प्रत्यक्ष काळासही,
ज्यांचें केवळ नांव शीघ्र पळवी शत्रूंस देशोधडी,
ऐसे कोण जवानमर्द जगतीं ? आम्ही मराठे गडी !

(३)

ज्यांचे लोळति आज अश्व उमदे रामेश्वराच्या तटीं,
टांचा हाणुनि ते ज्यां बुडविती वंगाक्षिती संकटीं;
जाती धन्य सुधन्य अन्य दिवशीं सिंधूनदाचे थडी,
ऐसे कोण जवानमर्द जगतीं ? आम्ही मराठे गडी !

(४)

साधा वेष, परी विशेष पटुता ज्यांहीं रणीं दाविली,
साधा थाट, परी अचाट करणी ज्यांहीं रणीं साधिली,

साधा डाव, परी निभाव रिपुचा लागे न, येती रडी;
ऐसे कोण जवानमर्द जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( ५ )

रात्रीचा घनघोर थोर पसरे अंधार चोहींकडे
पाठीनें चढती अशा अवसरीं सह्याद्रिचे जे कडे;
जेथें तो हनुमंतही श्रमुनियां निःशंक येता रडी,
ऐसे कोण जवानमर्द जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( ६ )

अंगानें कृश जे, परी सुदृढ कीं दुर्भेद्य वज्रापरी,
जे कौपीन मितान्नपान वरिती, योगी जणूं लष्करी;
ज्यांहीं संतत इष्टसिद्धि वशगा दारांत केली खडी,
ऐसे कोण जवानमर्द जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( ७ )

बाजूला पहुडे प्रिया असिलता, भाला उशाशीं उभा,
संचारा मणिबंधबद्ध तुरगा दे दीर्घरज्जू मुभा;
ढालेची गिरदी, उशी भुजलता, गादी जयां घोंगडी,
ऐसे कोण सुखें सुषुप्ति वरिती ? आम्ही मराठे गडी !

( ८ )

थंडी पाउस तान भूक न कधीं ज्यांहीं मुळीं मोजिली,
देहक्लेश न लेशही गणियले, स्वार्थी न दृष्टी दिली;
राष्ट्राची रचिली अनन्यहृदयें निःसीम सेवा खडी,
ऐसे कोण सुधन्य लोक जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( ९ )

कन्या, पुत्र, कलत्र, जीव, नलगे वित्तादिकांची कथा,
गेले वेंचुनि धन्य जे चढुनियां राष्ट्रोन्नतीच्या पथा;
राष्ट्रा नित्य महापदावरि जिहीं जागा दिली रोकडी,
ऐसे कोण सुधन्य लोक जगतीं ? आम्ही मराठे गडी !

(१०)

नाहीं ज्यास विलास खास रुचले, जे षड्रिपूंची फळी
आधीं फोडुनि पार अन्यविजया वेगें निघाले बळी;
संतुष्टा रणदेवता जय जयां देण्या करी तांतडी,
ऐसे कोण सशस्त्र वीर जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( ११ )

लोकीं ज्यापरि पायसीं मिळविती कीं शर्करा गोडशी,
नीतीची बहु गोड जोड दिधली ज्यांहीं स्वशौर्या तशी,
ब्रह्मक्षत्रमयी पुरी भिडविली वृत्तिद्वयीची घडी
ऐसे धार्मिक वीर कोण जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( १२ )

गोमाता बलपुष्टितुष्टिजननी सृष्टीस या संमता,
स्वर्गींही सुरवृंदवंदितपदा ऐशी जयां योग्यता;
त्या ज्यांहीं प्रतिपाळिल्या भवनदी कीं लंघण्या सांगडी
ऐसे धार्मिक वीर कोण जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( १३ )

पातिव्रत्यधनावरी युवतिंच्या घाला न जे घालिती;
स्थानें जीं यवनांस पूज्य गमतीं, तीं जे न विध्वंसती,

ज्यांचें सात्त्विक शील ढील पडुनी दंभीं न मारी दडी,
ऐसे धार्मिक वीर कोण जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( १४ )

धर्माची दृढ कास जे धरुनियां शस्त्रा करीं योजिती
निष्ठा देवपदीं वसे स्थिर, नसे भावा जयांच्या मिती;
ज्यांच्या ती परिरक्षणा निशिदिनीं जागे भवानी खडी,
ऐसे धार्मिक वीर कोण जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( १५ )

ज्यांची धीर उदात्तवृत्ति विमला युद्धांगणीं गाजली,
हिंसाहि शुभ युद्धयागविहिता पुण्यप्रदा जाहली,
ज्यांचें शस्त्र न रक्तबिंदुहि वृथा भूमीवरी शिंपडी,
ऐसे धार्मिक वीर कोण जगतीं ? आम्ही मराठे गडी,

( १६ )

येतां तो प्रतिपक्षसैन्यजलधी चालोनि आंगावरी,
ज्याचा त्याप्रति सत्य होय गनिमी कावा अगस्त्यापरी;
ज्याचा विक्रमदुर्ग भव्य मिरवी या धोरणाची गडी,
ऐसे कोण सुदक्ष वीर जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( १७ )

ज्यां वासस्थल सह्यपर्वतपिता देई निजांकीं खुलें,
क्रूर श्वापदगर्जनांस गणिती ओंव्या जयांचीं मुलें;
काठिन्यादि गुणीं जयांवर कधीं केली न कोणी कडी,
ऐसे कोण अतुल्य वीर जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( १८ )

ज्यांचा शौर्यदवानल प्रगटतां, दुर्वार दाहज्वरें-
शत्रू हो भयभीत, शीत नसतां त्याला भरें कांपरें;
पाणी सर्व पळोनि जाय मुखिंचें, जिव्हा पडे कोरडी,
ऐसे कोण अतुल्य वीर जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( १९ )

दृश्यादृश्य रणीं विजेपरि नभीं पाहोनि या लाघवा
ज्यांच्या, राक्षस का पिशाच अथवा सैतान वेताळ वा-
ऐसे तर्कवितर्क शत्रु करिती; त्यांची वळे बोबडी;
ऐसे कोण अतुल्य वीर जगतीं ? आम्ही मराठे गडी

( २० )

जो वर्षासमयीं कृषीस भजतां भागे श्रमें दुःसह,
येतां शारदकाळ तो करकरी युद्धार्थ खड्गग्रह;
ज्यांच्या ही कृषिकर्मखड्गयुतिची भंगे न केव्हां घडी,
ऐसे कोण अतुल्य वीर जगतीं ? आम्ही मराठे गडी !

( २१ )

झेंडा जो भगवा अखंड फडके ज्यांच्यासवें संचरे
जाणो मूर्त विराग दासमुनिचा भूमंडळीं वावरे;
राजैश्वर्य जयां विराग सम हो, वाडा तशी झोंपडी,
ऐसे कोण विरक्त वीर जगतीं ? आम्ही मराठे गडी !

## २. श्रीरामाशीं शिवाजीचें साम्य

(२२)

वागे जो नय नीति धर्म धरुनी, जागे प्रजारंजनीं;
लागे जो सुरविप्रवृंदचरणीं, भागे स्वभूसेवनीं;
गाजे जो जगतांत, एकवचनी, साजे यशोमज्जनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(२३)

वाळूचे कण कोण सागरतटीं, तारे नभीं वा गणी !
तैसे सद्गुण ते असंख्य मिरवी भूपाळचूडामणी,
झाली मूक-सरस्वती भगवती ज्याच्या यशोवर्णनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(२४)

तारुण्यें फुललो, मदें डवरली, शृंगारवासस्थळी
अन्यस्त्री असली करांत पडली लीलालतेची कळी,
नाहीं उद्भवली तथापि लवही दुर्वृत्ति ज्याच्या मनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(२५)

शत्रूशीं समारांगणीं झगडतां ज्याच्याकडे मा वळे,
लोकीं विश्रुत मावळे म्हणुनि कीं शौर्यादिकीं आगळे;
वा-पुच्छाविण तेचि वानरचमू ज्याच्या वसे शासनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(२६)

शत्रूंची वदनप्रभा प्रतिरणीं ज्यांच्यापुढें मावळे,
तेणें कीं स्थिति मावळे-वरपदीं ज्यांची न केव्हां ढळे;
स्वामीतें भजतां न जे कचरती प्राणव्ययाही मनीं;
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(२७)

झाली घोरदशाननांतरित जी राज्यप्रतिष्ठा-प्रिया,
हृत्कुंडीं विरहाग्नि थोर भडके लोपें तिच्या ज्याचिया;
लागे ध्यास तिचा, झुरे निशिदिनीं, जागे तिचे चिंतनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(२८)

एकामागुनि एक सद्गुण तिचे, लीला, कृती, आठवी;
लावी ध्यान तिचें अनन्य-हृदयें, पातें न जो हालवी;
होतां सावध 'हाय ! हाय !' वदनीं, 'अश्रू' वरी लोचनीं !
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(२९)

लागे वेड तिचें, सुचे न मतिला तीवीण कांहीं दुजें,
तत्प्राप्तीविण सर्व नीरस गमे, ब्रह्मांड वाटे खुजें;
झाली वृत्ति पिशापरी, भ्रमतसे जो दीन रानीं वनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

(३०)

ये ये सत्वर भेट दे जिवलगे ! कां अंत गे पाहसी ?
जाशी सोडुनि तूं कुठे प्रियतमे कोण्या स्थळीं राहसी ?

इत्यादि भ्रमनिष्ठ कष्टवचनें स्वप्नीं वदे जो वनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३१ )

पाहोनी करुणास्पद स्थिति, वनीं तेथील ज्या देवता
त्या जाती द्रवुनी, अखंड धरिती कीं अश्रुपातव्रता;
नेत्रींचें जळ शिंपुनी श्रमति का तन्मूर्छनाखंडनीं ?
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३२ )

होती विव्हळ तत्स्थितीस बघुनी पक्षी पशू वृक्षही,
हें ना चित्र; उले शिलाहृदयही, शोकीं बुडाली मही !
तों तत्प्राप्तिपथ-प्रदर्शक तया वाली मिळाला वनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३३ )

झाली सिद्ध वनीं वनेचरचमू, जी युद्धवेदीं रमे,
तत्साहाय्यबळें विपक्ष-दलनीं लीलावतारी श्रमे;
आली आड परी न चाड मुळिं त्या विघ्नावलीची मनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३४ )

मायाजाळ विशाळ शत्रु पसरी, भंगी परी तें क्षणीं,
आले भीषण दुर्ग राक्षस परी ते चीत झाले रणीं;
'जेथें धर्म तिथें जय' प्रभु असा विश्वास बांधी मनीं
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३५ )

धर्मे दुर्बळ युद्ध तो रिपुसवें वीराग्रणी माजवी,
दावी अद्भुत तो प्रताप समरीं, कीर्ती जगीं गाजवी;
सान्निध्यें रणभूमिच्या जपतसे शुद्धस्वसंवर्धनीं
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३६ )

जी नानाविध संविधानरुचिरा संग्रामकादंबरी,
देई संतत सेवितां नवनवा आस्वाद, चित्ता हरी;
कर्ता नायकही तिचा नृमणि तो कां हो भरेना मनीं ?
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३७ )

शत्रूचें बळ मंत्रतंत्र अवघें निःशंक लोकोत्तर,
तें निर्जीव अधर्मवृत्तिपर कीं झालें रणीं जर्जर;
पावे कोण यशा अधर्मगतिनें, हें बिंबवी जो मनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३८ )

माळा सुंदर मर्त्यलोकमणिच्या घाली जयश्री गळां,
शोभे क्षत्रियसिंह धर्मविजयी रूपें बळें अगळा;
मुद्वल्लीस्मित पुष्प शुभ्र विलसे त्याच्या प्रसन्नाननीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ३९ )

आलिंगी रणरंगधीर सुकृती, ही शांत युद्धक्रिया-
होता, ती चिरविप्रयोगविकला राज्यप्रतिष्ठा-प्रिया;

झाले ते झणिं नष्ट कष्ट कृत जे इष्टार्थसंपादनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ४० )

दोघें वाजत गाजत प्रतिपदीं सत्कार तीं सेवित
आलीं राजपुरीस संगमसुखी आनंददोलास्थित;
तेथें इच्छिति कीं चढूं उभयही साम्राज्यसिंहासनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ४१ )

गागाभट्ट वसिष्ठ, रायगड तो झाला अयोध्यापुरी,,
राज्यारोहणमंगलार्थ उचिता हो सिद्धता ती पुरी;
आली ती घटिका अपेक्षित दिनीं श्रीदिव्यभूपाननीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

( ४२ )

वाद्यें, गायनवेदमंत्रकवनें, स्तोत्रें, जयोद्गारही,
यांचा मंगल मिश्र घोष पसरे, संतोष पावे मही;
संख्यातीतजनाभिनंदित चढे तो धन्य सिंहासनीं,
श्रीरामासम धन्य धन्य नृपती शोभे शिवाजी जनीं !

## ३. शिवाजीचा राज्याभिषेक

( ४३ )

स्वर्गाधिक्य महीस, मानवजनां वर्चस्व देवांवरी,
देती, योग असे सुदुर्मिळ तरी येती कधीं भूवरी;
त्या पंक्तींत शिवाभिषेक पहिला; प्रत्यक्ष त्या लक्षिती
झाले जन्मुनि धन्य ते; शिवनृपा धन्यत्व येई किती !

( ४४ )

मर्यादा सुखवृष्टिची, परतटी भू-स्वर्ग-संसृष्टिची,
आनंदांकुरपुष्टिची परणती सीमा मनस्तुष्टिची,
जाणों ती अभिषेकदिव्यघटिका मुद्राचि दैवी पडे,
राज्यस्थापनहेमनाणकमुखीं, तें मान्य लोकीं घडे.

( ४५ )

त्या वेळीं भरती अपूर्व चढली आनंदसिंधूप्रती,
सीमा सांडूनि तत्तरंग वरिती दुःखांतरींही गती;
आनंदाकुललोकनेत्रकमळीं, हें सत्य नोहे जरी,
कां येते करुणारसप्रतिनिधी ते अश्रुबिंदू तरी,

( ४६ )

सीमा तो गुरु हर्षसागर तदा निःसीमभावीं वरी,
जी ती वृत्ति बहिर्मुखत्वविमुखी अंतर्मुखत्वा धरी,
सेवी देह विदेहभाव, गळली जाणीव ती ये स्थिती,
निद्राजागृति वा मृती-अमृती वा जेथें न ही निश्चिती.

( ४७ )

तो हर्षार्णव कोण वार्णिल कवी ? जे चित्ततापप्रद
ते चित्तस्थ समस्त भाव वरिती स्वस्वरूपीं पद;
दैन्या दैन्य घडे, प्ररोदन रडे, आधीस आधी जडे.
क्लेशीं क्लेश बुडे, श्रमा श्रम घडे, चिंतेस चिंता पडे.

( ४८ )

आधीं क्षत्रियवंशमौक्तिकमणी तेजें दिसे उज्ज्वळ,
संस्कारें अतिदिव्य शुद्ध विलसे त्याचें प्रभामंडळ;
कंठीं वा हृदयांत वा स्वशिरिं वा दृष्टींत वा हा मणी
कोठें सांठवुं हा न निर्णय ठरे तत्प्रेक्षकांच्या गणीं.

( ४९ )

धर्मात्मा शिवभूप कल्पतरु हो, राज्याभिषेकोत्सव
वाटे रम्य वसंतकाल, फुटती दिव्यप्रभापल्लव;
छायेला बसले असंख्य जन जे ते भाग्यशाली खरे,
सर्वार्थप्रद जें स्वराज्यफल तें त्यांच्या करीं संचरे.

( ५० )

श्रीक्रीडास्थळ तन्मुखेंदु विलसे दिव्यप्रभामंडळीं,
प्रेमें दृष्टि वळे परी दिपुनि ती जाई झणीं त्या स्थळीं;
ती पुण्योदकवर्षणें निसरती झाली मुखश्री गमे,
दृष्टीचें पद कीं ठरे न पळ, ती मागें सरे संभ्रमें.

( ५१ )

वाटे रायगडीं न तो नृपतिचा राज्याभिषेकोत्सव,
प्राणांचाचि परी प्रवेश घडला निर्जीव राष्ट्रीं नव,

राष्ट्राच्या सगळ्या झणीं अवयवीं चैतन्य खेळे नवें,
त्या काळीं जडसृष्टि अज्ञहि; तशी हर्षें भरे उत्सवें.

( ५२ )

ते किल्ले दृढ संधिबंध गमती जे राष्ट्रदेहाप्रती,
तोफांच्या सरबत्तिनें हृदयिंचा आनंद उद्गारती;
चीत्कारें गजराज, वाजिगणही हेषामिषें तें करी,
आनंदें भगवें निशाण फडके कीं नृत्यलीला वरी.

( ५३ )

पुण्यश्लोक-शिवाभिषेकविधि तो श्रीधामराम प्रभू,
जाया त्या मुनिची शिलास्थितिमयी वाटे महाराष्ट्रभू
गेली उद्धरुनी तशा स्थितिंतुनी, ही त्या प्रभूची कृपा,
वानीना मग कोण रामसम त्या प्रेमें शिवाजीनृपा ?

( ५४ )

नाम सार्थ शिवाभिषेक घडला, संपूर्ण राष्ट्राप्रती
झाला तोचि शिवाभिषेक अशिवा जागा न राहे रती.
हें तादात्म्य अपूर्व अद्‌भुत जिथें राजाप्रजा सेविती,
भूस्वर्गोपम रामराज्यसम त्या देशा न कां ये स्थिती ?

( ५५ )

तानाजी नरसिंह सिंहगड हा ज्याचें स्वरूपांतर,
तो बाजीप्रभु वीर हीरमणि या लोकांत लोकोत्तर;
दोघांची शिवमानसीं स्मृतिसुधा हालाहलास्वाद वी.
किंवा त्या सुखसागराप्रति फुटे दुःखोर्मि, त्या दूषवी.

( ५६ )

'शोभा ही विपुला मदीय वपुला' योजोनि या हेतुला,
केली स्वर्णतुला, दिली द्विजकुला, कीर्ति स्फुरे निस्तुला;
सेवाया निज देव धर्म धरणी सर्वस्व ज्यांहीं दिलें,
त्यांची होय तनू सुवर्णतुलिता साक्षात् शिवें दाविलें

( ५७ )

त्वन्निंदा इतिहासकार करिती, ते पारधी दुर्मती,
वेधाया झटती दुरुक्तिसुशरें त्वकीर्तिहंसीप्रती,
झालें निष्फळ तें नृपा ! उलट तो व्याधांस वेधी शर !
सांगा कोण असत्यमार्गगमनें झाला यशस्वी नर ?

( ५८ )

देवाचा अवतार तूं, भजक जे झाले विरोधें तव
नेशी उद्धरुनि तयां सुरपदीं, तें ऐकिती त्वत्स्तव;
ते जाणों अनुतापदग्ध, विधिला विज्ञापिती सादर;
घालीं दुष्कृतिनिष्कृतिस्तव पुन्हां जन्मा अम्हां सत्वर.

( ५९ )

माथां मत्सरचंडदंड पडतां क्रोधा न ज्यांच्या मिती,
ते दुर्लेखकसर्प अक्षरमुखें त्वकीर्तिला डंखिती,
दंशाची लवलेश हे शिवनृपा ! होई न बाधा तिला,
प्रल्हाद-प्रतिमेपरी अमृतता लाधे तुझ्या कीर्तिला !

( ६० )

माथां सुंदर राजछत्र विलसे, दों बाजुंला चामरें,
झालीं भूषित भूषणें तरिहि तीं देहस्थ माल्यांबरें,

तो राजेंदु गजेंद्र-पृष्ठगत जों संचारशाली घडे;
नक्षत्रें कुसुमच्छलें वरुनि तों येती जवें त्याकडे.

( ६१ )

दानाची दृढशृंखला शिवनृपा ! तूं श्रीपदीं आर्पिली,
तेणें चंचलता निसर्गघटिता जाणों तिणें सोडिली
झाली ती स्थिर, कीं जगीं अजुनिही त्वद्दत्त जीं वेतनें
तीं चालू असती अखंड रचिलीं त्वत्कीर्तिचीं केतनें.

( ६२ )

भूपा ! त्वद्गुणवर्णनोपवन जें सर्वांगशोभास्पद,
वाग्देवीसहि तेथ भूल पडली, हाले न कीं तत्पद;
कंठीं कुंठित तान मूक घडली तारांवरी अंगुली
पावे काय दुरुक्तिशस्त्रपतनें संज्ञेप्रती माउली ?

( ६३ )

माते देवि वसुंधरे, त्वदुदरा राजेंद्रवृंदाग्रणी
आले आजवरी किती ! विलसती त्वत्कंठमालामणी !
तेजःपुंज, सुवृत्त, सुंदर, गुणी, कल्याण-लाभप्रद,
राम-श्रीशिव-भूपतुल्य चमके कोणी दुजा का वद ?

## ४. शिवाजीचें स्वर्गारोहण

( ६४ )

झालीं जों न शिवाभिषेकसमया संपूर्ण वर्षें सहा,
तों नानाविध भीतिद क्षितिवरी उत्पात होती महा;
झाला कीं शिवभूप, ते सुचविती, स्वर्गप्रयाणोन्मुख.
मानी कीं अवतार-रंग-नट तो अंत्यप्रवेशीं सुख.

( ६५ )

पाहोनी प्रभुच्या असूंवरि यमें आणीयलें संकट,
युद्धा ते प्रभुनिष्ठ मृत्युवशही येती शिवांचे भट;
त्यांहीं कालचमू नभस्तलरणीं कापोनि कां काढिली ?
रक्ताची अथवा निरभ्र गगनें वृष्टी कशी गाळिली ?

( ६६ )

संबंधी मम चंद्रमा, जनक मी साक्षात् यमाचा तरी,
आपत्ती शिवसैनिकाभिभवजा येईल दोघांवरी.
ही शंका उपजे मनीं म्हणुनियां तेजोमयी मंडळीं
झाले ते स्थित चंद्रसूर्य गगनीं कीं दिव्यदुर्गस्थळीं.

( ६७ )

उन्मत्तापरि अंजनीरमणही लीला विचित्रा करी,
अंगीं चर्चुनि धूळ, भीषणरवें धांवे नभाभ्यंतरीं;
वर्ते देवगृहोदरीं शिरुनियां स्वच्छंद तो सर्वथा,
नाना तारक-दिव्य दीप पडते खालीं कसे अन्यथा ?

( ६८ )

आला भीषण धूमकेतु उदया आपत्तिमालाध्वज,
अश्रूचे कण गाळिती नृपतिचे उद्विग्न वाजीगज;
होता रम्य वसंतकाळ तरिही कर्णीं न कोठें पडे
दिव्या कोकिल-पंचमस्वरसुधा, कंठींच जाणो दडे !

( ६९ )

मध्यान्हीं घुबडें धरा घुमविती घूत्कारघोरस्वरें,
हुंकारें हुमणें हताश करिती दुःखार्तलोकांतरें,
आक्रोश श्रुतिचंड भेसुर शिवा दीर्घस्वरें फोडिती,
झाली उत्सवहीन शून्य मलिना संत्रस्त सारी क्षिती

( ७० )

पावे कंप धरा, तिला जणुं जडे शीतज्वराची व्यथा,
वृक्षा दुर्लभ पालवी, मग कुठें पुष्पोद्गमाची कथा !
देवांच्या प्रतिमांस भंग अथवा स्थानच्युती लाधली,
सृष्टीच्या प्रकृतींत हाय ! विकृती दृग्गोचरा जाहली !

( ७१ )

आधीं चंदनतुल्य देह झिजला जो देशसेवाव्रतीं,
तों त्या दुर्धर रोग जर्जर करी हो शस्त्रपातक्षतीं;
संभाजी सुत दुर्गुणी, सतत ही चिंताचिता जाळितां,
झाला तो मग पात्र शीघ्र पतना, आश्चर्य हें मानितां ?

( ७२ )

पक्षव्योमरसक्षमामित शकीं, चैत्रीं तिथी पौर्णिमा,
मध्यान्हीं दिनराज तत्सुतदिनीं आला वरी चांडिमा;

या काळीं तनु ठेविली शिवनृपें, त्या चित्रगुप्तें वही,
विश्रांती शिवसत्कृतीस लिहितां लाधे न ज्या लेशही.

( ७३ )

आधीं गोड शिवावतारसुकथा चित्तास ज्या मोहिती
आली मृत्युमुखीं तयां अमृतता गोडी कळेना किती ?
जों जों वृद्धदशा तयां, नवनवी तों तों रुची येतसे,
यावच्चंद्रदिवाकर स्थिरयशा त्यांच्या न शंका असे.

( ७४ )

आली लाज भगीरथा बघुनि जे दीर्घ प्रयत्न श्रम,
ते सोशी निजराज्यलाभरत जो, ठावा नसे विश्रम;
सेवी तो शिवभूप देवसदनीं विश्रांतिसौख्या चिर,
झाले त्या द्विशताधिकाब्द तंव तें वाटे अभंग स्थिर.

( ७५ )

तों आकस्मिक भूतलावरुनियां संग्रामकोलाहल,
कर्णाला बधिरत्व देउनि निघे, गांठी नभोमंडल;
तत्संचारवशें दिगंत हलती, ब्रह्मांडही हादरे,
विश्वव्याप्तिनिरीक्षणोत्सुक जणूं सर्वत्र तो संचरे.

( ७६ )

तो कोलाहल हालवी सकळही स्वर्गप्रदेशांप्रती,
तेथें श्रीशिवभूपकर्णविवरीं सेवी क्रमें तो गती;
निद्राज्येष्ठसहोदरांकगत तो तेणें घडे जागृत,
प्रेरी लोचन भोंवतीं रुचिर तो आरक्तवर्णावृत.

( ७७ )

येती वीर असंख्य संगरपथें रूपें वळें आगळे,
ज्यांच्या संस्कृति देश धर्म गुण वा व्यासंगही वेगळे;
आवर्तांक तसा भटौघ न खळे, सीमा पळाली दुरी,
येई दिव्य वसाहती वसविण्या, धात्री पडेना पुरी.

( ७८)

प्राक्संबंधविशिष्ट आंग्लभट जे त्यांहीं शिवस्वागत
हस्तांदोलन रम्य हास्य करुनी केलें, शिवें त्याप्रत;
क्षेमप्रश्न परस्परांतिल पुरे होती, दुजाही कथा,
ज्या युद्धप्रलयादिवर्णनविषें कर्णास देती व्यथा.

( ७९ )

एकांतीं मग भूप आंग्लभटही संभाषणीं सादर,
अन्योन्यांवरि वर्षती उभयही प्रश्नोत्तरांचे शर;
त्याच्या विस्तृत वर्णना उचित ही वेळा नसे वा स्थळ
सांगू प्रस्तुतकार्यसिद्धिकर जो सारांश तो केवळ.

( ८० )

अंतीं सादर आंग्लवीर वदतीः- आतां पुरे वाद हा,
युद्धाचा प्रलयाग्नि थोर भडके, भूगोल जाळी पहा;
भूलोकीं शिवभूपते ! त्वरित जा साम्राज्यसंरक्षणा,
येती धांवत वीर ते प्रिय तुझे, ऐशी करीं प्रेरणा.

( ८१ )

लोकीं विश्रुत मावळेप्रमुख जे सारे मराठे गडी,
ते एकत्र करीं, तयां रणगुरू होईं, करीं तांतडी;

जी इच्छा उचली रसातळाहि ती जाईल तेथें कशी ?
इच्छासिद्धिगृहीं प्रवेश करण्या तूं द्वारसा भासशी.

( ८२ )

होई दार उदारवर्य सदया ! केली तुवां जी कृपा
आम्ही ती स्मृतिमंदिरीं स्थिर करूं, होऊं ऋणी हे नृपा
त्वच्छब्दामृत सत्य मृत्युवशही राष्ट्रास संजीवन,
कां उद्योग सजीव राष्ट्र न गणी ? ये जीवनीं जीवन.

( ८३ )

जा जा, सत्वर, धांव पाव नृपते ! साम्राज्यसंरक्षणा,
येती धांवत वीर ते प्रिय तुझे ऐशी करीं प्रेरणा;
पन्थानस्तव सन्तु हे शिव ! शिवाः तच्छब्दरूपांतर.
केलें संस्कृतसंस्कृतीं नृपातिचें प्रस्थान त्या उत्तर.

( ८४ )

तानाजी शिवभूपतीसह निघे बाजीहि, झाले तिघे;
त्यां एकत्र बघूनि दत्तगुरुची स्वारी निघाली, गमे.
ब्रह्मा विष्णु महेश तीन सुर हे एकत्र होती जिथें,
दासी मागुनि ऋद्धिसिद्धि सगळ्या येती न शंका तिथें.

———

## ५. शिवाजीचा मराठ्यांस उपदेश

( ८५ )

जन्मापासुनि जन्मभूमिजननी ज्यांहीं सदा सेविली,
प्रेमाच्या सलिलें मलास हरुनी ती निर्मला राखिली,
प्राणांचा निधिही तदुन्नतिपदीं ज्यांही सुखें वेंचला,
त्यांहीं दिव्य विभूतियोग रचिला राष्ट्रीय-गीतेंतला !

( ८६ )

राष्ट्राचा इतिहास तोचि नटला जो तच्चरित्रक्रम,
राष्ट्राचा सुखशांति-विश्रमचि तो तद्दुःखकष्टश्रम,
राष्ट्राचा शुभयोग तो अशुभ जें लोकीं घडे त्यांजला,
त्यांहीं दिव्यविभूतियोग रचिला राष्ट्रीय-गीतेंतला !

( ८७ )

या राष्ट्रीय विभूति भूषविति जों प्रत्यक्ष भूमंडळ,
मर्यादान्वित तो तदीय सगळें कर्तृत्वलीलाबळ,
त्यांचा भौतिक पिंड अंतक-मुखीं जातां अनंतत्व त्या,
घेती सर्व गुणीं कुठें न दिसती सीमेंत कीं मावत्या,

( ८८ )

जी व्यक्तस्थितिरम्यता शिरतसे अव्यक्तभावीं, तिला
तर्कग्राह्य अतींद्रियप्रचुरता लाधे न सीमा जिला,
कीर्तीची शुभसंतती पसरते सर्वत्र, नाहीं मिती;
त्यांची अद्भुत उत्तरोत्तर घडे लीला वदावी किती !

( ८९ )

त्यांची संतत शून्यमूर्ति कवळी राष्ट्रोन्नती ही प्रिया,
त्यांचे संतत शून्यहस्त करिती राष्ट्रोन्नतीची क्रिया,
बोले संतत शून्य-मूक-रसना राष्ट्रोन्नतीच्या कथा,
चाले संतत शून्यपादयुगही राष्ट्रोन्नतीच्या पथा !

( ९० )

या राष्ट्रीय विभूति नित्य फिरती गुप्तस्वरूपें, तरी
संचारें निजराष्ट्र पूत करिती नेती सुमार्गावरी;
जे कोणी जन दिव्यदृष्टि धरिती ते मात्र त्यां लक्षिती,
नाहीं केवळ चर्मचक्षुस कधीं ही प्राप्य पुण्यास्थिति.

( ९१ )

येई श्रीशिवराज, गुप्त विचरे दिव्यस्वरूपें जनीं,
रेखा हो निजदृष्टि दिव्य करुनी तन्मूर्ति रेखा मनीं,
जें तद्वर्णन पुण्यतीर्थजळ तें, तद्‌बिंदुचें प्राशन
वाग्देवी मम ही करील न कशी व्हाया जगीं पावन ?

( ९२ )

तेजस्वी मुखचंद्रमा स्रवतसे वाङ्माधुरी ती सुधा,
धाले कर्णचकोर, सेवुनि उरे जी ती न जावी मुधा
त्यासाठीं मधुकोश काय रचिला श्मश्रुच्छलें भोंवतीं
दोघे कर्णचकोर नित्य जवळी संरक्षणा जागती !

( ९३ )

तेजःपुंज विशाळ नेत्रकमळें आकर्ण विस्तारलीं,
शोभे उन्नत नासिका, शुकमुखें उंची जिला लाजली,

बाहू सुंदर, दीर्घ वज्रदृढ जे, आजानु ते लोंबती,
काळानें प्रभुमृत्युबीज भरिलें त्या कीं खणूं पाहती.

( ९४ )

या सर्वांवर भाळ थोर विलसे, दिव्याक्षरें शोभती
तेथें कीं ' नवराज्य निर्मुनि कृती होईल हा भूपती '
सर्वांगीं नृपलक्षणें विलसती, क्षेत्रीं सुबीजें जशीं,
रेखाछत्रविशिष्टपादकमळें घ्यावीं न माथां कशीं ?

( ९५ )

ऐका श्रीशिवदिव्यमूर्ति वचनीं झाली दिसे सादर,
ओष्ठप्रांत हले, करी उचल; कीं कंठांत वाङ्निर्झर;
जी बोधोक्तिसुधा सुधाकरमुखें भूपाळ ओती तिला
लोकांनीं निज दिव्य कर्णविवरीं सन्मान हर्षें दिला.

( ९६ )

बोले श्रीशिवः-लोक हो म्हणवितां आम्ही मराठे गडी,
नांवाला जुळती मुळीं न करणी केली कशी वांकडी ?
" संग्रामीं मरती परी न हटती जे, ते मराठे खरे. "
ही व्युत्पत्ति न सोपपत्तिक असें शुष्मत्कृतीनें ठरे.

( ९७ )

सर्वस्वा मुकले परी न चुकले नांत्रास लोकीं भले,
नांवाला जपले म्हणूनि तरले, सर्वार्थ त्यां लाभले;
नांवाला विसरूं नका, दृढ मनीं नामाभिमाना धरा,
पूर्वीं पूर्वज जें अपूर्व करुनी गेले, सदा तें स्मरा !

( ९८ )

लोकीं उत्तम ते, विवृद्ध करिती जे पूर्वजांचें यश,
लोकीं मध्यम ते, न जे करिति तें वृद्धिक्षयाला वश;
ते लोकाधम, जे स्वपूर्वजयशा देती कलंकक्षय,
या वर्गांत कुठें मिळे स्थळ तुम्हां त्याचा करा निर्णय

( ९९ )

ते निःशंक नृसिंहपूर्वज, जिहीं जन्मा तुम्हां आणिलें,
आह्मां सिंहकिशोर, हें मग कुठें मेषत्व संपादिलें ?
ज्यांची ती रणगर्जना परिसुनी चिंता कृतांता पडे,
त्यांचें वंशजवृंद हें रणभयें रानीं वनीं कां दडे ?

( १०० )

निर्वेदस्थिति भूत कीं अवदशा, आर्या तुम्हां ती तरी
झाली संमत सर्वनाशजननी, आश्चर्य हें भूवरी
आम्ही सिंहकिशोर ही दृढमनीं बांधा सदा भावना,
आत्मप्रत्यय कल्पवृक्ष पुरवी साऱ्या मनःकामना.

( १०१ )

पूर्वी विश्रुत शंकरार्जुनरणीं निःशस्त्र झाला नर,
केला षण्मुखतात मुष्टिहननें पार्थें तदा जर्जर;
पूजेनें तसल्या प्रसन्न विजया झाला भवानीपती,
निःशस्त्रस्थिति कां निमित्त तुमच्या होई सुदैन्याप्रती.

( १०२ )

झालां भेकड हीन दीन दुबळे कां मर्द हो कागदी ?
दैन्याचे गिरि, संभवे जिथुन ही शोच्यस्थितीची नदी.

भीरुत्वादि-समर्थनार्थ कसलीं शोधीतसां कारणें ?
त्याज्य क्षत्रियपुंगवांस गमलीं सांगा कधीं कां रणें ?

( १०३ )

गेलें होउनि तें पुन्हां न परते, त्याचें नको चिंतन,
नाहीं निश्चित भाविकालगतिही, तेथें न ठेवा मन;
सद्यःकाल समर्थ अर्थघटनीं, त्यांतलि एक क्षण,
त्याचें मूल्य न वर्णवे; तरि उठा, कैवल्य माना रण.

( १०४ )

झाडा ही विपरीतवृत्ति, डसली अंगा भुजंगी जशी,
सोडा निष्फळ मृत्युभीति, न टळे ती, कर्मरेषा जशी
मागें सर्व कुटुंबभार निरवा देवी भवानीवरी,
ठोका दंड, उठा चला, पण करा, मारूं मरूं वा तरी !

( १०५ )

‘ स्वर्गद्वारचि धर्मयुद्ध उघडे ’ श्रीकृष्ण जें बोलले,
आली ती रणपर्वणी, भट किती यात्रेस त्या चालले.
आतां हीच तृषार्तकर्णविवरीं वर्णामृताची घडी.
जाण्या तेथ समस्त उत्सुक उभे आम्ही मराठे गडी !

———

# गजासुरवध

( महाकाव्य )

जो अग्रणी सकल-मंगल-देवतांचा
जो नाथ हो निखिल-भूतल-वाङ्मयांचा
वंदूनि त्या चरण युग्म गजाननाचें
आरंभितों चरित-चित्र गजासुराचें

# सर्ग १ ला

## गजासुर-प्रतिज्ञा-निरूपण

( उपजाति वृत्त )

आला वरी शारद-काल-चंद्र
देई तमाला क्षणि अर्धचंद्र
तदा पुरी ती महिषासुराची
न्हाली गमे दुग्धपुरांत साची १

रक्तच्छटाव्याप्त भयाण लाल
असे पुरीसंन्निध जें निशाल
पाहे जणूं त्या समरांगणातें
द्विजेंद्र तो कातर-दृष्टीपातें २

निशाचरांचे शवशैल थोर
रक्तोदकाच्या सरिता सुघोर
निर्मी तिथें अष्टभुजा भवानी
यच्छौर्य लोकत्रय सर्व वानी ३

राशी शवांच्या पडल्या प्रचंड
तेथें पडे त्यांवरि रश्मिखंड
वाटे करांनीं हिमरश्मिमाली
वीरांवरी त्या शववस्त्र घाली ४

शिवा शवास्वादनिं जीस गोडी
रणांगणीं भेसुर हाक फोडी
पिशाच्च तीतें अनुवाद देती
ऐकोनि ज्यातें भय कर्ण घेती ५

निशा क्रमें मध्यपदा निघाली
निद्रेस सारी वश सृष्टि झाली
चैतन्यलीलेस मिळे न ठाव
धरी पुरा भूमुख मूकभाव ६

शिवा-पिशाचादिक-भूतजात
मारी स्वभक्षावरि पूर्ण हात
आकंठ मांसाशन होय जेव्हां
जागींच ये त्याप्रति नीज तेव्हां ७

बीभत्स-रौद्र-स्थितिचा पसारा
रणांगणीं देखुनि चंद्र तारा
घेती जणूं विस्मय, भी, मनांत
विराजती स्तब्धपणें नभांत ८

पंगूपरी वायु मुळीं न चाले
न कीं कुठेंही तृणपत्र हाले
रणप्रसंगीं गमतें मनाला
पायावरी त्यासहि वार झाला ९

निःशब्द निर्वात निचेत शांत
चराचर स्तब्ध दिसे नितांत

निशाभिषग्योजित सृष्टिदेवी
संमोहनाख्य द्रव काय सेवी १०

सुशांतिचें राज्य सुतंत्र साजे
मुकें तिचें शासन पूर्ण गाजे
चढे तिचें वैभव हो शिगेस
तों विघ्न आकस्मिक ये तियेस ११

गजासुरा हांक तिथें प्रचंड
उठे करी व्योमतला दुखंड
कांपे धरा प्रेतसमूह हाले
ऐकूनि ती का असु त्यास आले १२

मध्यंतरीं थांबुनि अल्पकाळ
पुनः पुनः हाक तशी विशाळ
उठे महाराक्षस देत देत
छाया तशी दीर्घ तयासमेत १३

ताळापरी उंच असे तदंग
काळा तया कज्जलतुल्य रंग
माथीं जटाभार पिशंग रांठ
लोंबे सदा ज्याप्रति ये न गांठ १४

विक्राळ भीतिप्रद उग्र आस्य
देई यमाच्या महिषास दास्य
बाहेर ये त्यांतुनि दंतभार
सुदीर्घ जो सीर-समान-सार १५

ललाटपट्टावरती विशाळ
सिंदूरचर्चा विलसे कराळ
शिलातटीं सागर मध्यवर्ती
रक्ता जशी दीपित-दीप-वर्ती १६

असंख्य अंगीं जखमा तयाच्या
केल्या कलत्रें शशिशेखराच्या
तो त्याच वीरोचित भूषणांनीं
शोभे जपावृक्ष जसा फुलांनीं १७

मूर्च्छातम द्वार यमालयाचें
गांठी रणीं राक्षस विद्ध साचें
दैवें करस्पर्श सुधाकराचा
नेई लया मोह परी तयाचा १८

तत्सैनिकां मृत्युच मूर्च्छना ती
भासे तया सोडुनि सर्व जाती
पक्षी दवग्रस्त जसे नगातें
मयूख कीं मावळत्या खगातें १९

अंतीं दिव्याचें बळ वर्धमान
मानी तसें तो निज देहभान
प्राणाहुनीही प्रिय एक काम
हो तो स्वपुत्रा कथण्या सकाम २०

तारस्वरें यास्तव तो सुताला
बाही, मनीं फार अधीर झाला

क्षणीं तया मोल दिसे युगाचें
अंतीं पटे काल-महत्त्व साचें २१

हो योजनार्धावरि विद्यमान
रणांगणापासुनि जें स्मशान
करी तदा तेथ सभृत्यलोक
चितेसवें तो गजदैत्य शोक २२

कर्णीं पडे हांक यदा पित्याची
हो विस्मृता वृत्ति गजासुराची
श्वासक्रिया तत्क्षणिं रुद्ध झाली
विलग्नता ओष्ठपुटास आली २३

करूनियां मानस सावधान
अर्पूनि हांकेप्रति नीट कान
ही तातवाणीच अशी प्रचीती
ये घे तदा वाट अभीष्ट जी ती २४

" संजीविनीचा करुनी प्रयोग
दे तातदेहा कवि जीवयोग "
विचाररूपी पथिं हा तरंग
उठे करी हृष्ट तदंतरंग २५

भोगी तदा दानव राजबाळ
नवीन-तारुण्य-सुरम्य-काळ
विद्या कला ज्या उचिता तयाला
तो त्यांत पारंगत पूर्ण झाला २६

आजन्म तो बाळ असे करारी
महाभिमानी वचनानुसारी
धाऽयंकशायी शिशु तो रडोनी
स्वकीय घे छंद पुरा करोनी २७

पुढें करी दुर्दम तो कुमार
स्वहेतुसिद्धिस्तव हट्ट फार
बाहूप्रतापें मग आद्वितीय
तो कामना पूर्ण करी स्वकीय २८

तो शैशवीं कृत्रिम-सैनिकांची
पंक्ती रची तेविं रणायुधांची
वीराग्रणींची रणरीति दावी
निदर्शवी विश्वजयास भावी २९

त्रिलोक-लावण्य-विलास-भूचें
स्वरूपवर्णें सित जें प्रसूचें
तें घेऊनी अंबुद-नील-वेष
गजासूरांगीं उतरे अशेष ३०

तसा पित्याचा अतुल प्रभाव
तदंतरीं घे परिपूर्ण ठाव
रूपें प्रभावें गमतें मनाला
" साधील लोकोत्तर हा यशाला " ३१

" भालार्पिता मूळ लिपी पुसाया
लावील हा अन्य मला लिहाया "

या भीतिनें कीं विधिनें तयाचें
केलें सुविस्तीर्ण ललाट साचें ३२

संफुल्ल नेत्रांबुजयुग्म फार
पाणी तिथें कीं विलसे अपार
समर्पुनी पुष्टिस तेंच पाणी
मुखांबुजाही रुचिरत्व आणी ३३

आजानु त्याचे भुज लंबमान
लोहार्गलाशीं दिसती समान
प्रताप त्यां तें वचनानुरूप
परीस हो दे शुभ हेमरूप ३४

विस्तार वक्षःस्थल फार पावे
शौर्यादि तेथें गुण कीं वसावे
रेखातपत्र-ध्वज-वज्र-पद्म
शोभे तयाचें बहु पादपद्म ३५

पित्यापुढें पुत्र असा क्षणांत
त्या चंद्रिकाव्याप्त रणांगणांत
राहे उभा जोडुनि हात दोनी
प्रेमार्णवीं जाय पिता बुडोनी ३६

कठोर पृष्ठासम कासवाचे
प्रेमें परी ज्यांत मृदुत्व सांचे
हातें अशा तो कुरवाळण्याला
लागे पिता पुत्रमुखांबुजाला ३७

अपत्यवात्सल्यरसार्द्रदृष्टी
गाळी सुताचे वरि अश्रुवृष्टी
पुनः पुनः चुंबितसे सुताला
हातीं धरोनी मुखपंकजाला ३८

दाटे गळा शब्द फुटे न वाचे
तदर्थ होती व्यवसाय काचे
अंतीं वदे यत्न करून थोर
ऐके सुत व्यग्रमनें समोर ३९

" आतां सुता काळ समीप आला
नेईल नाशा महिषासुराला
तेणें नसे मी अणुमात्र भीत
येणार तें आज उद्यां खचीत ४०

धैर्यद्युतीचा जणुं कण्ठहीर
गाजे जगीं जो जगदेकवीर
दिला तया मृत्यु सुराधमांनीं
कापट्ययोगें अवलाकरांनीं ४१

हा तीक्ष्णशल्यासम मानभंग
वत्सा विदारी मम अंतरंग
मृत्यूहुनी मृत्युच मानहानी
मानी तुला मादृश मान्य मानी ४२

दे मानभंगाशनि तीव्र घाय
करी मदात्मा बहु हाय हाय

कोपें कढे हा अतिमात्र काय
पडे चिताग्नींत सजीव काय ! ४३

आकर्षितां जीवित कालपाश
पावेल माझा तनुताप नाश
मदीय आत्मा परि तापमुक्त
होईल हें बा ! नच शक्य युक्त. ४४

लाभेल त्या शांति न पिंडदानें,
किंवा न वत्सा तव तर्पणानें,
तच्छांतिचा केवळ एक लोकीं
उपाय तूं सादर ऐक जो कीं ४५

नीचाग्रणी छद्मपटु प्रसिद्ध
स्वभाववैरी रणभीरु सिद्ध
जे देव त्यां संतत सर्व ठायीं
चुकूं नको बा छळण्या अपायीं ४६

मांडी तयाशीं घनघोर युध्द
खळाळवीं रक्तनदी अशुद्ध "
हें बोलतांना महिपासुराला
आवेश वीरोचित थोर आला ४७

तेणें सुटे कंप तदा तदंगा
जिव्हा वरी तत्क्षणिं वर्णभंगा
हवेंत देती भुज मुष्टिघात
ओष्ठीं घडे दारुण दंतपात ४८

निश्वास नासापुट दीर्घ सोडी
घर्मोदकस्राव ललाट जोडी
देहांत जें जीवन जीविताचें
तें संचरे रक्त सवेग साचे ४९

स्वप्रांतभागां हलवी तयाची
तदा सुरक्तव्रणपंक्ति साची
पुरें कराया निज भाषणातें
योजी जणूं तो विविधां मुखांतें ५०

दैवीं परी तें नव्हतें तयाचे
हो क्षीण, ये स्पष्ट न शब्द वाचे
" सू-सूड-घे-वा-व-सु-सू-र- रां-चा "
हें बोलतां अंत घडे तयाचा ५१

घडे तदा वृत्ति गजासुराची
विषाद-कोप-स्थिति-मिश्र साची
व्याघ्री जशी व्याधशरें हताला
पाहून पार्श्वास्थित पाडसाला ५२

एकीकडे अश्रु अपार गाळी
एकीकडे दे अमरास गाळी
दुःखें द्रवे कोपभरें कढे तो
शीतज्वराचें जणुं साम्य घेतो ५३

क्रमें तयाचा गळला विषाद
चढे परी कोपकरीस माद

कुमार तो केसरिचा किशोर
वदे प्रतिज्ञामय शब्द घोर ५४

" अपूर्ण पूर्णोक्ति-वशें पित्याच्या
कळे जरी हृद्गत भाव साचा
यथार्थ तन्निर्णय कल्पनांहीं
लावूनि घेणें, गति अन्य नाहीं ५५

अव्याप्तिचा यास्तव दोष खास
नसो प्रतिज्ञामय लक्षणास
घडो अतिव्याप्ति जरी घडेल,
सदोषही ती सगुणा ठरेल ५६

म्हणूनि कक्षा निजभाषणाची
करीतसें व्यापक दीर्घ साची
तिच्यांत तातान्तिमकाम यात्रा
समग्र साधिक्य उणा न व्हावा ५७

हे अंतरिक्षस्थित तारकांनों
दाही दिशांच्या अधिदेवतांनों
सुधाकरा ! लोचन लोभनीय-
साक्षी प्रतिज्ञेस असा मदीय ५८

वसुंधरे, देवि शुभे महाच्या
हे आद्यसृष्टे चतुराननाच्या
हे अंजनीनाथ नभोद्वितीय
साक्षी प्रतिज्ञेस असा मदीय ५९

या विश्वविश्वांतरिं थोर सान
आहेत जे जे सुर विद्यमान
होतील वा – जिंकुनियां तयांस
करीन तेजें निजदास-दास ६०

देतील ते शाप अमर्त्यभावा
जेणें तयां मृत्युच गोड व्हावा
त्यांचे असे जाच करीन नाना
धिक्कारिती जे यमयातनांना ६१

विश्वांत जे जे सुरपक्षपाती
चारीन त्यां त्यां अधमांस माती
विश्वांत जें दैविक तें अशेष
करीन तेजें स्मृतिमात्रशेष ६२

माझी "न भूतो न भविष्यती" ति
होईल हो देवनिकार-रीति
संपूर्णकार्यें घडल्याविना हीं
सुखोपभोगा शिवणार नाहीं" ६३

अशी प्रतिज्ञा करूनी कराल
राहे उगा जों नव दैत्यपाळ
तों भोंवतीं भृत्यगणास पाहे
जो चित्रसा निश्चल मूक राहे ६४

ऐकूनि वाणी महिषासुराची
देखूनि ती निर्गति तत्सुताची

हे भृत्यही त्या समरांगणातें
आले करी जों गज भाषणातें ६५

त्याची प्रतिज्ञा परिसून घोर
कांपे धरा, घे जणुं भीति थोर
नभस्तलांतून कितीक तारे
भीग्रस्त जाणों पडले बिचारे ६६

पूर्वप्रकल्पितचितेवरि तो सभृत्य
सारी स्वताततनुचें गज अग्निकृत्य
गेली पतीसह सती जननी तयाची
साध्वीस संगति रुचे मृतही पित्याची ६७

तातप्रसू-मरण-वज्रयुग-प्रहार
सोशीत " मूर्त-धृतिचा निधि " तो कुमार
" कैसें करूं सफल मी निजभाषणातें "
चित्तांत घोळवित हें परते गृहातें ६८

हितकर परिणामीं आवडे ज्या विवाद
मुकुटमणि मुनींचा नारद श्लाध्यपाद
कथन करित हिंडे तत्प्रतिज्ञा त्रिलोकीं
मज गमत वपुष्मान् " वृत्तपत्रेश " हो ! कीं ! ६९

———

# सर्ग २ रा

## — गजासुरप्रस्थान —

( वसंततिलका )

संघेंत जें वचन शेवट घे प्रवेश
त्या दे कृतींत पहिलें पददानवेश
" जाणार ती परम दुर्घट शेवटास
गेलीच वा " ध्वनित कीं करितो जगास १

म्हैसूर सांप्रत जया अभिधान साजे
त्या राष्ट्रिंचा नृप जरी गजदैत्य गाजे
तन्मस्तकास न शिवे अभिषेकतोय
पूर्वींच कीं पणतृषेप्रति सेव्य होय २

तें राजछत्र सित सुंदर दैत्यराया
छाया प्रयाणसमयीं न सजे कराया
" पादप्रहार न करो रवि आपणास "
घेना शिरीं म्हणुनी चामरयुग्मवास ३

जाणों शिरोमुकुट तो मणिदिव्यभास
हो छत्रचामरसुहृद्विरहें उदास
कीं त्या गजासुरशिरीं न रुचे विलास
कोणांतरीं पडुनि कंठितसे दिनांस ४

भेटी तदीय तनुची हरिणाजिनास
लाभे अलभ्य वडली मणिमंचकास
रत्नावली-किरण-जाल-मिषें तयाच्या
ज्वाळाच कीं भडकल्या विरहानलाच्या ५

जे जे नृपोचित दुजे विविधोपचार
ते ते त्यजी जणुं गणी अवघे असार
तद्वृत्तिही पुढिल तापसभूमिकेची
पूर्वप्रयोगकृति हो मनिं ये असेंची ६

देण्या पुढें सुरगणांप्रति दास्यदान
तो मांसमद्यपरिवर्जित अन्नपान
सेवी सदा करुनि पूर्णमनोनिरोध
थोरांसवें हिताचि हो करितां विरोध ७

लावण्य-सद्गुण-कला-कुल-शालि-धाम
जीचें जगास ‘ करिणी ’ श्रुत होय नाम
ती कन्यका शशिमुखी मददानवाची
भावी वधू ठरविली महिषें सुताची ८

संघा असे वरियली निजपूर्वपत्नी
ती जों असे तंव नसो तिजला सपत्नी
या हेतुनें तनय तो महिषासुराचा
स्वीकार त्या नच करी करिणीकराचा ९

सिंहासनीं असुर तो गुरुपादुकांतें
योजी सुयोग्य सचिवां क्षितिपालनातें

राहे अलिप्त नच घे शिरिं राज्यभार
त्या राम जेंवि भरता पण सर्वसार १०

एवं तदीय तनुमानस-सर्ववृत्ती
संलग्न इष्ट विषयीं परिपूर्ण होती
होऊन ऐहिकसुखीं विमुखप्रवृत्ती
एकास लाभ दुसऱ्याप्रति हानि देति ११

संधा सुरांस भयदा, सुखदा पित्यातें
राहे अधिष्ठुनि सदा दृढ तन्मनातें
जी शून्यता गुरुवधें मनिं ये अगाध
संधेस तीच मनिं कीं पद दे अबाध १२

जेथें रणक्षितीवरी जनकासमोर
केला निशीथसमयीं पण फार घोर
त्या भूमिच्या प्रतिदिनीं गज दर्शनातें
जाई, पण स्मृति मनीं दृढ घे पदातें १३

त्याच्या मनीं नच दुज्या विषयास जागा
तो एक केवळ असे अभिलाष जागा
जागे जसा स्थिरचरीं परमेशपात्र
तेथें तदन्य न कुणी अधिवासपात्र १४

देई जसें सततदंशवशें अशेष
आत्मत्व कीटवपुला भ्रमरी विशेष
तैसें सदा निजमनोरथ-चिंतनानें
तादात्म्य पूर्ण दिधलें स्वमना तयानें १५

सोडोनियां स्वविषया अणुरेणुमात्र
तच्चित्तवृत्ति न ढळे धृतिसारपात्र
" माघार " हे अशुभ वर्ण तिला न ठावे
कां साम्य घोरपडिशीं मग ती न पावे १६

नांदे सदा विषय तो हृदयीं तयाचे
तेथूनि संगतिवशें जणुं शोणिताचे
व्यापी पुरें नखशिखांत तदीय अंग
रोमीं, लवीं, लवलवीं, भिनला अभंग १७

ज्ञान-क्रिया-करण-मानसबुद्धिवृत्ती
त्याच्या, नद्या गमति भिन्नमुखप्रवृत्ती
अंतीं तदीय दृढनिश्चय-सागरातें
जाऊनियां मिळति अर्पिति पुष्टि त्यातें १८

इष्टार्थ केंद्र घडला गजदानवाचा
तेथें तदीय बलवृत्तिविचारवाचा
निःशेष एकवटुनी बळ निश्चयाचें
विस्तारिती कुसुम पूर्व फलोदयाचें १९

कालक्रमें शकुन त्या असुराधिपाला
इष्टार्थ-मार्गगमनीं शुभ फार झाला
विश्वास आत्मगत कीं मनिं पूर्ण बाणे
जो सिद्धिचा गणिति आद्यसखा शहाणे २०

वासस्थळें विपुल-विक्रम-साहसाचीं
पात्रेंच पूर्ण भरलीं दुसऱ्या रसाचीं

चिंती सदैव चरितें निजपूर्वजांचीं
विश्वास-निश्चय-बलाग्निस आज्य साचीं २१

झाले महाप्रबल दानववीर पूर्व
जे तत्पराक्रम अतुल्य तसे अपूर्व
त्यांचें करी श्रवण सादर सावधान
विश्वास-निश्चय-बला नव पुष्टिदान २२

यत्न प्रयत्न धृति-साहससार साचें
वाची करी मनन वृत्त भगीरथाचें
तेणें गणी सतत यत्न परंपराहीं
होई 'अशक्यचि' अशक्य दुजें न कांहीं २३

"दैत्येंद्रवीरचरितांतिल एक सार
देई गजासुरमनाप्रति खेद फार
"कीं जिंकिलें सुरगणां सगळ्या तयांनीं"
देवांचिया अहह ! हंत ! वरप्रदांनीं २४

देणार मीं चरण सव्य शिरीं सुरांचे
शौर्ये प्रचंड भुजदंडबलें स्वतांचे
घेणें पराश्रय तरी नच तो सुरांचा
घेईन वर्जुनि तया भलत्या कुणाचा २५

तो दर्पवृत्तिस अशा असुराग्रवीर
चित्तीं धरीं दृढ-अहंकृति कंठहीर !
आधींच दुर्घट असा पण जो तयाचा
या वृतिनें परम दुर्घट होय साचा २६

इष्टार्थचिंतन सदा करितां असेंची
तो एक शब्द माहिषासुरपुत्र वेंची
हो सिध्दता सकल सिद्ध तदा मनाची
प्रस्तावनाच पुढल्या कृति-विस्तराची २७

निर्मी मनोरम मनोमयं सृष्टिलीला
रंगे तिच्यासह करी बहुकाळ लीला
ये वीट त्या जणुं तिचा बहु दैत्यराया
प्रत्यक्ष सृष्टिंत बघे कृतिच्या शिराया २८

जो रम्यरूप रमणीय सुखप्रवेश
भासे दुरूनि असुरा कृतिचा प्रदेश
जातां समीप बहुरुक्ष दिसे भयाण
तेथें न तत्पद धजे करण्या प्रयाण २९

वाङ्निश्चयें प्रथित दुष्कर घोर साचा
संकल्प अंतिम जगीं निजजीविताचा
"योजूं कसा कृतिसवें दृढ" हा विचार
आसी गजासुरमना भ्रमवी अपार ३०

संत्रस्त मंडल जसें मधुमाक्षिकांचें
गुंगे भ्रमे स्वविषयीं मन लुब्ध त्याचें
विश्रांतिचें निपट त्या पद निर्विकार
लाभे, परी नवल त्या त्यजिना विकार ३१

दिङ्मोहमोहित जसा नर काननांत
कीं मुख्य नाविक जसा मकरालयांत

इष्टस्थलोचित पथा न शके तसा तो
रेखावया विवश सर्व दिशा पहा तो ३२

तों शोच्य मृत्युतिथि वार्षिक ये पित्याची
अस्वाध्य घे अधिक वृत्ति गजासुराची
तो कीं कळे न करण्या गुरु मंद वा तें
जाई यथाक्रम पण क्षितिदर्शनातें ३३

तो घेउनी निजशिरावर रश्मिभार
उल्लंघितां पथ नभस्तलिंचा अपार
आदित्य दिव्य पथिक श्रम फार पावे
अस्ताद्रिच्या म्हणुन कीं शिखरीं विसावे ३४

केशावली रविशिरीं किरणस्वरूपा
झाली गमे विरळ वृद्ध-दशानुरूपा
जातां लया सुदिन कीं दिनराजयाचा
गेला लया विपुलही दलभार साचा ३५

अध्वश्रमें दिनकरा बहु ताप झाला
होई न तो सहन कीं बहुधा तयाला
अस्ताचलीं म्हणुनि शीतल वात सेवी
वस्त्रापरी किरणमंडळ दूर ठेवी ३६

जे राहिले मजसवें उदयप्रसंगीं
ते सोडिती किरण कां मजला प्रसंगीं
देखूनि दुष्कृति अशी बहु कोप आला
त्या कारणें मज गमे रवि लाल झाला ३७

संपूर्ण कुंकुमरसें भरली प्रतीची
भासे मना समरभूमिचिया प्रतीची
लीनप्रभावलय भास्कर लब्धदैन्य
शोभे श्रमाकुल जसा भट नष्टसैन्य ३८

लोकोपकार करण्या निजरश्मि मात्र
वेंची, उरे तपन केवळ बिंबमात्र
होई विशेष नयना परि तोषदाता
चित्तीं भरे अधिक निर्धन पूर्ण दाता ३९

सूर्यासवें बिसिनिचा चिर-मित्र-भाव
चित्तांमध्यें निपजवी बहु चित्रभाव
पाहूनियां प्रियकरा परितापमुक्त
झाली मनीं कमलिनी परितापयुक्त ४०

जों जों करी गमन भास्कर पश्चिमेस
तों तों मिळे भुवनिंच्या लय-चेतनेस
मंदावलें विविध-भूमुख-शब्दजाळ
अंगप्रभा जगीं तिची गळली विशाळ ४१

जेव्हां बुडे जलधिच्या जलिं अर्धकाय
घेण्या समाश्रय जणूं दिनकालराय
दे क्षीण आत्मकर उन्नतशैलभाळीं
उच्चांस उच्चसहवास रुचेल काळीं ४२

ज्या सागरीं सकल-भूतल-तीर्थ-गेह
ठेवी तदंतरिं सुखें रवि शुद्ध देह

आत्माच सृष्टितनुचा परलोक सेवीं
कां हो न शून्य मलिना मग सृष्टिदेवी ४३

रत्नें दुजीं वसति अंतरिं सागराचे
शंका अशी निपजली मनिं निर्जरांचे
शोधार्थ ते म्हणुन पाठविती दिनेशा
तो हेरसा करितसे जलधिप्रवेशा ४४

सायंतनें विकसलीं कमळें फुलेंही
दीपावली मिरविते निजतेज गेहीं
झांकीं स्वपर्णनयना तरुवर्ग कांहीं
मित्रापदा निरखिण्या जणुं शक्त नाहीं ४५

मार्तंड हा तिलक सुंदर कुंकुमाचा
गेला गळूनि घडला क्षय मंगलाचा
सायंप्रभा अनुमृता जणुं शोकमग्ना
तों जन्म घे रजनि कृष्णमुखी कुलघ्ना ४६

युद्धांगणीं धड नसे तम तेज वा तें
अस्पष्टरूप वरितें क्षितिदिङ्मुखातें
इष्टस्थलागत गजासुर एक थोर
तों पाहतो पितृसमा प्रतिमा समोर ४७

लोपे दिसे वरिवरी प्रतिमा पित्याची
हो भ्रांत विस्मित तदा मति तत्सुताची
या अल्पकाळ वरुनी सदसत्स्थितीचे
ती अंधकारपटलांतरिं घे गतीतें ४८

आला अनंतर गजासुर तो गृहातें
ये भ्रांत-विस्मित-विषण्ण-दशा मनातें
रात्रौ मृगाजिनतळीं गतनिद्र लोळे
चित्तीं पिता पण अनिश्चितवृत्ति घोळे ४९

त्याचें अनिश्चयवशें मन घे न थारा
आवर्तलग्न तृणतुल्य फिरे गरारा
वाग्रज्जुनें तदवलंब गमे कराया
तो बोलला स्वगत दानव भाषणाला ५०

“ जो जो अमूर्त उठतो हृदयीं विचार
तो तो वचःपथिं रिघे जरि मंदसार
येतां कृतींत बहुधा परिपूर्ण लोपे
भारी क्रिया कठिण शब्द विचार सोपे ५१

मच्चित्तवृत्ति घडली जणुं टंकशाळा
उद्दिष्ट-हेतुमय नाणकदीर्घमाळा
निर्मी वृथा अजुनि कीं विधिराज याची
मुद्रा असे तिजवरी उमटावयाची ५२

लाधे जरी उदरिं धान्यकणास वास
येई गुरुत्व बहुमान तरी तुपास
संगें तसेंच कृतिच्या वचनास मोल
त्यावांचुनी विफल तें ठरणार फोल ५३

शून्यस्वरूप गगनासम हो विचार
त्या नामरूपा वितरी वचनप्रसार

घाली तयांत कृति जीवित रूपसार
गर्भी मृतासम अकर्मक जो विचार ५४

तोली विचारसरणीस समग्रवाणी
वाणीस अंतर कधीं करणीं न आणी
जे एकरूप करण्या क्षम या त्रयीतें
ते धन्य धन्य बहु मान्य सदा महीतें ५५

आराधना मज नसे करणें सुरांची
मैत्री कृपा मज मुळीं नलगे तयांची
इष्टार्थसिद्धिस खरा न सुचे उपाय
शुक्राविणें मज दुजा न दिसे सहाय ५६

जाण्या चढोनि वरतीं पणरूप सौध
सोपानसा मज घडेल तदीय बोध
होई उपस्थित सुदुर्घट कार्य जेव्हां
सन्मार्गदर्शक असे गुरु एक तेव्हां ५७

पृथ्वी फुटो, नभ तुटो, हरि वज्र टाको
साक्षात् महाप्रळयकाळ समोर ठाको
कांहीं घडो सफळ मीं करणार संधा
मोडीन कां इतर विघ्नशत-प्रबंधा ५८

एवं विचार विपिनीं गहनीं अपार
हिंडे गजासुर, घडे श्रम त्यास फार
तों ती वरी रजनि पाश्चिमयामवास
निद्रा सदा श्रमसखी गजदानवास ५९

जो मृत्यु सोदर तदीय सुषुप्तिवास
तो जागृतीसह विचित्र वरी विलास
ये स्वप्नसृष्टि उदया मग चित्ररूप
तेथें बघे पुढिल तो भयदस्वरूप ६०

“ हो मध्यरात्र पडला सुघनान्धकार
तारे शशी न गगनीं करिती विहार
व्योमीं करी घनघटा घनघोर घोष
“ सों सों ” समीर करुनी मिरवी स्वरोष ६१

विद्युल्लता चकचके जगती दिपावे
त्या मागुनी कडकडे श्रुति कंप पावे
धो धो पडे मुसळधार पयोधरांची
धो धो रवें पळतसे तति निर्झरांची ६२

आक्रोश कर्कश पिशाचसमूह फोडी
आक्रंद हिंस्रपशुवृन्द भयाण सोडी
झाडें “ कडाड् ” करिती ध्वनि कर्णचंड
घूत्कार घोर करिती घुबडें उदंड ६३

कल्होळ हा प्रलयगर्जितसा कराल
पृथ्वीमुखांतुनि निघे क्रमिनो निराळ
त्याही विलंघुनी गिरा महिषासुराची
तत्कर्णगोचर पडे बहुघोर साची ६४

“ वत्सा तुझा पण कधीं पडणार पार
या यातना मम कधीं लय पावणार

आतां मला सहन हा करवे न ताप
कां स्वस्थ तूं ? तव कुठें दडला प्रताप ? ६५

होती असे श्रवणगोचर शब्द जेव्हां
विद्युत्प्रहार घडला बहु तीव्र तेव्हां
हो पृष्ठभाग विवरांकित भूतलाचा
त्यांतूनि हो प्रकट अर्णव पावकाचा ६६

( उपजाति )

त्या पावकाचा अति तीव्र दाह
वरी असे एक महाकटाह
तदंतरीं तेल कढे नितांत
पिता गजाचा पडला तयांत ६७

( आर्यागीति )

तळमळतो कळवळतो,
वळवळतो महिष विवश हळहळतो
" पुत्रा मज मुक्त करी "
या कामें दीनदृष्टि त्या बघतो ६८

( भुजंग प्रयात )

विचित्रा अशी पाहुनी स्वप्नलीला
वरी दानवाचा प्रभू जागृतीला
पित्याचा तया स्वप्नज क्लेश सारा
खरा वाटला लोटल्या अश्रुधारा ६९

( वसंत तिलका )

हें स्वप्नदर्शन सुदर्शन तुल्यधामें
तत्पृष्ठलग्न पळही न वरी विराम
प्रेरी तया सतत काव्यसमाश्रयातें
भासे सदा रसिकचित्तसमान यातें ७०

( मालिनी )

मतिमद गुरवी जो नीतिशास्त्रीं सुरांचा
प्रथित कुलगुरु जो सर्वही दानवांचा
हितकर कविचा त्या द्यावया बोध नामी
महिषसुत निघाला एकला पादगामी ७१

# किरातार्जुनीयाचें रूपांतर

# ईशस्तवन

( आर्या )

श्रीमन्मंगलमूर्ते ! वाग्देवी-जीवितेश हे तूतें
साष्टांग नमन करितों पुरवी तूं प्रणतभक्तहेतूतें ॥ १

ब्रीद तुझें सिद्ध जगीं भक्तेच्छा करिशि तूं सदा साच्या
होई सहाय देवा वाग्वल्ली-विस्तरास दासाच्या ॥ २

काव्यप्रबंध-मंत्रें जेणें मर्मज्ञसंघ भारविला
करितों प्रणिपात तया काव्यकलाकुशल कविस भारविला ॥ ३

रूपांतरटंकें मी फोडुनी तत्काव्यनारिकेल फल
आर्यापात्रीं भरुनी देतों रसिकां प्रसादरस विमल ॥ ४

हंसक्षीरन्यायें तो स्वीकारा तुम्हीं रसिक आर्य
विनवुनि नम्रपणें हें आतां आरंभितों पुढिल कार्य ॥ ५

## सर्ग १ ला

श्रीकुरुपतिप्रवर्तित जाणाया लोकरीतिचा धर्म
ज्या एक किराताची वनवासी योजना करी धर्म १

तो ब्रह्मचारिवेषें जाणुनि कौरवमहीतलाचार
धर्म प्रभु चरणांशीं द्वैतमनीं परत पातला चार २

त्या वनचरचारानें केला प्रणिपात धर्मराजाला
' भू रिपुवश पूर्ण वसे ' कळवाया प्रभुस सिद्ध तो झाला ३

परि त्या समयीं हृदया दूताच्या खेद झोंबला नाहीं
स्वामिहितेच्छु न धरिती व्यर्थ प्रिय भाषणीं स्पृहा कांहीं ४

ज्याचा अभिलाष सदा रिपुमंडलमर्दनोद्यमीं जागा
तो आक्रमी युधिष्ठिर एकांताची अबाधशी जागा ५

आज्ञा होतां तेथें चार वदे स्पष्टभाव भारतिला
शोभा विशेष देई अर्थाश्रय शब्दशक्तिभार तिला ६

प्रभु चारचक्षु नच त्यां वंचावें कार्ययुक्तदूतजनीं
प्रिय अप्रिय वा ऐकें पथ्य प्रिय बोलणें दुराप जनीं ७

निःशंक तो कुमंत्री जो न कथी योग्य मंत्र राजातें
कुप्रभु तो कान न दे जो मंत्र्याच्या विशुद्ध मंत्रातें ८

नृप-मंत्रियोग जेथें अन्योन्य स्नेह संपदावास
तेथें सेविति संतत सौख्यानें सकळ संपदा वास ९

दुर्बोध ईश्वरेच्छें भूपाळांचें चरित्र तें कोठें
अज्ञानग्रस्त असे मत्तुल्य क्षुद्र जंतु हे कोठें १०

सत्य स्वरूप जीचें गूढ अशा शत्रुनीतिसरणीचें
झालें ज्ञान मला हें सामर्थ्य नृपा त्वदीय चरणीचें ११

सिंहासनस्थ असुनी लागे दुर्योधना सदा घोर
कीं तूं वनस्थाहि तरी युद्धीं करिशिल पराजया घोर १२

कपटद्यूत करोनी जो पूर्वी जिंकिला धराभाग
आतां नयवश करण्या पडत असे कुरुधुरंधरा भाग १३

त्वत्परिभवेच्छु मिळवी सुगुणभरें शुद्ध कीर्ति तो कपटी
खलमैत्रीहुनि पुरवे भूतिप्रद सद्विरोध कितिक पटी १४

कामक्रोधादिक या षड्रिपुंवर पूर्ण विजय तो मिळवी
मनुराज्यपद्धतीचा कित्ता दुर्वेद्य नित्य तो गिरवी १५

दिनरजनीभागांशीं कुरुनाथाचा कृतिक्रम विभागे
नीतिज्ञ निरालस तो रात्रंदिन उद्यमीं सदा भागे १६

प्रेम सुहृत्सम दासीं बंधूसम मान दे स्वमित्रांस
बंधूंस विमद भासवि हाल्विती तेच राज्यसूत्रांस १७

धर्मार्थकाम यांचा करुनि यथायोग्य भाग कुरुपति तो
आसक्त त्यां न होतां समभक्तिप्रीति त्यांवरी करितो १८

यास्तव परस्परांना त्या तिहिंची लव न होतसे बाधा
दुर्योधन गुणलोभें त्याच्या जणुं मैत्रिचा जडे सांधा १९

कुरुराज न प्रवर्ते दानाविण साम सुदृढ साधाया
न घजे आदर-रहितीं दानीं तो वित्त विपुल वेंचाया २०

गुण जेथ तेथ घडते सत्कृति त्याची विशंक सुपवित्र
यास्तव विशेषशी ती शोभावी। यांत कायसें चित्र २१

पुरवाया वित्ताशा किंवा उगवावया न निज कोप
परि जाणुनि कर्तव्या न्याय करी कुरु-मही-सुरभि-गोप २२

शत्रु असो पुत्र असो उल्लघंन जो करील धर्माचें
त्या पारिपत्य करितो निर्भय तो गुरुमतोक्तदंडाचें २३

रक्षक मंडळ त्याचें वावरतें स्वपरमंडळीं सतत
आपण आलिप्त करवी, त्यांकडुनी शत्रु मित्रभावरत २४

व्यवहार त्यांशिं करितां शंकित परि तो अशंकित विराजे
भृत्यार्पित वित्तभरें कार्यांतीं तत्कृतज्ञता गाजे २५

सामादिक मानवती तो अनुरूपप्रयोजना करितां
त्यांची विचार पुरता करुनि यथाकाळ योजना करितां २६

अन्योन्यस्पर्धेनें स्थापिति ते तन्मनोरथा वाटे
अढळपदीं सिद्धीच्या जेथ नये भाविकाळही वाटे २७

शोभे विशाल त्याचा भव्य सभामंडपांगणावार
राजन्यमंडळाचे भरले जेथें रथाश्व अनिवार २८

त्यास नृपोपायनगज करिती सडा त्या स्वकीयदानाचा
सप्तच्छदगंधाशीं योग घडे ज्यास साम्यदानाचा २९

वस्त्राचे तद्राष्ट्र गमे कुल्यावलि ही तयावरी नक्शी
शस्यविपुलता मग ती वृष्टीविणही तया वरी न कशी ३०

कृषिकर्मकार-हस्तीं होई सुखलाभ विपुल धान्याचा
वाटे अल्पश्रमही त्या न पडे भूमि नांगरायाचा ३१

कुरुराजराजछत्रें करितां चिरकाळ सुखकरी छाया
शोभे विशेष कुरुभू तापाची ती न जाणते छाया ३२

भूषवि करुणाहंसी तन्मानस, विपुलकीर्ति तत्काय
रक्षण-कुशल उपद्रव निरसी मग वाण वृद्धिला काय ३३

तद्गुणवत्स विलोकुनि पान्हा भूधेनुच्या स्तना फुटतो
वसुदुग्ध अमित देती मग कां न गमे धनाधिपासम तो ३४

धनसत्कृत मानधन प्रबल धनुर्धर रणश्रुत सुधीर
स्वार्थ-द्वैत-द्वेषी प्राणव्ययसिद्ध नित्य तद्वीर ३५

अथ पासुनि इति पावत सच्चरितप्रणिधिच्या मुखद्वारें
तो अन्याक्षितिपांच्या कृत्यांचें ज्ञान मिळवितो सारें ३६

आसिद्धिकर्मपर तो चतुराननसम सदा तदारंभ
हित सदुदयगर्भ फळें ज्यांचा, अनुमेय होय आरंभ ३७

सज्ज सदा चाप करीं परि तें कोणाविरुद्ध उचलीना
कोपारुणमुद्रेनें अंधज कोणाकडे विलोकीना ३८

अन्यमहीपाल सदा आज्ञा त्याची जशी कुसुममाला
स्वशिरीं सादर धरिती तीव्र गुणासंग कीं घडुनि आला ३९

अप्रतिहतशासन तो करितो दुःशासनास युवराज
तेणें नवतारुण्यें झाला जो व्यर्थ सार्थ "युवराज" ४०

अनुमतिनें कुलगुरुच्या आरंभी यज्ञसत्र सुपवित्र
तर्पी धनंजयाला तो दुर्योधन वितंद्र हें चित्र ४१

साम्राज्य एकछत्री त्याचें पसरे समुद्र परिमाण
परि तुमचें भय त्याला दुःखद बलवद्विरोधपरिणाम ४२

श्रुतिगत नाम तुझें त्या त्या दुःसह मंत्रपद जसें उरगा
व्यथित नतानन करितें इंद्रात्मजविक्रमस्मरण वशगा ४३

तुमचा घात कराया राहे कुरुपाळ जागता राया
योग्य प्रतिकार करीं सत्वर तूं स्वहितभाग ताराया ४४

शोधुनि जनवचनतुषा वार्तेचें धान्यसार काढावें
हो चारधर्मसीमा प्रभुकर्णीं तें समग्र वाढावें ४५

वृत्त कथुनि हें गेला सोपायन चार; धर्म तीच कथा
अनुजांसमक्ष आणी पांचालीच्या अशेष कर्णपथा ४६

वैरिजनोत्कर्षाची वार्ता अग्रेसरी तदनुसारें
श्रवणपथें मनिं शिरलें कृष्णेच्या तच्छलस्मरण सारें ४७

वाणी परुष वदे ती स्मरुनि रिपुकृतामितापराध मनीं
नृपकोपोद्यमवन्ही चेतविण्या जी गमे परा धमनी ४८

उपदेशाच्या गोष्टी तुमच्यासम पंडितांस सांगाया
अबलास्त्रीनें धजणें निंदास्पद गोष्ट ही अगा राया ४९

परि अनुरूपस्त्रीचे सोडुनि सर्वंहि विचार आचार
दुर्धर मनोव्यथा या लाविति मज बोलण्यास साचार ५०

इंद्रासम तेजस्वी भारतवंशीय राजरत्नांनीं
सुचिर अविच्छिन्नपणें पाळियलें ज्या महीस यत्नांनीं ५१

त्यजिलें हाय ! निजकरें आपण होउनि तुम्हींच हो तिजला
माळ फुलांची त्याजितो जेविं गज मदें स्वकीय जो भिजला ५२

ते मूढ चीत होती कपटयांशीं जे न कपट आचरिती
लब्धप्रवेश शठ त्यां निष्कवचां बाणसे जिवें वधिती ५३

संबंध शुद्धवंशीं अनुराग-गुणीं जिचा सदा घडला
चित्तास रंजवी जी पत्नीसमभावही जिला जडला ५४

वंशाभिमानशाली अनुकूलसहाय तीच राजश्री
हरितां पर, साहिल तें तुमच्याविण कोण अन्य राजश्री ५५

मानी शूर जनांना ओकारी दर्शनेंच ये ज्याची
त्या हीन-दीनतेच्या मार्गा कां मारितां मिठी साची ५६

राजाधिराज अजुनी तनु तुमची कां न तीव्र कोपानें
भडकूनि सर्व जाई शुष्क शमी जेविं अग्निरोपानें ५७

क्रोध न निष्फळ ज्याचा आपत्प्रतिकार ज्यास हस्तमळ
वश मनुजपुंगवा त्या होती स्वयमेव लोक हे सकळ ५८

जो क्रोधशून्य वर्ते तन्मैत्रीची नसे कुणा चाड
तद्वैरबंधनींही येत नसे भीतिलेशही आड ५९

हिंडे रथांत बसुनी भूपावे जो रक्तचंदनें काय
तो भीम धूलिधूसर डोंगर धुंडोनि भागवी पाय ६०

यास्तव तुमच्या चित्ता नाहीं का होत अल्पही जाच
अथवा सर्वस्वाहुनि सत्यातें अधिक जपतसां साच ६१

देखुनि विक्रम ज्याचा स्मृति होई वासवप्रतापाची
उत्तरकुरूंस जिंकुनी आणी जो विपुल संपदा साची ६२

वस्त्रें तरूच्या साली होती हो त्या धनंजयालाही
शोक-क्रोधाग्नि तरी युष्मत्तनुची करी न कां लाही ? ६३

स्वर्गतमाद्रीचे जे भूतलगत कीं गमे असु कुमार
कानन-भूतल-शयनें व्रण पडती तत्तनूस सुकुमार ६४

सर्वत्र शिरीं त्यांच्या केशांचा भार मोकळा लोंबे
मलिनध्वज दुस्थितिचा तुमच्या नयनां न काय तो झोंबे ६५

माद्रीपुत्र जुळे ते वण वण रानीं वनीं अहा ! फिरती
छावे दोन गजाचे गिरिवरि कीं वाढले तसे दिसती ६६

ही दुःस्थिति पाहुनि जी अश्रू रिपुच्याहि लोचना आणी
संतोष-संयमावर सोडाया कां न धजतसां पाणी ? ६७

ही चित्तवृत्ति तुमची उमजेना म्हणुनि मी असें खिन्न
अथवा हेंच खरें कीं मूर्तिगणिक चित्तवृत्ति हो भिन्न ६८

ही परमघोर तुमची मनिं येतां आपदा नको ! बाई !
वळवळतें कळवळतें मन माझें आधिनें उलुनि जाई ६९

बहुमूल्य मृदुल शयनीं सुखनिद्रा जी तुह्मांसवें रमली
क्षुद्र कठिन कुशशयनीं दुःखी ती क्षीण हो बहु श्रमली ७०

स्तुतिपर सुस्वर सुंदर परिसुनि गीतें तुम्हीं उठावें हो
भेसुर बत्सुर ओंगळ भालूचें रुदन आज ठावें हो ७१

द्विज जेवुनि जें उरलें सेवुनि तें होय जी सुपुष्टियुता
आज फळें भक्षुनि ये कीर्तिसवें त्या तनुस हा ! तनुता ७२

मणिपीठ सतत शायी राजशिरोदामरेणुनीं रक्त
हरिणद्विजलूनाग्रीं दर्भवनीं त्या पदांस ये रक्त ७३

अंतर तिळ तिळ तुटतें होतां तें स्मरण कीं असे कष्ट
हे क्लेश सर्व रिपुनीं अमुच्या पाठीस लाविले स्पष्ट ७४

ज्यांच्या वीर्यश्रीचा भंग कराया कधीं न रिपु धजला
त्या मानि जनांची जी आपद ती संपदा गमे मजला ७५

सोडी शांति नरेशा ! जोडी निजशौर्य शत्रुकदनार्थ
नृपति न कधींहि परि ते निस्पृह मुनि साधिती शमें स्वार्थ ७६

तेजस्वि चक्रवर्ती लीन यशोधन जरी शमाचरणीं
कळस निकृतिचा होतां, हायहता ! मानिता जगे मरणीं ७७

विक्रम विमुख तुम्हांतें गोड जरी शांति ही महाकुलटा
धारण कशास करितां चाप श्रीचिन्ह; धर्म हा उलटा ! ७८

नृपचिन्हचाप सोडा जोडा शीर्षावरी जटाभार
सोडुनि " भटपद " यजनें " भट्टपदा " चा वहा महाभार ७९

पाठिस लाविति शत्रू अपमानांची परंपरा जेव्हां
नृपवया उचित नसे कसलाही नियम पाळणें तेव्हां ८०

रिपुवधवांच्छारूपी रणदुंदुभि अंतरीं यदा गाजे
कांहीं तरी मिष करुनी संधीचा भंग साधिती राजे ८१

दैववशें कालवशें ऱ्हास घडे तेज, वसु, समस्ताचा
रविसम तुह्मांस न चुके मार्ग विपत्सागरांत अस्ताचा ८२

रिपुतिमिर नष्ट करुनी रूप पुन्हां प्रकटितां उदयकाळ
घालो रविची रविला तुमची लक्ष्मी पुन्हां तुह्मां माळ ८३

———

## सर्ग २ रा

भार्मे महासारवती हृत्सुखदा मनुनियां प्रियावाणी
भाषण धर्मासि करी ज्यांत मुरे वीर्ययुक्तिचें पाणी १

सर्वत्र मानिनी जें देउनियां प्रेमपूर्ण दृष्टीतें
अन्य सुदर्वच वदली गुरुमनिं निर्मील कुतुकसृष्टी तें २

दुगर्म जरी हृदासम तीर्थद्वारें नयीं प्रवेश घडे
कृत्यपथ सुप्रवर्तक परि सांपडणें विशेष कठिण पडे ३

हितकारक परिणामीं क्षीण बलकटु प्रियोक्ति मात्रा ही
तेजस्विनी लघुतरा बहुतर गुण अंतरीं पहा वाही ४

द्रुपदसुतेची वाणी गोड गमो ती तुम्हां गुणाधीना
गुणलोलुपलोकांची वक्तृविशेषादिकीं कदा धीना ५

तुमच्या सुखसहवासें विद्या चारी सुखें अहा रमती
सदसद्विवेक-करणीं पावे तुमची कधीं न हार मती ६

पूर्वस्वरूपभेदा जाई ती मति वशा जशी पंका
जाणार ती लयाला याविषयीं लेशही नुरे शंका ७

बांधिति तुमच्या कंठीं रिपु दुर्गतिचें सुनिंद्य खापर तें
देवांशवीर्य तुमचें तरिहि जिरे शोच्य काय यापरतें ८

रिपुची गुरुवृद्धि जिनें क्षयसंगाति अंतरीं अपेक्षावी
उत्कर्षबद्धाचित्तें प्राज्ञें सौख्येंचि ती उपेक्षावी ९

दुर्धर दुःस्थिति रिपुची उदरीं उत्कर्षगर्भ जी वरिते
बुध न विसंबिति तिज जे देती पद भूतिच्या पदावरिते १०

क्षयसंभव शत्रूचा बहुतर लघुभावि आपला उलट
असतां सूज्ञ उपेक्षी तत्प्रातिकृति अन्यथा करी निपट ११

भूपति करिति उपेक्षा जे वर्धिष्णुविपत्प्रभावाची
जणुं दोषभयें तच्छ्री वाट धरी त्वरित नष्ट भावाची १२

क्षययुक्त परी नृप जो मिरवी सहज स्वतेज हितकारी
प्रतिपच्चंद्रासम त्या वर्धिष्णू तें प्रजा नमस्कारी १३

पंचांग पूर्ण मंत्रा वदाति पिता राज शक्तिला तोक
तो मंत्र दक्षतावश कृत्यपदीं जेवि नियतिला लोक १४

अभिमान धैर्यशाली उच्चपदीं प्रिय जया पदन्यास
निजपौरुष हेंचि असे आलंबन पतन चुकविण्या त्यास १५

जो विक्रमशून्य वसे त्याच्या पाठीस आपदा लागे
आपद्गत तो मृतसा जीवन्मृत कीं जगांत तो वागे १६

जीवन्मृत जो त्याच्या संमुख लघुता उभी सदा राहे
लाघवयुक्त नर कधीं नच राजश्री विलास सुख पाहे १७

उत्कर्षप्रातिपंथी उद्यमशून्यत्व शून्य हें कर गा
विक्रमसहवासरता न विषादें घडाति संपदा करगा १८

वनवास पूर्ण होई तों पाहूं वाट तरी कपटशील
चिरभक्तराजलक्ष्मी कुरुपति कैसा सुखेंचि गमवील १९

अथवा राज्यपदाची रिपुनीं तुज घातली जरी भिक्षा
तरि भुजवज्रें धारण करण्याची त्वदनुजा नको शिक्षा २०

सिंह क्षुधेस शमवी मदमत्त मतंगजा स्वयें वधुनी
परलब्धभूति नेच्छी तेजस्वी तृणसमान जग गणुनी २१

अस्थिर जीवितदानें स्थिरकीर्ति प्राप्तुकाम मानधन
गौण फळ गणी तें जें चंचल विद्युत्प्रभेसमान धन २२

जन न ज्वलिताग्नीतें भस्मचया रगडिती पदाखालीं
यास्तव परिभूतिभयें मानी असु, तेज नच करी खालीं २३

मृगराज किंफलेच्छू गर्जन्मेघावरी करी चाल
अन्योत्कर्ष न सहणें प्रबलतराची सुसिद्ध ही चाल २४

विक्रमकरणीं धर्मा यास्तव मन लाव, मोह हा झाड
व्यवसायशून्यता ही त्वद्रिपुविपदेस सत्य ये आड २५

दिग्गजसे सागरसे चार तुझे अनुज इंद्रसम शूर
सरसावतारणाला पाहुनि न पळेल कोण रिपु दूर २६

क्रोधाग्नि हृदयकुंडीं रिपुनिर्मित जो तुझ्या सदा जळतो
शमवोत हतरिपूंच्या ललनांचीं आंसवें अमंगळ तो २७

एवं विकारदर्शी क्रुद्धमना विवृतदुष्टगजघर्म
जो भीमसेन त्याचें सांत्वन करण्या प्रवर्तला धर्म २८

वाग्विस्तरमुकुर तुझा शुचिहृदयग्राहि मंगलास्पद रे
गतविप्लव त्यांत तुझ्या विमल मतीची प्रतिप्रभा विचरे २९

विषदार्थता न सोडी गुरुता अर्थीं न हें न कीं जोडी
पुनरुक्तिदोष तोडी उक्ति तुझी संगतिक्रम न मोडी ३०

निजपक्षयुक्तता त्वां स्थापियली सारगर्भवचनांनीं
शास्त्रींच्या नियमांचा भंग न केला कुठेंहि अनुमानीं ३१

मन्मन परि तृप्त नसे निर्णयशोधार्थ चहुंकडे धांवे
निश्चितकर्तव्य परी इतरत्र स्पष्टता न वच पावे ३२

सहसा क्रिया न कीजे विपदांचें मूळ मूळ अविवेक
गुणलुब्धसंपदा त्या वरिती स्वयमेव ज्यास सुविवेक ३३

सुविचार सलिलवृष्टी करुनि करी पुष्ट जो स्वविधिबीज
फललाभशरत्समयीं यत्नांचें त्याचिया घडे चीज ३४

विद्या विशुद्ध वपुला विद्येला प्रशम हा अलंकार
प्रशमा विक्रम त्यातें नयलब्धा सिद्धि शोभवी फार ३५

दुस्तर मतिभेदतमीं न दिसे निजकृत्यमार्ग गूढ यदा
सूज्ञांस मार्ग दावी परिशीलित शुद्ध शास्त्रदीप तदा ३६

स्पृहणीय गुणमहात्मे तत्पथ जे सेविती मनोभावें
मानिति अदोषजनिता आपत्ती ते विभूति समभावें ३७

जिंकुनि कोप जयार्थी दृष्टि चिरंतन महाफळीं देती
अनुकूल साधनांसह मग शार्यव्यक्तितें सदा नेती ३८

उदयेच्छूनें आधीं बुद्धिबळें कोपातिमिर भंगावें
सूर्यंही रात्रितमा निरसुनि मग उदयागिरिशिरीं यावें ३९

शूर परी न निवारी जो क्रोधोत्पन्न मोहशक्तीतें
क्षयपक्षकला विधुच्या तें विकरी नष्ट तो त्रिशक्तीतें ४०

समवृत्ति मृदुहि समयीं नृप जो तीक्ष्ण प्रताप दाखावितो
रविसम निज तेजें तो सत्ता लोकीं विशेष गाजवितो ४१

सतत सुचिर टिके जें लक्ष्मीचें तें वशीकरण कोठें
दुष्टेंद्रिय वाजींच्या पूर्ण स्वाधीन राहणें कोठें ४२

शरदभ्रभंगुरा श्री घडवी बहु कपटदोषलीला जी
ती रक्षवे न त्यानें जे करिती इंद्रियावलीला जी ४३

क्षोभ उताविळ मनिंचा कालाननुरूप कां करुनि उघड
धैर्यगुणीं जित आधिस वरपद तद्गुणिं तुवां दिलें उघड ४४

करिती सुश्रुतहिन जे शारीरिक शत्रुवर्ग-दमनातें
श्री अयश चापलाश्रय यांचें ते शीघ्र जोडिती नातें ४५

साधन-समय-विसंगत देहेंद्रिय-वर्ग-तापद क्रोध
क्षम न असे लघुजन यत् करण्या नयसिद्धिचा तुझ्या रोध ४६

उपकारक बहुत पुढें अविनाशी बहुत-कर्मफलद खरें
रिपुलोकहननकारी साधन न दिसे क्षमासदृश दुसरें ४७

अस्मत्सहजस्नेही यादवगण मानिजन-धुरंधर ते
सोडुनि आम्हां प्रणतां होतिल कुरुपास दानअनुसरते ४८

सुहृद सहज अन्यहि जे वृष्णीचे वृष्णिपक्षवश असती
सांप्रत ते कुरुपाचा आश्रय विनयें करूनियां वसती ४९

या यदुभूपां कुरुपीं अभियोग तुझा सुकालसघटित
भेदील उदयकाळीं कमलाकर जेंवि कमलिनी दयित ५०

नृप इतर भेद्य होतिल मदमत्त-सुयोधनापमानानें
न खपे अपमान जनां मग काय नृपां अतुल्य धामानें ५१

अभिमानशालि जन जे श्रीमद त्यांचा वसे विनय गूढ
परि समयीं तो उसळे करिती भलतेच ते मदें मूढ ५२

मदमानोद्धत नृप जो त्याशीं नियमें न मूढता विघडे
मूढ नयभ्रष्ट घडे नयहीनीं न प्रजानुराग जडे ५३

अपरागवायुचालित क्रमशीर्णा कुलसमूल मूलभर
प्रबल रिपुवृक्ष त्याचें उन्मूल न हो सहिष्णुला सुकर ५४

नाशी विग्रह अणुही अंतःप्रकृति प्रकोपज प्रभुला
तरुशाखासंघर्षज अनल करी भस्म गिरिस वृक्षकुला ५५

उत्कर्ष उपेक्षा वा सूज्ञें उद्धृत निजारिपक्षाचा
कीं रंध्रीं सुजयचि तो, विपदंत श्रीमदप्रमत्ताचा ५६

नृपराष्ट्र ज्यांत वसतें दुर्वृत्तें फूट आंत बाहेर
अंतिक नृप तें हरितो वेग नदीचा जसा शिथिल तीर ५७

धर्म निवेदित असतां नयपथ हा शुद्ध कुपित भीमास
जाणो मूर्त मनोरथ आले तेथें महामुनि व्यास ५८

मुनिवर तो दुग्धधुनें पशुपक्षि प्रातिकूल्य सर्व हरी
उज्ज्वल पापध्वंसी सर्वांगीं दर्शनीय तेज धरी ५९.

जो मूर्त पुण्यसंचय उगम तपा काळ जो विपत्काळा
आला सहसा पाहुनि विस्मयवशभाव ये जगत्पाळा ६०

मग धर्मराज उठला श्रेष्ठासन सोडुनी स्वकीय वरी
सोडी सुमेरुशिखरा ये उदया सूर्य तत्तुलेस वरी ६१

उदया येतां रविचें पसरे आरक्त किरणजाळ जसें
उठतां धर्म विराजे रक्त चलितवल्कलाग्रवृंद तसें ६२

मग सावधान चित्तें मुनिवरपूजा यथोचिता धर्म
शास्त्रोपादिष्ट विधिनें करिता झाला त्वरी मनीं शर्म ६३

मुनिकुलमुकुटमणीची आज्ञा होतां निजासनाप्रति तो
शास्त्रश्रवणास जसा प्रशम तसा धर्मराज भूषवितो ६४

तेजःपुंज मुनींच्या अभिमुख तो आसनस्थ नृप शोभे
स्मितकिरणस्फुरणवशें ओष्ठीं त्याच्या मनोज्ञ रुचि लोभे ६५.

उज्ज्वल रुचियुक्त नभीं गुरुतत्संमुख शशी वसे पूर्ण
त्याची लक्ष्मी धारण करिता झाला क्षितींद्र तो तूर्ण ६६.

## सर्ग ३ रा

शरदिंदुरश्मि सुंदर उसळे अंगप्रभापटल वरती
म्हणुनि जयाची उंची निजपरिमाणाहुनी दिसे वरती १

ज्याचें शिर शोभविती पिंगलवर्णाकुल प्रभूत जटा
आलिंगुनि नित्य वसे देहाला शुद्ध नीलवर्ण छटा २

विद्युल्लेखा वेष्टित मेघ तसा जो निजासनीं शोभे
पूर्णप्रसादलक्ष्मी यद्देहाश्रय करावया लोभे ३

पाहुनि मनोज्ञ ज्याचा लोकोत्तर सुप्रसन्न आकार
परिचयहीनाचेंही स्नेहरसें अंतर द्रवे फार ४

शांताकारद्वारा यच्चित्ताची सुशांत वृत्ति कळे
मधुरा प्रत्ययजनका दृष्टि जगूं मूकभाषणार्थ वळे ५

गाजे जो प्रभव जगीं अघशामक धर्ममूळ वेदाचा
व्यासा सुखासनस्था धर्ममुनिवरा तया वदे वाचा ६

" हें स्थळ पवित्र करण्या देशी तापसवरां पदां शीण
दर्शनलाभ दिला हा जो दुर्लभ पुण्यसंग्रहावीण ७

आकस्मिक दर्शन हें श्रेयस्कर जें रजोमदा नाशी
असतां निरभ्र नभ जें वर्षण तें उचित साम्यदानाशीं ८

यावच्चंद्रदिवाकर बहुमाना पात्र या जगीं झालों
दर्शनमहिमा तव हा मुनिवर्या पूर्ण मी मनीं धालों ९

जे यज्ञयाग केले त्यांचें फळ आज लाभलें वाटे
आशीर्वचनीं गमतें विप्रांच्या आज सत्यता दाटे १०

श्री देई अघ नाशी वितरी कल्याण कीर्तिची जोड
लोकगुरो विधिसम तव दर्शन पुरवी न कोणतें कोड ११

तव मुखमंडळ निववी न तसें शशिबिंब अमृतकर दृष्टी
पाहुनि तें मन विसरे बंधुविरहदुःख; घे नवी पुष्टी १२

निस्पृह जन जे त्यांचें साध्य नसे आमुच्या करीं कांहीं
कां आलां ? या प्रश्ना यास्तव अवकाश अल्पही नाहीं १३

तद्वचनमौक्तिकांचा मत्श्रुतिकंठीं परी पडो हार
ही इच्छा मज लावी शद्व तुजपुढें वदावया चार " १४

धर्म महात्मा वदला शुभवाणी ही तया वदे व्यास
वाणी अर्थवती जी दावी जयसाधनार्थ हव्यास १५

" इहलोकीं परलोकीं साधावें सर्वदा महाश्रेय
आम्हां तपोधनांना कीर्तीमद हेंच एक बा ध्येय १६

समवृत्ति सर्व भूतीं उचित असे मुनिजनां विशेष तरी
गुणगणवद्ध हृदय हें तुजविषयीं स्पष्ट पक्षपात वरी १७

संसृतिपथ सोडुनि जे मुक्तीच्या लागले नृपा वाटे
त्यांचाही नित्य जडे स्नेह महा सज्जनीं मला वाटे १८

राया धृतराष्ट्राचे पुत्र तुम्हीं पांचही नसां काय ?
तत्पुत्रांहुनि तुमचा गुणपक्षीं नाहिं का पुढें पाय. १९

मग त्या रायें केला तुमचा कां त्याग कारणावीण
अथवा नवल कशाचें मोह असे विषयसक्तीचें वीण २०

कर्णादिक-मंत्राचा आश्रय संशयपदीं जया पाठ
मग अर्थसिद्धिची कां त्या धृतराष्ट्राकडे नसो पाठ २१

दुर्जनसंसर्ग खरा जयसिद्धिपथीं विशाल कंटकसा
दुर्धर अनर्थ आणी दुर्जन योगश्रयी मरे न कसा ? २२

रिपुंनीं सभेंत जेव्हां धर्माला लाथ हाणिली धर्मा
धर्माची कास तुवां दृढ धरिली काय ती न दे शर्मा २३

सानुज सस्त्रीक तुला ग्रासी जरि घोर हा विपत्काळ
तव हृदय भूषवी ती प्रेमगुणग्रथित शांतिची माळ २४

कपटप्रयोग न परी त्वद्रिपुंनीं आत्मघात हा केला
जागृत असशी कीं तूं शांतिसखीच्या अखंड हाकेला २५

तव मतिचा शीलाचा उत्कर्ष स्थापिती तिन्ही लोकीं
करिती उपकार असे ते शत्रू मित्रतुल्य अवलोकीं २६

प्रतिपक्ष तुझा आहे बलवत्तर शस्त्र-वीर्य-सैन्य-गुणें
विक्रमबळसाध्य असे राज्य परी तेंच तुजकडेस उणें २७

बलवत्तर पक्षाला विजयश्री घालिते रणीं माळ
निजपक्ष तसा करण्या यत्न करीं तूं विशंक बहुसाळ २८

जो एकवीस वेळां निखिला निःक्षत्रिया करी धरणी
जो सुत जमदग्नीचा निस्तुल जो विप्रवर्ययोध रणीं २९

ज्या परशुराम पढवी सांग धनुर्वेद हो सुशिष्याला
शिष्यात्पराजयाचा हर्ष रणीं गुरुस दे न जो भ्याला ३०

इच्छामरणत्वबळें सर्व-धनुर्धर-धुरीण धीर गडी
प्रत्यक्ष अंतकाला पादतळीं जो विशंकधी रगडी ३१

तो भीष्मराज उठतां करण्या संग्राम चापशरपाणी
भीतिमुळें कोणाच्या नाहीं पळणार तोंडचें पाणी ? ३२

जो क्रुद्ध दृष्टिपातें करिल गमे भस्म सर्व जगतातें
ज्याचा विक्रममहिमा दिपवी प्रलयाग्निच्या प्रतापातें ३३

द्रुततरशरसंधानें रणकर्मी तो प्रवर्ततां द्रोण
त्याचा प्रताप साही आहे तुमच्याकडे असा कोण ? ३४

रणसंरंभ जयाचा पाहुनि हो गलितवीर्य शत्रुगण
भृगुसुतसद्गुरुवदनें सांग धनुर्वेद जो करी श्रवण ३५

राधासुत तो युद्धीं साधाया विजयसिद्धि ठाकेल
कां धाक न अन्य जनां बाधा भयजा यमास वाटेल ३६

ज्या विद्येच्या योगें पार्थ सुदुश्चर महातपश्चरण
साधुनि, करिल स्वमनीं भावगुणें बद्ध शंभुचे चरण ३७

ज्या विद्येच्या योगें दुर्लभ शस्त्रास्त्रवीर्य जोडील
अर्जुन यमसदनाला भीष्मादिक सर्व योध धाडील ३८

तीं विद्या देण्याला सिद्धि प्रत्यक्ष कीं नृपा आलों
विद्यादानासि जगीं तूंच अताशि पात्र मी मनीं घालों ३९

जिष्णुस त्या विद्येनें महिमा-वर्धिष्णु तेज लाभेल
देवप्रसादनिधिच्या मार्गी त्याला प्रवेश लाधेल ४०

एवं कृतभाषण तो मुनिकुलमणि मूकभाव जों सेवी
तों धर्माज्ञावश तो शिष्यत्वें विजय शिर पदीं ठेवी ४१

दिनमुखमधुररवीच्या बिंबांतुनि सत्प्रभा जशी कमळीं
विद्या विजयमुखीं ती तापसमुखनिर्गता शिरे अमळीं ४२

ध्यान परमगहन तरी ज्ञान करुनि दे क्षणें मुनिप्रवर
अर्थ सुदुर्घटहि जनीं होय तपःसिद्धिनें सदा सुकर ४३

ध्यानांजनलाभें त्या गळला अज्ञान दोष दृष्टीचा
विस्तार रम्य दिसला विजया तत्त्वावभाससृष्टीचा ४४

हृदयीं उत्साह असे हृदयाअनुरूप रम्य आकार
आकार भाग्यसूचक तीव्रतपश्चरणयोग्य साचार ४५

ज्या पार्थाला लाभे त्यातें पुनरपि महामुनि व्यास
वदती इच्छुनि चित्तीं वश व्हावी इष्ट सिद्धि कीं त्यास ४६

जप तप उपवास तसे स्नानादिक मूळ-तापसाचार
पाळीं विधिनें पार्था न गणीं तन्मूळ ताप साचार ४७

अंगीं तेज तव चढो हस्तीं शस्त्र प्रशस्त झळकों दे
अन्यसुदुश्चर तप तूं तप, कीं लोकीं तुझेंच यश कोंदे ४८

यक्षोपदिष्टमार्गें चारुशिलातलहिमाचला जावें
उग्र तप आचरावें इंद्राला आपुला करुनि घ्यावें ४९

हें भापण इंद्रसुता करुनि मुनी पावले तिरोधान
तों यक्ष पार्थनिकटीं आला आज्ञाकर प्रचुरमान ५०

कर्तव्यदक्ष आधीं यक्ष करी नमन पार्थचरणातें
पार्थ प्रिय बहु बोले गुह्यक डोले, जुळे अचल नातें ५१

मित्रीं तसाच पार्थीं जडला विश्वास शीघ्र यक्षाचा
निर्मी विश्वास सदा क्षणमात्रें योग साधुपक्षाचा ५२

अर्जुनरवि उदयार्थी सोदर हेमाद्रिकुंज जे सोडी
प्रउचरप्रकाश त्यांचा लोपे, तम त्यां हळू हळू जोडी ५३

कार्यगुरुत्वें लघुता पावे दुःखादिभार विजयाचा
बंधु विभागुनि घेती त्या मग भासे न भासहि जयाचा ५४

अर्जुनवीर्यप्रत्यय, रिपुविषयक्रोध, सहजधैर्य, वसे
व्यासश्रद्धा; शोका बंधुचतुष्टय-मनांत वाव नसे ५५

अति तेजस्वी बंधू चार गमे याम काय दिवसाचे
त्यांस तमोभर सोडुनि कृष्णाकृष्णोसि गांठिती साचें ५६

प्रियपतिदर्शनसमयीं प्रेमरसाचेच मूर्त बिंदुगुण
जाणों द्रुपदसुतेच्या भरले नेत्रांबुजीं, न अश्रु-कण ५७

अश्रुकणीं नयन तिचें शोभे हिमबिंदुनीं जसें कमळ
मंगलभंगभय तिला ने दे निज नेत्रमीलनास बळ ५८

सहजप्रेम मनोहर पत्नीहक्पात-दृष्टिचें ध्येय
अर्जुन चित्तांजलिनें ग्रहण करी कीं यथेच्छ पाथेय ५९

द्रुपदसुतेचें लोपे धैर्य जसें ग्रीष्मसिंधुचें तोय
नष्ट-प्रसाद-शोकें वन्यगजें सिंधुचा जसा होय ६०

क्षीण-स्वर-विशद करी, घाली अश्रूदया-बळें आळा
बोले महाप्रयासें, प्रस्थानीं अर्जुना द्रुपदबाळा ६१

रिपुकपटबंधपंकीं राज्यश्री-मान्यता निराधारा
रुतली चिरकाल तिच्या, कास तुम्ही घातली सदुद्धारा ६२

हें श्रेयस्कर नाथां माथां मीं चरणिं ठेवितें परिसा
अर्धांगीच्या बोधा शोधाया व्यसनलोह घ्या परिसा ६३

कंठा विरह पडे जों या कंठीं कार्य-सिद्धिची माळ
नाम विजय सार्थ करा, भंगे दुश्चरतपें विपत्काळ ६४

सुख यश कृत्य अमानुष साधाया जे प्रयास बहु करिती
त्यजिति न उत्साहगुणा सिद्धि स्वयमेव होय त्या वरिती ६५

सोडुनि मजला नाथा आतां आपण निघूनि जाणार
ही भावना स्मृतिपथीं आणी सारा विटंबना-भार ६६

छे ! छे ! स्मरण नको तें अनुभाविले क्लेश ते कसे हाय !
वळवळतें कळवळतें तळमळतें हृदय हें उलुनि जाय ६७

कालगतिवशें सुकले हृदयव्रण असंख्य ते आजी
विरह-कुपथ्यें वाटे धरिती हावर पुन्हां पहा ताजी ६८

दुस्मान पहा नाथा स्मृतिमार्गें येउनी मला छळती
निंद्य प्रकार करिती न कसे मेले धुळीस ते मिळती ६९

हा ! हा ! काय न करिता झाला नाथा विटंबना-भार
पूर्व-पराक्रमी-कीर्ती चिरडी अस्तित्व लोपवी पार ७०

भावि फळा क्षय जडवी अवधि नसे जरिहि भावि काळातें
अस्ताचल-वास जसा सवित्याच्या दीर्घ किरण-जाळातें ७१

आच्छादितसे जगता छत जें दिग्लग्न-शुभ्र-कीर्ति-मिष
तें सर्व दग्ध करण्या लागे न विकार-वन्हिला निमिष ७२

अश्लीलच्छलनरकीं रिपुंनीं रचिली यथेच्छ जी केली
दुःखें सुखें कशीही अन्यनृपीं मान्य हाय! ती केली ७३

लोकत्राणा विधिनें क्षत्रिय निर्माण या जगीं केले
अपमानतस्करें ते तेजोधन विहरपात्रते नेले ७४

जो स्वाभिमान जगतीं वाटे तेजस्विता प्रियप्राण
तो अपमानविषें हो मृत कीं अंगीं नुरे मुळीं त्राण ७५

अभिमान-प्रभ्रंशें हे नाथा देतसा मना खंती
बहुरूपहीन दिसतां दंतभ्रंशें दिसे जसा दंती ७६

शत्रुप्रतापकेतू तुमच्या उदयस्थ विक्रमार्कातें
ग्रासी संपूर्ण; नसे गोचर तो मोक्षकाळ तर्कातें ७७

जाणों लज्जित तुमचीं शस्त्रास्त्रें तोंड घालिती खालीं
कीं समयिं न उपयोगा त्यांची निःसार जीवितें आली ७८

क्षय तुमचें यश पात्रे झाला आकार सर्वथा भिन्न
पाणी अंगीं नुरलें अब्धि रिता जणुं बघूनि मी खिन्न ७९

हे मुक्त केश माझे दुःशासन दुष्ट दूषवी हातें
तेव्हां होतें कोठें तुमचें जें वीर्यसार नाथा नें ८०

असुनी प्रत्यक्ष तुम्ही पांच पती प्राण मूर्त कीं पांच
नाथ नसे केशांना दीनचि ते हाय ! सोशिती जाच ८१

परि समयीं हात दिला दैवानें धांव घेउनी मातें
ही तीच ना सुमूर्ती झाली जी पात्र विजय नामातें ८२

सज्जनरक्षण-पटु जो साजे क्षत्रिय यथार्थ नाम तया
कार्मुक सार्थ जगीं तें लाधे समरीं अखंड शक्ति जया ८३

विपरीतवृत्तिवश जो क्षत्रिय-कार्मुक-पदासि अधिकारी
तो व्युत्पत्तीस जसा होय तसा निज यशासि अधिकारी ८४

न पडे तेज गुणांचें नाथा अस्तित्वमात्र ते वरिती
" न्याल तुम्हीं उत्कर्षा " हीच अपेक्षा मनांत ते धरिती ८५

आम्हांसमान गुण ते दुःखाच्या लागले अहा ! वाटे
एवं गुणगण तुमचा आम्हांशीं तुल्यरूप हो वाटे ८६

दुःशद्बशस्त्रघातें रिपुनीं केलें तुम्हांस घायाळ
जाणों सिंहा करिती जर्जर गज ओढुनीच आयाळ ८७

रविला दिनलक्ष्मीशी प्रतिकारेच्छा तुम्हांस अनुरागें
वरण्यास सिद्ध झाली तीस वरा; घ्या न पाय हो मागें ८८

कृतिनें निजमहिमा जो सर्व जनीं स्थापितो निरुपमान
नरवर गणनासमर्थी आद्यपदाचाच त्या मिळे मान ८९

प्रियविषयीं आशंकी स्नेहवशें व्यर्थ विघ्नघात मन
मग खेद त्यास होई इंद्र तयाचें करो सदा दमन ९०

विजयार्थी निघुनि तुम्हीं जातां शुभ निर्जनप्रदेशाला
एकाकी; वश न कधीं व्हावें दौर्बल्यगुणानिदेशाला ९१

स्नेहें वा द्वेषें वा झाले जे अंध मानसीं त्यांचे
खेळे विकृतिचकी जी मानीना मानपान सुजनांचे ९२

द्रुततर मुनिशब्द तसे सफळ करा आमुचे मनोरथ हो
सिद्धिसहित परतुनि या आलिंगनसौख्य मग मला दृढ हो ९३

ही द्रुपदसुतावाणी आणी जो पूर्व मानभंग मनीं
परिसुनि दीपित झाला विजय, जसा सूर्य उत्तरागमनीं ९४

क्रोधांध तरिहि लक्ष्मी संमुख जणुं जिष्णु सर्व शत्रुगण
निजतनुवरि तो वरितो धौम्योक्त-समंत्रकायुधाहरण ९५

सौम्यस्वरूप त्याचा देह दिसे भयद शस्त्रसंनद्ध
सौम्याक्षरमंत्र जसा उच्चाटन-घोरकर्मसंबद्ध ९६

ज्याचा टंकार जनीं शरसंधानादि कर्म विख्यात
तें चाप विजय घेई शमवी जें शत्रुबळ असंख्यात ९७

शत्रूंच्या दृष्टिपथीं जे न कधीं संगरस्थळीं आले
शिरखड्गासह दोनी भाते पार्थांगलग्न ते झाले ९८

रत्नखचित कवचाचें तेज जणूं यशचि भूषवी काय
गगना उडुवृंद तसें झांकी वासवकतव्रणां काय ? ९९

यक्षोपदिष्ट मार्गें चाले हिमनगवरासि पार्थ यदा
घडला बाष्पाकुल तो द्रवला हृदयीं तपस्वि सार्थ तदा १००

चंचल वीचि भुजांहीं आलिंगी भूमिला नदीरमण
गर्जुनि तिज सांगे कीं "विजय तुझा भार गे करिल हरण" १०१

दिव्यध्वनि दुमदुमुनी दुंदुभिचा दशदिगंतरीं दाटे
व्योमांत पुष्पलक्ष्मी स्वर्गसरिद्वेणि कीं दुजी वाटे १०२

## सर्ग ४ था

शरदागमचारुतरा रुत-राजितहंसमेखला सृष्टी
पार्थि जेविं नवी रमणी वीरमणीची विलोभवी दृष्टी १

परिपक्व धान्य पांडू पांडूचा पुत्र भूमुखश्रीतें
बघुनि निववि भूमिप्रिय प्रियकिंकर युक्त तो स्वदृष्टीतें २

बहुनम्रभावशाली शालीचें पीक ज्यास शोभा दे
शुभजल-जात-सुपंकज पंकजनितदोषशून्यता नांदे ३

ग्रामोपांतिं नरमणी रमणीय क्षितिविभाग ते पाहे
जणुं उपहारविशारद शारदऋतुभृत्यगण उभा राहे ४

शफरींनीं जी केली केली उदकीं पहावया तीतें
उघडी कुतुकें जणुं जल जलजावालिच्या मिषें स्वदृष्टीतें ५

भार्याक्षिविलासाची साची शोभा स्मृतींत त्या वाटे
आली; मोहवशमना शमनात्मजबंधु जाहला वाटे ६

हो शालिपुंज अधिका आधिकारी द्युतिस कंजपूर्णजळीं
अर्जुन हर्षे; न रमे नरमेधा उचितसंगमीं विरळीं ७

चलनवशें मीनाचे नाचे, विघडी पराग, वी फेन
स्थलनलिनीभ्रम वारी वारी स्थळ तन्मनीं भ्रमा दे न ८

सिंधुसतीजलमयतनु तनुता शिथिलत्व मंदगति घेई
प्रांतपुलिनधवलपणा लपणारा दृक्पथा क्रमें येई ९

जैशा वली दुकूला कूला तैशा तरंगकृत रेखा
चित्रविती बघुन रमे नर; मेय नसे तदीय सुखलेखा १०

रम्यरज बंधुजीवा जी वाही भ्रूद्वयांतरीं, पाहे
जणुं त्यांशीं अधराभा अधरा भासे तदुत्तरा वाहे ११

पृथुकुचकुंभगता जी ताजी स्वेदोद्गमें रमे मातिला
वरुनि अरुणभासा जे साजे त्या कमलरेणुंच्या ततिला १२

यद्गंडदिव्यरुचिला रुचिलालस कर्णकुंजमुख सेवी
नयनरुचिसमागम तो गमतो उभयीं विशेष रुचि ठेवी १३

पांडव मनोभिरामा रामा ती शालिपालिनी पाहे
मानी संहृतजीवन जीवन ऋतुचें कृतार्थ कीं आहे १४

पथिं पार्थांतःकरणा करणारें हृष्ट, पुष्ट गोवृंद
भेटे; तदवेक्षणपर क्षण परतें हो न नेत्रयुग धुंद १५

सेवुनि तृणभक्षणसुख सुखसंचारहि वनीं पसाऱ्याचा
गोवृंद गृहा परते हा परतेजोघ्न शकुन त्या साचा १६

सेवी सुमंदगतिला गतिलाघव करुनि दूर, गोवृंद
कीं तें स्तनभर लेलें भरलेलें त्यांतहि उदर तुंद १७

वत्सस्मरणाधारा धारा फुटती स्तनीं दुधाच्या हो
शुभशकुनप्रति विजय विजययशाचाच तो गणी लाहो १८

भूतलखननविशारद शारदतृणपुष्ट गर्जना करितां
दिसला कुरु-कुलवृषभा वृषभाधिप अन्यवृषमदा हरिता १९

जरि जलयत्नविरहिता रहितावधि तरि शरन्नदी शोभे
पुलिनस्थळजघनरसा नर त्याचा कामुकापरी लोभे २०

हिमतातिसमवर्णाकुल कुल धेनूंचें तसें नदीकूल
ने समतेप्रति गतिला गतिलाघव धेनुंचें, हरी भूल २१

तुल्यवसातिलाभ वनीं भवनीं वा सहजमित्र ज्यां गाई
सरळ मनीं गोसम जे समजे ते गोप धन्य त्यां गाई २२

दधिमंथनपरहृदया परहृदया लोहकांतसत्प्रतिमा
नुरविती ज्या कमलास्या लास्याकुलवारयुवतिचा महिमा २३

चंचलता कुचकलशा कलशा दधिपूर्ण घुसळितां आली
लोचनपंकजलीला लीलाश्रमजा सुमंदभा त्याली २४

उदरीं शीघ्र फिरवितां रवि तांतड करुनि हस्त कमलाभ
दे गोष्ठांगणिकलशां कल शांत-ध्वनि मृदंगसम लाभ २५

परिसुनि हर्षपरमती रमती नृत्यीं मयूरकांता हो
जणुं असमयघनराजी राजी दे भेटिचा तयां लाहो २६

निश्वास सुचंचल दे चलदेकाधरदलत्व मुखकमला
कर पार्श्व-नितंबाप्रति प्रतिपळ मागें पुढें क्रमाचि जडला २७

दधिमंथनपरगोपी गोपीश्वरसख बघे स्थिरदृशांहीं
चित्र न तो न उपरमे परमेशाहि सत्य भुलविला त्यांहीं २८

चलकनककुंडलाभा लाभार्थाचि सुमुखसंगता घडली
वाटे निःशंक मला कमलावरि नवरवि-प्रभा पडली २९

खेळे हास्य न, विकचन कच नसती भ्रमर ते परिभ्रमती
दिसती दंत न, केसर सर जें ललनांग तें दुजी न मती ३०

जलपूररोध सरला सरलाक्रमणार्हतेस पथ गेले
फुलले धूलिचयानीं यानीं रेखाविदीर्ण मुख केलें ३१

शोभे फलप्रशस्या शस्यावलि मार्ग पार्श्वभागा जी
ती वृष भक्षी; हरिखे हरि खेश्वपुत्र बघुनि तें गाजी ३२

मार्ग सुखद संचरणीं चरणीं बहु पांथ त्यांकडे वळले
धरिती सुविशदपदता पदताडित मार्ग कीं स्फुटाचि कळले ३३

चिर सदनलताग्रामा ग्रामाश्रममंडपोपमा पाहे
सद्भावेंगित सुकृती सूकृती जन ज्या अधिष्ठुनी राहे ३४

त्या वेली गे हसती हसती वाटे स्वपुष्पभारांनीं
भासे केलें तन्मुख मुखर स्वागतवचेंचि भृंगांनीं ३५

शुभशारदसमयश्री स-मयश्री हरिवयस्य सृष्टीतें
रमवी भुलवी सुकवी सुकवीच्या तुल्य होय सृष्टीतें ३६

पार्था उक्तिविशारद शारदगुण तो अनुक्तही यक्ष
वर्णी, न चुके समयीं समयीं परभावबोधनीं दक्ष ३७

ज्यांत वसे निर्मल जल जलधर जलशून्य तो शरत्काळ
देवो तुज आशु भली शुभलीलासार सिद्धिची माळ ३८

शुभ दैवलाभ फलदा फलदानें जी करी कृषी सबळ
ऋतुलक्ष्मी ती विजया विजया हेतू घडो तुझ्या सबळ ३९

भू शुष्यत्पांसुतरा सुतरा सरिता सुपक्व धान्य खुले
नवगुण परिचयघन हे घनहेतुप्रेमबंध करिति खुले ४०

उडती बलाक न वरी न वरी घनपंक्ति इंद्रचापातें
तरिहि नभ रम्यतापर परगुणलाभीं स्पृहा न रम्यातें ४१

वनराजपतिवियुक्ता युक्ता सुकृशा दिगंगना चळती
पांडु पयोधर गतरस रसना· विद्युद्गुणात्मका गळती ४२

श्रुति होई सापरती परती कटु विमदबर्हिकेकांसीं
कलहंसरवें भुकेली; केली प्रेमा गुणीं न सहवासीं ४३

पृथुगुच्छबंधशाली शालींचें शेत पीत पक्व फळें
नमलें जणुं हुंगाया गा ! या कमळा प्रफुल्ल गंधबळें ४४

जल वनराजि-नभाला भा लाधे दिव्य काय वर्णावी
तिकडे कुरुकुलहंसा हंसावलि शीघ्र कां न धांवावी ४५

जल रक्त होय नलिनीं नलिनींनीं हरित शालिनीं पिवळें
जणुं इंद्रचापमाया मायाजलरूप घे सुयोगबळें ४६

वनराजिवधू विटली विटलीलासक्त अंजनीदयिता
सप्तच्छदपुष्पभर-ज रज हें स्तनवस्त्र जो बळें हरिता ४७

स्तनवस्त्र सांवरी ती रीती कुलजा-जनोचिता वरिते
विशदविकचबाणाक्षी बाणा क्षीरोर्मिशुद्ध जी धरिते ४८

शुभ्रच्छत्रासम जे समजेना सूर्यताप कीं घन ते
वळले आकाशपथीं शपथीं न जिथें अरम्यता वसते ४९

विरल, जललवें भरला भर लाहे जो सरोजगंधाचा
तो वात खपथ शोधी शोधी जणुं वास घनकलत्राचा ५०

मेघोपरोध सरला सरला विमला सुवृत्ति ज्या वरिती
अन्योन्यालाप सकल कलहंसध्वनिमिषें दिशा करिती ५१

दूर वनीं संचारा चारा सेवुनि यथेच्छ या गाई
व्रजगमनीं उत्सुकल्या सुकल्या वत्सांविणें करिति घाई ५२

निज निज गृह्यानातें या नातें त्याजिति मूळ कळपाशीं
फुटुनि फुटुनि कुरुपा हें पाहें गोधन वळे स्वगोष्ठाशीं ५३

पान्हा खाऊसा हो साहो पात्रोपमा न कां कास
आणी सुतार्थ जननी जन-नीतिस धरुनि गोडसा घास ५४

अन्योन्यदर्शनाचा नाचाया योग धेनु वत्साला
लावी; मग संगम तो गमतो ब्रम्हाख्यमुत्सखा झाला ५५

पावन मूळ जगातें गातें जग जसि जी स्ववत्सयुता
परमशुभा धेनुतती नुत ती जशि आहुती सुमंत्रहुता ५६

सुस्वर कंठें गाती गा तीव्र क्षुद्रता शिखिस देती
गोपी; गानवशवपू गा नवशवपूज्या हरिण घेती ५७

गानपरा वज्र नारी व्रजनारी मुग्धमृगवधूलागीं
झाल्या; तृणभक्षणही क्षणही न सुचे तयां अचल जागीं ५८

कमल शिर जरी लववी लववीना मान कमलिनी त्याला
स्मरहतसम तो सुखला सुख लाधेना तया फिकट झाला ५९

जो शीकर कमलाचें कमलाचे जो परागही हरितो
तो सर्वत्र विचरणा चरणाविणही सुखें पवन करितो ६०

भुलले भ्रमर हिता त्या भ्रमरहिता त्यां न वृत्ति हो उरली
खल जेंवि आपदाहत हत गति निर्णयबळीं मती भुलली ६१

करिते कांतिशुकाची काची शोभा शिरीषकुसुमाची
मुखकांति विद्रुमातें मातें गमते घडे सखी साची ६२

तुंडीं कमल शिखातें खातें उडते धरून शुकमाला
जणुं वासवचापलता चापलता घे गमे मम मनाला ६३

यापरि यक्ष वदे तो देतो श्रुतिसुख पथांत सूक्त बळी
तों पिहितरवि हिमाद्री माद्रीसुत दृष्टिला पडे जवळी ६४

हिमधवलद्युति संकुल कुलपर्वतराज गगनपथ पावे
वाटे कीं विगलितजल जलधरराशीच काय उंचावे ६५

पृथुवनराजिविराजित जिततोयदकांति गमे तळ धीतें
हिमधवलशीर्षवरि तो वरितो बलदेवदेह लक्ष्मीतें ६६

— — —

## सर्ग ५ वा

प्रकट हिमाचल दिसला निकट तया लक्षुनी विजय चाले
गिरिराज-दर्शनें त्या मार्गीं हे भाव तन्मनीं आले १

अच्युत-शिखर-भागें तुच्छ करी हा सुमेरुला काय
कीं गगनाची उंची मापाया हा वरी वरी जाय २

पाहूं दिगंत ऐसा किंवा अभिलाष तीव्र मनिं जागे
स्वतनुस गिरि म्हणुनि ह्मणे विस्तृत होऊनि दूरवर जा गे ३

रवितेज एक भागीं या गिरिच्या रात्रितम दुजा भागीं
नांदे जेविं शिवाच्या वदनीं स्मित नागचर्म अपरांगीं ४

भूमि—नभः—सुरलोकीं वसणारे लोक या गिरिवरती
वसति यथाक्रम; परि ते न कधीं अन्योन्य दृष्टिला पडती ५

निज सामर्थ्य कराया प्रकट जनीं शंकरें गमे केली
त्रैलोक्याची प्रतिमा हिमनगरूपेंच ती असे ठेली ६

शेषांग शुभ्र शिखरें कांचनलेखापरीत गगनातें
भिडती; लज्जित करण्या शंपालिंगित शरद्घनगणातें ७

गोपुर भव्य शिलांतर नृपमंदिर रुचिर हो लताकुंज
क्रीडे सुरललनागण पसरी परिमल जिथें कुसुमपुंज ८

गिरिराजभू-प्रदेशा नगराचें सत्य साम्य हो आलें
मणिकिरणजाल विलसे मंडन तें वस्त्रमय गमे झालें ९

गिरिवर-पृथुकटका जे विजल विगर्जित वियुक्त चपलांनीं
शुभ्र जलद विश्रमती बघुनि गमे युत गिरींद्र-पक्षांनीं १०

पुण्यजला चपला या कमलावलिलांछिता नद्या अचला
शोभविती, उपयोगा येती बहुविध सदा सुपूर्णजला ११

घाट बहु शोभविती तटिनींचे सम अतुल तटविभाग
दंतप्रहार जेथें करिती उत्कृष्टजाति वननाग १२

लाल मणी निजतेजें फुल्लजपा पुष्पकांति साराविती
हेमांकित शिखरांतें संध्येचा सतत भास भासविती १३

या गिरिवरी विहिततमा ततमाल-तमाल-वीथिका पसरे
दानार्द्रशुभकरांनीं रानीं नगजा गजावली विचरे १४

तुहिननगा पृथुशृंगा शृंगारी मालिका कदंबांची
आपाद मस्तकावरि वृष्टि घडे शीतजल तुषारांची १५

जीं जीं शिखरें गिरीचीं तीं तीं संपन्न रत्नपुंजांनीं
जीं जीं गुहास्थळें बा तीं तीं मंडित मनोज्ञ कुंजांनीं १६

जी जी नगराजनदी ती ती निःशंक रसमयी ललना
पुलिनस्थळ जघन गमे पंकेरुह फुल्ल तुल्य हो वदना १७

लघु गुरु वा जो जो नग नगपतिचें धवल भूषवी अंग
त्या त्या अखंड जडला पुष्पश्रीचा सुवासयुत संग १८

रशनायुतघनजघना सुरललना क्रीडती यथाछंद
हिमनगनदींत; वाटे भूवरि ये स्वर्ग सर्व-सुख-कंद १९

सर्वत्र हिमनगाला वसति अधिष्ठूनि नित्य नागकुलें
रम्यलतावकुलांचीं पसरिति परिमल जिथें अपार फुलें २०

नानाविध रत्नांची शिखरांवरि शुभ्र चित्र भा फांके
वाटे लोचन सुखदा सुरचापश्री सदा स्थिरा ठाके २१

हिमशुभ्रशिखरभागीं विमल विशद जलदजाल जें वागे
अपराशिखरशंकेला तें ध्वनितमिषें वदे " दुरी जा गे " २२

शुचिजल मानसनामक धारण नगवर करी सरोवर तें
विकचकमलवन विलसे जेथें कलहंसवृंद वावरतें २३

नगपति हा शुचिहृदया सहपरिवारा शिवास दे वास
कुपिता गिरिजा देवी कलहें दे त्रास जेथ देवास २४

गगनतळीं हिमनग हा ज्वलदोषधिवान्हिची प्रभा पसरी
ग्रहगण विमानगणही त्या योगें दीप्तिभार अधिक वरी २५

पाहुनि हें प्रतिरात्रीं प्रमथगणस्मरणमंदिरीं जागे
त्रिपुरदहनगहन कथा जी तेथें पडुनि निद्रिता वागे २६

धन्या हिमनगकन्या गंगा उत्तुंगसानुंतुनि वाहे
पाषाणरोध जेथें गाति चक्राकार यज्जळीं राहे २७

गंगातनुपासुनि जे उडति जळाचे तुषारपुंज वरी
पाहुनि ते वाटे कीं ढाळी सृष्टी तिच्यावरी चवरी २८

हृदय पृथापुत्राचें नगदर्शन-विस्मयें पूरें लोभे
मग यक्ष तया बोले समयीं वाचालता सदा शोभे २९

हिमशुभ्रशिखरसंघें भेदी नगराज हा नभःप्रांत
दर्शनमात्रें हरितो मनुजांचे सर्व पापसंघात ३०

अतिगहन रूप याचें दिग्व्यापी जेंवि परमपुरुषाचें
केवळ विधि तें जाणे न चले बळ तेथ सत्य इतराचें ३१

विजया हिमगिरिचें या तत्त्व सुदुर्गम न आगमां कळतें
वर्णनपर मुखवृंदहि "नेति" अशा वर्णनीं सदा वळतें ३२

कुंज हिमाद्रीचे या शुभपल्लव-पुष्प-पुंज शोभावितीं
सृष्टि तडागांची ती दृष्टि हरी कमलसंपदोघ वितीं ३३

रम्यस्थळ बघुनि असें स्त्रीमानग्रंथि बा तुटे सारी
उत्सुक पुनरपि होती दयितसमागमसुतृष्णही नारी ३४

नय-भाग्य-वतां सुलभा वित्तप्रभुचित्त हर्षदा लोकीं
श्रीगिरिवरि या विलसे जेणें भू श्रेष्ठ हो तिन्ही लोकीं ३५

लोकीं अविदित महिमा गिरिजापति गिरिवरी सदा वास
सेवी; त्रिभुवनही हो अपुरें गिरिगौरवा तुलायास ३६

इच्छिति पावाया जे जन्मजरामुक्त शुद्ध मुक्तिपदा
ज्ञानद आगमसा हा गिरि दे त्यां मति भवांतका सुखदा ३७

शय्यागत लाक्षारस सुमशेखरपतन-भंगि- सुमयोग
या गिरिवरि कथिति सदा सुरललनांचे अनेक रतभोग ३८

नयपरभूपीं श्रीशी ओषधिततति लोकमान्य गिरिवरती
विलसे नित्य गुणबलें महिमा जो परम उच्च हो वरती ३९

कुररीगणरव करिती पुष्पभरें वृक्ष वांकुनी जाती
कमला या गिरिवरती शोभविती बहुविधा कमलजाती ४०

गिरिवर-दुहिता सरिता नलद-वरण-वेष्टिता सुशीतलजा
हर्षविती हस्तगणा जो जलकेली करावया सजला ४१

सुरगजकुळगंडस्थळ घांशी तें स्थळ मदांबुपरिमळ वी
पिक हर्षें आलि चिकटे असमर्थि कुलाम्रयश न तें मिळवी ४२

मंदिर शुभवल्लीगण दीप ज्वलदोषधी, रुचिर शयन
हरिचंदन-नवपल्लव, सुरतश्रमहर सदा कमलपवन ४३

भूस्वर्ग हा हिमाद्री सुरभोगन्यूनता इथे न पडे
यास्तव सुरललनांना स्वर्गाचें स्मरणही कधीं न घडे ४४

गिरिवर्यसुता आर्या शिवभार्या व्हावया तपश्चर्या
वार्यंतरीं चिर करी हो जेणें सृष्टि सर्व साश्चर्या ४५

सलिलीं अचलसुतेला जलजंतुस्पर्श होतसे जेव्हां
चंचल चकित तिची ती दृष्टि घडे चित्तहारिणी तेव्हां ४६

शिव सुप्रसन्न झाला आला हस्तांगुलीस घर्मभर
या गिरिवरि गिरिजेचा विधिपूर्व धरी गिरीश अग्रकर ४७

सागरमंथन पूर्वी सुर सासुर साधिती सुधाकाम
मंथनदंड गिरिस त्या करिती " मंदर " जया जगीं नाम ४८

मंथनकाळीं सहसा उसळे खतळीं समूळ सिंधुजळ
पाताळलोक शोभा स्पष्ट पडे दृष्टिला घडे जवळ ४९

तो मंदरागिरि वाटे वासुकिच्च्या वेष्टनें व्रणित काय
गगन-मुखश्रीचुंबन घेण्या हिमनग मिषें उठे काय ५०

स्फुट विलसति गिरिवरि या स्फटिकांचे तट तसे रुप्याचे वा
शुभ्रप्रभा जयांची हंसतनुसवें सदा करी हेवा ५१

आधिकोन्नतीस गेले वाटे तट हे रविप्रभा संगें
नीलमणिद्युतिमिश्रित खुलती रूपें तसेच हे रंगें ५२

नीलमणिद्युतियोगें मंदावे तीव्रसार तटकांती
दिनमध्यावसरींही निर्मी हृदयांत चंद्रिका-भ्रांती ५३

मंदपवनकंपित हीं कमळें करिती विलासनृत्य जळीं
जें अल्पोर्मियुत वरी ललनाभ्रूभंगरीति या अचळीं ५४

गिरिवरि या गौरीचा परिणयविधि शंकरासवें झाला
चंचलभाव वधूच्या दृष्टीला भुजगकौतुकें आला ५५

देव पिनाकधर धरी लीलेनें हस्त पार्वतीचा जो
तो मंगलौषधींनीं शोभे कंपाश्रयें तथा साजो ५६

गिरिराजस्फटिकांचीं किरणसहस्रें नभीं भ्रमण करिती
तन्मिश्रित रविकरही दशशतसंख्याधिकत्व तें वरिती ५७

उन्नत-गोपुर जेथें नगर रची धनद शंभु तुष्टीतें
तो हा कैलास वसे कुतुकप्रद नित्य सर्व सृष्टीतें ५८

या पर्वतासभोतीं भ्रमण करी सर्वदा सहस्रकर
असमय अस्तास जया शिखरांचा तुंग पाववी निकर ५९

शिखरांतरस्थ कटकीं नानाविधरत्न-किरणजाळ उठे
भित्तिभ्रम तें निर्मी जो मारुतगतिवशें उरे न कुठे ६०

कैलासपर्वताची शाद्वलशोभा मनोज्ञ नवहि सदा
नलिनीवनांस वरिते श्यामद्युति अनुदिनीं नयनसुखदा ६१

कैलासतरुवरांतें नवपल्लवकांति नित्य आलिंगी
चित्रकुसुमगुच्छभरें तरुनट नटती यथेच्छ वनरंगीं ६२

कैलासपरिसराला शोभविती हरितवर्ण पाचमणी
नवरुचिरतृणांकुर त्यां मानुनि भुलतात मुग्ध मृगरमणी ६३

शुकतनुसमसुकुमारा उसळे तत्कांति जी नभांत वरी
दिनकर-कर-संयोगें वृद्धिंगत ती विशेष होय खरी ६४

कैलासगिरिवरी हें स्थलनलिनीवन घडे प्रफुल्ल पहा
विजया, गगनांत भरे कमलरजःकणसमूह पीतमहा ६५

प्रबलपवनसंचारें गगनीं भ्रमतां परागसमुदाय
वाटे गगनीं विलसे कनकमयच्छत्रचारुता काय ? ६६

संध्यावंदनकामें येती शिवपार्वती उषःकाळीं
तीरा गगननदीच्या वाहे जी स्फटिकशैलपृथुभाळीं ६७

वामचरणमुद्रेचा लाक्षारस, सान थोर पदमुद्रा
कथिती " शिव अर्धांगी स्त्रीस धरुनि कीं तरे भवसमुद्रा " ६८

तरुशाखारंध्रांतुनि गिरिपृष्ठीं सूर्यकिरणजाळ पडे
तें रजत भित्तिदीपित मधुनि मधुनि मुकुरबिंबतुल्य घडे ६९

कैलासशिखरदेशीं सेवी शिववृष यथेच्छ संचार
सर्वत्र देह ज्याचा शृंगारी शुभ्र शुभ किरणभार ७०

वप्रक्रीडार्थी तो वृष निजवपु वांकवी यदा थोर
मुग्धस्त्रीजनमानी चंद्राची उदय पावली कोर ७१

शारदघनमंडळ हें खंडितजळ विकलगात्र लघु झालें
निर्जीव त्रुटित असें त्यांतुनि जन्मास इंद्रधनु आलें ७२

कैलासशिखरगत जो नानाविधरत्नगणकिरणपूर
तो इंद्रधनुष्याच्या घटनेची न्यूनता करी दूर ७३

या शेषशून्यशैलीं शशिशेखरशीर्षशालिशशिकल
अमृतमयकरक्षेपें धवल करी गिरिवनांत हे सकल ७४

नित्य सुधासेकीं या वनवल्लीवृक्षगण करी स्नान
हा क्रम अखंड चाले नवमी त्या कृष्णपक्षही मान ७५

हा इंद्रकीलनामक पर्वत जो तुजपुढें दिसे कृष्णा
प्रिय बहु तव जनका तो जाण्याची जेथ बा तुला तृष्णा ७६

या इंद्रकीलदेहा कनकगुहा असति कीं बहु विशाल
तत्कांतिमिषें तो दे सर्ववनश्रीस भरजरी शाल ७७

प्रबल-पवन-संचारें तरुशाखा विलग जेधवां होती
अव्यक्त कनकतटगा कांति तदा दृष्टिगोचरा हो ती ७८

कनकतटांची द्युति ही द्विगुणित होई रविप्रभासंगें
वाटे वीजाचि चमके तेव्हां कीं उभयतुल्य कृति रंगे ७९

सुरगज निजगंडस्थळ घांशी हरिचंदना तदा गळती
कंपे आहिवर, करिवर मदगंधत्रस्त तेथुनी पळती ८०

घननीळ-नीळरत्नीं निजकिरणीं खंडिले दिनेशकर
शिरति न गव्हरजठरीं भिडुनि जणुं तयां गिळी तमोनिकर ८१

श्रीव्यासमुनिनिदेशें होऊनि तूं शांत दांत बा आधीं
मग येथें निजधर्में सायुध तूं सावधान तप साधीं ८२

सावध तूं दक्ष रहा तंद्रा आलस्य सर्वथा झाड
कल्याणपथ क्रमितां येती विघ्नें पदोपदीं आड ८३

न कधीं सोडुनि मार्गा विजया तव इंद्रियाश्व उधळोत
श्रीसांब धैर्यलोपीं कर्णीं उत्साहचूर्ण उधळोत ८४

विघ्नें विलया सारीं इंद्रादिक लोकपाळ नेवोत
सांग तपःसिद्धीतें सामर्थ्य तुला अखंड देवोत ८५

प्रिय हित वदुनि असें तो त्वरित करी गमन यक्ष सदनातें
नर विरस मनीं झाला सद्विरह सदा सुकष्टद मनातें ८६

स्वबळें सर्वत्र सदा दुर्लंघ्य त्वरितकार्यसिद्धिकर
निजपुरुषकारसम जो विलसे अत्युच्च इष्ट शैलवर ८७

त्याप्रति घेऊनि पोंचे लक्ष्मीयुत पूर्ण पुत्र इंद्राचा
कीं तच्छौर्यजलधिला घडला कीं योग शैलचंद्राचा ८८

## सर्ग ६ वा

ललितांग सुपथगामी गंगासमुख महेंद्रसुत जिष्णू
कनकशिखरगिरिवरि त्या चढला गरुडावरी जसा विष्णू १

जयजयकार तयाचा तरु करिती भ्रमरगुंजितद्वारा
" भाट भले हे " मग ही चालुनि ये कां न उक्ति तद्वारा २

पवनप्रेरित शाखी शाखारूपीं कराग्र हालवुनी
इंद्रसुताच्या शीर्षी कुसुमांची वृष्टि सोडिती लवुनी ३

गंगाजल-कुसुम-कणां जो वाही वायु सुखद गात्रातें
तो अभिमुख येऊनि त्या आलिंगी जेंवि मित्र मित्रातें ४

सारस-मराल-रव-युत उन्नतपाषाणपतनजनित महा
मंगलतूर्यध्वनिसा प्रतितटिं जलनाद त्यास दते महा ५

( अपूर्ण )

# जहाल आणि मवाळ

( आरंभीचे १६ श्लोक मिळू शकत नाहींत. )

पिताः—

मवाळां मुला लागलें काय खूळ
तुरे बुद्धि का? दृष्टि गेली समूळ
असे हांव त्यां भूतळीं जावयाची
वृथा वाट घेतील कां ते नभाची १७

दुतर्फा जयां शोभवी वृक्षवृंद,
मृदू, वाहनां योग्य जो लांबरुंद,
जिथें विश्रमाची असे सर्व सोय
मवाळां सदा मार्ग तो इष्ट होय १८

जहालां रुचे आडमार्गें प्रयाण
पशू हिंडती हिंस्र जेथें भयाण
नसे सावली ऊन जाळी शिराला
खडे बोंचती तीक्ष्ण कांटे पदाला १९

जहालां मवाळां विरुद्ध प्रयाणें
अखेरीस एकस्थळीं सत्य जाणें
तरी टाकिशी मार्ग कां तूं सुखाचा
नृपा मान्य अंतीं प्रजेला हिताचा २०

पुत्रः—

मावाळां रुचे मार्ग जो राजमान्य
भिकेचाच तो; भूप त्यां हो वदान्य
यथाशास्त्र ते मान खालीं करोनी
तया प्रार्थिती जोडुनी हात दोन्ही २१

न मीं स्वकरीं व्यर्थ भिक्षाव्रताला
चढे काय हंडी भिकेची शिक्याला ?
स्वकार्यार्थ जो स्वावलंबा न वाहे
सदा त्याकडे सिद्धिची पाठ राहे २२

प्रयासाविणें क्षुद्रही कार्य कोठें
न सिद्धीस जाई, तरी केंवि मोठें ?
स्वसौख्याहुनी कार्य ज्यां गौण वाटे
मवाळांचिया काय त्या लाभ वाटे ? २३

पिताः—

मवाळांचिया मस्तकीं सर्वकाळ
कृपाछत्र शोभे नृपाचें विशाळ
प्रसादा घडे पात्र जो का नृपाच्या
करीं नाचती ऋद्धिसिद्धी तयाच्या २४

पुत्रः—

जरी ऋद्धिसिद्धि मवाळांस राजी
तरी साध्य कां साधिती ते न गाजी ?
जया मानिती ऋद्धिसिद्धी मवाळ
नृपाचें असे सर्व तें इंद्रजाळ २५

नृपप्राप्त जे मोठमोठे किताब
मवाळांवरी ठेविती नित्य दाब
असे भूलही; भूलही काय वांके ?
जरी तच्छिरीं अक्षरी शैल ठाके २६

दुरुक्तींसही भूपतीच्या मवाळ
भुकेले बहू घोटिती नित्य लाळ
सुशब्दामृताच्या तयां एक घोटें
गमे स्वर्ग कीं राहिला दोन बोटें २७

नृपोष्ठांतुनी संभवे बाब जी जी
कराया तिला नित्य जे सिद्ध "जी जी"
वदाया नसे साष्ट ज्यां लेशधीर
कसें साध्य ते साधिती षंढवीर २८

शरीरव्यथा लेखुनी सौख्यधाम
करीं खेचुनी संयमाचा लगाम
चढे स्वार जो इंद्रियाश्वावरी तो
तपोमंडपीं ऋद्धिसिद्धी वरीतो २९

न हंसी कधीं माळ घाली बकाला
न सिंही वरी ग्रामपंचाननाला
जगीं भ्याड जे गाजती मेषपात्र
न होतील ते ऋद्धिसिद्धीस पात्र ३०

पिताः—

मवाळां नृपा तोडणें वाक्प्रहारें
जहालां असे हेंच का साध्य सारें ?
जिभेला जसें हाड त्यांच्या न बाळा
तसा लेखणीला नसे अल्प आळा ३१

नृपाची कृपा हीच वल्ली विराजे
मुलां शब्दपुष्पें तिच्चें रूप साजे
पुढें शोभती तीं फळांच्या बहारें
जहालीं परी तोडिलीं वाक्कुठारें ३२

मवाळां सदा आड येती जहाल
यशा ना तरी पावते ते खुशाल
चढाया जिथें येत नाहीं स्वतांला
तिथें अन्य जातां न साहे तयांला ३३

परांपासुनी कार्य साधून घेणें
तरी त्यांसवें स्नेहवृद्धीस नेणें
विरोधें वरी कार्यवैफल्यमुद्रा
तरे कोण नौकाविरोधें समुद्रा ३४

प्रसंगांत जो वृक्षशाखाश्रयाला
चढे लागतां दोन कांटे तयाला
जरी क्रुद्ध तो तीस हाणोनि पाडी
तरी मूढ तो मृत्युला मूळ धाडी ३५

पुत्रः—

न शाखा परी कंटकच्छेदनातें
जिवापाड घेती जहाल श्रमातें
न नौकेसवें त्यां रूचे वैरभाव
परी त्यां नको कागदी शुष्क नाव ३६

सं. नं. ..........

तृणप्राय मानूनिया भूपरोष
तया सर्वही राज्यतंत्रस्थ दोष
निवेदावया स्पष्ट चोरी कशाला ?
भिकेची ग्वसा भीड, ठावें जगाला ३७

नृपक्रोधरूपी ज्वलत्पर्वताचा
घडे दोषसंकीर्तनें स्फोट साचा
तयाच्या भयें पाय मागें न घेई
जगीं धन्य तो कार्यसिद्धीस नेई ३८

वसे राज्यदोषांवरी मौनवस्त्र
तया जो हरी त्यावरी कोपशस्त्र
नृपाचें सुटे त्यासही तोंड देई
जगीं धन्य तो कार्यसिद्धीस नेई ३९

असे लागली राज्यतंत्रस्थ छिद्रा
मवाळोक्तिच्या मंचकीं गाढनिद्रा
तयां जागृती भंगुनी तल्प देई
जगीं धन्य तो कार्यसिद्धीस नेई ४०

न जों मौनमुद्रा त्यजी ओष्ठवास
न जों "होस हो" वर्ण जाती लयास
अनाचार तो राज्यतंत्रास्थितीचा
कळे ना नृपा, मान तो घे सतीचा ४१

नृपानुग्रहाची लता जी विशाला
मवाळव्रताच्या वरी मंडपाला

निदानीं फळे ती फळांच्या अभावीं
तिचीं शब्दपुष्पें खपुष्पें गणावीं ४२

मवाळीं नृपीं तीव्र-वाग्बाण-जाळ
जहालव्रती सोडिती सर्वकाळ
जळावे तदंगीं महामोहरोग
घडे त्यावरी हाच लोहप्रयोग ४३

कुपथ्यावरी नित्य हव्यास त्यांचा
घडे क्षुब्ध हाणी शिरीं रोग टांचा
पराला तदा दोष देती स्वदोषें
जहालांकडे पाहती तीव्ररोषें ४४

जहालांपुढें तेज त्यांचें पडेना
जहालांवरी छाप त्यांची बसेना
मवाळां तदा चीड येई अपार
सुचूं लागती शुद्ध वेडे प्रकार ४५

शिखंडीपरी स्त्रीस्वरूपी मवाळ
स्वयें घेउनी पाठीराखा नृपाळ
मना मानलें सांगुनि तें तयाला
जहालांवरी घालिती चोर घाला ४६

पिताः—

तपस्व्यापरी मानसीं शांत दांत
स्वकार्यांत जे मग्न होती नितांत

मवाळव्रती ते महात्मे पवित्र
शिव्या शाप त्यां, दैवलीला विचित्र ४७

जहालां सदा एक हें कार्य ठावें
मवाळांस कीं शब्दशस्त्रें वधावें
महाघातकी वृत्ति ही शीघ्र फार
करी सांथशी सर्व देशीं प्रचार ४८

स्त्रिया अर्भकें वृद्ध वेडे शहाणे
तयांच्या मनीं एक ही वृत्ति बाणे
मवाळांस कीं हाणुनी वाक्प्रहार
स्तुतिस्वप्नसंगीं करावा विहार ४९

नसे धन्यता मान्यता वा, नसो ती
स्वदेशीं मवाळां महाक्लेश होती
सळो का पळो त्यांस केलें जहालीं
नसे वाव त्यां ठेवण्या पाय खालीं ५०

स्वदेशीं मवाळां घडे कोंडमारा
नुरे अन्य त्यां भूपतीवीण थारा
जरी कोपुनी शस्त्र माता उगारी
तरी मूल ताताकडे धांव मारी ५१

निजारिष्ट भूपाश्रयें दूर नेलें
मवाळीं तरी वाउगें काय केलें ?
तयां लादिशी कां वृथा दोषभारें
मनीं पाप त्यातें जनीं पाप सारें ५२

महाधूर्त जो धोरणी भूमिपाळ
स्वकार्यज्ञ त्या का गुरु हे मवाळ ?
नसे शक्य हें, तो स्वयें चारदृष्टि
विलोकी स्वदृष्टिपुढें सर्व सृष्टी ५३

जहालव्रती आपल्या दुर्मतीचीं
विषारी फळें चाखिती दुष्कृतीचीं
मवाळां वृथा दोष देती तयाचा
भल्याच्या शिरीं आळ हा तस्कराचा ५४

तयांच्याच संसर्गदोषें अशेष
पडे राजदंडा बळी आर्यदेश
भयें बापुडीं दीन होतीं जहालें
पहा तोंडचें सर्व पाणी पळालें ५५

किती भोगिती क्लेश कारागृहांत
किती कंठिती काळ देशांतरांत
किती बापडे मृत्युची वाट घेती
किती स्वव्रता सोडुनी शीघ्र देती ५६

नृपक्षोभ हा सत्य पर्यायकाळ
तया तोंड देणें असे अंतकाळ
करावें असे प्राण जों तेंच केलें
मृतें कोणतें कार्य सिद्धीस नेलें ५७

पुत्रः—

गिळी मृत्यु ताता कुडी सज्जनाची
उगाळी परी सत्कृती सर्व त्याची

मुखीं अंतकाच्या अनंतत्व तीतें
मिळे, कां नुरे व्यापुनी ती क्षितीतें ५८

अनंतां मुखीं सत्कृती मूक बोल
वदे शून्यकंठें नसे ज्यांस मोल
सदा बिंबती पूर्ण ते अंतरंगीं
जनां प्रेरिती स्तुत्यकर्मप्रसंगीं ५९

असे प्राण तों लोककल्याणकार्य
करी दोन हातीं महात्मा अवार्य
गतप्राण तो हस्तशून्यस्थितींत
हजारों नवे हात योजी कृतींत ६०

मरोनी जगीं नित्य झाले जिवंत
स्वशिष्यावलीच्या मिषें साधुसंत
नटातुल्य ते भूमिका भिन्न घेती
स्वरूपांतरें कार्य सिद्धीस नेती ६१

मवाळव्रताचा जरी शीतकाळ
नृपक्रोधवातें हरी पर्णजाळ
जहालव्रताचा तरू का वठेल ?
वसंतीं नव्या पल्लवीं तो फुलेल ६२

स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीयशाळा
मुलें थोर हीं पोषिती नित्य त्याला
मुळीं ठेविला देह त्याच्या जयांनीं
स्वताचीच त्या सोय केली तयांनीं ६३

जहालव्रताच्या जरी भास्कराला
विपद्राहुचा ग्रास खग्रास झाला
जनांचें हरी लक्ष तो मंदवेश
स्वतेजें स्फुरे मोक्षकाळीं विशेष ६४

विराजे नभीं दिव्य नक्षत्रजाळ
तया आड घाली जरी मेघकाळ
न हो नष्ट तें आंत कीं स्वस्थ वागे
जहालव्रता हाच दृष्टांत लागे ६५

मनःपूत ज्याची क्रिया शुद्ध झाली
विदेशादि दुःखा न तो भीक घाली
मनोरूप तो तार धाडी वितार
निवेदी स्वकीयां मनींचा प्रकार ६६

मनोदेवता ईश्वरी न्यायदेवी
क्रियानिर्णयीं ज्यावरी दोष ठेवी
पडे मुक्तही बंधनीं तो दुरात्मा
मनें शुद्ध तो मुक्तबंधीं महात्मा ६७

अनेकीं जरी सोडिलें या व्रताला
न आतां मुळीं बाध येई तयाला
जरी ओहटी आटवी सागराला
तरी न्यूनता काय तेथें जळाला ६८

मवाळी महाचंडपैशून्य-वातें
दिली चेतना भूपकोपानळातें

उजेडांत ये कृष्ण तें कर्मजाळ
न का कुक्कुटा झांकितां हो सकाळ ६९

स्वतःशीं प्रजेशीं नृपाशीं स्वभूशीं
महाद्रोह केला मवाळीं प्रभूशीं
कळेना तयां काय दंडप्रमाण ?
अणूहूनि तेथें कमी शब्दबाण ७०

स्वमार्गें चलावें मवाळीं खुशाल
न त्यां आड आले, न येती जहाल
जहालव्रताच्या परी तेच वाटे
तपस्विच्छलें हिंडती मैंद वाटे ७१

स्वहस्तीं धरीं सर्वविश्वाधिपत्य
सदा दुर्जनां जो करी पारिपत्य
उडी संकटीं तारण्या भक्त घाली
जहालव्रता तो असे देव वाली ७२

पिताः—

असो स्तुत्य वा निंद्य वा जें मवाळ
प्रयासें सदा साधिती कर्मजाळ
असे सर्व तें आर्यभूच्या हितार्थ
जगीं याच हेतुमुळें ते कृतार्थ ७३

असे हें जगीं सर्वदा मान्यतत्व
क्रियेला नसे हेतुला कीं महत्त्व

न घे अन्न जो द्वार-लोपें मुखाच्या
न पुण्यास तो पात्र विष्णुव्रताच्या ७४

स्वभूतें विपद्रोग होतां कराळ
सुधेचा तिला घोट देती मवाळ
विषारी जरी ईश्वरेच्छें घडे तो
मवाळांवरी काय बा दोष येतो ? ७५

कितीही जरी द्रोह केला मवाळीं
कितीही जरी दंड त्यांच्या कपाळीं
" जहालां " तरी त्यांविणें न्यूनभाव
नसे एकचक्रें रथाचा निभाव ७६

पडे पक्षघातें लुलें अंग डावें
दुजें सुस्थही व्यंग संसर्गभावें
मवाळव्रताच्या क्षयें तेंवि हानी
जहालव्रताच्या असें सत्य मानीं ७७

मुला एक पक्षें पुरा हो न मास
नभीं एकपक्षें गती ना खगास
कसा एकपक्षें जहालव्रताच्या
पदा आक्रमी देश हा वैभवाच्या ७८

मवाळव्रतीं जों नसे वैरभाव
जहालव्रताचा वृथा सर्व आव
मवाळव्रतीं आज सौख्यातिरेक
जहालव्रतीं आज पीडा अनेक ७९

उद्यांचें असो आज हो तूं मवाळ
कुणाला कळे ये कसा भाविकाळ
न जो पुत्रपाळी पित्याच्या वचाला
वृथा जन्मला तो करंटा कशाला ८०

पुत्रः—

मवाळांसवें स्नेह साधावयास
जिवापाड केले ' जहालीं ' प्रयास
" मवाळीं " परी सर्व ते व्यर्थ केले
जहालांस ते सोडुनी दूर गेले ८१

रुचे त्यां तरी ते जहालीं मिळोत
मवाळव्रती वा निराळे बसोत
जहालां नसे वाण आतां तयांची
जगीं विश्रुता पूज्यता हो जयांची ८२

स्वयंतेज जो सत्त्वशाली करारी
न तो साधनव्यंगतेला विचारी
रवी लंघितो एकचक्रें रथाला
नभीं, सारथी-व्यंग हाकी रथाला ८३

जशी भिन्न भिन्न स्थळीं दीपमाला
विदारी सदा सागराच्या मुखाला
तशी मंडळी ही मवाळव्रताची
जहालव्रता खंडिते नित्य साची ८४

तयाचा परी ओघ दुर्वार तीतें,
सदासर्वदा तो पुढें घे गतीतें

स्वमार्गी न तो क्षुद्र विघ्नां जुमानी
जसा सिंह तो ग्रामसिंहा न मानी ८५

कळेना जरी भाविकाळस्वरूप
तरी तेंच दे कर्मभागा हुरूप
भविष्यत्फळाची सुधातुल्य गोडी
मनुष्यां सदां कर्ममार्गास जोडी ८६

मवाळव्रतीं काय सौख्यातिरेक ?
जहालव्रती काय पीडा अनेक ?
निवेदा तरी स्पष्ट ताता मला तें
बघे बुद्धि माझी तिथें व्युत्क्रमातें ८७

स्वदेवार्थ किंवा स्वदेशार्थ कार्य
कराया बघे पुत्र, त्या तात आर्य,
निवारी जरी पुत्र आज्ञाविरोधी
निदानीं ठरे तोच आज्ञानुरोधी ८८

पिताः—

मुला जेविती तीन वेळां मवाळ
जहालांस ये हाय ! अन्नान्नकाळ
रितें पोट जों तोंवरी सर्व नाहीं
भरे पोट तेव्हां सुचे सर्व कांहीं ८९

पुत्रः—

स्वधर्मीं वरें राहणें अर्धपोटीं
अधर्मीं नको दूषिली तूपरोटी

घडे शुद्ध अन्नें सदा चित्त शुद्ध
अशुद्धान्नयोगें घडे तें अशुद्ध ९०

पिताः—

मवाळांस लाभे मुला रोजगार
मिळे मोठमोठा सदा त्यां पगार
जहालां नसे राजसेवेंत वाव
तरी त्यांसवें दुःखदारिद्र्य ठाव ९१

पुत्रः—

श्ववृत्तीहुनी नीच जी सर्वसेवा
जहालांस ताता तिचा काय हेवा ?
लता ईश्वरी भक्तिची दिव्यरूप
धरी दुःखदारिद्र्यभूमींत रूप ९२

पिताः —

मवाळां मिळे सर्वदा राजमान
जहालां मुला नित्य लत्ताप्रदान
कुटुंबा मवाळव्रतें सौख्यशांति
जहालव्रतें दुःख लाधे अशांति ९३

पुत्रः—

मवाळां जनीं नित्य लत्ताप्रदान
जहालां मिळे सर्वदा देवमान
यदा सर्वदेशा गिळी दुःखभार
कुटुंबीं नसो सौख्यशांतिप्रकार ९४

स्वमार्गी न तो क्षुद्र विघ्नां जुमानी
जसा सिंह तो ग्रामसिंहा न मानी ८५

कळेना जरी भाविकाळस्वरूप
तरी तेंच दे कर्मभागा हुरूप
भविष्यत्फलाची सुधातुल्य गोडी
मनुष्यां सदां कर्ममार्गास जोडी ८६

मवाळव्रतीं काय सौख्यातिरेक?
जहालव्रती काय पीडा अनेक?
निवेदा तरी स्पष्ट ताता मला तें
बघे बुद्धि माझी तिथें व्युत्क्रमातें ८७

स्वदेवार्थ किंवा स्वदेशार्थ कार्य
कराया बघे पुत्र, त्या तात आर्य,
निवारी जरी पुत्र आज्ञाविरोधी
निदानीं ठरे तोच आज्ञानुरोधी ८८

पिताः—

मुला जेविती तीन वेळां मवाळ
जहालांस ये हाय! अन्नान्नकाळ
रितें पोट जों तोंवरी सर्व नाहीं
भरे पोट तेव्हां सुचे सर्व कांहीं ८९

पुत्रः—

स्वधर्मे बरें राहणें अर्धपोटीं
अधर्मे नको दूषिली तूपरोटी

घडे शुद्ध अन्नें सदा चित्त शुद्ध
अशुद्धान्नयोगें घडे तें अशुद्ध ९०

पिताः—

मवाळांस लाभे मुला रोजगार
मिळे मोठमोठा सदा त्यां पगार
जहालां नसे राजसेवेंत वाव
वरी त्यांसवें दुःखदारिद्र्य ठाव ९१

पुत्रः—

श्ववृत्तीहुनी नीच जी सर्वसेवा
जहालांस ताता तिचा काय हेवा ?
लता ईश्वरी भक्तिची दिव्यरूप
धरी दुःखदारिद्र्यभूमींत रूप ९२

पिताः —

मवाळां मिळे सर्वदा राजमान
जहालां मुला नित्य लत्ताप्रदान
कुटुंबा मवाळव्रतें सौख्यशांति
जहालव्रतें दुःख लाधे अशांति ९३

पुत्रः—

मवाळां जनीं नित्य लत्ताप्रदान
जहालां मिळे सर्वदा देवमान
यदा सर्वदेशा गिळी दुःखभार
कुटुंबीं नसो सौख्यशांतिप्रकार ९४

पिताः—

जहालां मिळे सर्वदा देवमान
असें जें तुवां स्पष्ट केलें विधान
महाराष्ट्रदेशा तरी तें न लागे
तयाचा तिथें वा विपर्यास जागे ९५

नसे ज्यांस चिंता कुटुंबस्थितीची
घडे मान्यता त्या जहालाग्रणींची
घडो, ती परी वाटते व्यर्थ मातें
समुद्रीं वृथा मेघ वर्षे जलातें ९६

दरिद्री परी अन्य ज्यां न्यायदेवी
कुटुंबांतुनी काढूनी दूर ठेवी
कुटुंबें तयांचीं उपाशीं मरावीं
महाराष्ट्रदेशीं सुखें धिक् पहावीं ९७

पुत्रः—

जरी या विधानीं असे तथ्य कांहीं
जनांच्या स्तुतीची मला चाड नाहीं
अपस्वा मिळो उग्र लोकस्तुतीची
न त्या तीविणें जोड पक्वास्थितीची ९८

पिताः—

पुढें टाकुनी पाय मागें फिरे तो
तिरस्कार लोकीं शिव्याशाप घेतो

न हा अन्य वा लोक त्याच्या कपाळीं
त्रिशंकूपरी लोंबतो अंतराळीं ९९

कराया पुरा उच्च हेतू मनाचा
पुढें जो सरे पाय मागें तयाचा
जरी ये तरी मान्य तो, सिद्धि कोती
जघन्यार्थ निष्पादनीं जी नको ती १००

पिताः—

स्थिति प्रस्तुता साधनें देश काळ
न घेती मनीं आत्मघाती जहाल
[illegible] कातळीं उष्णकाळीं कुबीज
श्रम [illegible]रेलें काय होईल चीज १०१

व्यवस्था, सचोटी, नसे रीतभात
जहालीं वसे शिक्षकाचा विघात
मवाळीं विरुद्ध स्थिति घे निवास
मुला हट्ट सोडीं वरीं त्या व्रतास १०२

पुत्रः—

" धरीं वाट नेटें जहालव्रताची "
अशी प्रेरणा हो मला ईश्वराची
असें जन्मजन्मान्तरीं मीं जहाल
वृथा कां करा आग्रहाची कमाल १०३

पिताः—

हे पुत्राधम तोच ईश्वर करी मातें अशी प्रेरणा
" कीं, हा पुत्रकलंक घालवुनि दे गेहांतुनी या क्षणा "

जा वाटेल तिथें, तुझ्या कुमतिला मानेल तें तूं करीं
पश्चातापवशें मदुक्तिस वृथा वा आठवी अन्तरीं १०४

पिता माता पत्नी अनुज भगिनी बालसुतही
त्यजी तेजस्वी तो हृदयिं न धरी दुःखलवही
पुढें त्यानें केली अघटित कृती जी नवनवी
"यथाकाळीं लोकां कथिन" कावे हें नम्र विनवी १०५

× × ×

आतां सारे रसिक पुरवा एक हें अल्प कोड
माना राधारमण कविचे बोबडे बोल गोड
तेणें माझी श्रमपरिवृता शारदा विश्रमास
सेवोनीया वरिल मुदितां अन्यकाव्यप्रयास १०६

# दैवाचा - खेळ

# दैवाचा खेळ

( विदर्भ देशाचा राजा सत्यरथ याजवर एके समयीं शाल्वदेशाच्या राजानें स्वारी करून त्यास ठार मारलें व राजवाड्यास वेढा दिला. वाड्यांत सत्यरथाची राणी इंदुमती ही नऊ महिन्याची गरोदर होती. तिनें सहगमनाचा विचार केला. परंतु गर्भांतील बालकाची हत्या केल्याचा दोष जाणून, तो विचार तिनें बदलून वाड्यांतून असलेल्या भुयारातून ती बाहेर पडली. अरण्यांत गेल्यावर तिला प्रसूतिकाळच्या वेदना असह्य होऊं लागल्या. शेवटीं एका झाडाखालीं ती प्रसूत झाली. इतक्यात तिला फार तहान लागली. म्हणून जन्मलेल्या पुत्रास तेथेंच टाकून जवळ असलेल्या सरोवरावर गेली. तेथें पाणी पिण्यास ती जातांच एका मगरीनें तिला आंत ओढून नेलें. इकडे तें बालक तसेंच पडलें होतें. त्या सरोवराजवळ एक शिवालय होतें. तेथें एक तरुण गतभर्तृका ब्राह्मणी नित्य दर्शनास येत असे, तिला तें बालक आढळलें. त्या निर्जन प्रदेशातून त्या बालकास घरीं नेण्याचा तिनें विचार केला. इतक्यात योगीरूपानें शंकर तेथें आले व त्यांनीं तिला 'त्या बालकास घेऊन जा म्हणजे तुझा भाग्योदय होईल' असें सांगितलें. पुढें तिला एक जो दोन वर्षांचा मुलगा होता त्याबरोबर त्या बालकास तिनें वाढविलें.

त्या सांपडलेल्या बालकाचें नांव धर्मगुप्त असें होतें. दोघेही मुलगे वयांत आले. एके प्रसंगीं हे मुलगे क्रीडार्थ वनांत गेले असतां एका गंधर्व कन्येची व धर्मगुप्ताची दृष्टादृष्ट झाली. नंतर दोघांचा गांधर्वविवाह झाला. नतर त्या गंधर्व कन्येनें झालेलें वृत्त आपल्या पित्यास सांगितलें व त्याच्या संमतीनें दोघांचें लग्न थाटानें झालें. पुढें या धर्मगुप्तानें आपल्या सासऱ्याची गंधर्वसेना बरोबर घेऊन शाल्वदेशाच्या राजाचा सूड घेण्याकरतां त्यावर स्वारी करून

शाल्वदेशाधिपतीस ठार मारिलें व गेलेलें राज्य परत मिळविलें असा या कवितेंत कथाभाग आहे.

ते वयांत आलेले दोन्ही मुलगे क्रीडासुखार्थ वनांत गेले आहेत व विश्रांतिसुखार्थ एका झाडाखालीं बसले आहेत, तेथपर्यंत कथेचा भाग या अंकांत आलेला आहे. )

( आर्या )

साष्टांग नमन करुनी, विघ्नहरा कामदापि-गजवदना
कथिन कथा जी कथिली, सूतें जी शौनकप्रमुखमुनिंना १

पूर्वीं विदर्भ-देशीं झाला भूपाल सत्यरथ नाम
निजवंश शोभवी तो, रविवंशा शोभवी जसा राम २

वक्ष विशाल जयाचें, भेटति भुज जानुतें नयन कर्णा
वदनें विधु, शौर्यें गुह, दानानें लाजवील जो कर्णा ३

रत्नाकर रत्नांनीं, सूर्य नभो-मध्यवर्ति किरणांनीं
फलसंगें वृक्ष जसा, भूप तसा शोभला नृपगुणांनीं ४

लोकांचें भू-नाथीं, भूनाथाचें सदा तसें लोकीं
प्रेम अधिक जीवाहुनि उपमा त्या द्यावया नसे लोकीं ५

जनकल्याण-परायण राज्य करी चित्तिं धरुनि नयनीती
दैविक मानुष सर्वहि, तद्राज्यांतूनि आपदा पळवी ६

समरकला-चतुर महा, चतुरंग चमू विलोकुनि जयाची
रिपुचक्र चकित होउनि आशा सोडी समस्त विजयाची ७

सौराज्य-रम्य-धरणी, शांतीचें सर्वथैव माहेर
महिषीसह उपभोगी, बहु वत्सर इंद्रतुल्य राजवर ८

परि कालानें होतां विधिची अनुकूलता लयाधीन
संकट घोर नृपावर पडलें जणुं वज्र अंबरांतून ९

द्वेषाग्नि शाल्वपतिच्या हृदयीं जो धूमयुक्त वास करी
आली त्यातें ज्वाला जाळाया सर्व सत्यरथनगरी १०

शाल्वेशः समरपटुः सैन्येन सहामितेन रिपुविषयान्
जेतुं जगाम तरसा, यथा तपोभिस्तपोनिधिर्विषयान् ११

सत्यरथोऽपि श्रुत्वा वृत्तान्तमिदं विपक्षबल-सिंधुम्
अप्रतिरथः प्रतस्थे, सैन्ययुतः शैलवत्समारोध्दुम् १२

सेना दोन्ही मिळतां, रणदुंदुभिच्या प्रचंड नादानें
वीररणावेश बहू चेतविला वन्हि जेवि पवनानें १३

वाजी लक्षुनि वाजी, पत्ति पदग रथ रथा करी चाल
स्वज्ञातिशिं संबंधा, करणें ही सतत सुखकरी चाल १४

पांसुपटलिं शोभतसे शस्त्रास्फालंजहुताशनज्वाला
नरनीरधरावलीनें व्याप्तीं गगनोदरीं जशी चपला १५

अत्यद्भुत भूपांची, सप्त दिवस तुमुल जाहली समिती
हत नर-गज-तुरगाना, नच शोणित-निर्झरावलीस मिती १६

विजयश्री वश करण्या वाटे सेनेसहीत तो नृपती
वीर-शिरःकमलांनीं, एकाग्रमनें तदर्चना करिती १७

अस्त्रीजन सत्यरथें स्त्रीसम केले निजप्रभावानें
देखुनि मुखीं बोट धरी, अमर-वधूवर्ग कुतुकभावानें १८

सत्यरथ सप्तवासर, करोनिया हरसुतासम रणाला
शर्द्धी धारातीर्थी, पावे वीरोचितास मरणाला १९

वैरि-चमू-वन हरण्या, विजय-श्रीपद-विकार-वश-मतिनें
आज्ञा निज सेनेतें, दिधली निःशंक शाल्वनाथानें २०

धन अमित करीं पडतां, संग्रामायास विसरली सेना
होतां कार्यप्राप्ती तदर्थ परि खेद कोण विसरेना २१

शाल्वेश तदनु रिपुच्या मिरवित शिरला प्रताप नगरांत
त्यापासुनि जो लोकां, झाला तो तीव्र ताप न गरांत २२

समर-समुद्रीं पडतां, क्षीण-चमू-किरण सत्यरथसविता
तन्नगर-नभो-मंडळिं, शाल्वेश-प्रमुख पावती उद्भुता २३

राजीव-राजि-रावित, कासारीं जेवि गंधगजराज
कुंडिन नगरीं वर्ते तेविं पथा काम शाल्व-जन-राज २४

निजनाथ नाकवासी वार्ता दुःखद अशी यदा कळली
रमणी तैशी नगरी, भूपाची शोकसागरीं पडली २५

गततिलका, गतभूषा, गतशोभा गतधवा गताधारा
रडली परोपरी ती गुणालया स्मरुनि ती नृपालवरा २६

हृदय पिटी, कच तोडी, नृपजाया मृत्तिका वदनिं घाली
बोले प्रिय, मज त्यजुनी, स्वारी तव दूर कां वद निघाली २७

कुसुमसम कोमलांगी, ती दुःसह-दुःख-दहन-दाहानें
अतिपीडिता करितसे, करुणांबुधिमाजि मग्न मनुजमनें २८

अति दुर्वह शोकभरें, आलिंगी तनु तिची समोह रसा
पर्वत-पक्षच्छेदक, कदली साहील वज्रपात कसा ? २९

एणी जशी वृकगणें, शत्रुगणें वेष्टिली तशी अबला
परि घोर विपत्कालीं, नृपवर-भार्या त्याजि न धैर्य-बला ३०

वाढे संकटसमयीं तें कांचन तेज जेविं अनलांत
आणी विचार अबला इंदुमती वज्र-कठिन हृदयांत ३१

रिपुहस्तीं न पडावें, त्याहुनि बरवें असे मला निधन
नवमास गर्भिणीतें, अनुचित तें उचित एक वनगमन ३२

धरणी-वल्लभ-रमणी आणी स्वमनीं अशा विचारातें
वेष्टितसे धनलोभें तों रिपुजन लोकपालभवनातें ३३

सर्वत्र राज-सदनीं नर नारी-संभ्रमा नसे भान
सर्वत्र एक-कालीं, सहसा जणुं त्यास लागला ज्वलन ३४

सतनुपुरश्री जणुं ती, इंदुमती हर्म्य-तल-सुरंगेनें
केवळ धैर्य-सहाया, गेली त्या समयिं सेवपथा विपिनें ३५

चिंती मनुज मनिं सदा, कालानें कामना करूं सफल
परी भालीं जें लिहिलें, विधिनें तें जाणण्या नसे सबल ३६

नैषध-नाथ नतांगी, दुर्दैवें जेंवि जनकजा सीता
पतिहीना गर्भवती हिंडे वनिं तेविं सत्यरथ कांता ३७

चरणांगुष्ठावरिही पूर्वीं न कधीं जिच्या किरण पडला
मार्तंड-चंड-तापें जीव तिचा फार घाबरा झाला ३८

कमलसम-कोमलांगी कठिन-शिला उग्र कंटकीं फिरतां
ठायीं ठायीं मूर्च्छित, होई तिज तेथ कोण सांवरिता ३९

लक्षानुलक्ष दासी, यत्सेवादक्ष सर्वदा वसती
एकाकी तृषिता ती, हिंडे हिंस्रोग्र सर्व दाव सती ४०

नवनीत-मृदुल शयनीं, जी पहुडे रत्न-मंचकीं सतत
दुर्वहगर्भभरार्ता, अहह ! असे ती शिळातळीं निजत ४१

अन्न सुधा-स्वादु सदा, सेवी जी कनक-भाजनीं युवती
आहार तापसीसम, ती फलमूलादिकेंच निर्वर्ती ४२

प्रक्लांत-कांत-काया कान्तारीं भूमिकांत-कान्ता ती
फिरतां फलाश्रें देखुनी दुःखित तरुमृग-विहंगही होती ४३

ढाळिति कुसुमाश्रुतरू गाळिति हरिणी मुखस्थकवलातें
टाकिति नृत्य शिखिकुलें, झालें शोकार्त सर्व जणुं वन तें ४४

राजाधिराज-ललना भिल्लीसम करुनि काननाश्रय ती
चार कुवासर कंठी, चार युगांहूनि दीर्घ जे गमती ४५

पंचम दिनिं वनिं फिरतां अंबर-मध्यार्क-चंड तापानें
इंदुमुखी इंदुमती झाली व्याकुल तशी पिपासेनें ४६

जल-शोधार्थ भ्रमतां, अर्कोपल-विमल-जल जलधारा
आली अगाध बहु जो माधुर्यें लाजवी सुधाधारा ४७

चकित कुरंगाक्षीच्या लागति तों प्रसव-वेदना उदरीं
आपद्ग्रस्त-तनु तिची गर्भस्थित बाल ही अहह वारी ४८

क्षितिपाल-केसरीची पद्माकर-तीर-तरु-तलीं रमणी
प्रसवे प्रशस्त समर्थीं, पावक समकायकांति पुत्रमणी ४९

त्या जन्मतांच बालीं, स्पष्ट महीपाल-लक्षणें दिसती
अनिलोत्थितस्फुलिंगीं वसत नसे काय ती दहनशक्ती ५०

भाल विशाल तयाचें, दीर्घ कमलनेत्र इंद्रतुल्य मुख
कम्बूसम कंठ असे अंसद्वय लाजवी वृषप्रमुख ५१

आजानुपाणि पद्मीं रेखामय शंख चक्र मीन तसा
भव्य भुजांतर कटितें केसरि देखोनि जाहला नतसा ५२

तच्चारुचरणयुगलें, रक्तोपल-निवह बनविला दास
शिशुवेषें विष्णु गमे, अवतरला लोकहित करायास ५३

निज नाथ-प्रतिबिंबचि, तनुजानन पंकजा विलोकोनी
सत्यरथ-प्राणसमा शोक तसा हर्ष मानसीं मानी ५४

परिसुनि इंदुमतीच्या पाषाणद्रावका विलापातें
वाटे बालकरूपें दर्शनसुख देत सत्यरथ तीतें ५५

शिशुवदनीं स्तन लावी चुंबी त्यातें सवेंचि कवटाळी
करकमलें नवजननी तत्तनुगंधा-गतभ्रमर टाळी ५६

ऐशी घटिका जातां प्रबल पिपासानलें नलिननयना
दीपार्चि जशी व्याकुळ तैलाभावें तशी सुके रसना ५७

अच्छिन्न नाभिनाला, बाला सुमकोमला सरुदिताला
ठेवी धरण्युत्संगीं क्षितिपतिकान्ता निघे पिण्या सलिला ५८

पद एक पुढें ठेवी, मागें परतुनि बघे पुन्हां शिशुतें
तत्काय पुढें जातें, प्राण शिशुसमिप चालले गमतें ५९

पानीय-पान-लोभें अंजलि जों जाळिं वरानना घाली
तो दंष्ट्रीं दृढ धरुनी, मकरीनें ती जलांतरीं नेली ६०

प्रसव-जलार्द्रकलेवर तृणशय्येवर नृपालवरसुत तो
जननी-जनक-वियोगी, कर्मदशेनें वनीं अहह ! रडतो ६१

सिद्धायतन शिवाचें, सरोवरानिकट निबिडतरुगहनीं
होतें भव्य पुरातन सुंदर गंभीर विदित सकल जनीं ६२

कैलासनाथमंदिर स्फटिकांनीं निर्मिलें असे सर्व
रविसम भासुर परि जें शीतत्वें इंदुचा हरी गर्व ६३

सौंदर्यादिक तद्गुण अद्भुत वर्णावयास या धी न
तच्छिल्पकला मयही झाला देखोनि विस्मयाधीन ६४

चुंबी शिखर जयाचें क्षीरोदधिफेनधवल गगनातें
जणुं शिवपूजनसंभव शिखरमिषें भक्तयश दिवा जातें ६५

त्या दिव्य देवसदनीं मुक्तोपल-घटित लिंग शंभूचें
शोभे मंडल जैसें क्षीरसमुद्रांतरीं निशापतिचें ६६

कोणी भूसुररमणी तरुणी विधवा उमा तिचें नांव
तल्लिंगदर्शनातें आली जें भवनदीजया नाव ६७

परते दर्शन घेउनि तों कोमल बालरुदन-नाद सती
परिसे कुतुहलाकुल होय रुदन संभवस्थला निघती ६८

अलिसम वर्ण कच शिरीं ज्याचे भुजगें महा फणा धरिली
जो गर्भमुक्त केवल बाल असा देखुनी चकित झाली ६९

नालच्छेद न करितां नाकच्युतसुरकुमार सुकुमार
पुत्र वनीं टाकाया कोणाचे वाहिले कठोर कर ७०

" जावें टाकुनि जरि या हिंस्र पशू भक्षितील निःशंक
न्यावें सह अविधित तरि भूषविते वर्ण कोणता तोक " ७१

करुणासागरमग्ना दोलाचल-मानसा द्विजस्त्री ती
हें वदली तों तेथें आला पतिरूप-धारी भूतपती ७२

भूधरवरतनयावर भालविलोचन भुजंग-भूषण तो
मंजुल बोल उमेतें बोले जो भक्तकारणीं रमतो ७३

" कांहीं संशय न धरीं जा संगें घेउनी गृह बाल
स्वसुतासम जतन करीं सत्य तुझें भाग्य उदय पावेल ७४

तत्पूर्वजन्मपुण्यें चिन्तामणि लाभ जाहला तूतें
तत्पर तद्रक्षणिं हो पतिव्रता सेवण्या जशी पतितें " ७५

गिरिजावर गंगाधर गरलग्रीव क्षणें असें कथुनी
झाला गुप्त उठे तों तदर्थ-परिपूर्ण-भारती गगनीं ७६

नंतर महदानंदें कटि घेउनि भूमिपाल-तनयातें
आली उमा गृहातें घडलें जें वृत्त पृच्छकां कथि तें ७७

नामें शुचिव्रत असे वर्षद्वय-पुत्ररत्न तिजलाही
त्यासम राजकुमारा पाळी मनिं भेदभाव मुळिं नाहीं ७८

अग्रज शुचिव्रतासह प्रतिदिवशीं सत्यरथकुलांकुर तो
सितपक्ष-सुधाकरसा वाढे स्वगुणें जनांस तोषवितो ७९

त्या उभय कुमारांच्या परस्परप्रीतितें नसे सीमा
वाटे भिन्न शरीरीं वास करी एकसमयिं एका-त्मा ८०

एकत्र अन्नसेवन क्रीडा एकत्र शयन एकत्र
एकत्र सर्व कर्में एक असे यत्र अन्यही तत्र ८१

बालक्रीडा-क्रमही शान्त सदय भीरुभाव एकाचा
उज्ज्वल उग्र धृति-प्रिय अन्याचा प्रकट करितसे साचा ८२

उपनयन-विधी होतां शांडिल्यें धर्मगुप्त नाम तया
भूपालसुता दिधलें पंचाक्षर मंत्र कथियला उभयां ८३

कवनीं कविचित्त जसें सुमंत्रि-मंडल जसें प्रजा-तन्त्रीं
चंद्रोदयिं सिंधुवलय पुत्रद्वय रमतसे तसें मन्त्रीं ८४

केलीवन मधुमासें शरदागमनें शशांक-बिंब जसें
अत्यद्भुत तनयद्वय तारुण्यें शोभलें मनोज्ञ तसें ८५

कोणे एके दिवशीं यौवन-लक्ष्मी-विशेष-कान्त-तनू
क्रीडा-वांच्छा-लालस गेले ते कानना उभय सूनू ८६

भूमण्डण-भूपण ते विहरुनि वनिं भागले महाभाग
विश्रामार्थ तरुतलीं शोभविती बसुनियां शिलाभाग ८७

विषधर निर्मोक जसा नवकांचन केतकी-दलावलितें
धवल-दुकूल-परिग्रह शोभवि तैसा तदंग लतिकेतें ८८

आनन हरिणाक्षीचें बिंबाधरदल-सुवर्ण-तामरस
तद्गंधा कष्टगमे कचषट्पद लुटितसे मरंदरस ८९

जणु कंबु कंधरेच्या लावण्यादभुत-सरोवरीं सतत
कुचकुंभाश्रय करुनी करित असे विविध केलि रतिकांत ९०

उध्वेतर आरोहें आकर्षुनि ऊर्ध्व काठिन-कुच-युगुलें
सदसत्संशयगोचर मध्य चकोराक्षिचें गमे केलें ९१

ऊरुद्वयरंभाग्रीं पादसरोरुह तिच्या उदय पावे
संपूर्णपणें यातें, न अमानुष-रूप-वर्णना करवे ९२

नृपनंदन होत तदा मन्मथमार्गण शरभ्र-मानस तो
अग्रज अवलोकुनि तें ब्राह्मण-सुत सदुपदेश त्या करितो ९३

" परललना मृगनयना शशिवदना सकल-गुणकला-विलया
वमनाहुनि नीच गणीं, नेई आसक्ति सर्वथा विलया ९४

मुरली जशी मृगकुला दीपशिखा कीं जशी पतंगकुला
नारी तशी नरमना आकर्षी विलय-वय करायाला " ९५

भूपालसुत मग वदे " निःसंशय मात्प्रियाच हे बाला
मत्पाप-भीरु-मानस अभिलाषी अन्यथा कसें तिजला " ९६

( श्लोक )

एवं भाषि नृपाल-पुत्र सुगुणी माराभिराम त्वरें
नेला रक्त कपोल त्या तरुणिच्या क्रीडास्थलातें स्मरे
गेला अन्य गृहा कथी जननितें जें जाहलें तें वनीं
केव्हां येईल धर्मगुप्त निपजे चिंता तयांच्या मनीं ९७

भूपाल-बाल-वदना मृगलोचना ती
देखोनि होत सुदति चल चित्तवृत्ती
कम्पासहीत मग रोम उठे तदंगीं
जें जाहलें तदनुवर्म—विशेषसंगीं ९८

( आर्या )

येतां शशांक उदया जलनिधिचें जल जसें उचंबळतें
तन्मन त्या समयिं तसें, आलिंगी हर्षमूढ ती क्षितितें ९९

( श्लोक )

मोहांतीं पिकवचना वदे सखीतें
आणाया सकल चला वनीं फुलातें
त्या जातां शयन करोनि पल्लवांचें
वाही त्या मनुजमणीस नम्र वाचे १००

( नंतर ती बोलली )

गंधर्वराज धनवान् सुगुणी सुजाण
ज्यातें समस्त वदती जन कोद्रवीण

त्याची सुता नरवरा त्वदधीन-चित्ता
अंशूमती विनविते तुजला समर्था १०१

तुझ्या लोक-श्रेष्ठा नयन-सुखदा पादकमलीं
अनन्या हे कन्या अलिसम, सख्या दास बनली
नदी मोठी छोटी जलनिधि जशी मान्य करितो
तशी ही मानावी इतर न मनीं हेतु वसतो " १०२

" अग बाले " बोले नृपसुत तदा मंजु--वचनें
पिता ना माता ना मज, धन नसे लोकनयने
हिरा मानोनीया ललित-वदने काचशकला
न कोणी वाखाणी तुजविण जनीं वाटत मला १०३

मग वदत वरांगी भूमिपालात्मजातें
" नच वसत मराळी वर्जुनी मानसातें "
सपदि वदुनि ऐसें माळ मुक्ताफळांची
नर-पति-सुत-कंठीं घातली शीघ्र साची १०४

( आर्या )

" तृतिय दिनीं या समयीं, यावें येथें स्वबंधुसमवेत
मीही येतें " ऐसें विनयनता कथुनियां वनीं जात १०५

( श्लोक )

येवोनी सदना शशांकवदना जे जाहलें काननीं
सांगे तें जनकाप्रती बहुत तो संतोष मानी मनीं
" शंभूनें कथिलें भविष्य मजला त्या लक्षणीं अन्वित
वत्से वल्लभ योग्य तूं वरियला " तीतें असें बोलत १०६

सांगे गृहीं येउनि धर्मगुप्त
जें जें असे तें घडलें वनांत
बंधूस, माते बहु हर्ष होत
तो वर्णण्यातें कवि ही न शक्त १०७

झाला तृतीय दिवशीं विधिपूर्व त्यांचा
थाटें विवाह विपिनींतरिं त्याच साचा
लक्षानुलक्ष-हय-वारण-दास-दासी
अर्पी श्वशूर हारिखाकुल तो तयासी १०८

वंशादीनां स्वजायाजनकवदनतः सर्व वृतांत जातम्
ज्ञात्वो द्विप्रश्नरुष्टः स्वशिशु-विरसनं वीक्ष्य वा व्याघ्र उग्र
गंधर्वाणां विशालाममित-भुजबलां साकमादायसेना
समृद्धां धर्मगुप्तो निजगुरु-वसतिं राजधानीं रुरोध १०९

शाल्वाधीशं तुमुल-समरे भीम-शस्त्रास्त्र-नादे
शत्रुं शीघ्र शमन-सदनं यापयित्वा सलीलम्
सेनायुक्तो मुदित-मनुजां राजधानीं प्रविश्य
भद्रं भेजे जगदधिपते रासनं धर्मगुप्तः ११०

भ्रात्रा निजेन ऽह मन्त्रि-पदं गतेन
बव्हीः समानरपतिः परिपाल्य धात्रीम्
धर्मार्थ काम-रमणीं जननी-समेतः
शैवं पदस्मविशति प्रवयाः प्रहृष्टः १११

( अपूर्ण )

# स्फुट कविता

# १ श्रीगणेशाष्टकम्

श्री धाम्नि धाम्नि परिकीर्तित एव यस्य
वाग्देवता सपदि संन्निहिता प्रबुध्य
आस्यांबुजे कविकुलस्य करोति लास्यम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि १

अज्ञान-कानन-हुताशन-मण्डलाभं
भासां जपाकुसुमगर्वमुषां वितानम्
देहे सदा स्फुरति यस्य शुभस्य गेहे
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि २

यद्गंड-मंगल-गलद्मासिक्तमूलः
स्थूलः समीहित तरुः फलदः प्रकामम्
पारं मुदां नयति भक्त जनानपारम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ३

यद्गंड-पिण्ड मद-पान-मदाकुलानां
आमंजु गुंजितरवं मधुलिट्कुलानाम्
श्रुत्वेव धावति सुदूरमपाय भीति-
स्तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ४

छित्वापियस्य किल कोमलकंठनालं
नालं बभूव जननी जठरे स्थितस्य
दैत्याग्रणीर्निजविपत्तरुखंडनाय
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ५

देवस्य यस्य गुरुहासविकोपितस्य
शापं निशापतिरयं कृतचित्ततापम्
अद्यापि लांछनमिषेण मुखे दधाति
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ६

दुर्वाप्रियस्य खलु मोदकरंजनस्य
यस्याद्भुतं जगति मोदकरं जनस्य
लीलामृतं भवति संतत मंगलाय
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ७

चिंतामणिं स्वपदचिंतनचिंतितानाम्
राकामणिं निखिलविघ्नतमस्ततीनाम्
चूडामणिं सकल मंगल दैवतानम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ८

---

## २ श्रीगणेशाष्टकम्

निद्राजुषां हृदयतालितले कवीनाम्
वाचां सुधारसमुचां ददती प्रबोधम्
यस्यस्मृतिश्चरति चारणचारुचर्याम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि १

यत्पूजया विहितया प्रथमं सभावम्
सर्वस्य कार्यविहितस्य चिकीर्षितस्य

सिद्धि·शुभाच सुलभाच सदा विभाति
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि २

पादाम्बुजस्मरणमूल्यसमर्पणेन
क्रीतः पराशरसुतेन सुलेखकोयः
ग्रन्थं लिलेख सकलं किल भारताख्यम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ३

दतांकुरः सिततरः स्फुरदुग्रसारः
बालेन्दूनातिशुचिना तुलनामुपेतः
यस्यानिशं नयति विघ्नतमो विनाशम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ४

जातं येताऽखिलचराचरभूतजातम्
नित्यं स्थितं भवति येन तदेव सत्यम्
यस्मिन्पुनर्विलयमेति विनाशकाले
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ५

लोलां तयां मदकलां किल भृंगलामा
हर्षेनयत्कट तटस्त्रवदंबुवर्षम्
गेहं शुभस्य परिषिंचति यस्य देहम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ६

विघ्नस्य विघ्नमाहितं स्वजनाहितानां
दासस्यदासशुभं ह्यशुभावलीनाम्
यं भावयन्ति भुवने भयदं भयानाम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ७

विद्वन्मणेस्ति तिलकवंशविभूषणस्य-
यत्नेन भाद्रपदमासि जनार्थमूलाः
यन्मूर्तयो दिशीदिशी प्रतिभान्ति रम्याः
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ८

---

## ३ श्रीगणेशाष्टकम्

श्री धाम्नि नाम्नि परिकीर्तित एव यस्य
श्री शारदा दिविपदामपि वन्द्यपादा
पादारविन्दमुपयाति सदा हियस्य
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि १

विघ्नावली विजय वर्णन वैजयन्ती
सिन्दूरदीप्तिरुषसो विभवं जयान्ति
अंगे सदा स्फुरति यस्य शुभस्य रंगे
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि २

दारिद्र दुःख दुरितादिक दावदाहम्
नृत्योत्सवे गमयितुं प्रशमं नु यस्य
शुण्डाग्रतो गलति सीकरसान्द्रवृष्टि
स्तं श्रीगजानमहं शिरसा नतोऽस्मि ३

पादारविन्दनत-भक्तमिलिन्द-वृन्दे
सिद्धिप्रदान-निरतः खलु यस्य हस्तः

दानाम्बुना वहति संततमार्द्रभावम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ४

यस्यांघ्रिपद्मयुगलं विमलं विचिंत्य
वन्द्या जगत्सु मुनयः किल नारदाद्याः
चक्रुः स्वहस्तवशगं शुभशांति योगम्
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ५

यः कर्णतालपवनेन महारयेण
मन्ये तुषोपमवलान्निजभक्तविघ्नान्
उत्सारयत्यविरतं जगदेकनाथ-
स्तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ६

यो दृप्तदैत्य दलनाथ दयासमुद्रो
मुद्रां निजामज इति प्रतिमुच्य दिव्यां
भूमण्डलं स्वजनिमण्डितमातनोति
तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ७

विद्वन्मणेतिलकवंश विभूषणस्य
यत्नेन भाद्रपदमासि जनार्थमूलाः
यन्मूर्तयो दिशिदिशि प्रतिभांतिरम्या
स्तं श्रीगजाननमहं शिरसा नतोऽस्मि ८

———

## ४ श्रीगणेशाष्टकम्

विघ्नांधकारं दलितु दिनेशो
विघ्नांबुधिं पातुमगस्त्यरूपः
दग्धुं च यो विघ्नवनं दवाग्नि-
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि १

भक्तावली-विघ्नसमुच्चयाय
दत्वापि रात्रिंदिवमर्धचंद्रं
तमेव शीर्षे कुरुते सदा य-
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि २

हारं निधित्सुर्ननु सिद्धिकंठे
मुक्ताफलानां पटलं विशालं
यः शीकरासारमिषात्तनोति
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ३

युगे युगे वाहनवेषभेदम
रूपांतरं नूतननामधेयं
गुणं कृतिं चापि पृथग्दधौ य-
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ४

कृते भुजानां दशकं दधानः
पंचाननं वाहनमाददानः
विनायकाख्यां वरदो दधे य-
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ५

गतो मयूरेश इति प्रसिद्धिं
त्रेतायुगे षड्भुजशुभ्रकांतिः
कुशाधिरूढः किल यो विरेजे
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ६

युगे तृतीये श्रुतिबाहुशाली
शोणप्रभो मूषकवाहनो यः
गजाननाख्यां प्रथितां बभार
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ७

कलौ द्विबाहुर्हयपृष्ठगामी
धूम्रच्छविः शत्रुबलस्य हन्ता
प्राप्नोति धूम्रध्वज इत्यभिख्यां
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ८

---

## ५ श्रीगणेशाष्टकम्.

सुधारसं नीरसतां नयन्तः
काव्यप्रबंधाः कविपुंगवानां
प्रसादतो यस्य परिस्फुरन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि १

भाद्रे सिते यः कुरुते चतुर्थ्यां
हर्षप्रकर्षेण सह प्रवेशं

गृहे गृहे मृण्मयमूर्तिरूप–
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि २

सर्वेषु कार्येषु चिकीर्षितेषु
यत्पादपद्मस्मरणप्रसक्तं
वश्येव सिद्धिः समुपैति दासं
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ३

अवर्णनीयेति पदेन नित्यं
पंचाक्षरेण श्रुतयोऽपि यस्य
सत्यस्वरूपं किल वर्णयन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ४

उत्पादितो यद्यपि यः शिवायां
पंचाननेनाशिवसंगभाजा
जातो गजास्यो वसतिः शुभानां
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ५

निरीक्षते यो गणवृत्तरीतिं
सदर्थसिद्धिं प्रकटीकरोति
धत्ते प्रसादं च कवीन्द्रतुल्य–
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ६

तनौ नरत्वं वदने गजत्वं
कुक्षौ गुरुत्वं नयने लघुत्वं
दधाति सर्वत्र च यः शुभत्वं
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ७

गणेश हेरम्ब गजाननेति
नामावलिं यस्य पठन् मनुष्यः
भुक्तिं च मुक्तिं च सदैव भुंक्ते
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ८

---

## ६ श्रीगणेशाष्टकम्.

पक्षे सिते भाद्रपदे चतुर्थ्यां गृहे गृहे मंगलमूर्तिरूपः
यः सन्निधत्ते सहितः प्रमोदैस्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि १

सर्वेषु कार्येषु समीहितेषु यस्याग्रपूजा विधिना प्रयुक्ता
सुखेन सिद्धिं करगां करोति तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि २

ऋद्ध्याच बुद्ध्या च सदा समेतं निवार्य विघ्नान्‌ शरणागतानां
यः कल्पते संततमंगलाय तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ३

गणेश हेरम्ब गजाननेति पठन्समाकांक्षितलिप्सया यः
कृपाकटाक्षात्कुरुते कृतार्थं तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ४

स्वात्यंबुसारं किल यत्प्रसादं पीत्वा सगर्भा प्रतिभासुशुक्तिः
सत्काव्यमुक्तापटलं प्रसूते तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ५

स्वभक्तशीर्षोपरि दीप्यमानं त्रिताप-पीडा-परिहारपात्रं
धत्ते कृपाछत्रमहर्निशं यस्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ६

गृहे गृहे मृण्मयमूर्तिरूप–
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि २

सर्वेषु कार्येषु चिकीर्षितेषु
यत्पादपद्मस्मरणप्रसक्तं
वश्येव सिद्धिः समुपैति दासं
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ३

अवर्णनीयेति पदेन नित्यं
पंचाक्षरेण श्रुतयोऽपि यस्य
सत्यस्वरूपं किल वर्णयन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ४

उत्पादितो यद्यपि यः शिवायां
पंचाननेनाशिवसंगभाजा
जातो गजास्यो वसतिः शुभानां
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ५

निरीक्षते यो गणवृत्तरीतिं
सदर्थसिद्धिं प्रकटीकरोति
धत्ते प्रसादं च कवीन्द्रतुल्य–
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ६

तनौ नरत्वं वदने गजत्वं
कुक्षौ गुरुत्वं नयने लघुत्वं
दधाति सर्वत्र च यः शुभत्वं
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ७

गणेश हेरम्ब गजाननेति
नामावलिं यस्य पठन् मनुष्यः
भुक्तिं च मुक्तिं च सदैव भुंक्ते
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि

---

## ६ श्रीगणेशाष्टकम्.

पक्षे सिते भाद्रपदे चतुर्थ्यां गृहे गृहे मंगलमूर्तिरूपः
यः सन्निधत्ते सहितः प्रमोदैस्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि १

सर्वेषु कार्येषु समीहितेषु यस्माग्रपूजा विधिना प्रयुक्ता
सुखेन सिद्धिं करगां करोति तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि २

ऋद्ध्याच बुद्ध्या च सदा समेतं निवार्य विघ्नान्शरणागतानां
यः कल्पते संततमंगलाय तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ३

गणेश हेरम्ब गजाननेति पठन्समाकांक्षितलिप्सया यः
कृपाकटाक्षात्कुरुते कृतार्थं तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ४

स्वात्यंबुसारं किल यत्प्रसादं पीत्वा सगर्भा प्रतिभासुशुक्तिः
सत्काव्यमुक्तापटलं प्रसूते तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ५

स्वभक्तशीर्षोपरि दीप्यमानं त्रिताप-पीडा-परिहारपात्रं
धत्ते कृपाछत्रमहर्निशं यस्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ६

माता शिवा यस्य गिरीन्द्रजाता पंचाननो यस्य पिता तथापि
यो मंगलानां वसतिर्गजास्यस्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ७

विनायकोऽपि प्रियसर्पबंधुर्भवस्य पुत्रोऽपि भवस्य हन्ता
यो ह्रस्वनेत्रोऽपि च विश्वसाक्षी तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ८

---

## ७ श्रीगणेशाष्टकम्

भक्ताय यो विघ्नविनाशपूर्वम्
आकांक्षितार्थादधिकं प्रदास्यन्
मन्ये करं पंचममातनोति
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि १

दूर्वांकुरैर्भक्तिरसेन सिक्तै–
र्गात्रार्पितैर्हर्षभरं सृजद्भिः
रोमांचलीलामिव यो बिभर्ति
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि २

दानार्द्रगण्डस्थितभृंगमालां
विघ्नावलीबंधनशृंखलाभां
विघ्नाधिराजः किल यो बिभर्ति
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ३

सिद्धिप्रदानैकपरत्वकीर्ति–
र्यस्य ध्रुवेति प्रथयन प्रतीतिम्
दानार्द्रतां नैव जहाति हस्त–
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ४

संध्यासु नृत्योत्सवमादधानो
यः सीकरासारमिषादिवान्यां
तारावलीं कल्पयति स्फुरन्तामि्
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ५

शंभुः स्वयंभूः कमलापतिश्च
यं विघ्नराजं शरणं प्रपद्य
निर्विघ्नसिद्धिं वशगामकुर्व
स्तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ६

स्वानंदलोकाधिपते प्रसीद
मां रक्ष रक्षेति गिरं वदन्तम्
भक्तप्रियो रक्षति यः सदैव
तं श्रीगणेशं शिरसा नतोऽस्मि ७

जयुत जयुत देवो विघ्नविध्वंसदक्षो
जयतु जयतु देवः कामनाकल्पवृक्षः
जयतु जयतु देवो मंगलानां निवासो
जयतु जयतु देवो शुद्धबुद्धिप्रकाशः ८

# ८ श्रीगणेशाष्टकम्

रसं प्रसादं च समादधन्ति
मुखात्कवीनां प्रतिभावचांसि
यस्य प्रसादात्किल निःसरन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि १

यस्यांघ्रिपद्मद्वयमद्वितीयम्
संचिन्त्य धन्या चतुरास्यकन्या
श्रीशारदा शास्त्रविशारदाऽभूत्
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

गणेश–हेरम्ब–गजाननेति
नामामृतं यस्य निपीयमानम्
संजीवयत्यन्तकपाशबद्धं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

यस्याद्भुतं मोदकरंजनस्य
लीलामृतं मोदकर जनस्य
दत्ते रुचिं संसृतितापभाजाम्
त श्रीगणेशं शिरसा नमामि ४

निरंतरानंदभरप्रदानात्
स्वानंद लोकाधिपतित्वलाभम्
शुभाकरो यः कुरुते यथार्थम्
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

[stamp]

य एकदन्तो द्विशिरोऽरुणाभः
त्रितापहारी चतुरास्यपूज्यः
पंचास्यजः षण्मुखसोदरश्च
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

विपत्समुद्रे कृतमज्जनानाम्
कालक्रमक्षीणसुहृज्जनानाम्
य एक एवास्ति गतिर्जनानाम्
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

" मद्भक्तिभाजां न भवन्ति विघ्नाः "
इति प्रतिज्ञाक्षरमालिकेव
भृंगावलिर्यस्य कटे विभाति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ८

———

## ९ श्रीगणेशाष्टकम्

बालं त्रिलोकीतिलकं प्रशस्य-
मुत्पाद्य यं पुत्रवतां धुरीणः
गंगाधरो धन्यतमश्च जात—
स्तं श्रीगणेशं शिरसा नमामि १

दद्यां चतुर्भिश्चतुरः पुमर्थान्
विघ्नान् विहन्यां खलु पंचमेन

इतीव यः पंचकरान् बिभर्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

ये ये कवीनां सुखवाग्विलासा
हरन्ति नित्यं रसिकांतराणी
ते ते फलं यस्य कृपाकणस्य
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

स्वभक्तविघ्नः कति शून्यभावं
नीता विधातुं गणनां नु तेषाम्
यो भृंगमालां कटगां दधाति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ४

रक्ताम्बरं रक्तसुमावकीर्णं
रक्तच्छविं यं गणयन्ति लोकाः
विघ्नाम्बुधौ दीपनिकेतनाभं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

यो गण्डपिण्डच्युतदानदंभात्
वृष्टिं विधत्ते करुणारसस्य
पादानते भक्तजनस्य मौलौ
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

गणेषु दृष्टिं तनुते सुवृत्त-
बन्धे रुचिं धारयतीति वेदाः
" कविं कवीना " मिति यं स्तुवन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

पक्षे सिते भाद्रपदे चतुर्थ्याम्
प्रवर्तते यस्य कृते जनानाम्
महोत्सवानंदरसे विलास-
स्तं श्रीगणेशं शिरसा नमामि ८

---

## १० श्रीगणेशाष्टकम्

वेदांतगूढामृतमुत्सृजन्तं
यं वत्समानंदनिधिं जनानाम्
श्रीशंकरश्चुम्बति हर्षमूढः
तं श्रीगणेशं शिरसा नमामि १

यस्य स्मृतिं नावमिवाधिरुह्य
वाताम्बरं भावमयं प्रसार्य
विघ्नार्णवं भक्तजनास्तरन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

सिद्धिर्ध्रुवा भक्तमनोरथाना-
मिति प्रतिज्ञामिव घोषयन्ति
भृंगावलिर्गुञ्जति यस्य गण्डे
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

विघ्नांस्तृणीकृत्य वहामि मूर्ध्ना
भक्तावलीनामिति सूचयन्नु

दुर्वांकुरान् यः शिरसा दधाति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ४

यो रक्तवस्त्रो धृतरक्तपुष्पो
रक्तांगरागः किल रक्तवर्णः
भक्तस्य रक्तोऽहमिति व्यनक्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

विघ्नेश हेरम्ब गजाननेति
नामामृतं यस्य मुखादुदेति
तं संकटाद्रक्षति यः सदैव
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

देवाधिदेवा अपि वेदमान्यां
यस्याग्रपूजां विधिवद्विधाय
इष्टार्थसिद्धिं सुलभामवापु-
स्तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

विघ्नांधकारे प्रविलुप्तमर्थम्
दासाय संदर्शयितुं नु धत्ते
यो देहदीप्तिं तरुणार्कतुल्यां
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ८

---

## २१ श्रीगणेशाष्टकम्

इष्टार्थसिद्धिं प्रतनोति यस्य
नामावलिर्भावगुणेन बद्धा
कण्ठस्थचिन्तामणिमालिकेव
तं श्रीगणेशं शिरसा नमामि १

विघ्नैर्निरुद्धं सकलार्थसिद्धेः
द्वारं प्रवेशे पिहितं जनानाम्
यस्याग्रपूजाविवृतं विधत्ते
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

बालं त्रिलोकीतिलकं प्रशस्यं
गणेशगीतामृतमद्रिरन्तम्
गंगाधरश्चुम्बति यं सदारः
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

यस्याङ्घ्रिपद्मं भजतां जनानां
कुर्वन्ति चित्ते पदमप्रयासम्
विद्या अशेषाः सकलाः कलाश्च
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ४

भक्ता मदीया नरकुंजराः स्यु-
रिति प्रसिद्धिं भुवि यश्चिकापुः
धत्ते निजांगे नरकुंजरत्वम्
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

शुण्डां शुभां कुण्डलिताग्रभागां
ॐकारमूर्तिं नु मुखे दधानः
यो मंगलानां सदनं विभाति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

मत्वा तृणाय स्वजनस्य विघ्नान्
मूर्ध्ना वहामीति निवेदयिष्यन्
दूर्वातृणं यः शिरसा बिभर्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

दासस्य दासो भवितुं सदाऽहं
सिद्धोऽस्मि शंकां त्यजतेति हेतोः
दूर्वातृणं यः शिरसा दधाति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ८

---

## १२ श्रीगणेशाष्टकम्

गंगाधरस्यात्मजतामुपेत्य
यो बाल एव स्पृहणीयवीर्यः
लोकत्रये स्थापयाति स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि १

देवेषु दैत्येषु नरेषु चैव
निर्विघ्नकारित्वगुणैर्विशिष्टम्

विद्योतते यस्य सदा स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

सर्वेषु कार्येषु चिकीर्षितेषु
यस्याग्रपुजाख्यमिदं स्वराज्यम्
भूतं भवद्भावि च सिद्धमेव
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

समर्प्य हस्तं खलु सिद्धकण्ठे
स्मेरानना संततमंगलश्रीः
यस्य स्वराज्ये विदधाति नृत्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ४

धर्मः सुनीतिः सुखमद्वितीयं
विद्याः कलाः सद्गुणसंपदश्च
यस्य स्वराज्ये विलसन्ति नित्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

हास्यं मुखाब्जे हृदि हर्षलास्यं
ऋद्धिं पदे पाणितले च सिद्धिं
दधाति यो भक्तिजुषां स्वराज्ये
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

“ स्वराज्यमित्येव निसर्गसिद्धो
धर्मोऽस्ति तं रक्षत सर्वयत्नैः ”
एवं जनान् प्रेरयते सदा य-
स्तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

— — —

## १३ श्रीगणेशाष्टकम्

गंगाधरस्यात्मजमर्चनीयं
यं चिन्तयित्वा हि गणा जनानाम्
स्वराज्यलाभाभिमुखा भवन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि १

दग्धोऽपि विन्ध्याख्यदवानलेन
स्वराज्यवृक्षस्तनुते विकासम्
यस्य प्रसादामृतवर्षणेन
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

नानावतारं विविधस्वरूपं
विचित्रलीलाचरितक्रम यः
स्वानंदलोके कुरुते स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

वंशः प्रसिद्धः पटवर्धनाख्यो
यस्य प्रसादाद् दृढबद्धमूलः
भुङ्क्ते समृद्धं सुचिरं स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ४

राज्ञे वरेण्याय मुमुक्षवे यो
व्याख्याय गीतां भवसिंधुनावम्
ददौ स्वराज्यं खलु मुक्तिरूपं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

निधाय कंठे गजराजमुक्तां
मालां मनोज्ञां ग्राथितां सरोजैः
राज्यं ददौ यः कमलासुताय
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

दक्षः स्वराज्यच्युतिकष्टसिंधौ
मग्नो यमाराध्य महाप्रतापम्
संपादयामास पुनःस्वराज्यम्
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

भ्रष्टः स्वराज्यात् किल वासवोऽपि
यं संप्रसाद्य प्रार्थितैरुपायैः
स्वराज्यलक्ष्मीं पुनरालिलिंग
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ८

---

## १४ श्रीगणेशाष्टकम्

स्वयंप्रकाशं तमसां विदूरं
स्वानंदलोकेषु कृतप्रातिष्ठम्
विराजते यस्य सदा स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि

यो जातु सर्वात्मकतामुपेतः
पतिर्गणानामिति सुप्रसिद्धः

सर्वत्र संस्थापयति स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

स्वराज्यसौराज्यपरे प्रयत्ने
सर्वांगसिद्धिं भगवन् प्रयच्छ
इत्यार्य लोकाः खलु यं वृणान्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

आद्ये युगे सिंहगतोऽष्टबाहुः
परात्परः सिद्धिविनायको यः
चक्रे स्वराज्यं किल मर्त्यलोके
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ४

युगे द्वितीये शिखिवाहनत्वं
सिद्धिप्रदत्वं भुजषट्कतां च
तेने तनौ यो भुवि च स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

युगे तृतीये गजतुंडधारी
रक्तांगवर्णो युगबाहुशाली
यो मृत्युलोके बुभुजे स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

युगे तुरीये द्विभुजःसितांगो
विशेषमाहात्म्य बलोपपन्नः
ददाति कालोनियलं स्वराज्यं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

यस्याद्भुत शाश्वतिकं स्वराज्यं
स्वानंद लोके विततंहि भोक्तुम्
जगाम राधारमणस्य राधा
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ८

## १५ श्रीगणेशाष्टकम्

गणेश हेरम्ब गजाननेति
नामावलिर्यस्य, मुखे प्रयुक्ता
कविंच काव्यंच सदा पुनीते
तं श्रीगणेशं शिरसा नमामि १

सिद्धिप्रियं विघ्न विनाशदक्षम्
यं दुःख दारिद्र्य हरं च देवम्
सर्वार्थ कल्पद्रुममत्र मनन्ति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि २

यस्याग्र पूजा विधिवद् प्रयुक्ता
सिद्धिं निमग्नामपि विघ्नसिंधौ
आकृष्य दासस्य करे करोति
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ३

निर्विघ्नकारीति यशो यदीयं
निर्दोषमंगीकुरुते विचित्रम्

अव्याप्ति दोषं खलु विघ्नवृंदे
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ४

दासस्य दासोऽहमिति प्रतिज्ञां
यो भृंगवर्णैर्लिखितां कपोले
धत्ते त्रिलोकी सुखदर्शनार्थं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ५

स्वभक्तिभाजां पथिसंगताय
दातुं नु तं विघ्नगणायशीघ्रम्
भालेऽर्धं चंद्रं कुरुते सदाय—
स्तं श्रीगणेशं शिरसा नमामि ६

विन्घाय विन्घं मरणाय मृत्युं
दुःखाय दुःखं च भयाय भीतीम्
दातुं सदा जाग्रदवस्थितोय—
स्तं श्रीगणेशं शिरसा नमामि ७

भाद्रे सिते पुण्यतिथौ चतुर्थ्याम्
आनंद उत्साह इव स्वरूपी
गृहे गृहे यः कुरुते प्रवेशं
तं श्रीगणेशं शिरसा नमामि ८

## १६ श्रीगजानन

( चर्पटपंजरीच्या चालीवर )

भज हेरम्बम् जगदालम्बम्
सफलीकृतनतकामकदम्बम् ॥ भज० ॥

मस्तकमण्डलगतशशिखण्डम्
हिण्डन्मधुकरमण्डितगण्डम्
शुण्डादण्डविभूषिततुण्डम्
शूर्पविडम्बिश्रुतियुगचण्डम् ॥ भज० ॥

पाशांकुशवरपरशुमोदकान्
हस्तचतुष्टयतलविन्यस्तान्
पृथुवक्षःस्थलचंचलहारम्
धारयन्तमथतारमुदारम् ॥ भज० ॥

अन्तर्वर्तितविश्वविहारम्
जठरमुदारं तुंदिलसारम्
सर्वं चोरु द्वयमतिक्रान्तम्
दधतं चेतोहारि नितान्तम् ॥ भज० ॥

सिन्दूरावृतसकलशरीरम्
नवदिनमणिमदमोचनधीरम्
पीतपटांकितकटितटभासम्
नूपुरनादितपादन्यासम् ॥ भज० ॥

फणिवरबन्धनबंधुरकायम
संततविघ्नितविघ्ननिकायम
दूरीकृतनत-दुरितापायम्
दीनजनानां नित्यसहायम ॥ भज० ॥

वृन्दारकरिपुवृन्दामित्रम्
त्रिभुवनविस्मयकारिचरित्रम्
शिवगिरिजामुखपंकजमित्रम्
मूषकपत्रं परमपवित्रम् ॥ भज० ॥

ऋद्धिनिवासं सिद्धिविलासम्
बुद्धिविकासं विघ्ननिरासम्
उज्वलभासं मंजुलहासम्
सुंदरलासं पदनतदासम ॥ भज० ॥

तापसमण्डलमानसहंसम्
गण्डगलितमद-जल-लसदंसम्
मंगलदैवतवृन्दवतंसम्
निरुपम-महसं दलितनृशंसम् ॥ भज० ॥

मृगमदनिर्मितसुंदरतिलकम्
शुभदूर्वांकुरदर्शितपुलकम्
मन्दारद्रुमकुसुमसमुत्कम्
हिमनगसुतया चुंबितचिबुकम् ॥ भज० ॥

शरण शरणागतभक्तानाम्
मरणं दुर्विधिपथसक्तानाम्

तरणं संसृतिसिंधुजलानाम्
वरणं सद्गुणभूतिबलानाम् ॥ भज० ॥

गुणगणभूषणहेमकरण्डम्
संपद्गंगाजलशुभकुण्डम्
विपद्वनीरुहगजपतितुण्डम्
विदलितसिंदुरदानवमुण्डम् ॥ भज० ॥

आर्तजनानां सुखकरबंधुम्
संतप्तानां करुणासिंधुम्
तिमिरवृतानां शुभशरदिंदुम्
मृत्युवशानां जीवनकंदुम् ॥ भज० ॥

यस्य स्मरणं पातकहरणम्
भवति न यावद्रसनाभरणम्
दैन्यं तावद्गच्छतिदूरम्
लसति च हृदयं धृतधृतिपूरम् ॥ भज० ॥

भोगामृतसुखशांतिनिधानम्
स्फुरती न यावद् हृदये ध्यानम्
ताव न्निर्भितदुःखव्यालम्
त्रुटितं सहसा मायाजालम् ॥ भज० ॥

यदि गणनाथे रमते चित्तम्
विफला विषया विकलं वित्तम्
विरसा विद्या विषमा रामा
विलयं गच्छन्त्यन्ये कामाः ॥ भज० ॥

गजमुखनामामृतसुखसदनम्
सफलं विमलं खलु तद् वदनम्
वंदितगिरिजासुतपदयुगलम्
धन्यं मान्यं तत्करकमलम् ॥ भज० ॥

कृत्वा शीर्षे श्रितभवदंकम्
हे भगवन् यः स्वपिति विशंकम्
तस्य कथं स्यात्सं सृतिबाधा
विलसत्युत शिवतातिरगाधा ॥ भज० ॥

अतिवृष्ट्यादिकभीतिकदम्बम्
विलयं गमये ज्जगदालम्बम्
भारतराष्ट्रं यदि लम्बोदर
नत्वं रक्षसितत् करुणाकर ॥ भज० ॥

दहाति दवाग्निः क्षितिपतिमंत्रः
भारतवर्षे भीषणतंत्रः
भगवन् करुणाघन तं वारय
भुक्तिं मुक्तिं त्वं तत्प्रापय ॥ भज० ॥

भरतधरामुखतिलकविशेषम्
कष्टं ! कारालब्धनिवेशम्
अयि विघ्नेश्वर भवतो दृष्टिः
पातु कृपामृतसंततवृष्टिः ॥ भज० ॥

भक्तप्रणयिन् भवभयहरणम्
भो गजमुख तव नामस्मरणम्

नैव त्यजतात् त्वदेकशरणम्
मरणास्थितमपि ' राधारमणम् ' ॥ भज० ॥

---

## १७ श्रीगजाननस्तवनम्

( चर्पटपंजरीच्या चालीवर )

भजहेरम्बं जगदालम्बम्
सफलीकृतनतकामकदम्बम् ॥ भज० ॥

जप जप रसने रसनाभरणम्
नाम गणपतेर्भवभयहरणम्
कुरुषे कस्मात्संसृतिजालम्
वर्णान्तरगुणयोग विशालम् ॥ १ ॥

शृणु हे श्रुतियुग शिवसुतचरितम्
संततनाशितदुस्तरदुरितम्
तदितरविषयश्रवणेनालम्
वांच्छसि जेतुं यदि कलिकालम् ॥ २ ॥

भुक्तिमुक्तिसुखमंगलसदनम्
पश्य नयनयुग गणपतिवदनम्
मा कुरु विषयान्तरे विहारम्
वांच्छसि गन्तुं यदि भवपारम् ॥ ३ ॥

हृदयसदयतानित्यनिवासम्
चिंतय नूतनदिनमणिभासम्
तेन प्रापय शाश्वत शांतिम्
जन्मस्थितिलयचक्रभ्रांतिम् ॥ ४ ॥

गिरिजानंदनवंदनकृत्यम्
कुरु हस्तद्वय भव कृतकृत्यम्
यद्यत्तदितरकार्यं सकलम्
तत्तद् भावय विरसं विफलम् ॥ ५ ॥

हृच्छुद्धिप्रदभावसमेतम्
गच्छ पदद्वय गणपाननकेतम्
पुनरपि संसृतिपथावतरणम्
नेच्छसि चेत्व क्लेशावितरणम् ॥ ६ ॥

श्रीमन्मंगलमूर्तेः स्मरणम्
दुस्तरविघ्नार्णवसंतरणम्
दुष्करकार्यारंभविरचितम्
गमयाति सिद्धिं कार्यमघाटितम् ॥ ७ ॥

मधुमुरमथनो बलिदमनार्थी
स्मरदहनोऽपि त्रिपुरजयार्थी
नत्वा प्रययौ किल गणनाथम्
सकलसमीहितसिद्धिसनाथम् ॥ ८ ॥

मुनिजनमानस मण्डन हंसम्
मंगलदैवतवृंदवतंसम्

स्मृत्वा सुचिरं विद्याविधाता
सृष्टिकुशलतामपि विधाता ॥ ९ ॥

भुवनत्रयनुतपुण्यचरित्रम्
सिद्धिकमलिनीजागृतिमित्रम्
नुत्वा सनकादिकमुनिवृंदम्
लेभे सिद्धिजमोदममंदम् ॥ १० ॥

शुकतातेन स्तुतः सभावम्
गमितो गणपो लेखकभावम्
आलिखद् भाष्यमगणितखेदम्
जगति यदाहुः पंचमवेदम् ॥ ११ ॥

---

## १८ भज हेरम्बम् ।

[ चर्पटपंजरीच्या चालीवर ]

भज हेरम्बं जगदालम्बं
क्षणमपि मा कुरु मनुज विलम्बम् ॥ भज० ॥

जप जप रसने रसनाभरणम्
नाम गणपतेर्भवभयहरणम्
तुण्डं नामस्मरणविमुक्तम्
कुंण्ड सद्भिर्नारकमुक्तम् ॥ भज ॥

पिब पिब दृष्टे दृष्टिविहारम्
मंगलमूर्तिं देवमुदारम्
देवे सक्ता यस्य न दृष्टिः
तं जनुषांधं प्रति का सृष्टिः ॥ भज० ॥

शृणु हे श्रवण श्रवणानंदम्
गजमुखचरितं सुखरसकंदम्
देवकथासु न यदि तव तोषः
वद बाधिरत्वे स्यात्को दोषः ॥ भज० ॥

पुजय हस्तद्वय गणराजम्
पाति सदा यो वंदन भाजम्
कृत्वा पूजन वंदन कृत्यम्
त्वं भवमार्गे भव कृतकृत्यम् ॥ भज० ॥

गच्छं पदद्वय गणपानिकेतम्
चिच्छुद्धिप्रदशक्ति समेतम्
संसृतिसरणौ सुखसंचारम्
कृत्वा तेन व्रज भवपारम् ॥ भज० ॥

चिन्तय चित्त त्वं गणनाथम्
मंगलमयगुणराशि सनाथम्
तदितर विषयध्यनिनालम्
वाञ्छसिजेतुं यदि कलिकालम् ॥ भज० ॥

भो गिरिजासुत तव महिमानम्
कः खलु कथयेद गतसीमानम्

व्यासो भ्रचा मीशो भ्रान्तः
दशशतवदनः शेषः श्रान्तः ॥ भज० ॥

त्वत्तः सर्वं जगदुत्पन्नम्
त्वत्तो वसति स्थितिसंपन्नम्
त्वत्तः सर्वेश्वर लयमयते
त्रिगुणात्मकता त्वामाश्रयते ॥ भज० ॥

शुण्डादण्डच्छलतो मन्ये
प्रणवस्तिष्ठति वदने धन्ये
तेन मुखं तव मंगल सदनम्
जातं गजमुख खलबलदलनम् ॥ भज० ॥

भक्तजनानां कृतसंतापम्
शमयितुमिच्छन्निव भवतापम्
धृत्वा त्वं गुरुशुण्डादण्डम्
तनुषे सीकरवृष्टिमखण्डम् ॥ भज० ॥

भो गजमुख तव नामस्मरणम्
सिद्धिवितरणं भवभयहरणम्
नैव जहातु त्वदेकशरणम्
मरणस्थितमपि 'राधारमणम्' ॥ भज० ॥

## मंगला चरण

( शार्दूल )

सांगोपांग समस्त वेद, थकले योगी महा भागले
ब्रह्मा विष्णु महेश जिष्णु शिणले देवाग्रणीहि भले
ज्याचा अंत अनंत गोचर परी झाला नसे त्यांप्रती
भावें त्या करितों परात्परपदा आनंद-कंदा नती १

( मालिनी )

आणुहुनि अणु वाटे तेंवि मोठ्यांत मोठें
न यदधिगमशून्य स्थान विश्वांत कोठें
अनुदय अविनाशी त्या अगम्यस्वरूपा
नमन करितसें मी सच्चितानंद रूपा २

---

## वट वृक्षास

पुराणवंद्या तरुतापसा मी
विनम्र माथा करुनी प्रणामी
यथामती थोर अवर्णनीय
पवित्र गातों महिमा त्वदीय १

लागे तुझें मस्तक देवलोका
पाळें तुझीं पावति नागलोका

तूं मृत्युलोकीं दिसशी कसा न
त्रिविक्रमाची प्रतिमाच सान २

लोकां तिन्ही आक्रमिण्या हुरूप
ज्या, तें तुझें भव्य विराट रूप
चित्तीं करी जागृत दृष्टिपातें
भीत्यादराचें दृढ मिश्र नातें ३

शाखा तुझ्या दूरवरी प्रयाण
दिग्मंडलांतीं करितात जाण
बुंधे तुझें नूतन जाग जागीं
पर्णींच विश्रांतिस त्यांजलागीं ४

तुझ्या शरीरावर लांब फार
हारी मुळांच्या करिती विहार
जशी जशी प्रौढ दशा बळावे
वाढे तशी दाढिच वाढ पावे ५

अन्योन्यसंगें बहु दर्शनीय
होती दळें पक्क फळें त्वदीय
कां पाचुचें पात्र न फार साजे
मध्यें जरी लाल मणी विराजे ६

सन्मान्य एका तव पूर्वजाची
लाभे तुला सत्कृति जाण साची
नाहीं तरी वा वटपौर्णिमेस
नारी तुझ्या कां जपत्या पुजेस ७

छाये तुझ्या वाटसरू विसावे
माथीं खगांचें कुळ वास पावे
स्कंधीं कपी कोटरिं कीट घेशी
नाना जिवां आश्रयदान देशी ८

जें जें दिसे तें सगळें विनाशी
या तूं प्रमेयाप्रति आड जाशी
होईल जेव्हां लय या जगाचा
पर्णीं तुझ्या विष्णु वसावयाचा ९

होई तुझी ब्राह्मणतुल्य मुंज
नाहीं परी ती श्रुत सोडमुंज
तूं ब्रह्मचारीच सदा रहाशी
दीर्घायुरारोग्यसुखा पहाशी १०

देहीं पिशाचांस जरी प्रवेश
बाधे तरी ताप तुला न लेश
या ब्रह्मचर्याचरणेंच वाटे
अंगीं तुझ्या अद्भुत तेज दाटे ११

तुझ्या दुधाचें करितात पान
येई तदा बाल जटांस मान
तुझ्या समायुक्त दलावलीला
आलिंगिते भोजनपात्रलीला १२

तुझ्या जगन्मान्य समागमाचा
व्हावा द्रुमेशा सुखलाभ साचा

म्हणूनि कीं राम जगन्निवास
सेवी सुखें पंचवटीस वास १२

---

# इंद्रधनुष्य

( उपजाति )

मेघोदयें नील नभस्तलाला
विभूषवी वासव-चाप-लीला
करी तिचें सुंदर चित्र रूप
आश्चर्य योगें जन चित्ररूप १

नभस्तला माणिक पाच नील
यांचे जणु कोंदण रम्य-शील
कोणी करी शिल्पकला-विहारी
मयासुराचा मद जो निवारी २

पयोधरीं भासुर चित्रहार
नभश्रियेच्या करितो विहार
अनंगचापप्रतिमाच किंवा
घेई नभचित्रपटीं दिसावा ३

परोपकारीं निज जीवनाला
वेचावया अंबुदराज आला

तदादरा इंद्रधनुःस्वरूप
शोभे जणूं तोरण रम्यरूप ४

अनेक रत्नावलिबध्द सेतू
मंदाकिनीमंडनमुख्यहेतू
असे, दिसे भव्य कमान साची
न मूर्ति ही इंद्रशरासनाची ५

मुकुंदवक्षस्थलवासलोला
विचित्रवर्णा वनपुष्पमाला
पूर्वी कशी शोभलि हें जनांला
आली धनुश्री जणुं सांगण्याला ६

नभः पटा उज्वल वर्णलेप
भरूनियां सुंदर इंद्रचाप
रेखी करांनीं सविता स्वकीय
ही मानवां साध्य न गोष्ट होय ७

रवि प्रभेची शुचि बाह्य काया
तशीच कीं आंतहि हें पहाया
प्रकाशवर्गीकरणीक्रियेचा
प्रयोग होतो गगनांत साचा ८

परस्पर स्नेहवशें स्वताची
शोभा चढे सर्वहि संहतीची
हें सांगण्या तत्व गमे जगला
शोभे नभीं सुंदर वर्णमाला ०

दिव्यप्रभाभूषित चापकांती
पहावया उन्मुख लोक होती
आधिष्टितां उच्चपदा जनांची
कोणाकडे दृष्टि वळे न साची १०

धनुष्य हें निर्गुण वक्रशील
टिके जरी केवळ अल्पकाळ
तरी तयाला वश लोक होय
अतुल्य सौंदर्यरसें तदीय ११

( वसंत तिलका )

होतां पदोद्पटलीं क्रमपूर्व लोप
सांगे जनां घनरवें जणु इंद्रचाप
"आयुष्य अल्पचि असो परि लोकमान्य
होवोनि जा मिळविण्या परलोक धन्य १२

---

## स्वप्न

( इंद्रवज्रा )

चैतन्य जो ओतित जीव लोकीं
तो पावला भास्कर अन्यलोकीं
होई क्रमें दैनिक मित्र घोष
संधि प्रकाशासह नामशेष १

स्थलीं स्थलीं दीपलतावलीला
ज्योतिर्मयी पुष्प विकासलीला
विभूषवी चालविण्यास साचा
व्यापार जो जागृति-माळिणीचा २

विनाशुनी दीप परंपरेला
आधार जी जागृति जीविताला
सुषुप्ति शांतिप्रद सिद्ध होय
वर्चस्व लोकीं करण्या स्वकीय ३

कंठी जिवांच्या मृदुबाहुपाश
करूनियां अर्पण सावकाश
मोहूनियां इंद्रियवर्ग सर्व
निद्रा स्वसत्ता मिरवी स गर्व

हळू हळू बालदशा त्यजोनी
नक्षत्ररत्नीं तनु भूषवोनी
तारुण्य-भावें रजनीं विराजे
सुषुप्तिचा अंमल पूर्ण गाजे ५

शुभंकर श्यामल शांत शान
सुषुप्तिचें राज्य हरीत भान
पराजिता जागृति दे उसासे
कोणासही दास्य न गोड भासे ६

“ मातें मिळे आश्रय कोण आतां
चित्तासही पातली थोर चिंता

विचारपंक्तीस पडे विचार
करीतसे दुःखाचि दुःख फार ७

निद्रा विनिद्रा निज राज्य तंत्र
पाळी जरी दक्षपणें सुयंत्र
तरी तया ऱ्हास कदा चुकेना
लाभे न वास स्थिर संपदांना ८

साधावया योग्य रिपूंस वैर
सुषुप्तिचा दीन दशा प्रकार
करीतसे उत्सुक जागृतीला
तदीय राज्यस्थिति दर्शनाला ९

चारावलीशी बहुरूप धारी
मार्जारिशी केवळ मंदचारी
राज्यीं शिरे जागृति वैरिणीच्या
छाया जशी अंतरीं आरशाच्या १०

विचार नैसर्गिक नित्य मित्र
जाई दिनश्रीसह जेंवि मित्र
संगे तिच्या ती सम ज्या हुरूप
स्वीकारण्याला विविध स्वरूप ११

अन्योन्य कंठार्पित बाहुपाश
सुषुप्तिचा आक्रमिती प्रदेश
विचार तो जागृति तीच अंतीं
सुषुप्तिच्या सं-मुख नीट येती १२

नरेंद्रशी जागृति ने विशाल
निर्मी तदा अद्भुत इंद्रजाल
त्या स्वप्न हें नांव मिळे जनांत
लाभे पदा अग्र चमत्कृतींत ११

---

## —कृपणाचें स्वप्न—

( एक कृपण आपणांस पडलेलें स्वप्न आपल्या मित्रास सांगत आहे. )

हव्यास चित्तीं धरुनी धनाचा
द्वीपा सुवर्णाख्य निघावयाचा
विचार होतां पडला विचार
मला कसा थोर मिळेल नोर १

कंटाळुनी संतत याचनेते
त्वां अर्पिला नोर समग्र मातें
नौकोदरीं टाकुनि हें शरीर
स्वीकारिला सागर मार्ग घोर २

सर्व प्रवासीजन फार कष्टी
भूमीकडे लाविती दीन दृष्टी
जातां दुरी मातृमुखानुरागें
पुनः पुनः कोण बघे न मागें ३

नभस्तला भेदित नीट जाय
त्या पर्वताग्रीं स्थित भूमिमाय
तिचीं मुलें जीं बहु दूर जाती
परस्परां प्रेमभरें पहाती ४

क्षणक्षण क्षीण दशेस पात्र
परस्पर प्रेक्षण सौख्यसूत्र
गेलें तुटोनी वरतीं नभाचा
खालीं सुविस्तार दिसे जलाचा ५

शृंगारुनी शुभ्र शिडें शुभांगा
दावूनियां सुंदर अंगभंगा
पृष्ठावरी सागर-रंगभूचे
नौकानटी निष्पद नाच नाचे ६

तरंग लग्ना कणिका जलाच्या
ओळीच कीं स्वेदलवावलीच्या
आकाश त्यांचा करण्यास लोप
पंखा गमे हालवि वायुरूप ७

समुद्र-नौका नव कौतुकांची
गोडी-क्रमें-वाट धरी लयाची
समुद्र तो नीरस शून्य झाला
नौका गमे जंगम बंदिशाला ८

जातां असे निष्क्रिय वीस वार
दृष्टी पडे अंधूक बेट दूर

तद्दर्शनें किंचित ताडिलें म्यां
कोलंबसाची परितोषसीमा ९

सुवर्णसे द्वीप विभाग पीत
जसे जसे स्पष्ट दृशेस येत
तशी तशी रम्य विकास लीला
मन्मोदरूपी फुलवी कळीला १०

जातां असे आणिक याम चार
मी इष्ट देशीं पद ठेवणार
तों घोर आकस्मिक बादळाची
होई पथीं बा सुरवात साची ११

प्रचंड वेगें सुटला समीर
अभ्रें ख-मार्गीं घुसती अधीर
दणाणवी वीज दिगंत सारे
समुद्र सारा खवळे तसा रे १२

समीर रत्नाकर मेघभार
असे तिघे सक्षण दुष्ट फार
नौका वधूच्या अडवूनि वाटे
तत्प्राप्तिला मांडिती वाद वाटे १३

पूर्वी जशीं क्रूरपणें सभेला
दुःशासनानें द्रुपदात्मजेला
नौ–बालिके तद्वत चंडवारा
वाटे तिथें ओढित ने फरारा १४

अंगावरी टाकुनि वीचिहस्त
विटंबवी सागर तीस मस्त
बळेंच ओढी हृदय प्रदेशीं
द्रव्यास मी अन्य भिती जिवाशीं १५

प्रचंड लाटांसह उंच जातां
वाटे विकर्षी तिज मेघ आतां
मी एकचित्तें जपलों धनाला
अन्या गमे स्वर्ग समीप आला १६

नौका अशी उंच नभांत जात
तों पातले सत्वर देव दूत
सर्वां अम्हां घालुनि ते विमानीं
झाले सख्या तत्पर शीघ्र यानीं १७

मन्मानसीं वित्तवियोगरूपी
पेटे महाग्नी प्रलयस्वरूपी
नौकेत येण्या बहु यत्न केले
ते सर्वही निष्फल पूर्ण झाले १८

यत्संपदेचें निरखोनि मान
संख्यावलीही लववी स्वमान
लोकीं अशा येऊनी तें विमान
गांठी कुबेरगृह दीप्यमान १९

आम्हीं सख्या सर्व ! उभे समोर
दिव्यासनीं शोभतसे कुबेर

तो चित्रगुप्ता पुसुनी विचार
विचित्र दावी पुढला प्रकार २०

एक प्रवासी धनपाल नाम
जो दानधर्मीं दवडोनि दाम
परोपकारीं झिजवी शरीर
त्या लक्ष पद्में धन दे कुबेर २१

दुजा जया साधुनियां निजार्थ
रुचे स्ववित्तें करणें परार्थ
करीं तयाचे शतपद्म वित्त
सख्या पडे वा धनद-प्रदत्त २२

सर्वां असें देऊनि अल्प फार
स्व-स्वस्थळीं पाठविण्या कुबेर
दूतां कथी; या कवडी न एक
वर्णूं कसा मी मम तीव्र शोक २३

द्रव्यार्जना जोडुनि हात दोनी
गयावया दीन मुखें करोनि
मीं फोडिला दुःसह दीन टाहो
" प्रभो धनेशा मज वित्त द्या हो " २४

माझी परी त्या करुणा न आली
सक्रोध मुद्रा बहु लाल झाली
वाग्वज्र तो चाऊनि दांत ओंठ
सोडी मदाशागिरि होय पीठ २५

" पापिष्ठ तूं पूर्ण अ-दानशील
तुला न येथें कवडी मिळेल
जशी जशी बा सरणी कृतीची
तशी तशी प्राप्ति घडे फलाची २६

नाहीं तुला माहित दान धर्म
ध्यानीं मनीं ना उपकार-कर्म
परी न तूं लाजशी याचनेस
मिळे न तेथें तुज एक रेंस २७

दुष्टा धनेच्छामय थोर खांच
भरावया चौर्य वधादि साच
अघोर पापें रचिलीं अनेक
येथें मिळेना तुज दाम एक २८

जिवंत रे भूदरिं आत्महस्तीं
लक्ष्मी तुवां गाडिली निर्दया ती
तुला कशी येथ मिळेल मूढा
तुझ्याकडे लेश तिचा न ओढा २९

सेवूनियां संतत सत्पथास
करूनियां जो धनसंचयास
त्याची करी सद्व्यय भूमिलोकीं
त्या द्रव्य लाभें बहु अन्यलोकीं ३०

संपत्प्रियेचा सहवास येथें
जरी गमें इष्ट तुझ्या मनातें

अमोघ तूतें कथितो उपाय
जेणें तुझी इच्छित सिद्धि होय ३१

धरूनि चित्तिं ममोपदेश
छेदूनिया सर्वहि मोहपाश
दें दान धर्मीं निजसंपदेतें
मिळेल वृद्धिंगत येथ तूतें ३२

बोलोनि हे शब्द धनाधिनाथें
दिलें मला लोटूनि भूमिपंथें
आकर्षणें थोर गर्में धनाच्या
मी प्राप्त झालों उदरांत नौच्या ३३

सुदैव योगें मम संपदेचा
झाला पुनर्लाभ मला सुखाचा
अन्याचिही मद्वश पूर्ण झाली
बा शर्करा दुग्धरसीं मिळाली ३४

संपत्तिचा पाहुनि तो पसारा
धन-प्रभूचा उपदेश सारा
सोडी मला देखुनि मेनकेला
असा मनो-निग्रह गाधिजीला ३५

टाकोनी गेले दुसरे प्रवासी
एकत्र मी त्या धनसंचयासी
करोनि जों मग्न असें सुखांत
तों नौ फुटे वित्त पडे जलांत ३६

अधः शीर्ष मी सागराच्या जलाला
विदारीतसें कढण्या संपदेला
शिलेच्या शिरीं लागला तीव्र घाव
भयानें मला जागृति प्राप्त होय ३७

---

# सूर्य व मेघ

(शार्दूल विक्रीडित)

ल्याली कोमल लाल शाल उदया आली उषा सुंदरी
आला रांगत बाल भानु चढता झाला तदंकावरी
शोभा दिव्य मनोज्ञ मंगल तदा पूर्वेस जी संभवे
ती निःशंक ' अवर्णनीय इतुक्या वर्णीच हो वर्णवे १

वृक्षीं मंगल पाठ भाट वनिंचे पक्षी पढूं लागती
संध्यावंदनमग्न विप्रवर कीं वंध्या घडी हो न ती
देवी सृष्टि समस्त तुष्टिरस ती सेवी तया दृङ्मुखें
ब्रम्हानंदरसार्णवांतरि बुडी ब्रह्मांड घाली सुखें २

काळेकुट्ट नभांत मेघ घुसती तों दैत्य कीं भेसुर
हस्तच्छेद करोनि बाल रविला ते घेरिती निष्ठुर
होती धुंद दिशा निशाच परतें ग्रासावया वासरा
शोभा ती क्षण दृष्टनष्ट गतिला नेशी कशी ईश्वरा ३

झंजावात सुटे सवेग सहसा कल्पांत काळीं जसा
" सों सों " शब्द करीत चाल करितो मेघावरी वीरसा
झाले जर्जर मेघ मंडळ पळे दूरी दिगंतीं दडे
झाला नंतर शांत वात; रविला पूर्वाधिक श्री जडे ४

जों सद्बुद्धि उषा, गुणौघ सविता येती जगीं दृक्पथा
तों त्या मत्सर मेघ नित्य वळतो ग्रासावया सर्वथा
अंत्य श्वास समीर भीषण यदा संचार देहीं करी
भंगे मत्सर मेघ, सद्गुणरवी दीप्तिप्रकर्षा वरी ५

---

## गुलाब

उद्यानभूमि-प्रिय भूषणा बा
चेतोहरा पुष्पतरो गुलाबा
मी काव्यसृष्टींत तुझें स्वरूप
निर्मावयाची धरिली हुरूप १

तनू तुझ्या दूषित कंटकानीं
वसे तुझ्या दंतुरभाव पानीं
सामान्य तूं भाससि पुष्पहीन
ठायीं तुझ्या अद्भुत कांहिंही न २

पुष्पोन्मुखी मूर्ती परी त्वदीय
लोकीं घडे लोचन लोभनीय

कशीबशी मुग्ध जशी कुमारी
तारुण्य लेण्या करितां तयारी ३

क्रमें तुझ्या क्षुद्रदलावलीला
उद्भासवी पुष्पविकास लीला
मनोज्ञ शोभा अरुणोदयाची
जिच्या उणी हो तुलनेस साची ४

वर्ण प्रकर्षद्युतीचे निधान
हरी तुझे पुष्प शरीर भान
तें निर्मुनी प्रेमभरें पहातां
प्रत्यक्ष मोहीं पडला विधाता ५

रुते तुझी कंटक पंक्ती आंगा
तेणें विधाता जणु होय जागा
तो कौतुकें नंतर अद्वितीय
सुगंध उत्पन्न करी त्वदीय ६

अहा किती कोमल रम्यरूप
आरक्त वर्णार्द्र तुझें सुपुष्प
सुवासही दिव्य तिथें विराजे.
गुणान्वये रूप विशेष साजे ७

पुष्पा तुझ्या नाकची योग्य भासे
म्हणूनि का तन्मुख ते विकासे ?
मनुष्य हस्तीं खुटिले जरी तें
नाकाकडे उत्सुक घे गतीतें ८

भरे तुझें फुल पुरे मनांत
न कंटकां ठाव उरे तयांत
गुणप्रकर्षें गतदोष दोष
या उक्तिचा तूं करिशी प्रघोष ९

वर्णे सुगंधे भुवनत्रयाला
मोही अशी शक्ति तुझ्या फुलाला
चिंता परी एक मनासी बाधे
अत्यल्प कीं, आयु तयासि लाधे १०

तनू तुझी पीडित कंटकांनीं
सुपुष्पशाली घडते निदानीं
स्वनीतिचा दुर्घट मार्ग चाला
अंतीं सुखी व्हा कथिते जनाला ११

वस्तूस ज्या ज्या तव पुष्पयोगे
ती ती घडे या जनीं रम्य भोगे
माझी गुलाबी मग काव्य सृष्टि
न कां समर्पी रसिकांस तुष्टी ? १२

———

# सायंकाळ

घेऊनियां निजशिरावरी रश्मिभार
उल्लंघितां पथ नभस्तलिंचा अपार
आदित्य दिव्य पथिक श्रम फार पावे
अस्ताचलीं म्हणुनि संप्रति तो विसावे १

केशावली रविशिरीं किरणस्वरूपा
झाली गमे विरल वृद्धदशानुरूपा
जातां लया सुदिन कीं दिनराज याचा
गेला लया विपुलही करभार साचा २

अध्व-श्रमे दिनकरा बहु ताप झाला
होई न तो सहन कीं, बहुधा तयाला
अस्ताचलीं म्हणूनि शीतल वात सेवी
वस्त्रापरी किरणमंडल दूर ठेवी ३

जे राहिले मजसवें उदय प्रसंगीं
ते सोडिती किरण कां मजला प्रसंगीं
देखूनि दुष्कृति अशी बहु कोप आला
त्या कारणें मज गमे रवि लाल झाला ४

उत्तुंग शैलशिखरीं कनक-द्रवाचा
ओति सडा निजकरें पति पद्मिनीचा
वाटे प्रदोषसमयासह संगरास
तो अर्पितो रुचिर केसरी वेष त्यांस ५

संपूर्ण कुंकमरसें भरली प्रतीची
भासे मना समर-भूमिचिया प्रतीची
लीन-प्रभावलय भास्कर लब्धदैन्य
शोभे श्रमाकुल जसा भट नष्टसैन्य ६

लोकोपकार करण्या निजरश्मि मात्र
वेंची, उरे तपन केवळ बिंबमात्र
होई विशेष नयना परि-तोषदाता
चित्तीं भरे अधिक निर्धन पूर्ण दाता ७

चंडांशुशीं बिसिनिचा चिर सख्यभाव
चित्तांमधें निपजवी बहु चित्र-भाव
पाहूनिया प्रियकरा परितापयुक्त
झाली मनीं कमलिनी परि-तापयुक्त ८

जों जों करी गमन भास्कर पश्चिमेस
तों तों मिळे भुवनिंच्या लय चेतनास
मंदावलें विविध-भूमुख शब्दजाल
अंगप्रभा जगतिची गळली विशाल ९

जेव्हां बुडे जलधिच्या जलिं अर्धकाय
घेण्या समाश्रय जणू दिनकालराय
दे क्षीण आत्मकर उन्नत शैलभाळीं
उच्चांस उच्च सहवास रुचेल काळीं १०

ज्या सागरीं सकल-भूतल-तीर्थ गेह
ठेवी तदंतरिं सुखें रवि शुद्ध देह

आत्माच सृष्टितनुचा परलोक सेवी
कां स्तब्ध शून्य मलिना मग ती न व्हावी ११

रत्नें दुर्जी वसति अंतरिं सागराचे
शंका अशी निपजली मनिं निर्जरांचे
शोधार्थ ते म्हणुनि पाठविती दिनेश
तो हेरसा जणु करी जलधिप्रवेश १२

सायंतनें विकसती कमळें फुलेंही
दीपावली मिरविते निजतेज गेहीं
झांकी स्वपर्णनयना तरुवर्ग कांहीं
मित्रापदा निरखण्या जणु शक्त नाहीं १३

मार्तंड हा तिलक सुंदर कुंकुमाचा
गेला गळूनि घडला क्षय मंगलाचा
सायंप्रभा अनुमृता जणु शोकमग्ना
तों जन्म घे रजनि कृष्णमुखी कुलघ्ना १४

---

## गतसंवत्सर.

( शार्दुल विक्रीडित )

तारे मानवरूप जे चमकती या आर्यराष्ट्रांवरीं
एकामागुनि एक ते बुडवुनी सारे विपत्सागरीं
'गेला वासर तो बरा' वदवुनी सर्वांमुखीं ही गिरा
सत्ताकाल गताब्द कीलक करी 'हा हा' रवें साजिरा १

केला एक निबद्ध, अन्य सहसा कारागृहीं कोंडिला
एका दंड, दुजास जामिन, तिजा देशांतरीं धाडिला
वार्ता ही प्रतिवासरीं करुनियां कर्णप्रदेशीं स्थिरा
सत्ताकाल गताब्द कीलक करी 'हा हा' रवें साजिरा २

कोठें ग्रंथीक ताप पाप विचरे, दुर्भिक्ष कोठे अहो
कोठें आग्नि, कुठें जलप्रलयही, कोठें महास्फोट हो
या वार्तामय लोह मुद्गरमुखें हाणी जनां या शिरा
सत्ताकाल गताब्द कीलक करी 'हा हा' रवें साजिरा ३

दुर्वार-क्षितिपाल-कोप-दहनें ह्रत्क्षेत्र जो दाहवी
चिंतेचा शतधार नांगरवरी सर्वत्र संचारवी
पर्जन्यें नयनाश्रुच्या विलसवी दैन्यादि दुष्टांकुरा
सत्ताकाल गताब्द कीलक करी 'हा हा' रवें साजिरा ४

झाले मार्ग निरुद्ध सर्व, न दिसे कोठें खुलें छिद्रही
सर्वत्र प्रगतीस खीळ पडली, ही शून्य सारी मही
झाली मात अशी म्हणुनि जनता जागींच हो सुस्थिरा
सत्ताकाल गताब्द कीलक करी 'हा हा' रवें साजिरा ५

चक्रव्यूह–विषोदरीं विवश तो सौभद्र जैं सांपडे
निष्कांतिस्तव दीन दृष्टि फिरवी चारी दिशां तो रडे
आली ती स्थिति काळचक्रगतिनें सर्वांचिया मंदिरा
सत्ताकाल गताब्द कीलक करी 'हा हा' रवें साजिरा ६

विश्वग्रासक मृत्युची परि उडी येईल त्याच्यावर
तन्मृत्यूंतुनि 'सौम्यनामक' नवा जन्मेल संवत्सर

कल्याणप्रद सौम्य शांत शुभ तो होवो समस्तां जनां
ही 'राधारमणें' गणेशचरणीं केली असे प्रार्थना ७

---

## गतसंवत्सर व नवसंवत्सर

( शार्दूल विक्रीडित )

दिक्प्रांतीं गुरुधूम्रधूलिपटलें केशांस विस्तारुनी
तार्जी भीषण रक्तचंदनमयी अंगा उटी चर्चुनी
लोकग्रासपटू करालदशना संग्राम-भू-राक्षसी
आनंदा शुभवत्सरा त्वदुदरा जन्मास आली कशी ? १

सेवी दान यथेच्छ तुच्छ करिते प्रत्यक्ष मृत्यूसही
रक्ताचा अति घोर शिंपूनि सडा सारी विटाळी मही
क्रीडे जी भटमुंडकंदुकगणें संग्राम-भू-राक्षसी
आनंदा शुभवत्सरा त्वदुदरा जन्मास आली कशी ? २

जी हिंसापटुहस्त दूर पसरी भू-व्योम-तोयांतरीं
संख्यातीत सुधीर सैनिकमणीं पंचत्व-गर्भी भरी
नेई निर्जनतेस देश बहु ती संग्राम-भू-राक्षसी
आनंदा शुभवत्सरा त्वदुदरा जन्मास आली कशी ? ३

शांतीतें शमवी, निजेसि निजवी, चिंतेसि जी चेतवी,
दुःखाला सुखवी, सुखासि दुखवी, अर्थी अनर्थास वी

ती मायामयमंत्र-तंत्र-निपुणा संग्राम-भू-राक्षसी
आनंदा शुभवत्सरा त्वदुदरा जन्मास आली कशी ? ४

दुष्टापत्य-कुसंग-संगति-विषें आनंद चित्तीं झुरें
दुर्वार क्षय त्या जडे प्रतिदिनीं तज्जीविताशा नुरे
तो मृत्युंगत भूत-काल-विवरीं सेवी पदा निश्चळ
जन्मे राक्षस-नाम वत्सर नवा जो तन्मृतीचें फळ ५

होवो राक्षस हा सुखप्रदजनां तो नंदमंत्री जसा
बांधो त्यासम शत्रु मित्र अवघे हा प्रेमपाशीं कसा
नामें केवळ राक्षसत्व, कृतिनें देवत्व देवत्व पावो सदा
देवो मंगल भोग भाग्य सकलां नेवो लया आपदा ६

---

## प्रेमाचा जय

( शार्दूल विक्रीडित )

काकाचा कटु कर्णकर्कश असा " का " " का " ध्वनी ऐकुनी
घेई धाक मनीं, विराम गमनीं येई गृहीं धावुनीं
धांवे ती शिशुरक्षणार्थ अबला सिंहापुढें निर्भय
मातृप्रेम पवित्र कारण तया, पावो सदा ते जय १

शय्या पुष्पमयी जिला कठिण हो नैय्यापिकोक्तीपरी
चंद्राचे मृदु रश्मिजाळ शिवतां जी ताप तंद्रा वरी

आलिंगी पतिच्या शवासह सती दीप्ता चिता निर्भय
साध्वीप्रेम पवित्र कारण तया, पावो सदा ते जय २

धारातीर्थ विशुद्ध लक्षुनी पुढें जाई न मागें बघे
पंचप्राण तृणासमान गणुनी युद्धांगणीं ठाण घे
काळाच्या वदनीं उडी सरळ घे क्षत्राग्रणी निर्भय
क्षात्रप्रेम पवित्र कारण तया पावो सदा ते जय ३

खोटे दूषण दूर्जनीं मज दिलें वाटेल लोकां खरे
प्राणस्फूर्तिच कीर्ति ती, मरणही दुष्कीर्तिपेक्षां बरें
यासाठीं धरितों कुलीन नर तो कंठी सुरी निर्भय
शीलप्रेम प्रवित्र कारण तया पावो सदा ते जय ४

स्वामी कार्यवशें प्रवास करितां रानांत मार्गावरी
हत्या घोर करावयास उपशी हत्यार मारेकरी
मध्यें भृत्य पडे स्वजीवित तदा वेंची मनीं निर्भय
स्वामिप्रेम पवित्र कारण तया पावो सदा ते जय ५

युद्धाची नुसती कथा श्रुतिपथा येतां भयें सर्वथा
पावे कंप अपार जो जणु जडे शीतज्वराची व्यथा
धर्मत्राण करावयास नर तो स्वप्राण दे निर्भय
धर्मप्रेम पवित्र कारण तया पावो सदा ते जय ६

लक्षाधीश पदावरूनि ढकली दुर्भिक्ष भिक्षापदा
पोटीं हाय ! उपास वास करिती नेत्रीं असूही सदा
हस्ताग्रास तथापि याचकमुखीं दाता भार निभय
दानप्रेम पवित्र कारण तया पावो सदा ते जय ७

व्योमाची रचना तुटो वरूनि कीं, खालीं फुटो ही मही
टाको वज्र शिरावरी सुरपती ठाको पुढें काळही
सत्यापासुनि सत्यसंध न ढळे सत्या जपे निर्भय
सत्यप्रेम पवित्र कारण तया पावो सदा ते जय ८

---

## प्रेमाची रुचि

( शार्दूल विक्रीडित )

ज्यांच्या केवळ गंधसेवनवशें तोंडास पाणी सुटे
पक्वान्नें असती अशीं विविध तीं न स्वाद ज्यांचा तुटे
गोडी केवळ मोदकीं गजमुखा; तो त्या सुखें आदरी
प्रेमाची रुचि ती अपूर्व जगतीं पीयूष धारेपरी १

श्रद्धेनें दृढ गोपबालक कुणी श्री सांबदेवाप्रती
अर्पी प्रस्तर-खंड-धूलि-पटलें पूजा यथा सांग ती
नैवेद्यास्तव मृत्तिकाच वितरी श्रीशंभु ती आदरी
प्रेमाची रुचि ती अपूर्व जगतीं पीयूष धारेपरी २

दुर्वासें छळितां करीं द्रुपदजा धावा हरीचा यदा
आला टाकुनि तोहि ताट पुढचें क्षुत्क्षाम कंठे तदा
भागे श्रीहरिची क्षुधा प्रबळही शाकस्थ पत्रावरी
प्रेमाची रुचि ती अपूर्व जगतीं पीयूष धारेपरी ३

श्रीरामा निजवंश दूषितफळें दे भिल्लरामा वनीं
आनंदें रघुराजनंदन भरीं तीं सर्वही आननी
अंतीं तो रुचिलुब्ध रिक्त करही सारीं मुखीं " आ " करीं
प्रेमाची रुचि ती अपूर्व जगतीं पीयूष धारेपरी ४

---

## २ प्रियेचे अश्रुबिंदु

( दिंडी )

अश्रुवृष्टीनें गाल तुझे न्हाले
प्रिये पाहुनि जे भाव मनीं आले
ग्रथिक केले ते सर्व सुवर्णांनीं
तुझ्या, रसिकांच्या ते पडोत कानीं १

नयन गंगेच्या जळीं वास योजी
अश्रुमाळेचे स्फटिक मणी मोजी
दृष्टि घेई तव मार्ग तापसीचा
स्वर्ग लाभो कीं दुःखविस्मृतीचा २

फुलें सुंदर जीं दोन गुलाबाचीं
निशाणें कीं तारुण्यराजयाचीं
तुझ्या गालांवरि फुलति सर्वकाळ
शोकवन्हीचा कवाळि त्यांस जाळ ३

तुझ्या दृष्टीची म्हणुनि कृपादृष्टी
तयां रक्षी का ? करुनि अश्रुवृष्टी
गुलाबांचें कां तेज मंद झालें ?
" उष्ण दुःखाश्रू " प्रत्ययास आले ४

निधी करुणेचा लाधला तुला गे !
हृदयकोशीं जो नित्य तुझ्या वागे
हिरे त्यांतिल हे अश्रुरूप थोर
काय लांबवितो हाय ! शोकचोर ५

मृदू नवनीताचि हृदय तुझें, त्या गे
शोकवन्हीचा तीव्र ताप लागे
द्रवुनि गेलें तें साक्ष कीं तयाची
गळुनि देती हे अश्रुबिंदु साची ६

रुचिर तारामय दिव्यकांतिसार
तुझें नेत्रद्वय गगनतलाकार
अहा ! तेथुनि हीं अश्रुबिंदुरूप
गळति नक्षत्रें तरल रम्यरूप ७

त्यजुनि जातां गे ! दिव्य तुझे डोळे
अश्रुबिंदूही अश्रुरसीं लोळे
मूळ बिंदु तो अश्रुसंततीतें
स्वपदिं योजी का ! पावतां गतीतें ८

लिही अश्रूंनीं दृष्टि तुझी दीन
दोन ओळींचें काव्य वर्णहीन

# दाता व देव

( शार्दूल विक्रीडित )

दाता एक कुलीन निर्धन भला कर्जें बहू गांजला
स्त्रीच्या दुर्वचनीं तशांत खचला प्राणास कंटाळला
" सारें शून्य मला, अनन्य गति मी " दैन्यस्वरें तो वदे
" ये ये सत्वर धाव पाव मरणा ! दीनासि या ठाव दे " १

मायापाश निराशवृत्तिवश तो छेदी, न त्यां गुंतला
जाण्या शून्य पदासि शून्यहृदयें शून्य स्थळा पातला
तेथें एक विशाल वृक्ष पसरी शाखा नभीं आडवी
त्या भासे निजहस्त मित्र यम कीं स्नेहें अहा ! लांबवी २

बांधी पाश हताश कालवश तो त्या वृक्षशाखेप्रती
लावोनी गळफांस दुर्गतिपथीं घेणार जों सद्गती
तो अव्यक्त अतर्क्य अभ्दुत अशी शक्ति स्वशक्तिक्रमें
तोडी बंधन मृत्युसाधन, बु. तो विस्मयीं संभ्रमें ३

खालीं पाश गळे, वरी उसळले मिश्रप्रकाशांकुर
लक्ष्मीचेच कृपाकटाक्ष वळले तद्रक्षणा आतुर
द्रव्याचा निधि दानपुण्यफळ कीं पायांतळीं उभ्दवे
त्याचा हर्ष तसेंच मूल्य निधिचें कोणा कसें वर्णवें ४

आनंदें उचलावयासि निधितें सारी पुढें जो कर
तों शून्यांतुनि शद्ब हे उमटले " हां ! हात तूं आवर
" पात्रापात्रनिरूपण स्वहितही दानीं व तूं लक्षिलें
या दोषा त्यजिशील ? " " होय " मग घे द्रव्यायु देवें दिलें ५

## संसारसुख.

( शार्दूलविक्रीडित )

रंगस्थान तरंगिणीशतल हो जें नीलरंगाकुल
नाचे निष्पदनृत्य नृत्यनिपुणा नौकानटी निस्तुल
दावी ती ललितांगभंग, मिरवी वातांबरांची तती
बांधी सृष्टिस नृत्यविस्मयगुणें एकाग्रचित्ताप्रती

चाले मंद सुमंद मारुत मुळीं हाले न नृत्या भुले
झाला सागर गार नृत्यकुतुकें धाला मनीं तो डुले
राहे निश्चल पूर्ण चंद्र गगनीं पाहे तिचें कौतुक
अंगीं व्योम असंख्य नेत्र उघडीं रंगीं रमे उत्सुक २

नक्षत्रें गळती नभांतुनि तदा पाहोनि ती साजिरीं
कीं दिक्पाळ गमे फुलें उधळिती नौकानटीच्या शिरीं
तों कालोचित राग एक रमणी दिव्य स्वरें आळवी
पूर्णत्वा सुखसृष्टिची मधुरता नौकादरीं पाववी ३

देहाचें लव भान गान नुरवी चित्तैकतानप्रद
हें सारें सुखसार एक तरुणा निःसार हो दुःखद
जाई तो सहसा विषण्णवदनें सोडोनि रंगस्थळ
नौप्रांतीं मणिबंधनें स्थित करी राहे उभा निश्चळ ४

शोकाची उकळी वरी उसळली त्याचा गळा दाटला
अश्रूंचा अनिवार पूर सहसा नेत्रद्वयीं लोटला
त्याचें अंतर दुःखपात्र, कढवी ज्वाळा स्मृतीची तया
झाला गद्गद नाद, पाक शिजला श्लोकस्वरूपांत या ५

" हे मित्रा मम चित्तचातकघना प्रेमाम्बुधे धीवशा
तूं अस्तंगत मत्समीप नसशी सौख्य प्रसंगीं अशा
तेणें हें सुखपुष्प दुःखमधु दे मातें व्यथादायक
संसारीं सुख जें असे अहह ! तें निःशंक दुःखात्मक " ६

---

## अन्योक्तिमाला.

सर्पान्योक्ति ( वृत्त—मंदाक्रांता )

काया शोभे कनकसदृशी रम्य गोजीरवाणी
वाणी मोही त्रिभुवन, नको सेवण्या अन्नपाणी
पाणीदार स्वशिरिं धरिशी रत्न, सर्पा विषातें
संरक्षी तूं अपरवशता अन्यथा दूर तूतें १

गजान्योक्ति ( वृत्त—वसंततिलका )

देह प्रचंड तव पर्वततुल्य भासे
लोकोत्तर प्रबलता भुवनीं विकासे
मारी परी गजवरा ! तुज सिंहबाल
येथें सदोष तव मान्यहि सत्वशील २

वृक्षान्योक्ति ( वृत्त-हारिणी )

अयि तरुवरा ! देशी थारा खगावलितें वनीं
तुजसि कवळी प्रेमें वल्ली स्वपल्लवबांहुनीं

ज्वलनिं जळतां जाती तूतें विहंगम सोडुनी
तुजसह जळे साध्वीशी बा ! लता यश जोडुनी ३

आम्रान्योक्ति (वृत्त-इंद्रवज्रा)

जे शेवटीं प्राण तुझा हराया
सर्पापरी तत्पर आम्रराया !
कां तूं असे दत्तक वृक्ष घेशी
कोण्या स्थळा बुध्दि विवेक नेशी ४

चंद्रान्योक्ति (वृत्त-द्रुतविलंबित)

तव करास्थित औषधि केवळ
अमृतपूर्ण तुझें तनुमंडळ
तरि तुला न चुके क्षय सर्वथा
कुविधिची निरुपाय अहो ! व्यथा ५

---

## गोपाळकृष्ण

वाद्ग्रस्त समस्त सत्य महिमा जो त्वां सदा साधिला
हेंही अल्प न; लोक वर्ग जगिं जो सामान्य तो लंघिला
पाणी कृत्रिम सृष्टिसिद्ध अथवा अंगीं तुझ्या जें वसे
आतां त्याविण भारतोपवन हें प्रम्लान झालें असे १

निंदाया सरती पुढें जन कुणी वदावया अन्य ते
कोणी ओढिति शून्यते प्रति तुला नेती कुणी धन्य ते

कोणी सादर वर्णिती गुण तुझे दोषां दुजे शोधिती
वैचित्र्या न तुझ्या चरित्राविषया गोपाळकृष्णा मिती २

कोणी भेकड चोर जार कपटी देती अशीं दूषणें
कोणी शूर उदार थोर सुकृती हीं अर्पितीं भूषणें
कोणी वर्णिती काम-किंकर दशा कोणी विरक्त स्थिती
वैचित्र्या न तुझ्या चरित्रविषया गोपाळकृष्णा मिती ३

कोणी मत्सरदोष रोष करुनि माथीं तुझ्या स्थापिती
कोणी सात्विकभाव हाव धरुनि कंठीं तुझ्या बांधिती
कोणी बोलति धूर्त, मूर्त दुसरे मुग्धत्व आरोपिती
वैचित्र्या न तुझ्या चरित्रविषया गोपाळकृष्णा मिती ४

" लोकोद्धार करावया सतत हा वेंची तनू-श्रीमती "
जों हें सुंदर वर्ण कर्णविवरीं एका शिरूं लागती
तों अन्य श्रवणीं पडे ध्वनि असा " ऐशी न वस्तुस्थिती
वैचित्र्या न तुझ्या चरित्रविषया गोपाळकृष्णा मिती ५

" हा ज्ञानें शुक भाषणामृतरसें मोही नृपाचें मन
आनंदें डुलवी मनांत मुलवी देशी विदेशी जन "
हा कंठीं तव कीर्तिहार पडतां माफी न दे त्या स्थिती
वैचित्र्या न तुझ्या चरित्राविषया गोपाळकृष्णा मिती ६

रूपें तूं रतिकांत उद्यमगुणें भागीरथीचा पिता
वाङ्माधुर्यबळें बृहस्पतिसखा लोकश्रुती मोहिता
गोपीचंद सहोदर प्रकृतिनें भिन्नत्व वर्णूं किती
वैचित्र्या न तुझ्या चरित्राविषया गोपाळकृष्णा मिती ७

कोणी निर्गुण निर्विकार वदती कोणी विकारी गुणी
चाले तुंबळ वादसंगर असा मार्गे न घेती कुणी
जेव्हां हा जडदेह टाकुनि तुझा आत्मा अनंतीं विरे
तेव्हां संधि करावया उभयही पक्षीं मनीषा शिरे ८

बा मृत्यो मज भासशी कुशल तूं स्वर्गीय झारेकरी
चाळाया शवभस्म नित्य जपशी हिंडूनि या भूवरी
वेंचोनी गुण हेमखंड विकिशी लोकांस, ते भूषणें
त्यांचीं जीं करितीं तयांत दडती लाक्षामिषें दूषणें ९

---

## मूठ भराई

( भुजंगप्रयात )

महा पुण्यदायी सदा अन्नदान
तया सर्व दाना मधें अग्रमान
तयाच्या घरा चालुनी लाभ आला
उठा आर्य हो धान्यमुष्टीस घाला १

दिलें जें परा दान या मृत्युलोकीं
असंख्या पटीनें पुढें अन्यलोकीं
मिळे सत्य ते सर्वही आपणाला
उठा आर्य हो धान्यमुष्टीस घाला २

अजीर्णे घरा चालुनी रोग येती
मिताहारवृत्ती बलारोग्य देती

'भुकी तो सुखी ' व्हावया मार्ग सोपा
उठा आर्य हो धान्यमुष्टीस ओपा ३

प्रसंगीं निज प्राणही लोक आर्य
सुखें वेंचिती साधण्या अन्य कार्य
स्वकार्यार्थ या चार दाणे न भारी
उठा आर्य द्या मूठ हो एक सारी ४

स्वमातेहुनी पूज्य जी भूमिमाय
मरे ती उपाशीं परी हाय हाय !
तिची कां दया येत नाहीं तुम्हाला
उठा आर्य हो धान्यमुष्टीस घाला ५

रितें पोट जों तोंवरीं सर्व नाहीं
भरें पोट तेव्हां सुचें सर्व कांहीं
असें पोट आधीं पुढें सर्व गोष्टी
उठा आर्य हो घालण्या धान्यमुष्टी ६

गणेशापरी अग्रपूजेस पात्र
घडे पोट, घेतां करीं कार्य मात्र
असे धान्य मुष्टीच सर्वार्थ मूळ
उठा आर्य तें द्या नका लावु वेळ ७

महाराक्षस क्रूर दुष्काळ रूप
धरी झुंजण्या आर्यभूशीं हुरूप
धुळी चारण्या तन्मुखें मार्ग सोपा
उठा आर्य हो धान्य मुष्टीस ओपा ८

स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीय शाळा
त्रयी ही त्रयी सत्य लाभे तुम्हाला
तिच्या रक्षणा सर्वथा मार्ग सोपा
उठा आर्य हो धान्यमुष्टीस ओपा ९

न हानी मुळी लोटता आठ वार
दिली धान्य मुष्टी जरी एकवार
असे लाभ मोठा जपी नित्य ' भाला
उठा आर्य हो धान्यमुष्टीस घाला १०

तळें सांचतें थेंब थेंबें करोनी
वळे मूठही पांच बोटें मिळोनी
घडे अल्पसेवे महाकार्य पुष्टी
उठा आर्य हो घालण्या धान्यमुष्टी ११

वदे भारतीं कृष्ण माध्यान्ह काळ
असे अंतकाळाहुनीही कराळ "
तया दूर सारावया मार्ग सोपा
उठा आर्य हो धान्यमुष्टीस ओपा १२

किती प्रत्यही धान्य केरांत जाई
करा त्या जपोनी मुठीची भराई
क्रिया एक येती फळें दोन तीतें
प्रकारें अशा देत जा हो मुठीतें १३

खरें भूतळीं आर्य हे दानशूर
त्रिलोकीं असा लोटतो कीर्तीपूर

जरी राखणें इष्ट त्या हो यशाला
उठा आर्य हो धान्यमुष्टीस घाला १४

असे वेळ ही द्या मुखीं दोन घास
रिघे ना तरी आर्यभू ही लयास
वदा कासया औषधें प्राण जातां
उठा आर्य द्या धान्यमुष्टीस आतां १५

---

## सम्राटाभिनंदन.

( भूप—दादरा )

नित्य तुझा विजय असो जार्ज नृपवरा !
धन्य धन्य तूंचि जनीं नृपतिभास्करा ! ॥ धृ ॥

विद्या मुखकमलिं वसे, करकमलीं श्री विलसे,
राजन् ! तव पार नसे राज्यविस्तरा !
नित्य तुझा विजय असो जार्ज नृपवरा !
धन्य धन्य तूंचि जनीं नृपतिभास्करा !

अगणित सामंत सतत पूज्यचरणयुगीं तव नत,
त्वन्मंगल कीर्ति वितत भरित अंबरा !
नित्य तुझा विजय असो जार्ज नृपवरा !
धन्य धन्य तूंचि जनीं नृपतिभास्करा !

सलिल यशवर्धितबल, सततोदित रविमंडळ,
शतदल तव राष्ट्रकमल शोभावि धरा !
नित्य तुझा विजय असो जार्ज नृपवरा !
धन्य धन्य तूंचि जनीं नृपतिभास्करा !

सार्वभौमराज्ययोग, दीर्घकाल राजभोग,
राजेन्द्रा वपुविरोग, दे परात्परा !
नित्य तुझा विजय असो जार्ज नृपवरा !
धन्य धन्य तूंचि जनीं नृपतिभास्करा !

---

## प्रदर्शनानिमित्त दापोलीस आलेल्या मंडळींचें स्वागत

( शार्दूल विक्रीडित )

श्रीमन्मान्य वदान्य धन्य जन हो विद्याकला मंडित
सत्ता कीर्ति गुण प्रसिद्धि पर हो स्तुत्यक्रिया पंडित
आलां येथवरी मुळीं न गणिली मार्गश्रमादिव्यथा
दापोली पुरवासि सर्वजन हे केले ऋणी सर्वथा १

दापोली तुमच्या पदांबुजरजें झाली पवित्रा तशी
रामाच्या पतिता शिलामयतनू ती गौतमस्त्री जशी
गेलें लाघव दैन्य सर्व विलया चैतन्य आलें नवें
पावे मान महत्व, अंतर तिचें हर्षें भरे उत्सवें २

प्रेमाश्रू सुखदर्शनें तुमचिया, नेत्रांतुनी वाहती
संलापा मृत वर्षणें श्रुतिपुटीं संतोष सांचे अती
क्षेमालिंगन तेंच मज्जन घडे देहा सुधेच्या सरीं
आनंदांकुर कीं गमे उसळले रोमांचवेषें वरीं ३

भूलोकीं सुखसागरास भरती आली तरी त्यावरी
दुःखाच्या फुटती अनेक लहरी ही उक्ति वाटे खरी
भासे दुःखद कीं वियोग, घडली योग्या न संभावना
दुःखाब्धींत सुखातिरेक समयीं हा भाव लोटी मना ४

दापोलीकर मंडळी विनवाति दोन्ही करां जोडुनी
भाजी भाकर गोड सभ्य जन हो घ्यावी तुम्हीं मानुनी
नांदे भक्तिरसीं सुधाधिक रुची दोषांग तेणें गळे
सांगावें सुजनांस काय? मुळिंजे दोषस्थळीं आंधळे ५

गे भद्रे कृषिदेवते शरण हे सद्भक्त आले तुला
त्यांच्या तूं करपद्म अर्पूनि शिरीं साधीं मनोहेतुला
त्वत्पूजेंत पडे उणें अधिकवा माते क्षमा तें करीं
बाळांचें हित ऋद्धिसिद्धि सगळी नांदे तुझ्या गे करीं ६

माता होय वसुंधरा भगवती पर्जन्य होई पिता
धात्री कर्षक मंडळी दिनमणी आरोग्य संरक्षिता
जीवां जीव नदा वृषाश्वहना घाली अयोभूषणां
प्रीता ती कृषिदेवता सुफलदा होवो सदा आपणां ७

( मंदाक्रांता )

वाक्पुष्पें ही ग्रथुनि रचिला हार हा श्लोकरूप.
प्रेमें कंठीं सुजन तुमच्या अर्पिला रम्यरूप.

जागा द्यावी हृदयीं कुतुकें त्या करूं द्या विहार
शोभे 'राधारमण' कविला हाच सेवा प्रकार ८

---

## सुभाषित.

( श्लोक )

नख निवह जरेनें सर्व नेला हरोनी
सकल बल विरालें, दंत गेले पडोनी
तरिहि पशुपती हा चण्डनादें स्वकीय
निखिल वनपशूंना कांपवी हाय ! हाय ! १

अयि तरुवरा देसी थारा खगावलितें वनीं
कवळि तुजसि प्रेमें वल्ली स्व-पल्लव-बाहुनीं
ज्वलानिं जळतां तूतें जाती विहंगम सोडुनी
तुजसह जळे साध्वीशी ती लता यश जोडुनी २

मास श्रावण गांजितो, देवपती ना गा-करें भूतला
नक्षत्रें शतसाच; कालिज चिरी तारावळी निस्तुला
चिन्ता-रात्रि जरी भयाण विचरे गर्वें जनांच्या गणीं
ये ये ये पळही विलंब न करीं ये मेघराजा क्षणीं ३

गुणी तैलधी शूर विद्याविहारी
खरे साहसी मुत्सदी सद्विचारी
परी लोक हे कोकण क्षेत्र वासी
विधे कां बरें मत्सरें दूषवीसी ४

बारा वर्षें घोर दुष्काळ झाला
गेली नाहीं आर्यभू हार त्याला
छाया आतां व्यक्त होतां तदीय
अन्नाभावें ती मरे हाय ! हाय ! ५

कधीं कधीं मारुनी एक हिंदू
न मानिरे ' सोजिर ' गर्व-बिन्दू
तुझ्या दया-सागर पूर्वजांला
समूल-जातिक्षय इष्ट झाला ६

सोडी सुधीकैतवि आंग्ल भूप
नारायणास्त्रा निजनीति रूप
निःशस्त्रता आर्य जनांस आली
संग्राम विद्या विफलत्व त्याली ७

असे क्षणीं या मम सर्व नीट
अन्य क्षणीं होइल काय वाट
विवंचनीं या पडले समस्त
जेथें वसे ग्रांथिक-सन्निपात ८

भरत भूमिंकला सकला भल्या
प्रखर-सूर्य करें जणु पोळल्या
म्हणुनि संप्रति त्यांस गमे प्रिय
तुहिन-शीतल-भूमि-समाश्रय ९

———

# मकरसंक्रमणनिमित्तं तिलक पंचकम्

प्रखरघर्षणजां कृशतां गतं
ज्वलनतापगरेण च पीडितम्
तिलक, रूपमलोचनगोचर-
मतनु ते तनुते रुचिगौरवम् १

रूपं तवास्ति मलिनं सुभगं न नूनं
लोकोपकारकुशलं गुणसंचयं तु
स्नेहादिकं सुरुचिरं हृदि संनिवेश्य
जातोऽसि हे तिलक सर्वजनस्यमान्य ! २

दूरीकृतो जननभू-सुख-संनिकर्षात्
सांद्रं द्रवं स्वहृदये सततं दधान
कीर्त्या नु किं सुरसशर्करया परीतः
पूर्वाधिकां मधुरतां तिलकोऽद्य धत्ते ३

स्नात्वा जले तपनतापभरं निषेव्य
कृत्वा चिरं ज्वलनकुण्डसमाश्रयं च
तप्तं त्वया तिलक तीव्रतरं तपः किं !
जातोऽसि येन भुवने सुरमानपात्रम् ४

संस्थापितो विपुलकंटकजालमध्ये
बंदीकृतः समुचिते तिलक, स्थले त्वम्
मुक्तिं गतश्च गतितो दिननायकस्य
लोके चिरं भव सखे सुखसेवनीयः ५

# हिमालय वर्णन

( द्रुत विलंबित )

तुहिनसंततिच्या ध्रुव आलया
क्षितितळीं 'नगराज' पदाश्रया
त्रिभुवनश्रुतशुभ्रयशाश्रया
अदितिजां दितिजां मनुजां प्रिया १

निखिल रम्यपदार्थ समुच्चया
विविध विस्मय वस्तु वरालया
कुतल-कौतुक-केलि-निकेतना
शिवसती-वसती-प्रियकेतना २

खरतपश्चरणव्रतसाधना
शुभवनांतर शांत तपोधना
असुर ये सवयस्य हिमालया
नगवरा गवराज धराश्रया ३

गिरिगता सुषमा नयनां हरी
चढति ते बहु मंदपदें वरी
पथि पराशर त्या असुराप्रती
वच वदे चव देति तया अती ४

विदित वर्ण-न गोचित-वर्णना
विदित वर्णन गोचित वर्ण ना

तरि यथामति वर्णन हा करी
सरस वा रसवर्जित तें जरी ५

रुचिर भव्य उदात्त मनोहर
सुगुरु उच्च पुराण नगेश्वर
प्रतिपदीं नयनां नव वाटतो
जनमना नमनाहि यथार्थ तो ६

गहन भव्य सुदुश्चर सर्वदा
सुरुचिरा हरिता तिमिरास्पदा
गिरितलीं विलसे सवनेचरा
सघन-भू-वनभूमि परंपरा ७

सरलसालरसालवटोत्तरा
बकुल पिप्पल-तालपुरःसरा
वसत तेथ असे खगपालिका
पवनपा वनपादपमालिका ८

मधुर पल्लव पुष्प फळें वरी
तरु असे शिरती गगनोदरीं
विबुधवांस गमे इह निर्मिती
ख-वन-देवन देवपदीं क्षिती ९

भिडतसे तरुवर्ग वरी नभा
धरितसे हिमशुभ्र सुमप्रभा
गगन कीं भगणा दिनीं वाटतें
भिरवितें रवितें न जुमानितें १०

सरस कीं ख-मुख-द्युति-चुंबना
सतृष कीं सुरपादपदर्शना
उदित कीं अचलोन्नति निर्णया
दुवर ते वरते रत जावया ११

द्रुमगणें गिरिशें गिरिजा जशी
वरियली शुभपत्रफला तशी
कुसुममंडलमंडनमंडिता
व्रततिसंतती संततसंगता १२

विटपहस्त विशेष समागमें
दृढ परस्परसंगतितें गमे
करुनि नांदति वृक्ष अभेद्य ते
अहृति संहतिसंगत वागते १३

विविध हिंस्र तदन्य पशू किती
वसति आक्रमुनी विपिन क्षिती
विहरती खग चित्रविचित्र ही
अलघु वा लघु वा रमती अही १४

न दलपंक्तितुनी तरुच्या तळा
गति मिळे ख-घनोदरिंच्या जळा
भिजविण्या म्हणुनि क्षितिमेघ कीं
गजपती जपती स्वमदोदकीं १५

जलदगर्जितशी वनतर्जना
हरी करी विततोदर गर्जना

मुदित नाचति मुग्ध मयूर ते !
अवितथीं वितथीं जडधी रते १६

विविध चार यथासुख गोकुळीं
विकृती, रास, विकुंजवन स्थळीं
मुररिपूसम वाघ शुभाकृती
नव नवी वनवीर वरी कृती १७

जपतसे बहु, सत्वपरिग्रहा
रचितसे सुपदक्रमही महा
चहुंकडे निजकार्यवशें भ्रमे
शुक वनीं कवनीं कविसा रमे १८

नयनयुग्म वळे गगनाकडे
हृदय वेधविधींत सदा जडे
उडुसमागम मानस आदरी
इह वराह वराहतुला वरी १९

विसवर्ण विकास विराजवी
विकलता चरणीं स्फुट दाखवी
प्रगटवी असदुक्ति न तो कसा ?
तरस नीरस नीच कवी जसा

नयन कृष्ण विशाल सुचंचल
तनु सतेज मनोरम कोमल
गति सुशीघ्र अशी हरिणावली
विचरते चरते कुश-भू-वरी २१

निपजवी स-विषाणमहाद्भय
वदन शोणित नेत्र मनीं भय
महिष वन्य असे फिरती वनीं
यम न दे मन देखुनि वाहनीं २२

असित-लोहित-वक्रवती कुठें
विततपुच्छ-विपुच्छ-भरा कुठें
विलसते चटुला विविध स्थळीं
नवनवा वन-वानर मंडळीं २३

विकट कज्जलशैल समाकृती
विपुल सांद्र सुघोर तमस्तती
तदुदरीं सुखवास तरी सदा
तुरविती रवि-तीव्रमहोमदा २४

यवस जाल विशृंखल वाढतें
तरुतल ग्रसनोत्सुक भासतें
सदय त्यां जणुं पालविती लया
भुजगराज गराग्निवशें तया २५

रविकरच्छुरिताग्रदलोच्चया
रजनि वासर रंगति संशया
निपजवी मनिं, ती निरखीं प्रभू
कृततमा ततमाल-तमाल-भू २६

जपरता परताप विनाशिनी
स्व-परताप-रता श्रुतिसेविनी

स्व-पर-ताऽपरता मुनिमंडळीं
इह वनीं हवनीं वितरी बळी २७

शतशुचींद्रशराशनसंश्रय
अचल हा अमिताक्ष सुरां प्रिय
भिरवितो बहु नंदनकानना
पदिकरा विकराल विडंबना २८

विविधवर्णविहंगम-मंडळी
विलसते ततपक्ष खमंडळीं
मज गमे चलदिंद्र धनुःप्रभा
विहरते हरते मन दुर्लभा २९

रविकरासमुज्वलता वरी
तुहिन शीतल पादतती धरी
मृगशशौषधिपालनही करी
भवर भूवर भूधरता धरी ३०

न करितां सुरमस्तक मंडना
न करितां जनमानस रंजना
इह सुके फुलली कुसुमावली
अजनि वा जनि वा न कळे भली ३१

विलसती विपिनीं ज्वलदोषधी
बघुनि त्यां कुतुकाकुल होय धी
तिमिर सागर वेष्टित त्या तशा
गमति कां प्रतिकांत न बेटशा ३२

कनकराजतताम्रमुखा जशी
विविधमौक्तिकरत्नमयी तशी
उदरिं वागवि पार नसे जिचा
खनिजता निज तात भवानिचा ३३

गिरिवरी सकलेंद्रियमोहन
गहन दुर्गम निस्तुल पावन
बघुनि सृष्टिसुवैभव तें मनीं
न जड तो जडतो प्रभुचिंतनीं ३४

घन नगाक्रमणा चढतां वरी
क्रमिति अर्ध पथास सरासरी
न जलवृष्टिस ते परि सुश्रमें
श्रमजला मजला त्यजिती गमें ३५

हिमनगा जलरूप सुता किती ?
असति ती करवेल कुणा मिती
बघुनि हृद्य विलक्षण तत्कृती
मन वरी नवरीति चमत्कृती ३६

धरिति मार्ग अधोगतिचा जरी
विविध जंतुस उद्धरिती तरी
पचविती मळ पाप परोपरी
भुवन पावनपात्र सदा तरी ३७

जनकमंदिरलोभ न तोडवे
पतिसमागम सौख्य न सोडवे

उभय–सिद्धिस यास्तव त्या किती
असुकरा सुकरामत दाविती ३८

पितृपदीं तनु मागिल ठेउनी
सुरस दूरवरी मुख सारुनि
सतत राखुनि ही तनुची स्थिती
अदर सादर सागर चुंबिती ३९

कुटिल मार्ग सदा अवलंबिती
निपट त्या पट दोन उभारिती
उचित वृत्ति जरी परिलंघिती
परहिता रहितावधि साधिती ४०

धराण धनुस पाडस होतसे
रुचिररत्न महौषधि पीतसे
अजुनि तद्गत पुष्टि नगीं वसे
कशि खरी शिखरीश-कथा नसे ४१

" अचलराज " यथार्थ गमे कृती
विविधतीर्थजलार्द्र शुभाकृती
कनकवेत्र-विभूषित सन्महा
चमरचामरचालनचारु हा ४२

सर ससारससार्थ नगावरी
कमल-कोमल-कोश खुला करी
सकळ तें कळतें अलि याचकां
चपळ ते पळ तेथ न घेति कां ? ४३

शिखर संकर दीर्घ परंपरा
वरिवरी उसळे हिमपांडुरा
दिसतसे जंव ती गगनस्पृशा
उपरि ती परि ती नच दृग्वशा ४४

धवलदुग्धपयोनिधिपृष्ठभू
उरु तरंग खरंग नटप्रभू
विधिवशें घनरूप तयांवरी
स्वशिखरीं शिखरींद्र गमे करी ४५

शिखररूप गमे विलसे नगीं
तुहिन-जंगल विस्मय-भू जगीं
पथिक दृष्टिस दुःश्चर तें जरी;
अपरती परती नच ती तरी ४६

तुहिन शुभ्र सहस्र शिरांवरी
अचल राज सुरालय सांवरी
अहिपति प्रतिमा नृमुदा भली
सुविधिनें विधिनें जणु निर्मिली ४७

कांताऽऽरवा सरसदानकरी नरा जी
कांतारवास-रस दा न करी न राजी
कस्तूरिकापरिणपंक्ति सुखें विहारा
या पर्वतीं करितसे द्रुमभृंगभारा ४८

राजी वसे वन-वशा-गजराज यांची
राजीवसेवनवशा, गजरा जयांची

तुंडावली करितसे पळतां भयानें
ऐकोनि या नगवरी हरि शब्द कानें ४९

( श्लोक )

हरित सन्न गमंडन मानस
हरित-सन्नग-मंडन मानस
स्मरु-सारस-सार-समाकुल
‌ु ‌ ‌सार ससारस माकुल ५०

( आर्या )

सुरसाधरावरी ते शिवा सकुतुका गिरीशजा या हो
सुरसाधरा वरीते शिवास, कुतुका गिरिशजाया हो ५१

धरा धराया महती समान
धराधरा या मह तीसामान
धरा धरायामहतीस मान
धराधरा या महती समा न ५२

× × ×

( वरील उतारा " गजासूर वध " नामक अपूर्ण प्रकाशीत काव्यांतील आहे. गजासूर आणि कारणपरत्वें झालेला त्याचा मित्र ' पराशर ' नांवाचा ब्राह्मण ह हिमालयावर नपश्चर्येकरितां जात आहेत. )

———

# — व्हिक्टोरिया मरण —

( महाराणी व्हिक्टोरिया यांचा जन्म ता. २४ मे १८१९ रोजीं झाला. २२–२–१९०१ रोजीं त्यांचा काळ झाला. महाराणीचें विस्तृत राज्य व थोर वैभव आणि त्यांचें सौजन्य हीं सर्वश्रुत आहेत. त्यांच्या मरणकाळीं त्यांस उद्देशून भरतभूमीचे हे उद्वेगपूर्ण दुःखोग्दार कवीनें दाखविले आहेत. )

तूं भाग्यशाली जगदेकदेवी
श्री राजलक्ष्मी तुज नित्य सेवी
शिरावरी छत्र तुझ्या विराजे
लोकीं यशोदुंदुभि थोर गाजे १

विद्या-कला-पोषाणिं सुप्रसिद्ध
दंडावया शत्रुजनांस सिद्ध
समुद्र म लांकित भूमिमाय
सेवी तुझें शासन अद्वितीय २

रात्रंदिनीं रम्य विकासलीला
त्वदीय राष्ट्रावलि-पंकजाला
सुशोभवी, कारण त्या रवीचा
नाहीं कधीं माहित अस्त साचा ३

संग्राम-चातुर्य-चमत्कृतीच्या
लीला अनिर्वाच्य तुझ्या चमूच्या
पराजिता जी विधी-दुर्वियोगें
वाटे जयश्रीसह येत मागें ४

सुशोभिनी राष्ट्र-सुरत्नमाला
त्वत्कंठदेशीं रुळते विशाळा
तन्मध्यभागीं विपुल प्रकाश
मी शोभतें कौस्तुभशी विशेष ५

तूं चक्रवर्ती भुवनत्रयांत
सदा सुखें वागविशी करांत
अनेक सामंत परंपरेला
तशी जशी कंकण मालिकेला ६

हा ! हा ! तुझा जीवितकाल बाई
एव्हांच कां खुंटतसे अगाई !
अखंड भूमंडल अश्रु सोडी
मदीय दुःखा परि नाहिं जोडी ७

मत्संपदा देखुनियां अपार
घाली स्वयें बोट मुखीं कुबेर
बाई तुझ्या ती पद-सेवनाला
दिली, न मीं ठेविली आपणांला ८

पोसावया भूतल हें अशेष
समर्थ माझा गुरु धान्यकोष
हातीं दिला मीं तव बालकांच्या
त्यां वेदना होऊं नये क्षुधेच्या ९

ठोकूनियां दंड रणांगणांत
प्रत्यक्ष जे कांपविती कृतांत

माझे कसे सांघिति पुत्र लोकीं
असुव्ययें त्वद्धित तें विलोकीं १०

एवंच सर्वस्व मला मिळालें
तें दों करांनीं तुज वाहियेलें
सेवा तुझी नित्य करावयाला
आत्माच माझा तुज आर्पियेला ११

या स्तुत्य थोर उपकार-परंपरेची-
राहोच तें; मज नसे मुळि चाड त्याची
होतां परी स्मरण एक सुदिर्निवार
वाहे अहा ! दशदिशीं मम शोकपूर १२

अठ्ठावनांत वचनें बहु गोड गोड
जी तूं स्वयें मज दिली जगिं ज्यां न जोड
तीं अल्पही पुरविण्या तुज दे न वेळ
हा ! हा ! कसा सकल भक्षक दुष्ट काळ १३

त्यांतें तुझे प्रतिनीधी वदती अशक्य
त्वत्पुत्र तीं परि करो सगळीं सुशक्य
ही एवढीच जगदीशपदीं विनंती
आत्मा तुझा अनुभवो चिर सौख्य शांति १४

# कै. महादेव गोविंद रानडे.

न्यायमूर्ति रानाडे हे तारीख १८ फेब्रूवारी १८४२ रोजीं जन्मले. १६–२–१९०१ रोजीं ते परलोकवासी झाले. थोर विद्वत्ता विशाल ज्ञान, मुत्सद्दीपणा, सार्वजनिक हित करण्याचा निदिध्यास, वगैरे गुणांचे ते केवळ सागर होते.

( श्लोक )

हा ! हंत ! हंत ! कविते अभगे मदीय
दुर्दैव दुःसह तुझें तुज भाग योग
येणें बळेंची कवितात्मक-शोक-रंगीं
या मर्त्य-लोक–मणिच्या निधन-प्रसंगीं १

पृथ्वीतल प्रचलिता पृथु आंग्लवाणी
जी मानिनी नच गणी निज अन्य कोणी
ती रानडे-कुल-शिखा-मणिनेंच केली
सेवावया सतत तत्पर पादधूली २

वर्णी अलंकृति. गणां रससंचयास
जीच्या बघोनि सुरहि भुलतात खास
गीर्वाणवाग्रमणिच्या हृदयास मोह
पाडी जनीं अतुल हा नर-सिंह-सिंह ३

त्याचे मनीं सकल वाङ्मयता मराठी
प्रेमें वसे रचुनि दुर्घट पूर्ण गांठी
पाश्चात्य-पूर्व-धरणी-स्मृति-शास्त्र-लीला
त्याचे करी स्मरण मंदिरिं नित्य लीला ४

विद्या अनेक गमत रसनामिषानें
त्याचे मूखीं करुनि वास महा-सुखानें
होतात संप्रति निराश्रित हाय ! हाय !
शोधावया जगातिं हिंडती योग्य ठाय ५

दोष-क्षमा-सु-शरदुत्सव नित्य होई
सक्रोधता-जलद-काल कधीं न येई
तन्मानसीं म्हणुनि होउनियां निवासी
क्रीडा यथा सुख सदा करि शांतिहंसी ६

सूत्राशिवाय सुमनोहर पुष्प माला
कीं कौमुदीवि ण लोपावितां विधूला
झाली तशी भारतभू नर—पुंगवाचे
मृत्यमुळें विकल, तें कथवे न वाचे ७

एव्हांच या सकल-भूतल भूषणाला
नेईल अंतक असें न गमे कुणाला
काळा तुझे उदरिं काय असेल याचा
लागे न दीन मनुजा मुळीं ठाव साचा ८

विद्या-विशिष्ट-जन-मंडन मान्य—मान्य
नीतिज्ञ सत्व-गुण-पात्र उदार धन्य
सुश्लोक थोर मदहीन अतुल्य हाय !
जन्मा असा पुरुष येईल अन्य काय ! ९

होवो तया सुखद मार्ग नभस्तलींचा
होवो तया सुखद वास सुरालयींचा

स्वर्गीं तया विपुल सत्कृति-लाभ होवो
आत्मा तदीय सुख शांति अखंड सेवो १०

---

## कै० गोपाळ कृष्ण गोखले

तेजस्वी रविता कुठेंच नुकता स्वर्णप्रभा फेंकुनी !
होता सृष्टि सुरंजिता करितही निःस्वार्थ आनंदुनी
हा ! हा ! केतु सुवेग तोंच तनुला ग्रासी तयाच्या असा
रे मृत्यो, अधमा, तसाच अमुचा गोपाळ नेला कसा ? १

रे या भारतभूमिभालतिलका ! सौभाग्यदायी अशा !
दुष्टा तूं पुसुनी महीस विधवा केलें खरें दुर्यशा !
झाली दीन पशो, फिकीच पडली शोकानलें ही पहा !
जैसी कौस्तुभहीन माळ हरिची झाली तशी कीं अहा ! २

वाग्देवीहृदयारविंदधुपोत्तंसा, सखे, हें असें—
केलें बा सहसा प्रयाण सदया लोकांतरीं कां ? कसें ?
आर्यांना दिधलें समान अगदीं दुःखास गोपाल, या !
मागें धांवति हे सुमित्र बघण्या सोडूनि आप्तालया ! ३

साधो लजविशील शारद शशी तेजस्तरंगासही !
ऐसें आमरणान्त राखुनि तुवां ही भूषवीली मही !
भोगाभोग्य विपूल ! शक्ति तशि ही लाभूनि जो वेगळा
कोठें अन्य मिळे महीतळिं असा गोपाळकृष्णागळा ? ४

द्याया स्वागत थोर निर्जरगणीं दाटूनि गेलें नभ !
तैसी भूमिहि मानवीं हलतसे कंपीत ही निष्प्रभ !
मृत्यूला चुकला सुरासुरिं असा नाहींच कोणीपरी !
दीना ! या तव कन्यका मृदुमना ! झाल्याच विश्वोदरीं ५

गाजे या भुवनीं तुझा नरमणे कीर्तीपटाहध्वनी !
कैसें वर्णवती मला गुण बरें ? दुःखी असें मी मनीं !
झालें विश्व असे निमग्न पुरते शोकीं तरीं संप्रती !
नाहीं लेखनिं शक्ति अश्रु नयनीं मातें अहा रोधिती ६

---

## पुण्यश्लोक अण्णासाहेब पटवर्धन यांचा मृत्यु

कष्टं ! कष्टं ! कठिनहृदयः क्रूरकर्मा कृतान्तः
प्राणान्ताख्यं त्वयि मुनिवरे यन्नृशंसं चकार
आकर्षन्ती नयनसलिलं दुःसहा तस्य वार्ता
कर्णं भित्त्वा विशति हृदयं शस्त्रधारा नु तीक्ष्णा १

शान्तं दान्तं मधुरवचनं प्राप्तयोगप्रभावं
पुण्यश्लोकं परममहितं देवपर्यायमत्र
स्मारं स्मारं स्मरणविषयं प्रापितं त्वां यमेन
दुःखोद्वेगाद्द्रवति हृदयं मानवानां न केषाम् २

आयुर्वेदस्तमसि गहने सीदति प्राप्तखेदः
भिक्षापात्रं भजति विवशा लोककल्याणदीक्षा

जाता लोके शरणरहिता हन्त वैराग्यवृत्तिः
पुण्यक्षेत्रं त्वयि मृतिवशे शोकपंके च मग्नम्

मूल्यातीतं भवनमहितं कीर्तिकान्त्या प्रदीप्तं
क्षेमस्थानं नरवरमणिं त्वादृशं चोरयित्वा !
मन्ये जातः परमनिपुणः कालचोरः कृतार्थो
दर्पावेशाज्जगदिदमसौ विकरोतीव दीनम्

भवतु समुचितं ते स्वागतं स्वर्गमार्गे
पततु तव कृपार्द्रो दृष्टिपातोऽत्र लोके
व्रजतु सफलतां ते कांक्षितं यत्नसिद्धं
अनुभवतु च तेऽयं शाश्वतीं शान्तिमात्मा

---

# — शुद्धिपत्र —

## प्रस्तावना

| पृ. | ओळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|---|
| १ | १ | तूंतें | तूतें |
| १ | १ | करिशी | करिशि |

## — कालचक्र —

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | १७ | शुष्यत्तृणाच्छादित | शुष्कतृणाच्छादित |
| ६२ | १४ | अलिरुप | अलिरूप |
| २८ | २ | वाहति | बाहति |
| ३१ | २० | प्रभू: तें | प्रभू तें |
| ८३ | ८ | कुटिलस्वयुक्ता | कुटिलत्वयुक्ता |

## — फडणीस काव्य —

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | १ | पदापंकजातें | पदपंकजातें |
| ४५ | १८ | होन | हो न |
| ८४ | ८ | सांग | सांब |
| ५३ | २ | परस्परप्रीतिरसार्द | परस्परप्रीतिरसार्द्र |
| ५६ | १८ | वदनेंदु बी | वदनेंदुची |
| ६६ | १३ | साचे | साजे |
| ७२ | १९ | घेऊनि तो | घेऊनि जो |
| ७३ | १ | अध्वखेदप्रशमार्थ | अश्वखेदप्रशमार्थ |
| ८१ | ६ | दुत | द्रुत |
| ८४ | ९ | यमचोर | यम चोर |

| | | | |
|---|---|---|---|
| ९३ | १ | पॅरा | परी |
| ५०१ | ७ | साम्योक्तीच्या | सौम्योक्तीच्या |
| ११६ | १ | सुधीरण्याचा | सुधारण्याची |
| ११९ | २० | असना | असेना |
| १२० | २२ | संगरभूंत | संगरभूत |
| १३० | १३ | आतिगुप्त | अति गुप्त |
| १३१ | १६ | विनय | विनत |
| १३३ | २१ | निजहात | निज हात |
| १३७ | ५ | विप्रवीर | विप्र वीर |
| १४२ | १२ | आला | झाला |
| १४८ | १७ | लागणार | लाभणार |
| १५० | १० | गाढशोकीं | गाढ शोकीं |
| १५२ | १८ | हाहा | हा हा |

## —मोरोपंतांचा अभुद्रोह—

| | | | |
|---|---|---|---|
| ४६१ | ११ | सकल-वर्ग वर्णांतली | सकल वर्गवर्णातलीं |
| १६६ | २ | बहुबलाढयही | बहु बलाढयही |
| १६६ | ६ | यशसंपदा | यशः संपदा |
| ६७१ | ६ | जनेंद्रदेंहावरी | जननेंद्रदेहावरी |
| १६९ | ४ | प्रसुसि | प्रभुसि |
| १७० | २२ | वकलि | वकील |
| १७७ | २ | प्रवस–वेदनांची | प्रसव -वेदनांची |

## — आर्यमाता विलाप —

| | | | |
|---|---|---|---|
| १८४ | १६ | दुततर | द्रततर |
| १८८ | ९ | तचित्त | तच्चित्त |
| १८९ | २ | ससत्त्व | सुसत्त्व |

| | | | |
|---|---|---|---|
| १९१ | २ | नयप्रह्नसक्र्मीं | नयप्रहसनक्र्मीं |
| १९३ | १२ | वासना | वास ना |
| १९८ | ८ | तद्द:खानदग्ध | तद्दु:खानलदग्ध |
| १९९ | २ | ाह ! हा! हाय! | हा! हा ! हाय! |
| २०४ | ९ | अथवा | अवघा |

## —महाराष्ट्र वीरादर्श काव्य—

| | | | |
|---|---|---|---|
| २१० | ५ | येता | येतां |
| २१२ | १६ | क्रुर | क्रूर |
| २१७ | १४ | अगळा | आगळा |
| २१९ | ६ | परणती | परिणती |
| २१९ | १० | सांडूनि | सांडुनि |
| २१९ | १४ | अंतुर्मूखत्वा | अंतर्मुखत्वा |
| २२१ | १० | वानीना | वानी ना |
| २२१ | १० | शिवाजीनृपा | शिवाजी नृपा |
| २२१ | ११ | नाम सार्थ | नामें सार्थ |
| २२४ | १४ | नभाभ्यंतरीं | नभाभ्यांतरीं |
| २२६ | १७ | निद्राज्येष्ठसहोदरांकगत | निद्रा ज्येष्ठ सहोदरांकगत |

## —गजासुर वध—

| | | | |
|---|---|---|---|
| २३७ | ६ | पुरीसंन्निध | पुरी संन्निध |
| २३७ | १६ | शववस्त्र | शव वस्त्र |
| २४२ | १६ | गजासूरांगीं | गजासुरांगीं |
| २५२ | १९ | सततदंतवशे | सतत दंतवशें |
| २५५ | १७ | सत्रस्त | संत्रस्त |
| २५६ | ५ | वा तें | वातें |
| २५९ | १४ | उदिष्ट-हेतुमय | उद्दिष्ट-हेतुमय |

## — किरातार्जुनीयांचें रुपांतर —

| | | | |
|---|---|---|---|
| २६८ | १७ | स्नेह संपदाबास | स्नेहसंपदावास |
| २७९ | १६ | सरसावतारणाला | सरसावता रणाला |
| २९० | ६ | दुपदबाळा | द्रुपदबाळा |
| २९३ | ११ | दुपदसुतावाणी | द्रुपदसुतावाणी |
| ३०५ | ५ | पूरें | पुरें |
| ३०५ | १८ | श्रीगिरिवरि | श्री गिरिवरि |
| ३०६ | ३ | जन्मजरासुक्त | जन्मजरामुक्त |
| ३१२ | ५ | शाखारुपीं | शाखा रूपीं |

## — जहाल आणि मवाळ —

| | | | |
|---|---|---|---|
| ३१५ | १७ | मावाळां | मवाळां |
| ३१६ | १ | स्वकरीं | स्वीकरीं |
| ३१६ | १३ | ऋद्धिसिद्धि | ऋद्धिसिद्धी |
| ३१७ | ७ | लेशधीर | लेश धीर |
| ३१७ | ८ | षंढवीर | षंढ वीर |
| ३१८ | १० | स्नेहवृद्धीस | स्नेह वृद्धीस |
| ३१८ | ११ | कार्यवैफल्पमुद्रा | कार्य वैफल्यमुद्रा |
| ३२२ | ४ | स्वदृष्टिपुढें | स्वदृष्टीपुढें |
| ३२४ | १६ | मुक्तबंधीं | मुक्त बंधीं |
| ३२५ | १९ | मान्यतत्व | मान्य तत्व |
| ३२७ | ३ | पुत्रपाळी | पुत्र पाळी |
| ३३१ | १३ | स्थिति | स्थिती |
| ३३२ | २ | पश्चातापवशें | पश्चात्तापवशें |

## — दैवाचा खेळ —

| | | | |
|---|---|---|---|
| ३३७ | २ | पळवी | पळती |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३७ | १९ | शस्त्रा स्फालंजहुताशनज्वाला | शस्त्रास्फालनहुनाशनज्वाला |
| ३३७ | २० | नरनीरधलावलीनें | वरनीरधलावलिनें |
| ३३८ | ८ | शद्धीं | शुध्दीं |
| ३३८ | १७ | राजीव-राजि-रावित | राजीव-राजि-सेवित |
| ३४० | ५ | चरणांगुष्टावरिही | चरणांगुष्ठावरिही |
| ३४० | १७ | कुसुमाश्रुतरू | कुसुमाश्रु तरू |
| ३ १ | १३ | आजानुपाणि पद्मीं | आजानुपाणिपद्मीं |
| ३४३ | १७ | गृह | गृहा |
| ३४५ | १० | कुचकुंभाश्चय | कुचकुंभाश्रय |
| ३४५ | २० | विलय-वय | विलय-वश |
| ३४६ | ६ | येईल | येइल |
| ३४८ | ८ | हारिखाकुलं | हरिखाकुल |
| ३४८ | ९ | वृतांत | वृत्तांत |
| ३४८ | १४ | शीघ्र | शाघ्रं |
| ३४८ | १७ | भात्रा | भ्रात्रा |
| ३४८ | १८ | समानरपतिः | समा नरपतिः |
| ३४८ | २० | पदस्मविशति | पदं स्म विशति |

## — स्फु ट क वि ता —

| | | | |
|---|---|---|---|
| ३५१ | १ | श्री धाम्नि | श्रीधाम्नि |
| ३५१ | ९ | गलद्मसिक्तमूलः | गलद्मदसिक्तमूलः |
| ३५१ | १७ | छित्वापियस्य | छित्त्वापियस्य |
| ३५२ | ११ | मंगल दैवतानम् | मंगलदैवतानाम् |
| ३५३ | ७ | दतांकुरः | दंतांकुरः |
| ३५३ | ८ | बालेन्दूनातिशुचिना | बालेन्दुनातिशुचिनां |
| ३५३ | ११ | येताऽखिल | यतोऽखिल |
| ३५३ | १५ | भृंगलामा | भृंगमालां |
| ३५३ | १६ | तटस्त्रवदंबुवर्षम् | तटस्रवदंबुवर्षम् |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५३ | २० | दासस्यदास शुभं | दासस्यदाससशुभं |
| ३५४ | १ | विव्दन्मणेस्तितिलक | विव्दन्मणेस्तिलक |
| ३५४ | ३ | दिशीदिशी | दिशिदिशि |
| ३५४ | ५ | परिकीर्तीत | परिकीर्तित |
| ३५४ | ७ | हियस्य | हि यस्य |
| ३५४ | ९ | विजय वर्णन वैजपन्नी | विजयवर्णनवैजपन्ती |
| ३५४ | १० | जयन्ति | जयन्ती |
| ३५४ | १३ | दारिद्र | दारिद्र्य |
| ३५५ | ११ | दलनाथ | दलनाय |
| ३५५ | १५ | बिव्दन्मणेतिलक | विव्दन्मणेस्तिलक |
| ३५६ | १ | दलितु | दलितुं |
| ३५६ | १३ | वाहनवेषभेदम | वाहनवेषभेदम् |
| ३५७ | ११ | इत्यमिख्यां | इत्यभिख्यां |
| ३५९ | ७ | यस्माग्रपूजा | यस्याग्रपूजा |
| ३५९ | ९ | वृध्दया | वृध्दया |
| ३५९ | ११ | गजानतेति | गजाननेति |
| ३५९ | १२ | कृपाकटाक्षात्करुते | कृपाकटाक्षात्कुरुते |
| ३६० | ९ | दूर्वांकुरैंभक्तिरसेन | दूर्वांकुरैंभक्तिरसेन |
| ३६१ | २ | धृवेति प्रधयन | ध्रुवेंति प्रथयन् |
| ३६१ | ७ | स्फुरन्तमि् | स्फुरन्तीम् |
| ३६१ | १७ | जयुत | जयतु |
| ३६१ | २० | देवो | देवः |
| ३६२ | २ | प्रतिभावत्तांसि | प्रतिभावत्तांसि |
| ३६६ | १४ | मोदकर | मोदकरम् |
| ३६२ | १५ | संस्नतितापभाजाम् | संसृतितापभाजाम् |
| ३६४ | ४ | रसिकांतराणी | रसिकांतराणि |
| ३६४ | ७ | स्वभक्तविघ्नः | स्वभक्तविघ्नाः |
| ३६५ | १४ | घोषयन्ति | घोषयन्ती |
| ३६५ | १५ | भुंगावलिर्गुंज्जति | भृंगावलिर्गुंजति |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६५ | १७ | मुर्ध्ना | मूर्ध्ना |
| ३६५ | १८ | सुचयन्तु | सूचयन्तु |
| ३६६ | १ | दुर्वाकुरान् | दूर्वांकुरान् |
| ३६७ | ६ | जनानाम | जनानाम् |
| ३६७ | १३ | यस्याघ्रिपद्मं | यस्यांघ्रिपद्म् |
| ३६७ | १८ | यश्चिकार्षु: | यश्चिकीर्षु: |
| ३६९ | ४ | यस्याग्रपुजाख्यमिद | यस्याग्रपूजाख्यमिदं |
| ३६९ | | सिध्दकण्ठे | सिध्दिकण्ठे |
| ३७० | ५ | विन्घाख्यदवानलेन | विघ्नाख्यदवानलेन |
| ३७० | १० | चरितक्रम य: | चरितक्रमो य: |
| ३७१ | ३ | ददो | ददौ |
| ३७२ | ५ | खल | खलु |
| ३७३ | ७ | कविच | कविंच |
| ३७४ | ५ | –सुरवदर्शमार्थ | सुखदर्शनार्थं |
| ३७४ | १२ | भीतीम् | भीतिम् |
| ३७६ | १,२,४ | - कायम | कायम् |
| ३७६ | २१ | शरण | शरणं |
| ३७७ | १६ | स्फुरती | स्फुरति |
| ३८० | १२ | चेत्व | चेत्त्वं |
| ३८२ | २ | मंगलमूर्ति | मंगलमूर्ति |
| ३८२ | ४ | सृष्ठि: | सृष्टि: |
| ३८२ | ९ | पुजय | पूजय |
| ३८२ | १९ | -विषयध्यनिनालम् | -विषयध्यानेनालम् |
| ३८३ | ८ | प्रणवस्तिष्टति | प्रणवस्तिष्ठति |
| ३८४ | ५ | आणुहुनि | अणुहुनि |
| ३८४ | ८ | सच्चिदानंद रूपा | सच्चितानंदरूपा |
| ३८४ | १० | प्रणामी | णामीं |
| ३८५ | २१ | वा | बा |
| ३८७ | ८ | यांचे जणु | याचें जणू |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८७ | १४ | नभचित्रपटीं | नभश्चित्रपटीं |
| ३८८ | ७ | मुकुंदवक्षस्थल | मुकुंदवक्षः स्थल |
| ३८८ | १० | धनुश्री | धनुःश्री |
| ३८८ | ११ | उज्वल | उज्ज्वल |
| ३८८ | १७ | प्रकाशवर्गीकरणीक्रयेचा | प्रकाशवर्गीकरणक्रियेचा |
| ३८८ | २१ | तत्व गमे जगला | तत्त्व गमे जगाला |
| ३८९ | ३ | अधिष्टितां | अधिष्ठितां |
| ३८९ | ५ | वक्तशील | वक्रशील |
| ३८९ | ९ | पदोदपटलीं | पयोदपटलीं |
| ३९० | २२ | पातली | पातलि |
| ३९१ | १४ | अंतरीं | अंतरिं |
| ३९२ | १ | जे | जें |
| ३९२ | १४ | लाविती | लाविति |
| ३९३ | ८ | दिसें | दिसे |
| ३९३ | २२ | दृष्टी पडे अंधूक | दृष्टी पडे अंधुक |
| ३९५ | १३ | वित्तवियोगरुपी | वित्तवियोगरूपी |
| ३९५ | १९ | येऊनी | येउनि |
| ३९६ | २१ | चाऊनि | चाउनि |
| ३९७ | ७ | लाजशी | लाजशि |
| ३९७ | १४ | गाडिली | गाडिलि |
| ३९८ | ३ | चित्तिं | चित्तांत |
| ३९८ | ८ | लोटूनि | लोटुनि. |
| ३९९ | २ | कढण्या | काढण्या |
| ३९९ | १४ | निष्टुर | निष्ठुर |
| ४०० | ९ | भूषगा | भूषणा |
| ४०१ | ७ | प्रकर्षद्युतीचे | प्रकर्षद्युतिचें |
| ४०१ | ११ | पंक्ती | पंक्ति |
| ४०१ | १८ | गुणान्वये | गुणान्वयें |
| ४०१ | १९ | नाकची | नाकचि |

| | | | |
|---|---|---|---|
| ४०१ | २० | ते | तें |
| ४०१ | २१ | हस्ती खुटिले | हस्तीं खुटिलें |
| ४०२ | १ | फुल पुरे | फूल पुरें |
| ४०२ | ५ | वर्णे सुगंधे | वर्णें सुगंधें |
| ४०२ | ७ | मनासी | मनासि |
| ४०२ | १२ | अंती | अंतीं |
| ४०२ | १२ | पुष्पयोगे | पुष्पयोगें |
| ४०३ | ९ | अध्व-श्रमे | अध्वश्रमें |
| ४०३ | १८ | ओति | ओती |
| ४०४ | १ | कुंकमरसें | कुंकुमरसें |
| ४०६ | ५ | ग्रथीक | ग्रंथिक |
| ४०६ | ७ | जना या | जनांच्या |
| ४०६ | १५ | म्हणुनि | म्हणूनि |
| ४०६ | १८ | निष्कांतिस्तव | निष्क्रांतिस्तव |
| ४०६ | २२ | सोम्यनामक | सौम्यनामक |
| ४०७ | ८ | शिपूनि | शिंपुनि |
| ४०८ | ३ | चित्ती | चित्तीं |
| ४०८ | ९ | देवत्व देवत्व | देवत्व |
| ४०८ | १४ | सदा ते जय | सदा तें जय |
| ४०८ | १५ | नैय्यापिकोक्तीपरी | नैयायिकोक्तीपरी |
| ४०८ | १६ | चंद्राचे | चंद्राचें |
| ४०९ | ७ | खोटे दूषण दूर्जनीं | खोटें दूषण दुर्जनीं |
| ४०९ | १० | प्रवित्र | पवित्र |
| ४०९ | १७ | धर्मगाण | धर्मत्राण |
| ४०९ | २१ | भार निभय | भरी निर्भय |
| ४१० | १ | महा | मही |
| ४१० | ११ | श्रा शंभु | श्रीशंभु |
| ४१४ | १४ | क्षुत्क्षाम कंठे | क्षुत्क्षामकंठे |
| ४११ | १ | निजवंश | निजदंश |

| | | | |
|---|---|---|---|
| ४११ | ७ | ग्रथिक | ग्रथित |
| ४१३ | १३ | सेवीतां | सेवितां |
| ४१४ | १७ | पुढें जो कर | पुढे जों कर |
| ४१४ | १९ | दानींन तूं | दानीं न तूं |
| ४१७ | १५ | वदावया | वंदावया |
| ४१७ | १६ | धन्य ते | धन्यते |
| ४१९ | १० | दाना मधें | दानामधें |
| ४२० | १९ | क्रुर | क्रूर |
| ४२१ | २२ | कीर्तीपूर | कीर्तिपूर |
| ४२३ | २ | शोभवि | शोभवी |
| ४२४ | २ | संलापा मृत वर्षणेंश्रूतिपुटीं | संलापामृतवर्षणेंश्रुतिपुटीं |
| ४२४ | ९ | बिनवति | विनविती |
| ४२४ | १४ | अर्पूनिशिरीं | अर्पूनिशिरीं |
| ४२६ | ५ | मारुनी | मारुनि |
| ४२७ | ८ | सर्वंजनस्यमान्य | सर्वजनस्यमान्यः |
| ४२७ | १० | दधान | दधानः |
| ४२८ | १ | ध्रृव | ध्रुव |
| ४२९ | ६ | नमनहि | नमनाहि |
| ४२९ | २१ | दिनीं | दिनिं |
| ४३० | २२ | हरी | हरि |
| ४३१ | ४ | विकृती | विकृति |
| ४३५ | ११ | धराण धनुस | धरणि धेनुस |
| ४३६ | ११ | दुःश्चर | दुश्चर |
| ४३६ | १३ | सहत्र | सहस्र |
| ४३६ | १९ | कस्तूरिकापरिणपंक्ति | कस्तूरिकाहरिणपंक्ति |
| ४३६ | २० | धृ भृंगभारा | धृतभृंगभारा |
| ४३७ | २ | नगवरी | नगवरीं |
| ४३७ | ८ | गिरशिजाया | गिरीशजाया |
| ४३७ | १० | तीसामान | तीसमान |

| | | | |
|---|---|---|---|
| ४३८ | ७ | मलांकित | मालांकित |
| ४३९ | २० | होऊं | होउं |
| ४४२ | १ | गमत | गमती |
| ४४२ | २ | मूखी | मुखीं |
| ४४२ | ४ | मोग्य | योग्य |
| ४४२ | ९ | पुष्य माला | पुष्पमाला |
| ४४२ | १० | कौमुदग्रि ण | कौमुदीग्रहण |
| ४४२ | १९ | अतुल्प | अतुल्य |
| ४४२ | २० | येंईल | येइल |
| ४४३ | ११ | वाग्देवीहृदयारविंदधूपोत्तंसा | वाग्देवीहृदयारविंदमधुपोत्तंसा |
| ४४३ | १५ | लजविशील | लाजविशील |
| ४४३ | १६ | राखुनि | राबुनि |
| ४४५ | ४ | नरवरर्भाणि | नरवरर्मणि |
| ४४५ | ६ | दर्पाविशाज्जगदिदमसी | दर्पाविशाज्जगदिदमसौ |

# टिपा

## कालचक्र

पृ. ६ नाकवास :—स्वर्ग. ७ गोवृंद :—गाईंचा कळप. ८ सराग :—प्रेमानें. ११ शरत्केलिचा:—पावसाळ्यांतील. १२ तापः—ऊष्णता, त्रास. धूम्रतुषारराशी:—पांढरे ढग. दक्षिणाशा :—दक्षिण दिशा पक्षीं दक्षिणा मिळण्याची आशा. १३ द्युतीचा :—तेजाचा. तरुच्चयः—वृक्षसमुदाय. स्थाणुसमानः—शंकर, झाडाचा खुंट. अपर्णाः—पानें नसलेली, पार्वती. पादपाली :—वृक्षांची ओळ. पर्णचैला : वस्त्रा. १४ निष्पेपयंत्रस्थितः—चरकांत असलेला. तिंतिडिः—चिंच. मरीचीः—सूर्य. धनाचीः—धन राशीची. सुमिश्र :—खिचडी. १५ पूग फलावलीला :—पोफळीच्या फळांस, सुपारी. विखुरी :—पसरी. खुरी :—झाडाचें नांव. मुकुलः—मोहोर. सहकार :—आम्रवृक्ष. १६ सखा सखिदोष साही :— मित्रा, मित्रदोष सहन कर. १७ हैमन :—हेमंत ऋतुविषयक. दर :—भय. मंजरि :—गुच्छ-परंपराः—मोहराच्या घडांची रांग. सहकार—सुमस्थिताः—आंब्याच्या फुलांमध्यें असलेला. अमरवर्ग :—देवगण. असितीं :—कृष्णपक्षीं. विधू :—चंद्र. रित :—रिकामा. १८ लोहित :—लाल. चूतज :— आंब्याचा. कुसूमसायकसा :—मदन. सायक :—बाण. साः—सारखा. अशिव :—अशुभ. पा :—रक्षण करणाऱ्या. हुतवाह्-समागमी :—अग्नीसह वर्तमान. २४ मरंदपानीं :—मध पिण्यांत. षट्पद :—भुंगे. आली :—पंक्ति. २७ भुजंग-निर्मोकसमान चीर :—सर्पाचे कातेप्रमाणें हलकें व पातळ वस्त्र. २८ वातायन :—खिडकी. २९ विदाघ :—उष्णता. रश्मिमाली :—सूर्य. रश्मि :—किरण, ३० चंड :— जोराचे. उष्ण. विवर्णा :—निस्तेज. तिक्रपरागलीला :—तिखटाचे कण. ३१ खगाचे—सूर्याचे. जलजंतुमाला :—पाण्यांतील अनेक किडे. दवाग्नी :—जंगलांत पेटलेली आग. शिखी :—अग्नी. कुळें:—थवे, समुदाय. ३३ कठोरः—जोरानें. करकाः—गारा. आवलीः—

पंक्ति. खरंगीं :–आकाशरुपी रंगभूमीवर. भोंवळोनी :–फिरवून. भूत-धात्री :–पृथ्वी. ३४ पयोधर :–ढग. ३५ सीरमुखोत्कषणाकुल :–नांगराच्या फाळानें नांगरलेलें. शिखी:–मोर. बलाक:–बगळे. कासार:–तळें. कूप :–विहीर. ३७ सस्यावलीला :–धान्यपंक्तीस. शुचिकाल-लीला :–ग्रीष्मऋतु. ३९ विषाणकोटी :–शिंग. वृष :–बैल. वप्रकेली:–शिंगानीं व पायानीं जमीन खणण्याची क्रीडा. कातराक्ष :–भयाकुल आहे दृष्टि ज्याची असें. ४० पन्नगपंचमीतें:–नागपंचमी. व्यालग्रही:–गारुडी. अही :–सर्प. रत्नाकरीं :–समुद्रांत. ४१ जराकाळ :–म्हातारपण.

## — फ ड णी स का व्य —

पृ. ४५ भृगुनंदनानें :–परशुरामानें. ४७ भट :–योध्दे. ५२ 'तिवरा ':–या नांवाचा सह्याद्रीमधील घाट. शाई :–धंदा, पेशा. ५४ वल्गुवचीं :–गोड. ५७ दोहदकालकामना :–डोहाळचांच्या कालांतील इच्छा. ६३ नाकसा :–श्रेष्ठ. ६६ नरयज्ञवाट :–नर यज्ञासाठीं केलेली जागा. खकोष:–नभोमंडळ. ६७ प्रतिबोध :–जागृती. ६८ पट्टिश:–पट्टे. तरवारी. ७० रागें:–प्रेमानें. ७२ हिंदुछाग :–बकरें. युद्धयाग:–यज्ञ. ७३ कंदुककेली :–चेंडूचा खेळ. ७४ क्षीणमयूखजाळ :–किरण समुदाय. ८० परिवेष:–खळें. ९४ गदार्ता:–रोगपीडित. ९५ मुमूर्षु:–मरणोन्मुख. ९९ सुकृताकर :–सत्कृत्यांची खाण पक्षीं सद्गुणी, संस्कृत-वान्. शुक्ति :–शिंप. १०० गजवक्र :–गणपति. ११६ असु:–प्राण. चार:–दूत, हेर. ११९ चाटु:–कुशल. १२० उल्हाटयंत्र:–तोफखाना. १२१ लोहनाडी :–बंदूक, तोफ. १२३ बिजारी भट:–गोरी इंग्रज सेना. अमोघसंधानकलानुरागी :–अचूक नेम धरण्यांत प्रवीण. १२५ व्यसू:– मेलेले. (विगत आहेत असू ज्यांचे) १२६ सालबीचा:–सालबाई याठिकाणचा. १२८ क्षीरमार्ग :–आकाशगंगा. भ-गणांनीं :–तारकांनीं. १२९ नयबळें:–न्यायानें. सुषमा:–शोभा, लाली. १३० दत्तवास-तरु:–औदुंबर. छलजाळ:–कपटजाळ. १३५ छलधाम:–लुच्चेगिरीचें ठिकाण. १३८ शर्म:–सुख. १४१ मर्कटचार:–माकडीचाळे करणारा. सहाय:–

मदतगार. १५० शित-जल-नलिकेचें :—थंड पाण्याच्या नळाचें.

## मोरोपंताचा प्रभुद्रोह

पृ. १६१ कनकविष्टरीं:— सिंहासनावर. दर:—भय. १६३ वायु-संधुक्षित:— वाऱ्यानें चेतवलेला. १६५ शिखा-प्रळय:— ज्वाला. १६८ कळी:— भांडण, वैर. १७३ प्रथिशिलीं:— फार ढिलें. रदीं:— दांत.

## आर्यमाता विलाप

पृ. १८७ झष:— मासा. १९० ‘ दावरा ’ :— त्या नांवाचा.

## महाराष्ट्रवीरादर्श काव्य

पृ. २२५ उद्गम:— येणें, फुलणें. २२६ व्दिशताधिकाब्द :— दोनशेंहून जास्त वर्षे. २३२ षण्मुखतात:—षडाननाचा बाप, शिव.

## गजासुर वध

पृ. २३७ शैल:— पर्वत. हिमरश्मिमाली:— चंद्र. २३९ आस्य:— मुख. २४० कलत्रें शशिशेखराच्या:— शंकराच्या बायकोनें.. जपावृक्ष :— जास्वंद. २५२ निशीथसमयीं:— सायंकाळीं. २५६ अध्वश्रम:—रस्ता, प्रवास. २६१ पयोधर:— मेघ. तति:— ओळ, रांग.

## किरातार्जुनीयाचें रूपांतर

पृ. २६८ नि:शंक:— खात्रीनें. स्नेह संपदावास :— स्नेहसंपत्तीचें घर. किंवा स्थान. २७१ प्रणिधि :—गुप्तहेर. वदारंभ :—त्यानें हातांत घेतलेलें काम. २७२ व्द्यर्थ युवराज :—तो दोन अर्थांनीं युवराज झाला ( १ ) दुर्योधनानें त्याला युवराज केलें व ( २ ) तारुण्यामुळें खरा

युवराज ( श्रेष्ठ तरूण ) झाला. धनंजयाला :—अर्जूनाला. परिमाण :— सीमा. उरगा:— सर्पाला. अमित :—पुष्कळ. धमनी :—फुंकणी. २७५ हरिणद्विजलूनाग्रीं :—हरिणाच्या दातांनीं तोडलेल्या टोकांच्या २७७ गुरुमनि :—बृहस्पती. हृदासम तीर्थद्वारें :—डोहाप्रमाणें. वशा :—हत्तीण. २७८ तोकः— मूल. नियतिला:—दैवाला. करगा:—हातांतील, स्वाधीन. २७९ मानी असु तेज नच करी खालीं:—मानी पुरूष प्राण खालीं करी, (टाकतो) पण तेजाची हानी होऊन देत नाहीं. २८१ वरपदः—श्रेष्ठ स्थान. कुरुपास :— दुर्योधनाला. २९२ अधिकारी:—अधिक + अरि, २९३ तयाचें :— त्या विघ्नपाताचें. उत्तरा गमनीं :—उत्तर दिशेला जातांना. २९४ काय :— शरीर. उडुवृंद :—नक्षत्रांचा समुदाय. नदीरमण:—समुद्र. २९५ पांडू:— पिवळट पांढरे. पंकजनितदोषशून्यता:—चिखलामुळें उत्पन्न झालेल्या दोषाचा अभाव. उपहार :— नजराणा. केली :—क्रीडा. जलज:—कमळ. शमनात्मजबंधु :—शमन (यम)आत्मज (मुलगा) युधिष्ठिर त्याचा बंधू अर्जून कंज:—कमळ. मेधा:—बुद्धि. २९६ कूला:—तीराला. बंधुजीवा:—एक प्रकारचें पुष्प. अधराभा:— ओठांची शोभा असणारी. रामा:—स्त्री. संहृतजीवन :—जलवर्णन. जीवन ॠतुचें कृतार्थ :—जीवित आमूल्य. तदवेक्षणपर :—तों पहाण्यांत गुंग. परतेजोघ्न :—शत्रु तेजाची हानी करणारा. गतिलाघव :—जलद चाल. स्तनभर लेलें :—कासांचा भार धारण करीत. वत्सस्मरणाधारा :—वांसरांच्या आठवणीमुळें उत्पन्न झालेल्या. विजय :— अर्जन. २९७ कुरु-कुलवृषभा :—कुरु कुलांत श्रेष्ठ असा. रहितावधि :— अमर्याद. कुल :—समुदाय. नदीकूल:—नदीचें तीर. ने गतिला :—नाशाला नेई वा नेतो. गाई या क्रियापदाचा कर्ता अर्जून (अध्याहृत) परहृदया :— पर + हृद्अया :—दुसऱ्याच्या हृदयरूपी लोहाला. नुरविती याचें कर्म आर्या २५ मधील कल शांत-ध्वनि. कमलाभ :—कमलासारखे तेजानें लाल शोभणारें. चलदेकाधरदलत्व मुखकमला :—मुखकमलाची अधरोष्टरूपी एकच पाकळी हालत आहे अशी उपमा. गोपीश्वरसख :—कृष्णमित्र अर्जुन. उपरमे :—थांबे. २९८ चलकनककुंडलाभा......पडली :—दधिमंथन समयीं हालणाऱ्या सुवर्ण कुंडलांची प्रभा गोपींच्या सुंदर मुखांवर पडली व त्यामुळें दोहोंसही लाभ झाला. आर्या २९ व ३० यांत पूर्वीचीच उपमा आहे.

खेळे हास्य न ...... दुजी न मती :– हास्य खेळत नव्हतें, मुखावर केंस विखुरले नसून जणूं मुंगेच धिरटचा घालीत होते. दांत दिसला नसून तंतूच दिसत होते व गोपींचें अंग सरोवर तुल्य दिसे. खेश्वर पुत्रः–स्वर्ग गामी इंद्र. सुकृतीः– कुशल. सूकृतीः–पुण्यवान. मय-श्री-हरिवयस्यः– मयासूर व कृष्ण यांचा मित्र. समयींः–योग्यवेळीं. समयीं:–कर्तव्यांत. आशु भली:–शीघ्र, २९९ विजयाः– अर्जुन. शुष्यत्पांसुतराः– जिच्यावरील धूळ अधिकाधिक शुष्क होत आहे. नवगुण परिचयघनः– ( वरील ओळींत सांगितलेले ) नवीन गुण परिचयामुळें दृढ झालेले. घनहेतुप्रेमबंधः–पर्जन्याबद्दलचे प्रेमपाश. पयोधरः–मेघ पक्षीं स्तन. रसनाः–कमरपट्टा. सापरतीः– स + अपरतीः– विटलेली. बर्हीः–मोर. भा लाधेः– शोभा आणतात. नलिनींः–कमळांनीं. नलिनींनीं:–कमलिनींच्या योगानें. शालिनीं:–भाताच्या पिकांनें. विटलीलासक्तः– विट + लीला + आसक्तः– जाराचें आचरण करण्यांत दंग झालेला. अंजनीदयिताः–अंजनीचा नवरा (वायु). वाणाः–वागण्याचा करारी क्रम. क्षीरोर्मिशुद्धः– दुग्धधारेप्रमाणें पांढरें. ३०० सरोजः–कमळ. शोधीः– स्वच्छ करी. शोधीः–तपास करी. घनकलत्राचाः–विजेचा. व्रजगमनीः– गोठयांत जाण्यासाठीं. ब्रम्हाख्यमुत्सखाः–ब्रम्हाख्य + मुद् + सखाः–ब्रम्हानंदाच्या तोडीचा शिखीसः–मोराला. गानवशवपूः–गाण्याला वश झालें आहे शरीर ज्याचें असें हरिण. नवशवपूज्यता :–नूतनप्रेताप्रमाणें शून्य भाव. व्रज-नारी :–गौळिणी. व्रजनारी :–व्रजन + अरि :–गमनाला प्रतिबंधक. ३०१ स्मरहतसम :– कामपीडितासारखा. शीकर :–तुषार. कमलाचे :– पाण्याचे. हिता :–सुखकर. विद्रुम :–पोंवळें. कमल-शिखा :–भाताच्या लोंबी. खातें :–आकाशांत. वासवचापलता :–इंद्रधनुष्य. चापलता :– चंचलपणा. सूक्त वळी :–उत्तम, भाषणांत तरबेज. पिहितरवि :–ज्यानें सूर्य झांकून टाकला आहे असा. पृथुवनराजिविराजित :–हिमालयाचा तळभाग वनराजीमुळें निळा दिसे व वरील भाग बर्फामुळें पांढरा दिसे म्हणून बळरामाच्या देहाची शोभा त्याला आली. ३०२ नागचर्म :–हत्तीचें कातडें. शरद् घनगण :–शरत्कालीन धन समूदाय. ३०३ बिहिततमा ततमाल-तमाल-वीथिकाः–अंधार करणारी रांगेनें वाढलेल्या तमाल वृक्षांची वाटिका. दानार्द्र शुभकरांनीं :–मदजलानें ओल्या व सुंदर अशा शुंडदंडांसह.

नगजा :—पर्वतावर जन्मलेली. पंकेरुह :— कमळ. ३०४ नागकुल :— सर्पांचें समुदाय. सुरचापश्री :—इंद्रधनुष्याची शोभा. ३०५ आगमाम् :— वेदांना. ३०६ अलि :—भुंगा. ३०८ अचळीं :—पर्वतावर. ३०९ पीतमहा :—पिवळें आहे तेज ज्याचें. मुकुर :—आरसा. ३१० शेषशून्य-शैलीं :—सर्व पर्वतांवर. शशिशेखरशीर्षशालिशशिशकल :— ( शशिशेखर :— शंकर ) ( शशिशका :-चंद्राची कोर ) शंकराच्या मस्तकावर शोभणारी चंद्राची कोर. ३१२ सारस-मराल-रव-युत :—कमळांतील भुंग्याच्या आवाजानें युक्त. महा:—आनंद.

## जहाल आणि मवाळ

पृ. ३१५ वदान्य :—उदार, दाता. ३१६ गाजी :—शूर, वीर. इंद्रजाळ :—माया, फसवणूक. ३१७ ग्रामपंचाननाला :—ग्रामसिंहाला, कुत्र्याला. मवाळां नृपा :—मवाळांस आणि राजाला. आळा :—नियंत्रण. प्रतिबंध. ३१८ जहालीं :—जहाल लोकांनीं. वाक्कुठारें :—शब्दरूप कुऱ्हाडीनें. मूळ धाडी :—बोलावणें धाडतो. नांव :—होडी. ३१९ स्वसा:—बहीण. तल्प :—निद्रा. ३२० खपुष्पें :—आकाश कुसुमें, अशक्य गोष्टी. ३२१ सांथशी:—रोगाच्या साथीप्रमाणें. मनीं पाप......पाप सारें:—ज्याचें मन वाईट त्याला सारेच वाईट दिसतात. ३२२ चारदृष्टि:—गुप्त-हेरांमार्फत ज्याला सर्व गोष्टी कळतात असा. आळ :—आरोप. अशेष:—सर्व. ३२३ अवार्य :—आवरण्यास कठीण. ३२४ विपद्राहुचा :—संकट रूपी राहूचा. मोक्षकाळीं :—ग्रहण सुटण्याचे वेळीं, सुटकेनंतर. तार धाडी वितार :—विनतारी संदेश. ३२६ स्वभूतें :—स्वदेशाला. कराळ :—भयंकर. न्यूनभाव :—उणेंपणा. ३२७ विश्रुता :—प्रसिद्ध. ३२८ व्युत्क्रमातें :—उलट स्थितीला. निदानीं :—शेवटीं. अन्नान्नकाळ :—उपासमार. ३३१ जघन्यार्थ निष्पादनीं :—हलका अर्थ मिळविण्याचें कामीं, Not failure but low aim is Crime या अर्थीं.

## दैवाचा खेळ

३३६ गुह :—स्कंद. रत्नाकर :—समुद्र, कार्तिकस्वामी. ३३७ महि-

षीसह :—पट्टाभिषिका राणी. ३३८ अस्त्रीजन :—अस्त्र धारण करणारे, स्त्री नव्हत ते. हरसुतासम :—शंकराचा पुत्र स्कंद त्याप्रमाणें. संग्रामायासः— लढण्याचे श्रम. खेद :—कष्ट, श्रम. गरांत :—विषाचे ठिकाणीं. उडुता :— नक्षत्रपणा. नाक :—स्वर्ग. ३३९ कच :—केश. आलिंगी तनु तिची समोह रसा :—मूर्च्छा येऊन धरणीवर पडली. रसा :—धरणी. एणी :— हरिणी. संभ्रमा :—भांबावून पळत सुटणें. ज्वलन :—अग्नि. सतनु :— सशरीर. हर्म्य--तल--सुरंगेनें :—राजवाड्याच्या तळांतून जाणारा गुप्तमार्ग. ३४० नैषध-नाथ-नतांगीः—दमयंती. हिंसोग्र :—हिंसेमुळें भयंकर. दावः— वन. दुर्वहगर्भभरार्ता :—दुःसह अशा गर्भाच्या ओझ्यामुळें पीडिलेली. ३४० निर्वर्तीः—संपादी, उरकी. तरुमृग :—वानर. कुवासर :—वाईट दिवस. ३४१ अर्कोपल :—सूर्यकांतमणि. जलाधाराः—सरोवराजवळ. अनिलोत्थित. स्फुलिंगीं :—विस्तवाच्या ठिणगींत. कम्बूसम :—शंखाकृति. अंसद्वय :— दोन्हीं खांदे. भुजांतर :—छाती. नतस :—नम्र असल्याप्रमाणें. रक्तोपल-निवह :—तांबड्या कमळांचा समूह. तनुजानन-पंकजा :— पुत्र-मुखकमळास. पाषाणद्रावका :—दगडाचाही भेद करणाऱ्या म्हणजे दगडासही पाझर फोडणाऱ्या. ३४२ पिपासानलें :—तृषारूप अग्नीनें. दीपार्चि :—दिव्याची ज्योत. अच्छिन्न नाभिनाला :—ज्याचा नाळ कापिला नाहीं त्याला. धरण्युत्संगीं :—पृथ्वीच्या मांडीवर. तत्काय :—तिचें शरीर. वरानना :—उत्तम मुख जिचें ती. भासुर :—चकाकणारें, तेजस्वी. या धी न :— मला बुद्धि नाहीं. मयही :—मयासुर. क्षीरोदधीफेनधवल :—क्षीरसागराच्या फेसाप्रमाणें पांढरें. दिवा :—स्वर्गाला. ३४३ भूसुर रमणी :—ब्राह्मणाची बायको. भवनदीजया नाव :—संसाररुपी नदी तरून जाण्यास होडी. कुतूहलाकुल रुदन :—जिज्ञासेनें व्याप्त. नाकच्युतसुरकुमार :—स्वर्गांतून पडलेला देवांचा बालक. दोलाचल-मानसा :—हिंदोळ्याप्रमाणें हेलकावे खाणारें मन जिचें. भूधरवर :—पार्वतीचा पती. ३४४ गरलग्रीव :— विषकंठ, शंकर. तदर्थ-परिपूर्ण-भारती गगनीं :—तोच अर्थ भरला आहे अशी वाणी. अग्रज :—वडीलबंधू. सितपक्ष-सुधाकरसा :—शुक्ल पक्षांतील चंद्रा- प्रमाणें. उपनयन-विधि :—मुंज. सिंधु :—समुद्र. केलीवन :—क्रीडावन. मधुमासें :—वसंत ऋतूनें. मनोज्ञ :—सुंदर. ३४५ यौवन-लक्ष्मी-विशेष-

कान्त-तनू :—यौवनामुळें ज्याचें शरीर विशेष रमणीय झालें तो. महाभाग :— भाग्यशाली. विश्रामार्थ :—विसाव्यासाठीं. निर्मोक :—कात, मेंग. ३४६ माराभिराम :—मदनाप्रमाणें सुंदर. ३४७ मराळी :—हंसी. मानसातें :— मानस सरोवराला. ३४८ हरिखाकुल :—हर्षयुक्त.

## श्री ग णे शा ष्ट क म्

पृ. ३५१ आस्यांबुजे :—मुखकमलें. ३६३ ६ व्या श्लोकांत एकपासून सहा आंकडे गंमतीनें योजिले आहेत. पहिल्या श्लोकांत बाळ गंगाधर टिळक या नांवाचा गंमतीनें उपयोग केला आहे. ३६४ दीपनिकेतनाभः— दीपगृहाप्रमाणें. ३७८ काराः—तुरुंग. ३८४ यदधि-गमशून्यः— ज्यांच्या अस्तित्वावांचून. ३८५ सानः—लहान. हारीः—रांगा. दर्शनीयः—सुंदर. ३८६ तुझ्या समायुक्त भोजनपात्रलीलाः-लोक तुझ्या पानांच्या पत्रावळी लावून त्यांवर जेवतात. ३८८ वर्णमालाः—रंग पक्षीं अक्षरें. ३९१ चारावलीशी वहुरूप धारीः—हेरांच्या पंक्तीप्रमाणें. ३९२ नोरः—गलबताचें भाडें. ३९३ अंगभंगाः—अंग विक्षेपास, हावभावास. जंगम बंदिशालाः—हलता तुरुंग. ३९४ सक्षणः—राक्षस. चंडवाराः— सोसाट्याचा वारा. ३९५ द्रव्यास मी, अन्य भिती जिवाशीं:—मला द्रव्यावद्दल व इतरांना स्वप्राणांबद्दल भिती वाटली. ३९६ धनद— प्रदत्तः—कुबेरानें दिलेलें. वाग्वज्र :—वज्रासारखी कठोर वाणी. मदाशागिरी होय पीठ :—माझ्या आशारूपपर्वताचें चूर्ण झालें; मी पूर्ण निराश झालों. ३९७ जशी जशी......घडे फलाचीः—करावें तसें भरावें. सत्पथास :— सन्मार्गाला. ३९८ धनाधिनाथें:—कुबेरानें, गाधिजोलाः-विश्वामित्राला ३९९ वंध्याः-विफळ. ४०० दंतुरभाव :—कातरलेली स्थिती. ४०१ नाकः—(स्वर्ग) शरिराचा अवयव. ४०६ ग्रंथिक ताप :—प्लेग. ४०७ भटमुंडकदुकगणें:-वीरांचीं मुंडकीं हेंच चेंडू, त्यांनीं. ४११ भिल्लरामाः— भिल्लीण. ४१८ रतिकांत :—मदन. श्रुती :—कर्ण. ४१९ हेमखंडः— सोन्याचे कण. लाक्षामिषें :—लाखेच्या रूपानें. ४२१ प्रत्यही :—दररोज. ४२५ निवह :—समूह. ४४० अठ्ठावनांत :—१८५८ सालांत.

# हिमालय वर्णन

४२८ तुहिन संतति :–बर्फाची रास. नगराजपदाश्रया :–पर्वतांचा राजा ही पदवी धारण करणारा. त्रिभुवन.....चया :–ज्याचें शुद्ध यश तीन जगांमध्यें माहीत आहे अशा. अदितिजा :–देवांस ( अदिती + ज )– दितिज :–असुर. कुतुल :–कौतुक. निकेतन :–घर. केतन :–घर खर.....साधना :–उग्र तपश्चर्या करण्याच्या सोईचें ठिकाण. गवराजधर :– शंकर. आश्रय :–वसतिस्थान. सुषमा :–उत्कृष्ट शोभा. विहितवर्ण (कीर्ति) असा नग ( पर्वत ) त्याचें उचित ( यथायोग्य ) वर्णना ( वर्णन करण्या-साठीं ) वर्णनगो ( वर्णनपर भाषा ) तीमध्यें चित्त ( समाविष्ट झालेले ) वर्ण ( अक्षरें ) विदित ना. भावार्थ :–सर्व विश्रुत असा जो हिमालय त्याचें हुबेहुब वर्णन करण्यास वर्णनपर भाषेमध्यें उपलब्ध असलेलीं अक्षरें अपुरीं पडतात. ४२९ रसवारित :–नीरस. प्रतिपदीं :–पावलोपावलीं. सवनेचरा :–कातकरी जींत रहातात अशी वनभू – वन ( पाणी ) भू ( जमीन ) पाणथळ जमिनी यांनीं युक्त अशी अरण्यभूमीची परंपरा. सरल :–देवदारू ( देवदार ) साल – या जातीचा वृक्ष. रसाल :–आम्र-वृक्ष. खगपालिका :–पक्ष्यांचें पालन करणारी. पवनपा :–वायू भक्षण करणारी. विबुधवास :–स्वर्ग. खवनदेवन :–आकाश रूपी अरण्याला सुशोभित करणारी. देवपदीं :–स्वर्गांत. भगण :–नक्षत्र समुदाय. ४३० सरस :–उत्सुक. अचलोन्नति :–पर्वताची उंची. द्रुवर :–मोठें वृक्ष. व्रततिसंतति :–लतांची मालिका. विटप :–शाखा. अहति :–( माघार न घेणें ) इष्टसिद्धि. संहति :–एकी, तिच्याशीं युक्त. दल :–पानें. खघनो-दरिंच्या :–आकाशांतील मेघांमधील. गर्जित :–गडगडणें. वनतर्जना :– अरण्य दणाणून सोडणारी. ४३१ मुग्ध :–भोळे. वितथ :–खोटें. अवितथ :–खरें. जडधी :–मूर्ख. श्लोक १७ व्यांत वाघ व श्रीकृष्ण यांचें साम्य श्लेष गर्भ भाषेंत दाखविले आहे. चार :–चेष्टा. गो-कुळीं :– धेनूंच्या समुदायांत पक्षीं गोकुळांत. विकृति :–या ऐवजीं विहृति असें वाचावें. विहृति :–विहार. रास :–ओरडणें पक्षीं रासक्रीडा. श्लोक १८ त कवि व वृक (लांडगा) ह्यांचें साम्य दर्शविलें आहे. सत्वपरि-

ग्रहा :–भक्ष्य श्वापदें धरण्यासाठीं, पक्षीं काव्यांत उत्तमपणा साधण्यासाठीं. पदक्रम :–उडया पक्षीं शब्दरचना. श्लोक १९ मध्यें – वराह (डुकर) व ज्योतिः–शास्त्रवेत्ता वराहमिहिर ह्यांची तुलना आहे. वेधविधी :–जमिनींत भोकें पाडण्याची क्रिया पक्षीं ग्रहांचे वेध घण्याचे व्यवसाय उडू :–पाणी पक्षीं नक्षत्रें. श्लोक २० यांत तरस व कुकवी ह्यांची तुलना केलेली आहे. वर्ण :–रंग पक्षीं अक्षरें. विकलता :–न्यूनपणा. ४३२ विषाण :–शिंगें. शोणित :–लाल. असित :–कृष्ण, काळे. लोहिता :–तांवडे. चटुला :–चपळ. विकट :–मोठा. रवितीव्रमहोमदा :–रवीच्या प्रखर तेजाचा गर्व. यवसजाल :–गवत. विशृंखल :–अनावर. गराग्नि :–गर (विष) त्यापासून उत्पन्न झालेला अग्नि. रविकरच्छुरिताग्रदलोच्चया :–सूर्य किरणांनी सारविलेला आहे शिरोभागस्थित पर्ण समुच्चय जिचा. रजनिवासरसंगतिसंशया :–दिवस आणि रात्र एकाचवेळीं एका ठिकाणी नांदत आहेत असा संशय. कृततमा :–अंधकार पाडणारी. स्वपरतापरता :–स्वतःस होणारा दुःसह ताप सहन करणारी. ४३२ श्रुतिसेविनी वेदाप्रमाणें चालणारी. ४३३ स्व-पर-ताऽपरता :–आपपर भाव जिला नाहीं अशी. श्लोक २८ ओळ १ मध्यें शेंकडों सुंदर इंद्रधनुष्यें ज्यावर आहेत असा. अमिताक्ष :–असंख्य अक्ष नांवाचे वृक्ष ज्यावर आहेत असा. पविकरा:--इंद्राला (पवि आहे हातांत ज्याच्या) श्लोक ३० यांत भवर (चंद्र) व भूधर (पर्वत) हिमालय ह्यांचा ऐक्यभाव कल्पिला आहे. पाद :–किरण पक्षीं पर्वताच्या पायथ्याशीं असणाऱ्या लहान लहान टेंकड्या. जनि :–जन्म. प्रतिकांत :–मनाला आवडणाऱ्या. ४३४ राजत :–रूपें. खनिजता :–खनिज द्रव्यांची संपत्ति. श्रमजल :–घाम. जलरूपसुता :–नद्या. नवरीति :–नवीन प्रकारची. ४३५ सुकरामत :–चांगली करामत. अ-दर :–भयरहित. रहितावधि :–निःसीम. शिखरीश :–पर्वतश्रेष्ठ. संसारससार्थ :–हंसांच्या समुदायांनीं युक्त. तरंग:–लाटा. ४३६ खरंगनटप्रभु :–आकाशरूपी नृत्यभूमीवर नृत्य करणारें नर्तकश्रेष्ठ. अपरति :–रुचिहीन. सुरालय :–स्वर्ग. अहिपति :–शेष. सुविधिनें :–सुदैवानें. विधिनें :–ब्रह्मदेवानें. श्लोक ४८ वा. कांताऽऽरवा :–मधुर शब्द करणारी. अरसदानकरी :–सुगंधयुक्त दान करणारी, कस्तुरी

देणारी. कांतारवास-रसदा :—अरण्यामध्यें रहाण्याची गोडी उत्पन्न करणारी. वृतभृगभारा :—भ्रमरांचे समुदाय धारण केले आहेत जिनें अशी. श्लोक. ४९ वनवशा गजराज :—रानटी हत्ती व हत्तीण. राजीवसेवनपरा :— कमलांचें सेवन करणारांमध्यें तत्पर. ४३७ श्लोक ५०. हरित :— हरण करतें. सन्नगमंडन :—( सत् + नग + मंडन ) उत्तम अशा हिमालयपर्वतास भूषण. हा शब्द २ ऱ्या ओळींतील मानस ह्या शब्दाकडे जातो. मानस—चित्त--हरित (हिरवें) सत् ( सुंदर ) नग ( वृक्ष ) मंडन (भूषण) आहेत ज्यास असें मानस -- मानस सरोवर – सुरस ( मधानें भरलेलीं ) सारस ( कमळें ) सार ( श्रू ) समाकुल ( युक्त ) सु ( गोड-स्वच्छ ) रस ( पाणी ) सार (संपत्ति) ज्यांत मुख्य गोड व स्वच्छ पाणी आहे असें, असारस :—हंसांनीं व्याप्त. माकुल :—मा ( लक्ष्मी ) कुल ( मंदीर ) श्लोक ५१ सु—रसाधरा—वरी – श्रेष्ठ पर्वत ( रसाधर ) जो हिमालय त्यावर. शिवा :—कल्याणी, शुभा. सकुतुका :—उत्साहानें. गिरीशजा :— ( गिरी + ईश + जा ) पर्वतश्रेष्ठ हिमालयाची मुलगी पार्वती. पुढील "या" या शब्दाचा संबंध ' सुरसाधरावरी ' या पदाकडे आहे. सुरसाधर -- ( सुरस + अधर ) सुंदर ओष्ठ असलेली पार्वती. वरीते :-- लग्न लावतें. कुतुका :—आश्चर्यास. गिरीशजाया :—शंकराची पत्नी -- ही -- झाली. गिरीशजा :—( हिमालयाची मुलगी ) गिरीशजाया झाली हें आश्चर्यास कारण. श्लोक ५० – धरा – पृथ्वी. धराया :—धारण करण्यास. महती :—मोठी. समान :—पूज्य. गौरवयुक्त :—( महती व समान धरा धराया ) धराधरा ( हिमालयास ) मह :—सामर्थ्य. तिच्या (पृथ्वीच्या) तोडीचें. धरा न ( धरीत नाहीं कां ? ) धरा (पृथ्वी) आयाम (विस्तार) हती (हिचा भार.) पृथ्वीच्या विस्ताराच्या भारास. मान :—गळा. कंठ आहे अशा धराधरा (शेषास ) धराधरा ( हिमालयास ) समा महती ( सारखी योग्यता) हिमालय व शेष ह्यांची योग्यता सारखी आहे असें ध्वनित केलें. कारण दोघेही भूधारणार्थ समर्थ असून दोघांचा वर्ण पांढरा आहे.

REFBK-0007252